मंगळवार
१० मार्च २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३६२
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत




# उच्च न्यायालयाची केजरीवाल यांच्यासह २३ जणांना नोटीस

## दिल्ली मद्य धोरण प्रकरण

नवी दिल्ली : दि. ९ वृत्तसंस्था

**दिल्ली मद्य धोरण प्रकरणी उच्च न्यायालयाने सोमवारी आपचे संयोजक अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया यांच्यासह सर्व २३ जणांना नोटीस बजावली. या प्रकरणातील सर्व आरोपींना निर्दोष मुक्त करण्याचा निर्णय देताना ट्रायल कोर्टाने केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) आणि तपास अधिकाऱ्यांविरुद्ध केलेल्या निरीक्षणांना उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. ट्रायल कोर्टाच्या निर्णयाविरोधात सीबीआयने उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी झाली.**



या याचिकेवर उच्च न्यायालय निर्णय घेईपर्यंत ट्रायल कोर्टाने सदर प्रकरणातील मनी लाँड्रिंगची सुनावणी घेऊ नये, असे निर्देश न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा यांनी दिले. त्यानंतर त्यांनी आरोपींना नोटीस बजावली आणि सीबीआयच्या याचिकेवर १६ मार्चपर्यंत त्यांचे उत्तर दाखल करण्यास सांगितले. सीबीआयने २७ फेब्रुवारीच्या ट्रायल कोर्टाच्या निकालाला आव्हान देणारी पुनर्विचार याचिका दाखल केली आहे.

सीबीआयची बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की, सध्या ते आरोपींच्या सुटकेला स्थगिती देण्याची मागणी करत नाहीत. तर फक्त ट्रायल कोर्टाचा निकाल अंमलबजावणी संचालनालय (ईडी) द्वारे स्वतंत्रपणे तपासल्या जाणाऱ्या मनी लाँड्रिंग प्रकरणावर परिणाम करणार नाही, असे निर्दे श देण्याची मागणी करत असल्याचे त्यांनी न्यायालयाला सांगितले.

### राष्ट्रीय लज्जेचा विषय

तुषार मेहता म्हणाले की, उत्पादन शुल्क धोरण घोटाळा हा देशाच्या इतिहासातील सर्वात मोठ्या घोटाळ्यांपैकी एक आहे. माझ्या मते हा राष्ट्रीय लज्जेचा विषय आहे. वैज्ञानिक तपास करण्यात आला. कटाचे प्रत्येक पैलू सिद्ध झाले, असे त्यांनी म्हटले. त्यांनी असाही युक्तिवाद केला की साक्षीदारांचे जबाब होते ज्यातून कट स्पष्टपणे सिद्ध झाला. दरम्यान, राऊस अव्हेन्यू न्यायालयाचे विशेष न्यायाधीश जितेंद्र सिंह यांनी २७ फेब्रुवारी रोजी या प्रकरणातील सर्व आरोपींना दोषमुक्त केले. सीबीआयने केवळ अनुमानाच्या आधारे खटला सुरु केल्याचे निरिक्षण न्यायालयाने नोंदवले होते.

## थोडक्यात

### दिल्लीहून मँचेस्टरला जाणाऱ्या इंडिगो विमानाचा यू-टर्न



**नवी दिल्ली:** दिल्लीहून मँचेस्टरला जाणारे इंडिगोचे विमान ७ तास उड्डाण केल्यानंतर परत आले. इंडिगोच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, फ्लाइट ६३३ ने इथिओपिया आणि एरिट्रियाच्या सीमेवर यू-टर्न घेतला आणि आता ते दिल्लीला परत जात आहे. अधिकाऱ्याने सांगितले की, मध्यपूर्वेत सुरू असलेल्या युद्धामुळे शेवटच्या क्षणी हवाई मार्गावर बंदी घालण्यात आली. त्यानंतर वैमानिकाला अर्ध्या वाटेतून परतण्याचा निर्णय घ्यावा लागला. हे विमान सोमवारी सकाळी दिल्लीहून युनायटेड किंगडम मधील शहरासाठी निघाले होते. २६ फेब्रुवारीनंतर इंडिगोची ही पहिली दिल्ली-मँचेस्टर फ्लाइट होती. दीर्घकाळ बंद असलेला हा मार्ग काही काळानंतर पुन्हा सुरू झाला होता. सामान्य परिस्थितीत फ्लाइटला सुमारे ११ तास लागतात.

### घरगुती एलपीजी सिलेंडर बुकिंगचा कालावधी वाढवला

**नवी दिल्ली:** मध्य पूर्वेतील (वेस्ट एशिया/ईरान-इस्रायल संघर्ष) युद्धामुळे जागतिक तेल आणि नैसर्गिक वायू पुरवठा साखळी विस्कळित झाली असून, त्याचा परिणाम भारतासह अनेक देशांवर पडला आहे. इंधन पुरवठ्यातील अनिश्चिततेमुळे देशात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीची मागणी वाढली आहे. अशा परिस्थितीत केंद्र सरकारने घरगुती एलपीजी सिलेंडर बुकिंगचा कालावधी आणखी वाढवला आहे. पेट्रोलियम मंत्रालयाने आज (९ मार्च) घरगुती गॅस सिलेंडर बुकिंगचा न्यूनतम अंतर २१ दिवसांवरून २५ दिवसांपर्यंत वाढवला आहे. हा निर्णय साठेबाजी (हॉर्डिंग) आणि ब्लॅक मार्केटिंग रोखण्यासाठी घेण्यात आला आहे. सरकारी सूत्रांनी सांगितले की, सध्या घरगुती गॅस, डिझेल किंवा पेट्रोलचा कोणताही तुटवडा नाही. मात्र, युद्धामुळे निर्माण झालेल्या भीतीमुळे काही ठिकाणी पॅनिक बुकिंग आणि साठेबाजी सुरू झाली आहे.

# तुम्ही मध्यरात्री याचिका लिहिली का?

## वकिलाच्या अजब मागण्यांवर सुप्रीम कोर्ट संतप्त

नवी दिल्ली : दि. ९ वृत्तसंस्था



तुम्ही या सर्व याचिका मध्यरात्री तयार करता का?, असा संतप्त सवाल करत सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी एका वकिलाने दाखल केलेल्या पाच जनहित याचिका
फेटाळून लावल्या. तसेच सर्वच याचिका असंबद्ध आणि निराधार असल्याचेही न्यायालयाने फटकारले. वकील सचिन गुप्ता यांनी दाखल केलेल्या पाचपैकी एका याचिकेत कांदा आणि लसूण मध्ये ''तामसिक'', म्हणजेच नकारात्मक, ऊर्जा आहे का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती.कांदा आणि लसणाशी संबंधित याचिकेत असा युक्तिवाद करण्यात आला होता की, जैन धर्मात हे पदार्थ तामसिक मानले जातात आणि ते खाल्ले जात नाहीत. यावर सरन्यायाधीशांनी आक्षेप घेत विचारणा केली की, तुम्हाला जैन समाजाच्या भावना का दुखावायच्या आहेत?. न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांचाही समावेश असलेल्या खंडपीठाने या याचिका स्पष्ट आधार नसलेल्या आणि विसंगत असल्याचे स्पष्ट केले. न्यायालयाने फटकारल्यानंतरही वकिलाने अजब युक्तिवाद केला. ही एक सामान्य समस्या आहे; गुजरातमध्ये जेवणात कांदा वापरल्यामुळे एका व्यक्तीने घटस्फोटही घेतला आहे, यावर संताप व्यक्त करत सरन्यायाधीशांनी इशारा दिला की, पुढच्या वेळी जर तुम्ही अशा निरर्थक याचिका घेऊन आलात, तर आम्ही काय करू शकतो हे तुम्हाला समजेल. जर तुम्ही वकील नसता, तर आम्ही तुमच्यावर मोठा दंड ठोठावला असता, अशा शब्दांत सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी आपली नाराजी व्यक्त केली. या याचिकांना कोणताही कायदेशीर आधार नसल्याचे सांगत न्यायालयाने सर्व याचिका फेटाळून लावल्या.

### अन्य याचिकाही फेटाळल्या

सचिन गुप्ता यांनी दाखल केलेल्या इतर जनहित याचिकाही न्यायालयाने फेटाळून लावल्या. यामध्ये प्रामुख्याने दारू आणि तंबाखू उत्पादनांमधील हानिकारक घटकांवर नियंत्रण आणणे; मालमत्तेची नोंदणी अनिवार्य करणे; शास्त्रीय भाषा घोषित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे ठरवणे या मागण्या होत्या.

# कर्नाटक राज्यात मुख्यमंत्री बदलला जाण्याची शक्यता!

## शिवकुमार आणि मुख्यमंत्री तातडीने दिल्लीला रवाना

बेंगळुरू: दि. ९ वृत्तसंस्था

कर्नाटकमध्ये पुन्हा एकदा सत्ता बदलली जाणार अशी चर्चा रंगू लागली आहे. कर्नाटकमध्ये भाजप ऑपरेशन लोटस राबवणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. त्यातच काँग्रेस पक्ष आपली सत्ता गमावणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. काँग्रेसचे कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डिके शिवकुमार हे दिल्लीला गेले आहेत. त्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना डिके शिवकुमार यांनी मुख्यमंत्री बदलला जाणार का या चर्चेला उधाण आले आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशन झाल्यावर राज्यात नेतृत्व बदलले जाण्याची शक्यता आहे. सिद्धरामय्या यांच्या ऐवजी डिके शिवकुमार हे मुख्यमंत्री होण्याची शक्यता आहे. डिके शिवकुमार काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासोबत कलबुर्गीवरून दिल्लीला रवाना झाले. समोर आलेल्या माहितीनुसार डिके शिवकुमार आपल्या खासगी कार्यक्रमानिमित दिल्लीला गेले आहेत; मात्र त्यांच्या दिल्ली दौऱ्यामुळे राजकीय चर्चा सुरू झाल्या आहेत. आजपर्यंत मी कधीही मुख्यमंत्रीपदाबाबत भाष्य केलेले नाही. आमच्यामध्ये असलेल्या गोष्टी मी, मुख्यमंत्री आणि हायकमांडपुरते मर्यादित आहेत. जो काही निर्णय घेतला गेला आहे त्यात आमचा सहभाग आहे. यापलीकडे मी कधीही काहीही बोललो नाही, असे डिके शिवकुमार म्हणाले. दरम्यान काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रीपदावरून हा वाद सुरू आहे. दोन नेत्यांमध्ये शीतयुद्ध सुरू आहे. सध्या पुढील काही तास काँग्रेससाठी महत्वाचे समजले जात आहे. मात्र सर्वांच्या नजरा या भाजपकडे खिळल्या आहेत. काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या या वादाचा फायदा भाजप उठवणार का? अशी चर्चा सुरू झाली आहे. भाजप कर्नाटकमध्ये ऑपरेशन लोटस राबवून सरकार स्थापन करण्याचे प्रयत्न करणार का? अशी चर्चा सुरू झाली आहे.



### शिवकुमार आणि सिद्धरामय्या यांच्यात वाद

कर्नाटकच्या मुख्यमंत्रीपदावरून डिके शिवकुमार आणि सिद्धरामय्या यांच्यात वाद सुरु असल्याचे पाहायला दिसून येत आहे. काँग्रेस हायकमांडने संधी दिल्यास मी आणखी दोन अर्थसंकल्प सादर करू शकतो असे सिद्धरामय्या म्हणाले होते. शुक्रवारी त्यांनी राज्याचे अर्थमंत्री म्हणून १७ वा अर्थसंकल्प सादर केला. डिके शिवकुमार यांना पाठिंबा देणाऱ्या काही आमदारांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन झाल्यावर आमच्या नेत्याला मुख्यमंत्री करण्याची इच्छा व्यक्त केली असल्याचे म्हटले जात आहे.

# स्टॅम्प पेपरवरील करार विवाह हिंदू कायद्यानुसार अवैध : हायकोर्ट

कोलकाता: दि. ९ वृत्तसंस्था

केवळ स्टॅम्प पेपरवर स्वाक्षरी करून केलेला विवाह हा हिंदू कायद्यानुसार वैध मानला जाऊ शकत नाही. अशा विवाहाच्या आधारावर भारतीय दंड संहितेच्या कलम ४९४ (द्विपत्नीत्व) किंवा ४९८-अ (विवाहित महिलेचा छळ) अन्वये गुन्हा दाखल करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल कोलकत्ता उच्च न्यायालयाने दिला आहे.

एका महिलेने (तक्रारदार) दावा केला होता की, २७ जून २०११ रोजी त्यांचा विवाह झाला होता. पत्नीने द्विपत्नीत्व आणि छळाचे आरोप करत फौजदारी खटला दाखल केला होता. महिलेने दावा केला होता की, दोघांनी स्टॅम्प पेपरवर स्वाक्षरी करून विवाह केला होता. त्यानंतर ते एकत्र राहत होते. मात्र, पतीने नंतर दुसरा विवाह केला. अर्जदाराने त्यांच्याविरुद्ध दाखल झालेला खटला रद्द करण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायमूर्ती उदय कुमार यांनी या प्रकरणाची सुनावणी करताना स्पष्ट केले की, हिंदू विवाह कायदा, १९५५ च्या कलम ५ आणि ७ नुसार, हिंदू विवाह वैध ठरण्यासाठी तो विहित धार्मिक विधी आणि परंपरांनुसार (उदा. सप्तपदी) संपन्न (पान २ वर)

# महिला आणि विद्यार्थिनींनी रचला इतिहास!

## मोडला सांगलीकरांचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड

मुंबई: दि. ९ वृत्तसंस्था

**जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने डोंबिवलीसह कल्याण तालुक्यातील ९ हजार १११ महिला आणि विद्यार्थीनीनी एकत्र येत सामूहिक लेझीम वादनात एक जागतिक वर्ल्ड रेकॉर्ड करून डोंबिवलीच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला आहे.**

भाजप प्रदेशाध्यक्ष, आमदार रविंद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार आणि कल्याण तालुका शारीरिक शिक्षण समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामूहिक लेझीम वादन स्पर्धेत रविवारी येथील श्री संत सावळाराम क्रीडा संकुल या क्रीडांगणामध्ये ठाणे जिल्ह्यातील शेकडो शाळांच्या विद्यार्थीनी आणि महिला भगिनी आदींनी एकत्र येत ९,१११ एवढ्या मोठ्या संख्येने सामूहिकपणे लेझीम वादनाचा वर्ल्ड रेकॉर्ड केला. या आधी सांगलीकरांच्या नावाने हा रेकॉर्ड होता, गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे लंडनहून आलेले अधिकारी स्वप्नील डांगरेकर यांनी सांगितले. त्या ठिकाणी या आधी ७ हजार ३३८ महिलांनी एकत्र येऊन तो रेकॉर्ड रचला होता, मात्र तो रविवारी डोंबिवलीत मोडण्यात आल्याचे त्यांनी जाहीर केले. साडेपाच मिनिटांची विविध प्रात्यक्षिक सादर करून महिलांनी हा रेकॉर्ड केला. त्यावेळी स्वप्नील डांगरेकर यांनी आमदार रविंद्र चव्हाण यांच्या पत्नी सुहासिनी रविंद्र चव्हाण यांच्याकडे वर्ल्ड रेकॉर्ड झाल्याचे सर्टिफिकेट व मेडल हस्तांतरीत केले. शिक्षक, (पान २ वर)



### लेझीम ही आपली संस्कृती

रविंद्र चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानत लेझीम ही आपली संस्कृती असून ती टिकवणे हे आपले काम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाच्या वर्षी शारीरिक व्यायामावर भर देऊन जगासमोर सशक्त भारत कसा असू शकतो हे दाखवून देण्याचा संकल्प सोडला होता, त्या निमित्ताने महिला आणि विद्यार्थीनी आदींनी एकत्र येऊन हा अनोखा रेकॉर्ड केला याचा मला डोंबिवलीकर म्हणून प्रचंड आनंद आहे, हा रेकॉर्ड मी भारत मातेच्या चरणी समर्पित करतो असेही उद्गार त्यांनी यावेळी काढले. कल्याण तालुका शारीरिक शिक्षण समितीचे त्यांनी आभार मानले.

# पायलटला बळीचा बकरा बनविले जात आहे- पवार

## अजित पवार विमान अपघात प्रकरण



नवी दिल्ली : दि. ९ वृत्तसंस्था


उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी नव्याने प्रश्न उपस्थित करत आमदार रोहित पवार यांनी गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणात पायलटला बळीचा बकरा बनवले जात असून, काही प्रभावशाली लोकांना वाचवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा दावा त्यांनी केला. या प्रकरणाचा तपास स्वतंत्र यंत्रणेकडे द्यावा, अशीही मागणी त्यांनी केली आहे.


रोहित पवार म्हणाले की, अजित पवारांना न्याय मिळावा यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. या प्रकरणात मोठा दबाव निर्माण झाल्याचे दिसत आहे. पायलटवर दोष टाकण्याचा प्रयत्न होत असून, प्रत्यक्षात त्याला बळीचा बकरा बनवले जात आहे. त्यांनी आरोप केला की, व्ही.के. सिंग यांनी पायलटवर जबाबदारी ढकलण्याचा प्रयत्न केला आहे. अपघाताच्या वेळी दृष्यमानता (व्हिजिबिलिटी) कमी असल्याची माहिती पायलटने आधीच दिली होती. मात्र त्यावेळी 'तू टेकऑफ घे, नंतर पाहू' असे सांगण्यात आले होते, असा दावा त्यांनी केला.

रोहित पवारांनी सांगितले की, अपघातानंतर पायलटच्या रक्ताची तपासणी करण्यात आली आणि त्यात दारू किंवा कोणतेही विषारी पदार्थ आढळले नाहीत. त्यामुळे पायलटवर दबाव टाकला गेला होता का, असा प्रश्न उपस्थित होतो. मग पायलटवरच जबाबदारी का टाकली जात आहे आणि व्ही.के. सिंग यांना का वाचवले जात आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. (पान २ वर)

### टेकऑफ घेण्याचा सल्ला कोणी दिला?

दृष्यमानता ५ हजार मीटरपेक्षा कमी नव्हती, असे सांगितले जात असताना टेकऑफ घेण्याचा सल्ला कोणी दिला? यामागे दबाव होता का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. तसेच एस. एन. शर्मा हे प्रफुल्ल पटेल यांच्या जवळचे व्यक्ती असल्याचा उल्लेखही त्यांनी केला. अजित पवारांच्या विमान अपघाताचा तपास केंद्रीय तपास यंत्रणा सीबीआय कडे देण्याची मागणीही रोहित पवारांनी पुन्हा एकदा केली. मात्र ही मागणी स्वीकारली जात नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.



# पान 1 वरून...

## स्टॅम्प पेपरवरील करार विवाह हिंदू...

होणे आवश्यक आहे. स्टॅम्प पेपरवर केलेला करार हा केवळ एक कागदोपत्री व्यवहार आहे. द्विपत्नीत्वाच्या खटल्यात पहिला विवाह कायदेशीर अर्थाने संपन्न झालेला असणे अनिवार्य आहे. तक्रारदाराने स्वतः हा विवाह स्टॅम्प पेपरवर आधारित असल्याचे मान्य केल्यामुळे, द्विपत्नीत्वाचा आरोप लावणे कायदेशीररित्या अशक्य आहे. जोपर्यंत पहिला विवाह कायदेशीररित्या सिद्ध होत नाही, तोपर्यंत द्विपत्नीत्व हा गुन्हा लागू होत नाही. तसेच, जिथे विवाहाचे कायदेशीर अस्तित्वच नाही, तिथे पती हे नाते सिद्ध होत नसल्याने कलम ४९८-अ अंतर्गत छळाचा गुन्हाही टिकू शकत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

-------------------------

**संशयिताविरोधात सर्व फौजदारी खटले केले रद्द**

''करार विवाहाचा वापर फौजदारी कारवाईसाठी पाया म्हणून करता येणार नाही,'' असे स्पष्ट करत न्यायालयाने संबंधित व्यक्तीविरुद्धचे सर्व फौजदारी खटले रद्द केले मात्र, तक्रारदार महिला घरगुती हिंसाचार कायदा, २००५ अंतर्गत किंवा नागरी न्यायालयांत अन्य पर्यायी कायदेशीर मदत मागू शकते, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

## महिला आणि विद्यार्थीनींनी रचला...

विद्यार्थी आदींना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सारा आसमंत भारत माता की जय, जय श्रीराम, वंदे मातरमने दणाणून सोडला होता. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर वर्ल्ड रेकॉर्ड केल्याचा आनंद ओसंडून वाहत होता. लेझीमचा झुंकार सर्वत्र निनादत होता, ढोल ताशांच्या गजरात त्या रेकॉर्डचे हजारो डोंबिवलीकरांनी स्वागत केले आणि प्रत्येकाच्या सहभागाबद्दल कौतुक करण्यात आले. अशा दैदिप्यमान सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी पहाटेपासून डोंबिवलीकर प्रतीक्षेत होता, अखेर वर्ल्ड रेकॉर्डची घोषणा होताच प्रचंड जल्लोषात त्याचा आनंद व्यक्त करण्यात आला.

## पायलटला बळीचा बकरा....

याचबरोबर अजित पवारांचे विमान ''अपघाताने पडले की पाडले गेले?'' याचे स्पष्ट उत्तर मिळाले पाहिजे, असेही ते म्हणाले. या प्रकरणात काही मोठ्या आणि प्रभावशाली लोकांचा दबाव असल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. रोहित पवारांनी आणखी एक दावा करत सांगितले की, रोहित सिंग यांच्या लग्नसमारंभात अनेक मोठे आणि प्रभावशाली नेते उपस्थित होते. त्या कार्यक्रमात गायक यो यो हनी सिंग यांनी गाणेही सादर केले होते. या कार्यक्रमात प्रफुल पटेल यांच्यासह अनेक मोठे नेते उपस्थित होते, असा दावा त्यांनी केला. या संदर्भात त्यांनी प्रफुल्ल पटेल यांना विनंती केल्याचे सांगितले की, त्या पार्टीत नेमके कोण-कोण उपस्थित होते, याची माहिती त्यांनी द्यावी. त्या कार्यक्रमात खूप प्रभावशाली लोक उपस्थित होते आणि तेच रोहित सिंग यांना वाचवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

# राज्यात हुंडा संबंधित गुन्ह्यांमध्ये घट

## मंत्री पंकज भोयर यांची विधानसभेत माहिती

**मुंबई, दि.९** वृत्तसंस्था

गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात हुंडा संबंधित गुन्ह्यांमध्ये घट झाली आहे, अशी माहीती मंत्री पंकज भोयर यांनी दिली आहे. तसेच, राज्य सरकारने दक्षता समित्या आणि विशेष चौकशी पथकांच्या माध्यमातून या प्रथेविरुद्ध कारवाई तीव्र केली असल्याचे त्यांनी नमूद केले. विधानसभेत उपस्थित केलेल्या एका लक्षवेधी प्रस्तावाला उत्तर ते उत्तर देत होते.

भोयर म्हणाले, हुंडासंबंधित गुन्हे २०२२ मध्ये १८० होते, ते २०२५ मध्ये १३८ पर्यंत कमी झाले आहेत आणि यामध्ये ३१३ जणांना अटक करण्यात आली आहे. महिला आणि बालविकास विभागाने अधिसूचित केलेल्या महाराष्ट्र हुंडा प्रतिबंधक नियम २००३ द्वारे राज्याने हुंडा विरोधी कायदा लागू केला आहे.

अशा प्रकरणांवर लक्ष ठेवण्यासाठी राज्य, जिल्हा आणि तालुका पातळीवर हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्यांची नियुक्ती, महिला आणि मुलांवरील गुन्हे रोखण्यासाठी अतिरिक्त महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालील पोलिसांमध्ये स्वतंत्र



शाखा स्थापन करणे यासह सरकारने उपाययोजना केलेल्या आहेत.


हुंडा आणि घरगुती हिंसाचाराच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी महिलांसाठी हेल्पलाइन, भरोसा सेल, दक्षता समित्या आणि विशेष पोलिस तपास पथके यासारख्या यंत्रणा स्थापन करण्यात आल्या आहेत, असे भोयर म्हणाले.

चर्चेदरम्यान, अनेक आमदारांनी हुंडा प्रकरणात न्यायाला होणाऱ्या विलंबाबद्दल चिंता व्यक्त केली. काँग्रेसच्या ज्योती गायकवाड यांनी कायदेशीर तरतुदी असूनही हुंडा प्रकरणी झालेल्या मृत्यूंबद्दल जिल्हावार डेटा मागितला. त्यांनी अशा प्रकरणांमध्ये पोलिस तपासाचा कालावधी आणि प्रक्रिया जलद करण्यासाठी उचललेली पावले याबद्दल देखील विचारले.

# राज्यभरात ८१ शिक्षक-कर्मचाऱ्यांचे निलंबन

## शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ

**मुंबई, दि. ९** वृत्तसंस्था



राज्यात दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षांदरम्यान मास कॉपीच्या प्रकारांवर मोठी कारवाई करण्यात आली असून आतापर्यंत ८१ शिक्षक व कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. ही माहिती राज्य मंडळाने परिपत्रकाद्वारे दिली आहे.

यंदा परीक्षा केंद्रांवर लावलेल्या सीसीटीव्ही यंत्रणेमुळे मास कॉपीचे प्रकार पुराव्यासह समोर आले. त्यानंतर संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे.

बीड जिल्ह्यातील चौसाळा येथील कला-विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या केंद्र क्रमांक २२४ वर बारावीच्या परीक्षेदरम्यान कॉपी झाल्याचे उघड झाले. या प्रकरणात प्रशासनाने १७ कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना निलंबित केले. हा प्रकार १० फेब्रुवारी रोजी पहिल्याच पेपरच्या दिवशी घडल्याची माहिती आहे.

तसेच कन्नड तालुक्यातील जैतापूर येथील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालयाच्या केंद्र क्रमांक ००७९ वरही सामूहिक कॉपीचा प्रकार उघडकीस आला.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये पर्यवेक्षक आणि केंद्र संचालक प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करत असल्याचे दिसून आल्याने २४ जणांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून त्यापैकी २१ जणांना निलंबित करण्यात आले आहे.

दरम्यान जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील दोन केंद्रांवर इंग्रजी विषयाच्या पेपरदरम्यान विद्यार्थ्यांकडून कॉपी करताना आढळले. या प्रकरणात पर्यवेक्षक म्हणून नियुक्त असलेल्या ५ शिक्षकांवर कारवाई करण्यात आली आहे.

याशिवाय गडचिरोली जिल्ह्यातील एका परीक्षा केंद्रावर राज्यशास्त्र विषयाच्या पेपरमध्ये मायक्रोनोट्स आणि प्रिंटआउटच्या मदतीने सामूहिक कॉपी केल्याचे आढळले. या प्रकरणात तीन शिक्षक आणि एका शिपायावर गुन्हा दाखल करून सर्वांना निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईमुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

# इराण युद्धामुळे इंधन तुटवडा की फक्त अफवा?

## मुख्यमंत्री फडणवीसांचे महत्त्वाचे आवाहन

**मुंबई, दि. ९** वृत्तसंस्था

.टी-२० वर्ल्डकपच्या सामन्यात भारतीय क्रिकेट संघाने ऐतिहासिक विजय मिळवला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीम इंडियाच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक केले. यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी इराण-इस्रायल युद्धाबाबतही महत्त्वाचे विधान केले. या युद्धामुळे तेल, गॅसचा तुटवडा निर्माण होण्याची भीती भारतीय नागरिकांमध्ये आहे. अफवांवर विश्वास ठेवून साठे केल्यास परिस्थिती खराब होऊ शकते



असे त्यांनी सांगितले.

अमेरिका, इजराईल आणि ईरान यांच्या युध्दात तेल साठ्यांचे मोठे नुकसान झाल्याने इंधन तुटवड्याच्या अफवा पसरत आहेत. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही महत्वाची माहिती दिली.

# राज्यात आजपासून रिक्षा परवाना देण्यास स्थगिती

## मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**मुंबई, दि. ९** वृत्तसंस्था

राज्यात आजपासून रिक्षांचे परवाने देण्यास स्थगिती देण्यात आली आहे. राज्य मंत्रिमंडळात रिक्षाचे परवाने देण्याबाबत योग्य नियमावली बनवण्यात येणार आहे. त्यानंतर रिक्षाचे परवाने देण्यात येणार आहेत. तोपर्यंत आता रिक्षाच्या परवान्यांचे वाटप केले जाणार नाहीत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याबाबत माहिती दिली आहे.

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात रिक्षा परवाना देण्यास आजपासून स्थगित करण्यात आले आहे. याबाबत आता मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा होणार आहे. या



बैठकीत योग्य ती नियमावली तयार करण्यात येणार आहे. या नव्या नियमावलीनुसार आता रिक्षाची परवाने दिली जाणार आहेत. स्वत: परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याबाबत माहिती दिली आहे. राज्यात आता सर्रासपणे रिक्षा परवाने मिळणार नाहीत. केंद्रीय वाहतूक मंत्र्यांसोबत पत्रव्यवहार केल्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी हा निर्णय घेतला आहे. याबाबत मंत्रिमंडळात चर्चा केल्यानंतर योग्य नियमावली तयार करुन परवाने दिले जाणार आहेत. तोपर्यंत परवाने दिले जाणार नाहीत. मात्र तोपर्यंत परवाने दिले जाणार नाहीत, असं स्पष्ट करण्यात आलं आहे. प्रताप सरनाईक यांनी याबाबत महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे.

''अनेक वर्षांपासून राज्यात रिक्षाचे परवाने खुले केले गेले होते. पण अनेक संघटनांनी, रिक्षा असोसिएशनने मागणी केली होती की, रिक्षांची संख्या जास्त झाली आहे. त्यामुळे व्यवसायावर परिणाम होतो. त्याचबरोबर अनेक लोकप्रतिनिधींनी मागणी केली होती की, रिक्षांच्या जास्त संख्येमुळे वाहतूकीची मोठी समस्या निर्माण होते. पर्यावरणाचा ऱ्हास होतो म्हणून काही पर्यावरणादींनी देखील याबाबत मागणी केली होती. त्यामुळे मी सातत्याने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करत होतो. पण केंद्र सरकारची परवानगी नसल्यामुळे आम्ही त्यावर बंदी घालू शकत नव्हतो'', असं प्रताप सरनाईक म्हणाले.

# श्रीराम विद्यालयात विज्ञान दिन संपन्न



**अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ :** दि. २८ फ ब्रुवारी ला श्रीराम विद्यालयात विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवाभाऊ मोहोड होते. तर प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले मलकापूर केंद्राचे केंद्रप्रमुख घोगरे सर तर शिवर केंद्राचे केंद्रप्रमुख वानखडे सर होते. प्रमुख अतिथींच्या हस्ते विज्ञान प्रदर्शनाचे फीत कापून उदघाटन करण्यात आले. त्यानंतर अध्यक्ष शिवा मोहोड व प्रमुख अतिथींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वाहस्ते बनविलेल्या विज्ञान प्रकल्पांचे निरीक्षण केले विद्यार्थ्यांनी प्रकल्पासाठी कोणते साहित्य वापरले. प्रकल्पाविषयी विविध प्रश्न विचारून त्याविषयी माहिती विचारली. विद्यार्थ्यांनी बनविलेल्या प्रकल्पाचे आलेल्या पाहुण्यांनी कौतुक केले. त्यानंतर श्री घोगरे सर केंद्रप्रमुख व श्री वानखडे सर यांनी विज्ञान दिवसाविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# रायगडावरून राज ठाकरेंची गर्जना !

**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाच्या आज स्थापनेला २० वर्षे पूर्ण झाली आहेत. या ऐतिहासिक वर्धापनदिनानिमित्त रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी एक खास कार्यक्रम पार पडला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले आणि महाराजांच्या आशीर्वादाने पक्षाच्या सदस्य नोंदणी मोहिमेला औपचारिक सुरुवात केली. दरवर्षी पक्षाचा वर्धापन दिन हॉल किंवा बंदिस्त जागेत साजरा केला जातो, जिथे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. मात्र यंदा राज ठाकरे यांनी वेगळी रणनीती अवलंबली. त्यांनी सांगितले की, ९ मार्च हा वर्धापन दिन असून १९ मार्चला गुढीपाडव्याच्या मेळाव्याची तारीख आहे. ''म्हणून मी ठरवले की, जे काही बोलायचे ते १९ तारखेलाच बोलून टाकू. ९ तारखेला फक्त सदस्य नोंदणी सुरू करूया,'' असे ते म्हणाले. कार्यक्रमात राज ठाकरे यांनी मनसे कार्यकर्त्यांशी संवाद साधला. ते म्हणाले, ''पक्ष सदस्य नोंदणी गेल्या काही दिवसांपासून सुरू होती. आज वर्धापनदिनी आम्ही ती अधिक जोमाने पुढे नेतो. माझे सर्व महाराष्ट्र सैनिकांना आवाहन आहे की, नुसते सदस्य नाही व्हायचे तर सक्रिय सदस्य व्हायचे आहे.

# महिला दिनानिमित्त कुंभारी येथे सत्कार समारंभ संपन्न



**अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ :** रविवार दि. ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कुंभारी येथे एका विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कुंभारी येथील सरपंच, येळवण येथील महिला सरपंच आणि गावातील सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या भव्य सत्कार समारंभाचे आयोजन राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टीच्या प्रदेश सरचिटणीस श्रीमती. राधाताई तुकारामजी बिडकर यांच्या वतीने करण्यात आले होते.

महिलांनी समाजाच्या जडणघडणीत दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सत्कार समारंभाला रुषी कन्या अतकरे, काजल मडावी, अंजनाबाई बोंडे, अंबुताई बिडकर, अरुणाताई बिडकर, लीना काळे आणि उज्वला कोठाळे या प्रमुख महिला उपस्थित होत्या.

त्यांच्या कार्याचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला. तसेच या कार्यक्रमाला महिला वर्गासोबतच पुरुषांचीही मोठी उपस्थिती होती. बाळासाहेब अतकरे, देवेंद्र जवळकर यांच्यासह गावातील बरीचशी महिला आणि पुरुष मंडळी या सत्कार समारंभाला आवर्जून उपस्थित होती. राधाताई बिडकर यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे संपूर्ण गावातून कौतुक होत असून, महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमाने सर्वांमध्ये एक नवा उत्साह निर्माण केला आहे.

# श्रीराम विद्यालयात होळीकेचे दहन



**अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ :** दि. २ मार्च रोजी श्रीराम विद्यालयात होलिका दहनाचा कार्यक्रम श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवाभाऊ मोहोड यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. शाळेतील शिक्षिका सौ. प्रेमा मॅडम यांच्या हस्ते होळीकेचे पूजन करून होळीकेचे दहन करण्यात आले. हा दिवस वाईटवर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे. आपल्या आयुष्यातील सर्व नकारात्मकता होलिका दहनात जळून जावो आणि आनंद यश समृद्धीचे रंग आपल्या जीवनात येवो. अशा सर्वांना होली पौर्णिमेच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षककेतर कर्मचारी या सर्वांचे सहकार्य लाभले. मुलांना खाऊ वाटून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# उद्धव ठाकरेंची आमदारकी संपुष्टात!


**मुंबई :** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ९ जागा मे महिन्यात रिक्त होणार असून, सध्याच्या विधानसभा संख्याबळानुसार महाविकास आघाडीला केवळ एकच जागा मिळण्याची शक्यता आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा विधानपरिषद सदस्यत्वाचा कार्यकाळ १३ मे २०२६ रोजी संपत आहे. त्यामुळे त्यांना पुन्हा उमेदवारी मिळेल का, असा प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे. ठाकरे गटाकडून उद्धव ठाकरेंना पुन्हा विधानपरिषदेवर पाठवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र, या एका जागेसाठी मविआ एकत्रितपणे निर्णय घेईल. खासदार संजय राऊत यांनी यावर सूचक विधान केले असून, ते म्हणाले, ''उद्धव ठाकरेंनी विधानपरिषदेत असणे हा एक चांगला संकेत असेल. यामुळे आमच्या आमदारांना बळ मिळेल आणि पक्षाच्या राजकीय धोरणांना दिशा मिळेल. मे महिन्यात रिक्त होणाऱ्या ९ जागांसाठी निवडणुकीची प्रक्रिया लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे. सध्याच्या विधानसभा संख्याबळानुसार महायुतीला बहुमत असल्याने त्यांना बहुतेक जागा मिळतील, तर मविआला केवळ एक जागा मिळण्याची स्थिती आहे.

# महानगरपालिका क्षेत्रातील १३ सफाई कामगार महिलांचा सत्कार

**अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ :** कस्तुरी या सेवाभावी संस्थे सोबत समाजातील इतरही विविध संस्था आता जुळत असून त्या निमित्ताने समाजाकरता एक सेवेचा महासंघ उभारल्या जात आहे .जिथे समस्या तिथे कस्तुरीची सेवा साधना सुरू होते, असे प्रतिपादन कस्तुरीच्या जेष्ठ सदस्या, थोर कवयित्री, साहित्यिक व पातूर येथील माजी नगराध्यक्षा राष्ट्रमाता शिलाताई गहलोत यांनी केले. त्या स्थानिक कस्तुरी या सेवाभावी संस्थेच्या वतीने आयोजित जागतिक महीला दिन कार्यक्रमातअध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.

स्थानिक कस्तुरी या सेवाभावी संस्थेच्या परिसरात रविवार दि. ८ मार्च रोजी जागतिक महीला दिनकार्यक्रम सोत्साह संपन्न झाला. या कार्यक्रमात कस्तुरीच्या वतीने अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण या ४ झोन मधील स्वच्छता व आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या १३ निवडक स्वच्छतादूत महिलांचा शाल, गुलाबपुष्प व भेटवस्तू देऊन सहकुटुंब सत्कार करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार वसंतराव खोटरे, आरोग्य निरीक्षक सुनील कंडेरा, कार्यकारी अभियंता व महानगर सचिवअमोल डोईफोडे,



स्त्रीधन्वंतरी डॉ. माधुरी सोनी, विश्वकर्मा मंदिर विश्वस्थ श्रीमती जयाताई खेडकर व कस्तुरीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. किशोर बुटोले उपस्थित होते. याप्रसंगी प्रा. किशोर बुटोले यांनी आपल्या प्रास्ताविकातून कस्तुरीच्या मागील १५ वर्षांत झालेल्या सेवाकार्यावर प्रकाश टाकला.

## कस्तुरी संस्थेचा उपक्रम

याप्रसंगी वसंतराव खोटरे यांनी देखील या महिलांचे योगदान दखलपात्र असल्याचे म्हटले. डॉ. माधुरी सोनी यांनी एका भावपूर्ण व भक्तिमय वातावरणात होत असलेल्या सेवाकार्याचे कौतुक केले. जयाताई खेडकर यांनी कस्तुरी परिसरात जणू काही माहेर असल्याची प्रचिती येत असल्याची भावना व्यक्त केली. या कार्यक्रमात कस्तुरीच्या जेष्ठ सदस्या सौ. मीरा देशपांडे, कोषाध्यक्ष कु. चेतना आनंदानी, सौ. अपर्णा काळे यांचा सुद्धा मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. नरेंद्र देवघरे यांनी कस्तुरीची सदस्यता स्वीकारल्याबद्दल आणि सचिन मोडक यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.अपर्णा काळे, राजेश्वर पेठकर यांनी तर आभारप्रदर्शन चेतना आनंदानी यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. पसायदान प्रा. किशोर बुटोले यांनी म्हटले. कार्यक्रमाच्या समापनानंतर कस्तुरीचे स्नेही वसंतराव देशमुख यांच्या योगदानातून प्राप्त झालेली पक्षी जलपात्रे उपस्थितांना वितरित करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री यशवंत देशपांडे , संजय ठाकरे, राजेश्वर पेठकर, अनिल पालवे, अमर शर्मा, संजय बुटोले, सचिन मोडक, नरेंद्र देवघरे, संगीता देवघरे,राम भिरड, दामोदर नुपे, किशोर बांधवकर, अविनाश खुंटे, अंबादास तल्हार यांनी विशेष प्रयत्न केले.

**सलामी** | मुक्ता इव्हेंट्स अँड हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. चे आयोजन

# जवान व अधिकारी यांची राष्ट्रीय स्तरावरील गायन स्पर्धा

**मुंबई, दि. ९** वृत्तसंस्था

''सलामी'' हा हिंदुस्थानी सीमेवरील जवानांच्या करमणूकीचा उपक्रम १ ते १२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत ४५ कलावंत व तंत्रज्ञ यांच्या सोबत राजस्थान राज्यातील जोधपूर, पोकरण, जैसलमेर, ब्रम्हसर, रामगढ, बबलीयनवाला, खाजूवाला, सांचू, बिकानेर सेक्टर या राजस्थान राज्याच्या सीमावर्ती भागातील सीमा सुरक्षा बल च्या जवानांच्या करमणुकी करीता नुकताच संपन्न झाला.

२०१५ पासून सीमा सुरक्षा बला साठी करमणूकीचे कार्यक्रम करीत असताना डॉ. संतोष परब यांना एक गोष्ट लक्षात आली होती कि इथले जवान व अधिकारी सुद्धा ताला सुरांशी मैत्री ठेऊन आहेत. ही मंडळी खूप चांगलं गातात. आणि यातूनच ही राष्ट्रीय स्तरावरील जवानांची व अधिकाऱ्यांची गायन




स्पर्धा जन्मास आली. सिमा सुरक्षा बलाच्या दिल्ली मुख्यालयातून या संकल्पनेला परवानगीचा हिरवा कंदील दाखवण्यात आला. सीमा सुरक्षा बलाच्या ६० वर्षांच्या दैदीप्यमान इतिहासात तिसऱ्यांदा होत असलेली ही स्पर्धा जवान आणि अधिकाऱ्यांमध्ये उत्सुकता निर्माण करून गेली आहे. २० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या प्रदीर्घ कालावधीत या थरारक स्पर्धेत पहिल्या भागात ऑनलाईन पद्धतीने १४० जवान व अधिकारी यांनी सहभाग दर्शविला, उपांत्य फेरी, अंतिम फेरी, महाअंतिम फेरी, पारितोषिक वितरण सोहळा आणि सलामी २०२६ याचा समारोप सोहळा दि ९ व १० मार्च २०२६ रोजी मुंबई येथे स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, दादर येथे कला क्षेत्रातील मान्यवरांच्या यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने या तिसऱ्या वर्षीच्या विजेत्यास या बाईक कंपनीने त्यांची नवी कोरी बाईक भेट म्हणून प्रदान केली आहे. सर्व सहभागी जवान आणि अधिकारी विजेत्यांना सन्मानचिन्हे, भेटवस्तु देऊन गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेत सन्माननीय परीक्षक म्हणून संगीतकार श्रीरंग आरस, मनोहर गोलांबरे, मालिका दिग्दर्शक विवेक देशपांडे, माधुरी नारकर, प्रदीप कडू, पुरुषोत्तम बेर्डे हे कामं पहाणार आहेत. हिंदुस्थानच्या अनेक प्रदेशातील सीमारेषा वरून ४० पैकी ३६ जवान त्यांच्या आयुष्यात पहिल्यांदा मुंबईत येणार आहेत. या दोन्ही संकल्पना यशस्वी होण्यासाठी मा. मंजिरी मराठे, किसन जाधव, नाना आंबोले, नगरसेवक यशवंत किल्लेदार, मंदार फणसे, गोपाळ खाड्ये, दीपक बागवे, अशोक सावंत, बाळा खोपडे, प्रदीप कडू, डॉ सुनिल हळूरकर,निखिल जाधव, अंकेश जैन, डॉ. जितेंद्र जाधव, डॉ शर्मिला जाधव, मारुती खुळे, संजीव जाधव, रजनीश राणे, सुनिल चव्हाण, डॉ शाम नाबर, डॉ. अजित चराटकर, डॉ. महेश संघवी, सिद्धार्थ तांबे, सायली परब, सुनिल मेहेतर, अनुप सुर्वे, मेघश्याम दिघोळे, ॲड तुषार काळे, केतन सरगे, जमील सिद्धीकी, कोमल दळवी, दिपमाला लादे, आदिती मडकीकर, सुनील देवळेकर,रुपेश कदम, डॉ. मानसी कदम, समर्थ परब या मंडळींनी विशेष मेहनत घेत आहेत. या सोहळ्यास मुंबईतील मान्यवर उद्योजक, कलावंत, आणि '' सलामी व '' या संकल्पनेचे हितचिंतक उपस्थित रहाणार आहेत. या संपूर्ण उपक्रमास स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक यांचे सहकार्य लाभले आहे. माधुरी नारकर यांची स्वर्णस्वर इंटरटेनमेंट, प्रिं अजय कौल यांचा एकता मंच, नितीन नांदगावकर यांची निमना फाऊंडेशन, यांच्या विशेष सहकार्यातून संपन्न होत असलेल्या या राष्ट्रीय स्तरावरील संपूर्ण सोहळ्याची संकल्पना लेखन, दिग्दर्शन, आयोजन व नियोजन डॉ. संतोष परब यांचे आहे.

# भारताच्या कच्च्या तेलाच्या खरेदीत वाढ

## आफ्रिकेसह अमेरिका, रशिया आणि लॅटिन अमेरिकेतून कच्च्या तेलाची खरेदी वाढली

**नवी दिल्ली : दि.९ वृत्तसंस्था**




पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आणि होर्मुज जलसंधीतून जाणाऱ्या जहाजांच्या हालचालींवर वाढलेल्या धोक्यामुळे भारताने आपल्या तेलपुरवठ्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. भारतीय रिफायनरी कंपन्यांनी आता अमेरिका, लॅटिन अमेरिका, रशिया आणि पश्चिम आफ्रिका यांसारख्या पर्यायी स्रोतांमधून कच्च्या तेलाची खरेदी वाढवली आहे. यामागील उद्देश देशातील इंधनपुरवठा स्थिर ठेवणे आणि संभाव्य संकट टाळणे हा आहे. ऊर्जा क्षेत्राशी संबंधित अधिकाऱ्यांच्या मते, भारतीय रिफायनऱ्यांनी आपल्या खरेदी धोरणात बदल केला आहे.

इराण आणि अमेरिका यांच्यात वाढत्या तणावामुळे जागतिक तेलबाजारातही चढ-उतार दिसत आहेत. होर्मुज जलसंधीमधून जहाजांची सुरक्षित वाहतूक याबाबत चिंता वाढली आहे. याच दरम्यान कुवैतने खबरदारीचा उपाय म्हणून तेल उत्पादन आणि रिफायनिंगमध्ये कपात करण्याची घोषणा केली आहे. या परिस्थितीमुळे केवळ एका आठवड्यात कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये सुमारे ३५ टक्क्यांपर्यंत वाढ नोंदवली गेली आहे.

रिलायन्स इंडस्ट्रीज, एचपीसीएल (हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड) आणि एचपीसीएल-मित्तल एनर्जी लिमिटेड यांसारख्या कंपन्यांनी पश्चिम आफ्रिका, अमेरिका, लॅटिन अमेरिका तसेच रशिया येथून अतिरिक्त कच्चे तेल खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. अमेरिकेकडून रशियन तेलासाठी दिलेल्या ३० दिवसांच्या तात्पुरत्या सूटीमुळे भारतासाठी तेल आयातीचा एक नवा मार्गही खुला झाला आहे.
पेट्रोलियम मंत्रालयाच्या सूत्रांनुसार, भारत आता सध्याच्या संघर्षाच्या क्षेत्राबाहेरील भागांतून अधिक तेल खरेदी करत आहे. यामुळे होर्मुज जलसंधीव्यतिरिक्त इतर स्रोतांमधून येणाऱ्या तेलाचा वाटा सुमारे ७० टक्क्यांपर्यंत वाढला आहे. वर्ष २०२५ मध्ये हा आकडा सुमारे ६० टक्के होता. भारत आपल्या एकूण कच्च्या तेलाच्या गरजांपैकी सुमारे ८८ टक्के तेल आयात करतो, त्यामुळे पुरवठ्याचे अनेक स्रोत उपलब्ध ठेवणे आवश्यक मानले जात आहे.
पेट्रोलियम मंत्रालयातील एका अधिकाऱ्याच्या मते, सध्या देशाकडे सुमारे १४.४ कोटी बॅरल कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध आहे. हा साठा देशातील सुमारे ५० दिवसांच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी पुरेसा मानला जातो. याशिवाय सामरिक पेट्रोलियम साठ्यात सुमारे ९.५ दिवसांच्या शुद्ध आयात गरजा भागवण्यासाठी पुरेसे कच्चे तेल सुरक्षित ठेवण्यात आले आहे.सरकारी तेल कंपन्यांकडेही कच्चे तेल आणि पेट्रोलियम उत्पादनांचा मोठा साठा उपलब्ध आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या कंपन्यांकडे सुमारे ६४.५ दिवसांच्या शुद्ध आयात गरजांइतका साठा आहे. सामरिक साठ्यासह पाहिले असता, देशाकडे एकूण सुमारे ७४ दिवसांच्या गरजा भागवण्याइतके तेल उपलब्ध आहे.

### महत्त्वाचे

## सुप्रसिद्ध गायिका रिहानाच्या घरावर गोळीबार


**पुणे** : पुण्यातील वारजे माळवाडी परिसरात एका विवाहित महिलेने पती आणि सासरच्या मंडळींविरोधात केलेल्या गंभीर आरोपांमुळे खळबळ उडाली आहे. लग्नानंतर सातत्याने मानसिक आणि शारीरिक छळ, पैशांसाठी दबाव, धमक्या आणि पतीने दिलेल्या गोळ्यांमुळे गर्भपात झाल्याचा आरोप संबंधित महिलेने केला आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, वारजे माळवाडी परिसरात राहणाऱ्या ३३ वर्षीय विवाहित महिलेने याबाबत पोलिसांकडे तक्रार दिली आहे. २०१९ साली तिचा विवाह झाला होता. सुरुवातीला सर्व काही सुरळीत असल्याचे भासत होते; मात्र काही दिवसांनंतर पती आणि सासरच्या मंडळींकडून तिचा छळ सुरू झाल्याचा आरोप तिने तक्रारीत केला आहे. सतत टोमणे मारणे, शिवीगाळ करणे आणि अपमानास्पद वागणूक देणे असे प्रकार घडत असल्याचेही तिने नमूद केले आहे. परस्त्रीशी संबंध असल्याचा संशय
महिलेच्या म्हणण्यानुसार, पतीकडून वारंवार अपमान आणि मारहाण केली जात होती. पतीचे परस्त्रीशी संबंध असल्याच्या संशयातून विचारपूस केल्यास मारहाण सहन करावी लागत होती.


## भारताचा शेषनाग १५० ड्रोन, नवे घातक शस्त्र

**नवी दिल्ली** : पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धामुळे ड्रोनचे महत्त्व आणखी वाढले आहे. याआधी रशिया - युक्रेन लढाईत दोन्ही देशांनी तसेच ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने पाकिस्तान विरोधात ड्रोनचा शस्त्राप्रमाणे प्रभावी वापर केला. आता भारत शेषनाग १५० नावाच्या नव्या अतिशय प्रभावी आणि संहारक ड्रोनच्या निर्मितीत गुंतला आहे. पश्चिम आशियातील युद्धात इराण मोजके पैसे खर्चून तयार केलेले ड्रोन हे बॉम्ब प्रमाणे इस्रायल तसेच अमेरिकेविरोधात वापरत आहेत. हे ड्रोन आकाराने लहान आणि वेगवान असल्यामुळे निकामी करणे कठीण आहे. अमेरिका आणि इस्रायल जी आधुनिक क्षेपणास्त्र विरोधी क्षेपणास्त्र प्रणाली वापरतात, त्याने हे ड्रोन निकामी करता येतात. पण अवघ्या काही हजारांचा ड्रोन नष्ट करण्यासाठी लाखो रुपये खर्चून तयारी केलेली महागडी क्षेपणास्त्र वापरली जात आहेत. शिवाय इराणी ड्रोनचा मोठा ताफा आला तर ती सर्व ड्रोन निकामी करणे कठीण जाते आणि किमान काही ड्रोन शत्रूचे नुकसान करण्यात यशस्वी होत आहेत. या घडामोडींचा अभ्यास करून भारताने स्वतःच्या नव्याने विकसित होत असलेल्या ड्रोनमध्ये आवश्यक ते बदल केले आहेत. यामुळे भारतीय ड्रोन अतिशय प्रभावी आणि संहारक झाले आहेत. भारताच्या शेषनाग १५० या ड्रोनची ऑपरेशनल रेंज एक हजार किमी. पेक्षा जास्त आहे.

## 'ज्वाला' पुन्हा आई झाली! कुनो राष्ट्रीय उद्यानात ५ पिलांचा जन्म

### चित्त्यांची संख्या ५३ वर पोहोचली





**नवी दिल्ली : दि.९ वृत्तसंस्था**

मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यान येथे सोमवारी नामिबियन चित्ता 'ज्वाला'ने पाच पिलांना जन्म दिला आहे. त्यामुळे भारतातील चित्त्यांची एकूण संख्या आता ५३ वर पोहोचली असल्याची माहिती केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी दिली. यापैकी ५० चित्ते सध्या कुनो राष्ट्रीय उद्यानात असून तीन चित्ते गांधी सागर अभयारण्य येथे आहेत. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांनी 'एक्स'वर पोस्ट करत ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, भारतात जन्मलेल्या चित्त्यांच्या पिलांची संख्या आता ३३ झाली आहे. तसेच कुनो राष्ट्रीय उद्यानात चित्त्यांची काळजी घेणाऱ्या पशुवैद्यकीय तज्ज्ञ आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या कामाचे त्यांनी कौतुक केले.
भूपेंद्र यादव यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, ''चित्त्यांची संख्या अर्धशतक ओलांडणे हा 'प्रोजेक्ट चित्ता'साठी अभिमानाचा क्षण आहे. नामिबियन चित्ता आणि तिसऱ्यांदा आई बनलेली ज्वाला हिने आज कुनो राष्ट्रीय उद्यानात पाच पिलांना जन्म दिला. या जन्मामुळे भारतात जन्मलेल्या चित्त्यांच्या पिलांची संख्या ३३ वर पोहोचली आहे. भारतीय भूमीवर हा चित्त्यांचा दहावा यशस्वी जन्म असून भारताच्या चित्ता संवर्धन प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.''
तसेच त्यांनी पुढे नमूद केले की, ''ही कामगिरी पशुवैद्यकीय तज्ज्ञ, क्षेत्रीय कर्मचारी आणि वन विभागातील सर्वांच्या समर्पित प्रयत्नांचे आणि कौशल्याचे फलित आहे. या पिलांच्या जन्मामुळे भारतातील चित्त्यांची एकूण संख्या ५३ झाली आहे. वन्यजीव संवर्धनासाठी हा ऐतिहासिक आणि प्रेरणादायी क्षण आहे. ज्वाला आणि तिची पिले बळकट होवोत आणि भारतातील चित्त्यांच्या संवर्धनाची ही कहाणी आणखी उंचीवर जावो.''
दरम्यान, यापूर्वी २८ फेब्रुवारी रोजी भारताच्या महत्त्वाकांक्षी प्रोजेक्ट चित्ता अंतर्गत आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठण्यात आला होता. त्या दिवशी बोत्सवानातून आणलेल्या नऊ चित्त्यांना कुनो राष्ट्रीय उद्यानात सोडण्यात आले. या वेळी भूपेंद्र यादव वरिष्ठ वन अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांसह उद्यानात उपस्थित होते.
फेब्रुवारीमध्ये बोत्सवानातून नऊ चित्ते भारतात आणल्यानंतर देशातील चित्त्यांची संख्या ४८ झाली होती, ज्यामध्ये भारतात जन्मलेल्या २८ पिलांचा समावेश होता. 'प्रोजेक्ट चित्ता' हा जगातील पहिला आंतरखंडीय चित्ता स्थानांतरण प्रकल्प असून तो १७ सप्टेंबर २०२२ रोजी सुरू करण्यात आला. १९५२ मध्ये भारतातून नामशेष झालेल्या चित्त्याला पुन्हा भारतात स्थिरावण्यासाठी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

## इस्रायलचा लेबनॉनवर केमिकल ॲटॅक:ह्युमन राइट्स वॉचचा गंभीर आरोप

**योहमोर : दि.९ वृत्तसंस्था**



इस्रायलने लेबनॉनमधील योहमोर गावात हिझुबल्लाह या अतिरेकी संघटनेच्या तळावर हल्ला करण्याच्या निमित्ताने एक केमिकल ॲटॅक अर्थात रासायनिक हल्ला केल्याचा आरोप ह्युमन राइट्स वॉच नावाच्या संस्थेने केला आहे. ह्युमन राइट्स वॉच ही एक मानवाधिकारांसाठी लढणारी संस्था आहे.
ह्युमन राइट्स वॉचच्या आरोपानुसार इस्रायलने योहमोर गावावर पांढऱ्या फॉस्फरसचा मारा केला. दुसऱ्या महायुद्धानंतर झालेल्या आंतरराष्ट्रीय करारानुसार कोणताही देश दुसऱ्या देशाविरुद्ध अथवा तिथल्या एका प्रदेशाला लक्ष्य करून रासायनिक (केमिकल्स) किंवा जैविक (बायॉलॉजिकल) हल्ला (ॲटॅक) करू शकत नाही. पण इस्रायलने योहमोर गावावर पांढऱ्या फॉस्फरसचा मारा केला आहे. दक्षिण लेबनॉनमधील योहमोर गावात निवासी भागाला लक्ष्य करून इस्रायलने तोफखाना आणि पांढरा फॉस्फरस वापरला. इस्रायली सैन्याने गावकऱ्यांना आणि दक्षिण लेबनॉनमधील डझनभर इतर रहिवाशांना स्थलांतर करण्याचा इशारा दिल्यानंतर हा हल्ला केला.
पांढरा फॉस्फरस हा एक धोकादायक रासायनिक पदार्थ आहे. तो मेणासारखा पिवळा किंवा पांढरा दिसतो आणि त्याला लसणासारखा वास येतो. हवेतील ऑक्सिजनच्या संपर्कात आल्यावर तो आपोआप जळतो, ज्यामुळे ८१५ अंश सेल्सिअस पर्यंत तापमान निर्माण होते. शरीर पांढऱ्या फॉस्फरसच्या संपर्कात आल्यास जळू लागते. त्वचा आणि हाडे जळायला सुरुवात होते. या हल्ल्यातून वाचलेल्यांना गंभीर स्वरुपाच्या व्याधी, त्वचारोग, श्वास घेण्यास त्रास होणे, डोळ्यांची आग होणे, हृदयक्रिया मंदावणे किंवा बंद पडणे, मृत्यू येणे अशा स्वरुपाचे त्रास होऊ शकतात. निवासी वस्तीत पांढरा फॉस्फरस मोठी आग लावू शकतो. यामुळेच पांढरा फॉस्फरस वापरून हल्ला करणे हे घातक आणि मानवतेच्या विरुद्ध असल्याचा आरोप ह्युमन राइट्स वॉचने केला आहे.
इस्रायलने युद्धाच्या निमित्ताने पांढऱ्या फॉस्फरसचा बेकायदेशीर वापर करणे ही चिंता वाढवणारी बाब आहे.

लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार २ मार्च २०२६ ते ८ मार्च २०२६ दरम्यान इस्रायली हवाई हल्ल्यांमध्ये एकूण ४०० जणांचा मृत्यू झाला. यात ८३ मुले, ४२ महिला, ९ बचाव कर्मचारी यांचा समावेश आहे. तसेच २५४ मुले आणि २७४ महिलांसह १,१३० हून अधिक लोक जखमी झाले आहेत.

## पंजाबमध्येही लाडकी बहीण: दरमहा १००० रुपये मिळणार: अर्थसंकल्पात मोठी घोषणा

**चंडीगड : दि.९ वृत्तसंस्था**



पंजाब सरकारने राज्यातील महिलांसाठी रविवारी एका विशेष योजनेची घोषणा केली. यानुसार अनुसूचित जातीच्या महिला वगळता राज्यातील सर्व महिलांना या योजनेंतर्गत दरमहा एक हजार रुपये देण्यात येणार आहेत. अनुसूचित जातीच्या महिलांना या योजनेनुसार दरमहा दीड हजार रुपयांची रक्कम मिळणार आहे. पंजाबचे अर्थमंत्री हरपाल सिंग चीमा यांनी राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना ही घोषणा केली. मुख्यमंत्री मावां-धियां सत्कार योजना असे या योजनेचे नाव असून १८ वर्षांवरील महिला त्यासाठी पात्र असतील. पंजाबमध्ये २०२२मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने याबाबत आश्वासन दिले होते. त्यानुसार मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या सरकारने ही योजना आणली आटे लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात ही रक्कम दरमहा थेट जमा होईल . जागतिक महिला दिनाच्या औचित्याने राज्य सरकारचा अर्थसंकल्प विशेषत्वाने रविवारी सादर करण्यात आला. त्यामध्ये राज्यातील महिलांना ही भेट देण्यात आली. परंतु विधानसभा निवडणुकीतील आश्वासनानंतर चार वर्षांनी ही योजना लागू होत असल्याबद्दल विरोधकांनी टीका केली.
पंजाबमधील ९७ टक्के सज्ञान महिला या योजनेच्या लाभार्थी ठरतील , असा दावा चीमा यांनी केला. भारतात कोणत्याही राज्यातील महिला एवढ्या मोठ्या प्रमाणात लाभार्थी नाहीत, असेही ते म्हणाले.
पंजाबमधील ९७ टक्के सज्ञान महिला या योजनेच्या लाभार्थी ठरतील , असा दावा चीमा यांनी केला. भारतात कोणत्याही राज्यातील महिला एवढ्या मोठ्या प्रमाणात लाभार्थी नाहीत, असेही ते म्हणाले.

## युद्धामुळे भारतावर डेटा संकट?

### होर्मुझमध्ये तणाव वाढल्यास भारतातील इंटरनेटवरही होणार परिणाम!

**नवी दिल्ली : दि.९ वृत्तसंस्था**

मध्य पूर्वेत वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर होर्मुझच्या सामुद्रधुनीची जोरदार चर्चा सुरू आहे. ही सामुद्रधुनी जगातील सर्वात महत्त्वाच्या तेल वाहतुकीच्या मार्गांपैकी एक आहे. मात्र ती केवळ पेट्रोल-डिझेलसाठीच नाही तर इंटरनेट साठी देखील ही अत्यंत महत्त्वाची आहे. हा तो भाग आहे ज्या समुद्री भागांच्या खाली मोठ्या संख्येत सबमरीन फायबर ऑप्टिक केबल्सचे जाळे पसरले आहे. यांमुळे संपूर्ण जगभरातील इंटरनेट डेटा एका देशातून दुसऱ्या देशात पोहोचतो. तज्ञांच्या मते, जर या क्षेत्रात संघर्ष किंवा कोणत्याही प्रकारची अडचण आली, तर त्याचा परिणाम केवळ तेल बाजारावरच नाही तर इंटरनेट सेवांवरही होऊ शकतो.
अनेकदा असे मानले जाते की इंटरनेट उपग्रहांच्या माध्यमातून कार्य करते, मात्र वास्तव असे आहे की जगातील बहुतांश इंटरनेट ट्रॅफिक समुद्राच्या खाली पसरलेल्या फायबर ऑप्टिक केबलच्या माध्यमातूनच जाते. भारताच्या आंतरराष्ट्रीय इंटरनेट कनेक्टिविटीचा मोठा भाग समुद्राच्या खाली पसरलेल्या केबल्सवर अवलंबून आहे, ज्या अरबी समुद्रातून आखाती क्षेत्र आणि युरोपपर्यंत जातात. महत्वाचे म्हणजे या केबल्सचा मोठा भाग होर्मुझच्या जवळून जातो. रिपोर्टनुसार भारताच्या पश्चिम दिशेला जाणाऱ्या इंटरनेट ट्रॅफिकचा जवळजवळ एक-तृतीयांश भाग या क्षेत्रातून जातो. याचा अर्थ असा की भारतातून परदेशात जाणारा मोठा डेटा ट्रॅफिक याच मार्गावर अवलंबून आहे. हा डेटा ट्रॅफिक आपल्या महत्त्वाच्या गरजा पूर्ण करण्यात मदत करतो यामध्ये क्लाउड कॉम्प्युटिंग प्लॅटफॉर्म, आंतरराष्ट्रीय बँकिंग आणि वित्तीय नेटवर्क, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे डिजिटल ऑपरेशन्स, सोशल मीडिया आणि स्ट्रीमिंग सेवांचा समावेश आहे.

## युवकाने जुळ्या बहिणीला निर्दयीपणे संपविले

**लखनौ : दि.९ वृत्तसंस्था**




इन्स्टाग्रामवर ओळख झालेल्या तरुणीशी प्रेमसंबंध जुळले, मात्र काही काळातच ब्रेकअपही झालं, परंतु याचा राग मनात ठेवून इंजिनिअर तरुणाने आपल्या कुटुंबावरच हल्ला केला. होळीनिमित्त उत्तर प्रदेशातील मुरादाबादला गेलेल्या २५ वर्षीय युवकाने आपल्या जुळ्या बहिणीवर ४० हून अधिक वेळा वार करत तिचा जीव घेतला, त्याच्या हल्ल्यातून आईही सुटली नाही.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी हार्दिक इन्स्टाग्रामवर भेट झालेल्या एका तरुणीच्या प्रेमात पडला होता. परंतु आई आणि बहिणीमुळे आपल्या नात्याची अखेर झाली, असा त्याचा समज होता. या दुःखातून निर्माण झालेल्या रागाचं रुपांतर अखेर एका क्रूर हल्ल्यात झालं, ज्यामुळे हसतं खेळतं कुटुंब उद्ध्वस्त झालं. ही घटना उत्तर प्रदेशातील मुरादाबादमधील माझोला पोलिस स्टेशन हद्दीतील बुद्धि विहार कॉलनीत घडली.
निलीमा या मुरादाबादमधील एका हेल्थ इन्शुरन्स कंपनीत काम करतात. त्यांची पंचविशीतील जुळी मुलं हार्दिक आणि हिमशिखा गुरुग्राममध्ये नोकरी करत असून तिथेच एकत्र राहतात. होळी निमित्ताने भावंडं यूपीला आईच्या घरी आली होती. होळीची सुट्टी संपल्याने आई पुन्हा ऑफिसला जायला लागली, तर भावंडं मुरादाबादमधल्या घरीच होती. शुक्रवारी त्यांचा गुरुग्रामला परतीचा प्रवास ठरला होता.
त्याआधीच हार्दिक आणि हिमशिखा यांच्यात टोकाचं भांडण झालं, ज्यामुळे हार्दिकने जुळ्या बहिणीवर चाकूहल्ला केला. त्याने हिमशिखावर तब्बल ४० वेळा वार केले. त्यानंतर तो शांत डोक्याने आईच्या ऑफिसला गेला. थातुरमातुर कारण सांगून त्याने आईला सोबत घरी यायला सांगितलं. घरी शिरताच निलीमा यांना लेक जखमी अवस्थेत जमिनीवर पडलेली दिसली. तिची किंकाळी घरभरच नव्हे, तर शेजाऱ्यांपर्यंतही पोहोचली. मात्र त्यावेळी हार्दिकने आईवरही चाकूने हल्ला केला. काही वेळा भोसकून तो कारने पळून गेला.
आईचा आरडाओरडा ऐकून शेजारी पळत आले. तेही चित्र पाहून थबकून गेले. मात्र तातडीने रुग्णवाहिका बोलवून जखमी मायलेकीला जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं. डॉक्टरांनी दाखल करण्यापूर्वीच हिमशिखाला मृत घोषित केलं. तर आईवर उपचार सुरु आहेत. तपासादरम्यान पोलिसांना आढळून आलं की हार्दिकचे पुण्यातील एका तरुणीशी प्रेमसंबंध होते. दोघांची इन्स्टाग्रामवर एकमेकांशी ओळख झाली होती. ते बहुतेकदा ऑनलाइन बोलत असत. मुरादाबादचे एसपी रणविजय सिंह यांनी सांगितलं की दोघांचं नातं साधारण सात महिन्यांपूर्वी संपुष्टात आलं होतं, त्यानंतर हार्दिक भावनिकदृष्ट्या अस्वस्थ असल्याचे दिसून आलं. निलीमा यांनी पोलिसांना दिलेल्या जबानीत सांगितलं की, ब्रेकअपनंतर तो चिडचिडा झाला होता, त्याला वाटायचं की मी आणि त्याची बहीण याला जबाबदार आहोत. तो लहान सहान गोष्टींवरुन संतापायचा.

### दिलासा | भारतीय दूतावासाने दिली माहिती

## सौदी अरेबियावरील हल्ल्यात कोणत्याही भारतीय नागरिकाचा मृत्यू झालेला नाही

**नवी दिल्ली : दि.९ वृत्तसंस्था**



इराणने सौदी अरेबियावर क्षेपणास्त्र हल्ला केला. या हल्ल्यात निवासी भागात एक प्रोजेक्टाइल पडल्याने सुरुवातीला एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाल्याची बातमी समोर आली होती. मात्र रियाधमधील भारतीय दूतावासाने आज म्हणजेच सोमवार ९ मार्च रोजी स्पष्ट केले की या हल्ल्यात कोणत्याही भारतीय नागरिकाचा मृत्यू झालेला नाही. तसेच त्यांनी सांगितले की कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नका, आम्ही सौदी अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात आहोत.
यापूर्वी सौदी नागरी संरक्षण (सिव्हिल डिफेन्स) अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले होते की अल-खरज शहरात झालेल्या या घटनेत मृत्यू झालेल्या दोन जणांमध्ये एक भारतीय आणि एक बांगलादेशी नागरिक होता. मात्र आता भारतीय दूतावासाने भारतीय नागरिकाच्या मृत्यूची बातमी चुकीची असल्याचे स्पष्ट केले आहे. भारतीय दूतावासाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत म्हटले, ''काल संध्याकाळी अल-खरज येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेत कोणत्याही भारतीय नागरिकाचा मृत्यू झालेला नाही, ही दिलासादायक बाब आहे.'' दूतावासाने पुढे सांगितले, ''कौन्सुलर अधिकारी वाय. साबिर काल रात्री अल-खरज येथे गेले होते आणि या दुर्दैवी घटनेत जखमी झालेल्या भारतीय नागरिकाची त्यांनी भेट घेतली.'' दूतावासाने पुढे माहिती दिली की सध्या त्या जखमी व्यक्तीवर अल-खरजमधील सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.
दरम्यान, सौदी प्रवक्त्यांनी म्हटले की नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्याचे प्रयत्न हे आंतरराष्ट्रीय मानवीय कायद्याचे उघड उल्लंघन आहे आणि अशा प्रकरणांमध्ये निर्धारित प्रक्रिया लागू करण्यात आली आहे. तसेच सौदी अरेबियाने निवेदन जारी करत सांगितले की इराणी हल्ल्यांमुळे देशात संताप वाढत आहे.दरम्यान, भारतीय दूतावासाने रविवारी आपल्या नागरिकांसाठी ॲडव्हायजरी जारी केली. यात नागरिकांनी सतर्क राहावे आणि सुरक्षा मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच स्थानिक अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या सूचनांचे प्रामाणिकपणे पालन करण्यास सांगितले आहे. दूतावासाने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले, ''या प्रदेशातील आणि सौदी अरेबियातील सध्याची परिस्थिती लक्षात घेता, सध्या सौदी अरेबियामध्ये असलेल्या सर्व भारतीय नागरिकांनी सतर्क राहावे,'' असे आवाहन करण्यात आले आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्षणगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले साहित्य या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## सवंग अर्थकारणाला लगाम बसेल का?

वास्तवाचे भान ठेवून मुख्यमंत्र्यांनी संतुलित आणि विकसित महाराष्ट्राच्या दिशा निश्चित करणारा अर्थसंकल्प सादर केला आहे. निवडणुकांचे पर्व समाप्त झाले असल्यामुळे आता सवंग अर्थकारणास लगाम बसेल, अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्राचा अर्थसंकल्प 'प्रगतशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन' या चार प्रमुख स्तंभांवर आधारित असल्याची आश्वासक ग्वाही देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तो विधिमंडळात मांडताना नवमहाराष्ट्राच्या उभारणीचा संकल्प विस्ताराने स्पष्ट केलाच; त्याची रूपरेषाही मांडली. शहरीकरणापासून गाव-वस्ती-खेड्यापर्यंत प्रत्येक घटकाचा विचार त्यात केलेला दिसतो. त्यातही शेतकरी कर्जमाफीची घोषणा करत बळीराजाला बळ देण्याच्या अनेक योजनांची केलेली मांडणी हे अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य. मुंबईच्या नागरीकरणाची कोंडी फोडताना अटल सेतूला जोडून तिसऱ्या मुंबईच्या उभारणीची घोषणाही सरकारचा सुनियोजित शहर समूह उभारणीचा संकल्प स्पष्ट करते. उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे यंदाचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडला आणि तो अजित पवार यांना समर्पित केला. विधिमंडळाच्या इतिहासात मुख्यमंत्री असताना अर्थसंकल्प मांडणारे फडणवीस पहिलेच मुख्यमंत्री ठरले. यापूर्वी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी अर्थमंत्री म्हणून पहिल्यांदाच अर्थसंकल्प सादर केला होता. गुंतवणुकीमध्ये अग्रेसर राज्य असल्याने महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाकडे अवघ्या देशाचे लक्ष होते. गेल्या वर्षी उत्तम पाऊस होऊनही कृषी व संलग्न क्षेत्रांत अगोदरच्या वर्षांच्या तुलनेत पाच टक्क्यांनी घसरण झाली. अवकाळी पाऊस, गारपीट, अतिवृष्टी आणि पूरस्थिती अशा नैसर्गिक आपत्तींमुळे कृषी क्षेत्राचे प्रचंड नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली असून, नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची घोषणा अभिनंदनीय आहे. तसेच गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेत शेतमजुरांचाही समावेश करण्यात येणार असल्यामुळे हातावर पोट असणाऱ्या अगणित शेतमजुरांना याचा आधार मिळणार आहे. कृषी क्षेत्राच्या मंदावलेल्या विकास दराला गती देण्यासाठी मुख्यमंत्री नैसर्गिक शेती अभियान, मत्स्यसंपदा योजना, ग्रामीण पशुधन उद्योजक योजनांची घोषणा करण्यात आली असून, त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. लाडकी बहीण योजनेवरील खर्च, मोठी महसुली व वित्तीय तूट आणि दहा लाख कोटी रुपयांच्या आसपास कर्जाचा बोजा, यातून मार्ग काढत राज्याची अर्थव्यवस्था रुळावर आणण्याचे आव्हान सरकारपुढे होते. गेल्या काही वर्षांत अन्य राज्यांच्या तुलनेत भांडवली, म्हणजेच विकास कामांवरील खर्च कमी झाल्यामुळे यासाठी भरीव ततूरद करण्याची कसरत करावी लागणार होती. साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांचे वीज बिल सरकारने माफ केल्याने त्यासाठी १४ हजार कोटी रुपयांचा बोजा सरकारवर आला. राज्याच्या अर्थव्यवस्थेचे एक लाख कोटी डॉलरचे उद्दिष्ट गाठणे, हा महायुती सरकारचा अग्रक्रम आहे. आतापर्यंत ५० लाख कोटी रुपयांपर्यंत अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठलेले आहे. पण अजून अर्धे बाकी आहे. त्यासाठी विकास दर दहा टक्क्यांपेक्षा अधिक असावा लागेल, असे मत महाराष्ट्र आर्थिक परिषदेने व्यक्त केले आहे. महायुती सरकार स्थापन झाल्यापासून आतापर्यंत १ लाख २० हजार कर्मचाऱ्यांची पदभरती झाली असून आगामी काळात आणखी ७५ हजार पदांची भरती होणार आहे. मत्स्य व्यवसायासाठी १२४० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याने अनेकांना काम मिळणार आहे. गडचिरोलीत ७० हजार रोजगारांची निर्मिती करण्यात येणार आहे. मुंबई-पुण्यात ३० लाखांहून अधिक रोजगारांची निर्मिती करण्याचा संकल्प आहे. मुंबई विमानतळ नवी मुंबई विमानतळाला मेट्रोने जोडण्यात येणार असून, वडाळा ते गेट वे ऑफ इंडिया असा नवा भुयारी मेट्रो मार्ग सुरू केला जाणार आहे. मुंबई-पुणे हायस्पीड ट्रेनही सुरू करण्यात येणार आहे. शहरांच्या विकासासाठी दहा शहर विकास प्राधिकरणे निर्माण करण्यात येणार आहेत. भविष्यकाळात नागरीकरण वाढणार असून, त्यांचे योग्य पद्धतीने नियोजन होणे आवश्यक आहे. धार्मिक पर्यटनाला गती देण्यासाठी सरकारने मोठी पावले उचलली असून, रामटेक येथे 'रामसृष्टी' आणि 'कालिदाससृष्टी' उभारली जाणार आहे. महानुभाव पंथीयांच्या विविध धार्मिक स्थळांवरील पायाभूत सुविधांसाठी खर्चाची तरतूद केली आहे. सातारा जिल्ह्यात वासोटा किल्ला ते मुनावळे रोप वे, छत्रपती संभाजी महाराज यांच्या मौजे तुळापूर येथील स्मारक आणि मौजे वढू बुद्रुक येथील स्मारकाचे काम २०२७ पर्यंत पूर्णत्वास नेण्याचे नियोजन मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. महात्मा जोतिराव फुले यांचे जन्मगाव कटगुण येथे भव्य स्मारक आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगावला स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्राची घोषणाही लक्षवेधी ठरली. सातारा जिल्ह्यातील संगम माहुली येथे महाराणी ताराराणींच्या समाधिस्थळाचा जीर्णोद्धार केला जाणार आहे. हा ऐतिहासिक वारसा आणि जाज्वल्य इतिहासाची जपणूक केली जाणार आहे. राज्यातून जास्तीत जास्त खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके मिळवावीत, यासाठी 'मिशन लक्ष्यवेध' योजनेवर भर दिला जात आहे. खेळाडूंना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण देण्याकरिता आणखी चार नवीन केंद्रे सुरू करण्याची कल्पना चांगली आहे. कर्करोग, मधुमेह व हृदयविकार अशा आजारांचे लवकर निदान करण्याकरिता आशियाई विकास बँकेच्या सहाय्याने ग्रामीण भागात दरवर्षी तपासणी मोहीम राबवण्याकरिता साडेचार हजार कोटी रुपयांची घसघशीत तरतूद केली आहे. मराठी भाषेतील साहित्य इतर भाषांमध्ये आणि अन्य भाषांतील साहित्य मराठीत अनुवादित करण्यासाठी 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र अनुवाद ॲकॅडमी'च्या माध्यमातून मराठीची पताका सर्वदूर पसरेल. त्याचप्रमाणे मराठी भाषेच्या कक्षाही रुंदावणार आहेत. राज्य सरकारकडून ३०० कोटी वृक्ष लागवडीची मोहीम हाती घेतली जाणार आहे. आखाती देशांतील युद्धामुळे कच्चे तेल महागले असून, कांदा, केळी वगैरेंची निर्यात करणारा शेतकरी संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर राजकोषीय तूट ही तीन टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात सरकारला यश आले असले तरीदेखील अपेक्षेपेक्षा ही तूट वाढू शकते, याचे भान ठेवण्याची गरज आहे.

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

अहंकार येता बुद्धी होते भ्रष्ट ।
क्षणातच नष्ट ख्याती होई ॥

अहंकार असे खेकड्या सारखा ।
ओढतो सारखा मागे मागे ॥

गीता बायबल वा वाचा कुराण ।
व्यर्थ जाते ज्ञान अहं येता ॥

अहंकार येता बुद्धी होते भ्रष्ट ।
क्षणातच नष्ट ख्याती होई ॥

# 'काठमांडू मॉडेल'वर उमटलेली विश्वासाची मोहोर!

## नेपाळचा राजकीय भूकंप: बालेन शाह आणि 'जेन झी'सत्तेचा उदय



रूबेन वाळके
अकोला. 7028173880

**नेपाळचे राजकारण गेल्या अनेक दशकांपासून ठराविक नेत्यांच्या आणि पक्षांच्या भोवती फिरत राहिले आहे. के. पी. शर्मा ओली, शेर बहादूर देउबा आणि पुष्प कमल दहल (प्रचंड) यासारख्या दिग्गज नेत्यांनी नेपाळच्या सत्तेची सूत्रे आपल्या हातात ठेवली होती. मात्र, राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाच्या माध्यमातून बालेन शाह यांनी मिळविलेला विजय हा या जुन्या व्यवस्थेला बसलेला सर्वांत मोठा धक्का आहे.**

'झापा-५' हा मतदारसंघ के. पी. शर्मा ओली यांचा बालेकिल्ला मानला जात होता. तिथून त्यांना हरविणे हे जवळपास अशक्य मानले जात होते. मात्र, बालेन शाह यांनी ५०,००० मतांच्या फरकाने मिळविलेला विजय हे दर्शविते की, जनतेमध्ये प्रस्थापित राजकारणाबद्दल प्रचंड असंतोष होता. बालेन श यांनी केवळ भाषणांवर भर देता, तंत्रज्ञान, पारदर्शकता आणि तरुण पिढीच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून आपली मोहीम राबविली. पेशाने 'स्ट्रक्चरल इंजिनिअर' आणि 'रॅपर' असलेले बालेन शाह हे तरुण पिढीचे आयकॉन बनले आहेत.





त्यांनी काठमांडूचे महापौर म्हणून काम करताना आपल्या प्रशासकीय कौशल्याची चुणूक आधीच दाखवून दिली होती. काम करणारा नेता ही त्यांची प्रतिमा तरुणांच्या मनावर ठसली आहे. त्यांनी राजकारणात कोणत्याही घराणेशाहीचा आधार न घेता, केवळ आपल्या कामाच्या जोरावर ही मजल मारली आहे. नेपाळमधील या विजयाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये 'जेन झी' पिढीचा असलेला सहभाग. बालेन शाह यांनी पारंपरिक रॅलींऐवजी फेसबुक, टिकटॉक आणि इन्स्टाग्रामच्या माध्यमातून मतदारांशी थेट संवाद साधला. तरुणांना आता पोकळ आश्वासने नको आहेत, तर त्यांना 'इंजिनिअरिंग सोल्यूशन्स', 'चांगले रस्ते' आणि 'पारदर्शक प्रशासन' हवे आहे. बालेन शाह हे या अपेक्षांचे 'प्रतीक' बनले आहेत. बालेन यांचा राष्ट्रवाद हा केवळ सीमावादापुरता मर्यादित नसून, तो नेपाळला स्वावलंबी बनविण्यावर आधारित आहे. के. पी. शर्मा ओली हे नेपाळच्या राजकारणातील एक धुरंधर व्यक्तिमत्त्व. त्यांच्या पराभवाचा अर्थ असा होतो की, जुन्या पिढीतील नेत्यांचा प्रभाव आता ओसरत चालला आहे. मतदारांनी अनुभवापेक्षा भविष्य निवडले आहे. ५०,००० मतांचे अंतर हे स्पष्ट करतो की, हा केवळ तांत्रिक विजय नसून, एका मोठ्या जनक्रांतीचा परिणाम आहे. राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाने नेपाळमध्ये एका नव्या राजकीय संस्कृतीची पेरणी केली आहे. त्यांनी सुशिक्षित तरुणांना उमेदवारी देऊन ाजकारण हे केवळ गुन्हेगारांचे किंवा श्रीमंतांचे क्षेत्र ाही'हे सिद्ध केले आहे. बालेन शाह यांच्या विजयाने हा पक्ष आता नेपाळमधील सर्वांत शक्तिशाली राजकीय शक्तीपैकी एक म्हणून पुढे आला आहे. नेपाळमधील या सत्तांतराचा परिणाम दक्षिण आशियातील इतर देशांवरही होऊ शकतो. भारत आणि चीन या दोन्ही शेजारील देशांसाठी नेपाळमधील ही तरुण सत्ता एक नवे आव्हान आणि संधी असेल. बालेन शाह यांच्यासारखे नेते कोणत्याही एका गटाचे बाहुले बनण्यापेक्षा 'नेपाळ फर्स्ट' या धोरणाला प्राधान्य देतील, अशी शक्यता आहे. बालेन शाह यांचा विजय हा केवळ 'झापा-५' पुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण नेपाळच्या बदलत्या मानसिकतेचा आरसा आहे. ही 'जेन झी'ची सत्ता आहे, जी प्रश्न विचारते, उत्तरेही मागते आणि बदलासाठी स्वतः मैदानात उतरते. नेपाळ आता एका अशा वळणावर उभा आहे, जिथे जुन्या परंपरा आणि नवीन विचार यांचा संगम होत आहे. बालेन शाह यांचा हा विजय भविष्यातील एका समृद्ध, विकसित आणि पारदर्शक नेपाळची नांदी ठरेल यात शंका नाही. बालेन शाह यांनी पदभार स्वीकारताच घेतलेला पहिला मोठा निर्णय म्हणजे महानगरपालिकेच्या बैठकांचे थेट प्रक्षेपण यामुळे प्रशासकीय निर्णयात पारदर्शकता आली. सर्वसामान्य जनतेला आपले प्रतिनिधी काय चर्चा करतात आणि निधीचा वापर कसा होतो, हे घरबसल्या पाहता आले. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी हे एक क्रांतिकारी पाऊल ठरले. 'झापा-५' या मतदारसंघातील बालेन शाह यांचा विजय हा केवळ एका निवडणुकीचा निकाल नसून, तो त्यांनी काठमांडूमध्ये राबविलेल्या 'काठमांडू मॉडेल'वर जनतेने दिलेली पसंतीची पावती आहे. हे मॉडेल म्हणजे पारंपरिक राजकारणाला छेद देणारा एक 'रिझल्ट ओरिएंटेड' (निकालाभिमुख) प्रशासकीय आराखडा आहे. बालेन शाह यांनी काठमांडूमध्ये दाखवून दिले की, प्रशासन हे बंद दाराआड चालणारे काम नसून, ते जनतेसमोर उघड असले पाहिजे. धोरण ठरविताना होणारी चर्चा जनतेला थेट दाखविल्यामुळे भ्रष्टाचाराच्या शक्यता कमी झाल्या. तक्रार निवारण आणि सरकारी कामांसाठी त्यांनी डिजिटल प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर केला.

झापाच्या मतदारांना हे 'पारदर्शक शासन'हवे होते, जे जुन्या पक्षांकडून कधीच मिळाले नाही. नेपाळच्या राजकारणात 'शक्तिशाली'लोक कायद्यापेक्षा मोठे मानले जात. बालेन यांनी हे चित्र बदलले. 'नियम सर्वांसाठी सारखाच' हे त्यांनी कृतीतून दाखविले. यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये त्यांच्याबद्दल एक विश्वासाची भावना निर्माण झाली की, हा नेता कोणालाही घाबरत नाही. 'काठमांडू मॉडेल'मध्ये भव्य आश्वासनांऐवजी दैनंदिन समस्या आणि मूलभूत सुविधा पुरविण्यावर भर होता. काठमांडूच्या कचऱ्याचा प्रश्न त्यांनी ज्या जिद्दीने हाताळला, त्याने त्यांची प्रतिमा 'कामाचा माणूस'अशी केली. सरकारी शाळांचा कायापालट करण्यासाठी त्यांनी स्वतः शाळांना भेटी देऊन शिक्षणाची गुणवत्ता सुधारली. 'झापा-५'मधील मतदारांना आपल्या मुलांच्या भविष्यासाठी असेच 'प्रॅक्टिकल'शिक्षण हवे होते. पारंपरिक नेते अनेकदा भारत किंवा चीनविरोधी भूमिका घेऊन मते मिळवतात. मात्र, बालेन शाह यांचा राष्ट्रवाद हा 'आत्मनिर्भरतेवर'आधारित आहे. त्यांनी काठमांडूमध्ये स्थानिक संस्कृती, नेवारी वारसा आणि स्थानिक व्यापाराला चालना दिली. 'देश तेव्हाच मोठा होईल जेव्हा आपली शहरे आणि गावे सक्षम होतील,'हा विचार त्यांनी मांडला. हाच विचार झापा च्या जनतेला भावला. नेपाळमध्ये वर्षानुवर्षे 'सिंडिकेट राज' (काही ठराविक पक्षांची मक्तेदारी) चालत आले आहे. बालेन शाह यांनी कोणत्याही मोठ्या पक्षाचा पाठिंबा न घेता, केवळ आपल्या कामाच्या जोरावर निवडणूक लढविली. त्यांनी तरुणांना केवळ 'कार्यकर्ता' म्हणून न वापरता त्यांना 'बदलाचे दूत' बनविले. 'झापा-५'मध्ये के. पी. शर्मा ओली यांच्यासारख्या दिग्गज नेत्याचा पराभव होणे, हे दर्शवते की जनतेला आता 'नेत्या'पेक्षा 'तज्ज्ञ'लोकांची गरज आहे, जे वास्तववादी उपाय शोधू शकतील. बालेन शाह यांचा विजय हा 'काम करणाऱ्याला मते मिळतात'या लोकशाहीतील सर्वांत मोठ्या सत्याचा विजय आहे. 'काठमांडू मॉडेल'हे आता केवळ एका शहरापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते संपूर्ण नेपाळ साठी विकासाचे एक 'ब्लू प्रिंट'बनले आहे. या विजयामुळे नेपाळच्या राजकारणात आता 'घराणेशाही' आणि 'पोकळराष्ट्रवाद' यापेक्षा 'परफॉर्मन्स'ला जास्त महत्त्व प्राप्त होईल. शहरात ठिकठिकाणी 'पब्लिक पार्क्स'आणि हरित क्षेत्र विकसित करण्यास सुरुवात केली. त्यांच्या कामावर टीकाही झाली. विशेषतः फूटपाथवरील फेरीवाल्यांना हटविताना त्यांनी दाखवलेली कठोरता मानवाधिकार संघटनांच्या टीकेचा विषय ठरली. गरिबांच्या पोटावर पाय दिला असा आरोप त्यांच्यावर झाला, मात्र त्यांनी नियम सर्वांसाठी समान ही भूमिका लावून धरली. बालेन शाह यांनी काठमांडूचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी जे धाडस दाखविले, त्यामुळेच नेपाळच्या जनतेला, विशेषतः तरुणांना, त्यांच्यामध्ये एक 'नॅशनल लीडर' दिसू लागला. 'झापा-५'मधील त्यांचा विजय हा याच 'काठमांडू मॉडेल'वर उमटलेली विश्वासाची मोहोर आहे.

**(लेखक हे दैनिक 'अजिंक्य भारत'चे कार्यकारी संपादक असून ते आंतरराष्ट्रीय संबंधांचे अभ्यासक आहेत.)**

# कर्जमाफी: काल आणि आज

कृषी जगत
पदमाकर आखरे
मो. 9881929090



महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी गेल्या अनेक दशकांपासून अस्मानी आणि सुलतानी संकटांशी झुंज देत आहे. कधी अतिवृष्टी, कधी दुष्काळ, तर कधी बाजारभावातील घसरण यामुळे शेतकरी सातत्याने कर्जाच्या विळख्यात अडकत गेला आहे. या विळख्यातून त्याला बाहेर काढण्यासाठी सरकारने वेळोवेळी कर्जमाफी हे हत्यार वापरले. २००८ ची ऐतिहासिक कर्जमाफी असो किंवा २०२४ मधील सवलती, कर्जमाफीच्या स्वरूपात आणि अंमलबजावणीत मोठा बदल झाला आहे. भारतात कर्जमाफीची परंपरा तशी जुनी आहे, परंतु २००४-२००५ नंतर शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढल्याने हा विषय राष्ट्रीय पटलावर आला. वाढता उत्पादन खर्च आणि त्या तुलनेत न मिळणारा हमीभाव यामुळे शेतकरी बँकांचे हप्ते फेडण्यास असमर्थ ठरला. जेव्हा शेतकरी थकबाकीदार होतो, तेव्हा त्याला पुढील हंगामासाठी नवीन कर्ज मिळत नाही. ही साखळी तोडण्यासाठी कर्जमाफी हा एकमेव तात्कालिक मार्ग सरकारसमोर उरतो.

२००८ मध्ये तत्कालीन केंद्र सरकारने (युपीए-१) संपूर्ण देशासाठी ७१,००० कोटी रुपयांची कृषी कर्जमाफी आणि ऋणनिवारण योजना जाहीर केली होती. महाराष्ट्रात याचे मोठे पडसाद उमटले. ही योजना सरसकट स्वरूपाची होती. अल्पभूधारक शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करण्यात आले, तर मोठ्या शेतकऱ्यांना २५% सवलत देण्यात आली. यामुळे लाखो शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झाला. बँकांची वसुली झाली आणि शेतकऱ्यांना पुन्हा पतपुरवठा सुरू झाला.

या योजनेत अनेक गरजू शेतकरी तांत्रिक कारणांमुळे सुटले होते, तर ज्यांनी नियमित कर्ज फेडले होते, त्यांच्या पदरात काहीच पडले नाही. त्यानंतर २०१७ मध्ये राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना आणली. राज्यात २०१७ मध्ये मोठ्या शेतकरी संपानंतर तत्कालीन राज्य सरकारला हा निर्णय घ्यावा लागला. ही योजना २००८ च्या तुलनेत अधिक कंडिशनल (अटी-शर्ती असलेली) होती. यात दीड लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्यात आली.

यावेळी पहिल्यांदाच आयटी () प्रणालीचा वापर करून ऑनलाईन अर्ज मागवण्यात आले. आधार प्रमाणीकरण सक्तीचे केले गेले जेणेकरून भ्रष्टाचार रोखता येईल. तसेच ज्या शेतकऱ्यांनी कर्जाची नियमित परतफेड केली होती, त्यांना २५,००० रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात आला.

पुढे २०१९ मध्ये सत्तांतरानंतर नवीन सरकारने अधिक सोपी आणि व्यापक महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना आणली. या योजनेत २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज पूर्णपणे माफ करण्याची घोषणा करण्यात आली. २०१७ च्या योजनेतील ऑनलाईन अर्जांचा गुंता कमी करून केवळ आधार प्रमाणीकरण आणि बँक खाते पडताळणी यावरच यावेळी भर दिला गेला. तसेच नियमित कर्ज फेडणाऱ्यांना ५०,००० रुपयांचे अनुदान देण्याचे आश्वासन देण्यात आले, ज्याची अंमलबजावणी पुढील काही वर्षांत टप्प्याटप्प्याने झाली.

आजच्या काळात मात्र कर्जमाफीचे स्वरूप केवळ कर्ज पुसून टाकणे इथपर्यंत मर्यादित राहिलेले नाही. आता सरकार शाश्वत मदतीकडे वळताना दिसत आहे. आता केवळ एकदाच कर्जमाफ करण्यापेक्षा नमो शेतकरी महासन्मान निधी अंतर्गत दरवर्षी ६,००० (राज्य) + ६,००० (केंद्र) असे एकूण १२,००० रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले जात आहेत. नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी आता कर्जमाफीची वाट न पाहता विमा संरक्षणावर भर दिला जात आहे. १ रुपयांत पीक विमा काढण्यात येत आहे. तसेच सध्या अनेक योजनांतर्गत वेळेवर कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजाने कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे.

कर्जमाफीमुळे कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्याला मानसिक आधार मिळतो. त्यामुळे शेतकरी आत्महत्या रोखण्यास मदत होणार आहे. कर्जमाफीमुळे थकबाकीदार शेतकरी पुन्हा कर्ज घेण्यासाठी पात्र होतो, ज्यामुळे तो सावकाराच्या पाशात अडकत नाही. ग्रामीण भागात पैसा खेळता राहतो. कर्जमाफीचे शेतकऱ्यांसंबंधी असे फायदे असले तरी याचे तोटेही आहेत. वारंवार कर्जमाफी दिल्याने कर्ज न फेडण्याची प्रवृत्ती वाढू शकते, असे अर्थतज्ज्ञांचे मत आहे.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले : स्त्री शिक्षणाच्या प्रकाशवाटेच्या शिल्पकार

दिन विशेष
डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२



भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांनी आपल्या धैर्य, दूरदृष्टी आणि निःस्वार्थ कार्यातून समाजाच्या विचारविश्वाला नवे परिमाण दिले. स्त्रीशिक्षणाचा पाया रचणाऱ्या, सामाजिक समतेचा विचार रुजवणाऱ्या आणि मानवतेच्या मूल्यांना जीवनकार्याचे स्वरूप देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव त्या थोर व्यक्तिमत्त्वांमध्ये अग्रक्रमाने घेतले जाते. स्त्रीला शिक्षणाचा अधिकार नसलेल्या, जातिभेद आणि अंधश्रद्धांच्या जोखडात अडकलेल्या भारतीय समाजात त्यांनी प्रबोधनाची ज्योत पेटवली. स्त्रीला शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. १० मार्च हा दिवस त्यांच्या स्मृतिदिनाच्या रूपाने साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका महान समाजसुधारकाची आठवण करून देणारा दिवस नसून स्त्रीशिक्षण, सामाजिक समता आणि मानवतेच्या मूल्यांची जपणूक करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे एका साध्या शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे वडील खंडोजी नेवसे आणि आई लक्ष्मीबाई नेवसे हे कष्टाळू आणि साधे स्वभावाचे होते. त्या काळात भारतीय समाजात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. स्त्रीचे आयुष्य घरकाम, कुटुंबाची सेवा आणि सामाजिक बंधनांच्या चौकटीत मर्यादित ठेवले जात असे. बालविवाह, विधवांवरील अन्याय, स्त्रीशिक्षणाचा अभाव आणि जातीय विषमता या समस्या समाजात खोलवर रुजलेल्या होत्या. अशा वातावरणात सावित्रीबाईंचे बालपण गेले. लहान वयातच त्यांचा विवाह महात्मा ज्योतिराव फुले यांच्याशी झाला. हा विवाह सावित्रीबाईंच्या आयुष्यातील एक महत्त्वपूर्ण वळण ठरला. महात्मा ज्योतिराव फुले हे अत्यंत प्रगत विचारांचे समाजसुधारक होते. त्यांनी समाजातील अन्यायकारक परंपरांना आव्हान देण्याचा धाडसी मार्ग स्वीकारला होता. विवाहानंतर त्यांनी सावित्रीबाईंना शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्या काळातील सामाजिक परिस्थिती लक्षात घेतली तर हा निर्णय अत्यंत क्रांतिकारक होता. समाजातील अनेक लोकांनी या निर्णयाचा विरोध केला. परंतु ज्योतिराव फुले यांनी सामाजिक टीकेची पर्वा न करता सावित्रीबाईंना शिक्षण दिले. सावित्रीबाईंनीही अत्यंत मेहनतीने शिक्षण घेतले आणि पुढे त्या भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका बनल्या. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. १८४८ साली पुण्यातील भिडेवाडा येथे सावित्रीबाई फुले आणि ज्योतिराव फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. ही घटना भारतीय शिक्षणाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानली जाते. त्या काळात मुलींना शाळेत पाठवणे हे समाजाच्या दृष्टीने अत्यंत अनुचित मानले जात होते. सावित्रीबाई शाळेत जात असताना अनेक लोक त्यांच्यावर दगड, चिखल आणि गोमूत्र फेकत असत. त्यांना अपमानास्पद शब्दांनी हिणवले जात असे. परंतु या सर्व अपमानांना न जुमानता सावित्रीबाई दररोज शाळेत जात राहिल्या. त्या आपल्या पिशवीत दोन साड्या घेऊन जात असत. एखादी साडी खराब झाली तर दुसरी साडी नेसून त्या पुन्हा वर्गात जाऊन मुलींना शिकवण्याचे काम सुरू करत असत. त्यांच्या या धैर्यामुळे आणि चिकाटीमुळे स्त्रीशिक्षणाची ज्योत अखंड प्रज्वलित राहिली. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा प्रसार करताना समाजातील दलित, शोषित आणि वंचित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. त्या काळात जातिव्यवस्था अत्यंत कठोर होती आणि खालच्या जातींतील लोकांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. शिक्षण ही केवळ उच्चवर्णीयांची मक्तेदारी मानली जात होती. परंतु सावित्रीबाई आणि ज्योतिराव फुले यांनी या अन्यायकारक व्यवस्थेला आव्हान दिले. त्यांनी दलित मुलांसाठी आणि मुलींसाठी अनेक शाळा सुरू केल्या. त्यांच्या प्रयत्नांमुळे समाजातील दुर्लक्षित घटकांना शिक्षणाची संधी मिळाली. शिक्षणाच्या माध्यमातून समाजात समता निर्माण करता येईल, असा त्यांचा ठाम विश्वास होता. सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठीही मोठा संघर्ष केला.

# इतिहासाची पुनरावृत्ती: भारताचा टी-२० विश्वचषक विजय

क्रीडा जगत
प्रविण बागडे
नागपूर, मो. 9923620919

क्रिकेट हा भारतासाठी केवळ खेळ नाही; तो भावना आहे, ओळख आहे आणि कधी कधी संपूर्ण राष्ट्राच्या आत्मविश्वासाचा आरसाही असतो. जेव्हा भारतीय संघाने टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात विजय मिळवला, तेव्हा तो फक्त एका ट्रॉफीचा विजय नव्हता; तो कोट्यवधी भारतीयांच्या स्वप्नांचा आणि आशेचा विजय होता. जगातील सर्वात लोकप्रिय आणि रोमांचक स्पर्धांपैकी एक असलेल्या आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये भारताने पुन्हा एकदा आपली ताकद सिद्ध केली. अंतिम सामन्यातील या विजयाने भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील अनेक गौरवशाली आठवणींना नव्याने उजाळा दिला. हा विजय म्हणजे इतिहासाची पुनरावृत्तीही आहे आणि इतिहासावर मातही आहे. भारतीय क्रिकेटच्या इतिहासात काही क्षण असे असतात जे केवळ क्रीडा विजय नसतात, तर राष्ट्रीय आत्मविश्वासाचे प्रतीक बनतात. १९८३ मध्ये कपिल देव यांच्या नेतृत्वाखाली भारताने जिंकलेला विश्वचषक हा असा पहिला ऐतिहासिक क्षण होता. त्या विजयाने भारतीय क्रिकेटचा चेहरामोहरा बदलून टाकला. त्यानंतर २००७ मध्ये महेंद्रसिंग धोनी यांच्या नेतृत्वाखाली भारताने पहिल्यांदा टी-२० विश्वचषक जिंकत नवे युग सुरू केले. त्या विजयाने भारतीय क्रिकेटला नवा आत्मविश्वास दिला. त्यानंतर २०२४ मध्ये भारतीय संघाचे कर्णधार रोहित शर्मा यांनी स्पर्धेत उत्कृष्ट नेतृत्व दाखवले. क्रिकेटमध्ये कर्णधार हा केवळ खेळाडू नसतो; तो संघाचा मार्गदर्शक असतो. योग्य वेळी गोलंदाजांचा वापर, अचूक क्षेत्ररचना आणि खेळाडूंवर दाखवलेला विश्वास या सर्व गोष्टींनी संघाला निर्णायक क्षणी बळ दिले. रोहित शर्माच्या नेतृत्वामुळे भारतीय संघामध्ये आत्मविश्वास आणि एकजूट दिसून आली. आज सूर्यकुमार यादव यांच्या नेतृत्वात मिळवलेला दणदणीत विजय हा त्या इतिहासाचीच पुनरावृत्ती आहे. परंतु अधिक परिपक्व आणि अधिक प्रभावी स्वरूपात. टी-२० क्रिकेटमध्ये फलंदाजीवर अधिक भर दिला जातो; मात्र या अंतिम सामन्यात भारताच्या गोलंदाजांनी विजयाचा पाया रचला. जसप्रीत बुमराह यांची अचूक लाईन-लेंथ, अर्शदीप सिंग यांची स्विंग आणि हार्दीक पांड्या यांची अष्टपैलू कामगिरी यांनी प्रतिस्पर्धी संघाला सतत दबावाखाली ठेवले. क्रिकेटमध्ये असे म्हणतात, फलंदाज सामना जिंकतात; पण गोलंदाज स्पर्धा जिंकून देतात. या विजयातही तेच दिसून आले. अंतिम सामन्यात भारतीय विजयाचा खरा शिल्पकार



ठरला तो म्हणजे जसप्रीत बुमराह. त्याच्या अचूक यॉर्कर, वेगवान चेंडू आणि शांत स्वभावामुळे प्रतिस्पर्धी फलंदाजांना धावा करणे कठीण झाले. निर्णायक क्षणी घेतलेली त्याची विकेट भारतासाठी टर्निंग पॉइंट ठरली. त्याच्या शानदार कामगिरीमुळे त्याला "मॅन ऑफ द मॅच" हा किताब मिळाला. क्रिकेटमध्ये गोलंदाज अनेकदा पडद्यामागील नायक असतात; परंतु या सामन्यात बुमराहचा प्रभाव इतका जबरदस्त होता की त्याच्याशिवाय हा विजय कदाचित शक्य झाला नसता. या संपूर्ण स्पर्धेत सर्वाधिक प्रभाव टाकणाऱ्या खेळाडूंमध्ये संजू सॅमसन याचे नाव विशेषत्वाने घ्यावे लागेल. आपल्या आक्रमक आणि आकर्षक फलंदाजीने त्याने भारतीय संघाला अनेक सामन्यांत दमदार सुरुवात करून दिली. निर्णायक क्षणी खेळलेल्या त्याच्या खेळींनी संघाला विजयाच्या दिशेने नेले. सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरीमुळे त्याला "मॅन ऑफ द टूर्नामेंट" हा मानाचा किताब मिळाला. सॅमसनच्या या यशामुळे भारतीय क्रिकेटला एक नवा तारा मिळाल्याची भावना अनेक क्रिकेटप्रेमींनी व्यक्त केली. अंतिम सामन्यात भारताचा सामना न्यूझीलंड या मजबूत संघाशी झाला.

न्यूझीलंडचे कर्णधार हे शांत स्वभावाचे आणि रणनीतीत पारंगत नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या संघाने अंतिम सामन्यात जोरदार संघर्ष केला; मात्र भारतीय गोलंदाजीची धार, उत्कृष्ट क्षेत्ररक्षण आणि संयम यामुळे शेवटी विजय भारताच्या बाजूने झुकला. भारतामध्ये क्रिकेटमध्ये मोठा विजय मिळाला की तो राष्ट्रीय उत्सव ठरतो. रस्त्यांवर फटाके फुटतात, लोक एकमेकांना मिठी मारतात आणि संपूर्ण देश आनंदाच्या लाटेत न्हाऊन निघतो. हा आनंद क्षणिक असला तरी तो लोकांच्या मनात नवी ऊर्जा निर्माण करतो.

दैनंदिन जीवनातील संघर्ष, आर्थिक अडचणी आणि सामाजिक ताण यांच्या दरम्यान हा विजय लोकांना आशेची नवी किरण देतो. गेल्या काही वर्षांत भारताला अनेक मोठ्या स्पर्धांमध्ये निराशा स्वीकारावी लागली होती. उपांत्य फेरीतील किंवा अंतिम सामन्यातील पराभवांनी चाहत्यांच्या मनात खंत निर्माण झाली होती. परंतु पराभव हा कधी कधी यशाचा पाया ठरतो. त्या अपयशांनी भारतीय संघाला अधिक मजबूत बनवले. आजचा विजय म्हणजे त्या सर्व पराभवांना दिलेले ठोस उत्तर आहे. भारतीय क्रिकेटच्या यशामागे व्यवस्थेचेही मोठे योगदान आहे. बोर्ड ऑफ कंट्रोल फॉर क्रिकेट इन इंडिया यांनी गेल्या काही वर्षांत क्रिकेटच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे.

तसेच इंडियन प्रीमियर लीग मुळे भारतीय खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचा अनुभव मिळाला. या स्पर्धेमुळे अनेक तरुण खेळाडूंना मोठ्या मंचावर चमकण्याची संधी मिळाली. भारतीय संघाचा हा विजय लाखो तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. गावोगाव क्रिकेट खेळणारी मुले आज हा सामना पाहून मोठी स्वप्ने पाहत असतील. कारण भारतीय क्रिकेटची कहाणी अजून संपलेली नाही; उलट ती दिवसेंदिवस अधिक रोमांचक होत चालली आहे. क्रीडा ही केवळ मनोरंजन नसून व्यक्तिमत्त्व घडवण्याचे माध्यम आहे. ती शिस्त, मेहनत आणि संघभावना शिकवते. भारतीय संघाचा हा विजय त्या मूल्यांना अधिक बळ देणारा आहे.

# रूपाली विश्वंभर पांडे : न्यायाच्या प्रवासातील प्रेरणास्त्रोत



महिला दिन हा दिवस केवळ सण म्हणून नाही, तर त्या सर्व महिलांचा गौरव करण्याचा दिवस आहे, ज्या आपल्या कामगिरीने समाजात बदल घडवतात. अशाच प्रेरणादायी महिलांमध्ये रूपाली विश्वंभर पांडे यांचे नाव अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी आपल्या कार्याने महिलांना न्याय मिळवून देण्याच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. रूपाली पांडे यांनी बी.ए., एम.एस.डब्ल्यू., व एम.एम.सी. ही शैक्षणिक पात्रता संपादन केली आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी महिला व बालकल्याण क्षेत्रात काम करण्याचा निर्णय घेतला. जानेवारी २०१३ मध्ये त्यांनी जिल्हा संरक्षण अधिकारी म्हणून सेवेत प्रवेश केला. त्यांच्या पहिल्या कार्यस्थळाचा अनुभव अकोला जिल्हा महिला व बालविकास कार्यालयातून सुरू झाला. २०१९ मध्ये रूपाली पांडे यांना यवतमाळमध्ये बदली झाली, आणि नोव्हेंबर २०२४ पासून पुन्हा अकोला येथे त्यांचे कामकाज सुरु आहे. संपूर्ण कालावधीत त्यांनी अनेक महिलांच्या प्रकरणांवर काम केले आहे निवास आदेश, गावठी मुलांचा ताबा, नुकसान भरपाई मिळवून देणे, तसेच महिलांना रोजगारासाठी आवश्यक मार्गदर्शन देणे. ज्या महिलांना सासऱ्यांकडून घराबाहेर काढले जाते किंवा ज्या महिलांकडे राहण्याची व्यवस्था नसते, त्यांना महिला राज्यगृहात पाठवले जाते, जे महिला बालकल्याणाचे आश्रयस्थान आहे. ज्या महिलांना समुपदेशनाद्वारे समस्यांचा मार्ग शोधावा लागतो, त्यांना जवळच्या समुपदेशन केंद्रात पाठवले जाते. अकोला जिल्ह्यात चार समुपदेशन केंद्रे आहेत, जिथे महिलांना सल्ला, मार्गदर्शन व मानसिक आधार मिळतो. रूपाली पांडे यांचा कार्यक्षेत्र फक्त कार्यालयापुरता मर्यादित नाही. ज्या प्रकरणांमध्ये न्यायालयात केस दाखल करणे आवश्यक असते, त्या प्रकरणांचे कार्यालयातून मोफत दाखल होते आणि मोफत वकील उपलब्ध करून दिला जातो. पीडित महिलांना येण्या-जाण्याचा त्रास होऊ नये म्हणून प्रत्येक तालुक्यात तालुका संरक्षण अधिकारी नियुक्त आहेत. पीडित महिला स्वतःच्या भागातील अधिकारी कडे जाऊन न्यायालयीन कार्यवाही सहज करू शकतात. महिलांना न्याय मिळवताना अनेक अडचणी येतात. ग्रामीण भागातील किंवा बाहेरील जगाशी फारसा संबंध नसलेल्या महिलांना कायद्याचे ज्ञान नसते, त्यामुळे त्यांना प्रत्येक बाबीची स्पष्ट माहिती देणे आवश्यक असते. तसेच गैर अर्जदारांकडून येणाऱ्या अडचणी, धमक्या आणि न्यायालयाचे आदेश पाळले न जाणे यासारख्या आव्हानांवरही रूपाली पांडे यांनी उत्तमरीत्या मार्गदर्शन केले आहे. रूपाली पांडे यांचे कार्य कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २०१५ अंतर्गत अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्या पीडित महिलांसाठी न्याय मिळविण्यातला मुख्य दुवा आहेत. समुपदेशन केंद्रे, पोलीस, आश्रयगृहे, वन स्टॉप सेंटर आणि न्यायालयाशी सतत संपर्क ठेवून त्यांनी अनेक महिलांना न्याय मिळवून दिला आहे. महिला दिनाच्या निमित्ताने, रूपाली पांडे यांचे हे कार्य केवळ प्रशंसनीय नाही, तर प्रेरणादायी आहे. त्या दाखवतात की महिलांना सक्षम बनवणे, त्यांना न्याय मिळवून देणे आणि त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी केलेले प्रयत्न समाजात बदल घडवू शकतात.



प्रासंगिक

प्रवीण वानखडे
9022149145



# प्रा. जयश्री नवलकार : महिला सक्षमीकरणाचे प्रेरणादायी उदाहरण



प्रा. सौ. जयश्री गणेश नवलकार (कात्रे) या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहेत. सध्या त्या श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला येथे गृहअर्थशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी गृहअर्थशास्त्र विषयात कला शाखेची पदव्युत्तर पदवी, राज्य पात्रता परीक्षा उत्तीर्ण(सेट), पीएचडी, बीएड पदवी तसेच मानसशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, मराठी व इंग्रजी या विषयांत उच्च शिक्षण संपादन केले आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देतानाच संशोधनाचीही प्रेरणा दिली आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत अविष्कार या संशोधन पर कार्यात प्रथम क्रमांक प्राप्त आहेत.आहारोपचार मध्ये विशेष करून मिलेट्स, रानभाज्या,गर्भावस्थेतील आहार या विषयावर त्यांचे विविध संशोधन निबंध प्रकाशित झाले असून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर येथे मिलेट्स प्रचार आणि प्रसार या विषयावरील आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेत त्यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांचा पीएचडी अभ्यास विषय ''बालकांच्या वाढ व विकासामध्ये गर्भसंस्काराची भूमिका एक अध्ययन'' हा अभ्यास विषय अत्यंत समकालीन व समाजोपयोगी असून लवकरच त्या या विषयाशी निगडित गर्भसंस्कार कार्य व पुस्तक लेखन करणार आहेत. विशेषतः शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांचे मानसिक स्वास्थ्य हा त्यांचा जिव्हाळ्याचा अभ्यास विषय आहे. साहित्य क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. ''पौष्टिक आहार रानफळांचा खजिना'' हे त्यांचे पुस्तक प्रकाशित असून ''आयुर्वेद,पोषक तत्व व रानभाज्या'' हे पुस्तक लवकरच प्रकाशित होणार असून त्यांच्या लेखनातून पारंपरिक ज्ञान, स्थानिक आहारसंस्कृती व आधुनिक शास्त्रीय दृष्टीकोन यांचा सुंदर समन्वय दिसून येतो. तसेच आरोग्य, संस्कार व निसर्गाशी नाते जपण्याचा संदेश समाजापर्यंत पोहोचतो. मनोरंजन क्षेत्रातही त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. अकोला आकाशवाणी येथे ''सखी सहेली'' व किसान वाणी या कार्यक्रमामध्ये त्यांनी उद्घोषिका म्हणून कार्य केले आहे. त्यांच्या ओजस्वी व प्रभावी निवेदन शैलीमुळे त्या श्रोत्यांमध्ये विशेष लोकप्रिय ठरल्या. ''निसर्ग कट्टा'' या यूट्यूब चॅनलच्या माध्यमातून निसर्ग,आहार व पर्यावरण संवर्धनावर आधारित तसेच बाल मानसशास्त्र या विषयावर ब्लॉक द्वारे लेखन करीत आहेत. निसर्ग कट्टा या चैनल द्वारे निसर्गा विषयी वैज्ञानिक जाणीव व संवेदनशीलता निर्माण करणे हेच त्यांच्या कार्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सामाजिक क्षेत्रात धनगर समाज महिला अध्यक्षा म्हणून कार्यरत असून महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंच मुंबई महाराष्ट्र राज्य च्या शहर अध्यक्ष असून समाजप्रबोधनाचे कार्य करीत आहेत. ''राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बहुउद्देशीय प्रतिष्ठान''च्या अध्यक्षा म्हणून त्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवित आहेत.

# सन्मान, स्वावलंबन आणि समाजासाठी योगदान

महिला दिन हा फक्त एक दिवस साजरा करण्यासाठी नसून, समाजातील प्रत्येक स्त्रीच्या योगदानाला, तिच्या हक्कांना आणि तिच्या सक्षमीकरणाला ओळख देण्याचा दिवस आहे. आजच्या बदलत्या काळात स्त्री हा समाजाचा एक अभिन्न घटक आहे, आणि तिच्या स्वावलंबनासाठी, नेतृत्वासाठी आणि निर्णयक्षमतेसाठी प्रत्येक स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. माझ्या अनुभवातून, प्रशासनात काम करताना आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात कार्यरत असताना, मी अनेक स्त्रियांच्या संघर्षांना आणि यशाला प्रत्यक्ष पाहिले आहे, ज्यातून समाजातील बदलाचे वास्तविक दर्शन होते. माझा करिअर प्रवास भंडारा जिल्ह्यात ११ जानेवारी २००१ पासून सुरू झाला. सुरुवातीला अडीच महिन्याचा करार होता, पण माझ्या इच्छाशक्तीने, कुटुंबाच्या पाठिंब्याने BSW आणि MSW स्वतःच्या मेहनतीने मी या क्षेत्रात स्थिरता मिळवली. आणि पूर्ण केल्यावर, मी सामाजिक सेवा आणि महिला विकास या क्षेत्रात पूर्णपणे समर्पित झाले. माझ्या बालपणापासूनच स्टेजवरील आत्मविश्वास आणि वडिलांच्या सामाजिक कार्याची प्रेरणा माझ्या वाटचालीस मार्गदर्शन करत आली. शाळेत पहिला क्रमांक मिळवणे, कॉलेजमधील कार्यक्रम, सामाजिक उपक्रम, भाषण आणि इलेक्शन प्रचार यामध्ये सक्रिय सहभाग या सर्व गोष्टींमुळे मला नेतृत्वाच्या आणि समाजसेवेच्या भूमिकेत स्वतःला विकसित करण्याची संधी मिळाली. महिला म्हणून प्रशासनात काम करताना अनेक आव्हाने आली. अमरावती ते भंडारा असा प्रवास आणि घरकुल सांभाळण्याचा दबाव सुरुवातीला मोठा होता. माझा दीड वर्षांचा मुलगा होता, आणि त्यासाठी आई-वडिलांची मदत घेणे भाग पडले. सुरुवातीचे सहा महिने हे आव्हानात्मक होते, पण मला फील्ड काम आवडले आणि मी त्यात आनंद अनुभवला. माझ्या महाव्यवस्थापक मॅडम, सर आणि सहकाऱ्यांच्या मदतीमुळे मी या अडचणींवर मात करू शकलो. ऑगस्ट २००१ मध्ये माझी बदली अमरावती येथे झाली आणि त्या क्षणी माझा वास्तविक करिअर प्रवास सुरू झाला. MAVIM (Mahila Arthik Vikas Mahamandal ) ने माझ्या कार्यक्षेत्राला आकार दिला आणि माझ्या प्रामाणिक कार्याचा फळ मला मिळाले, ज्यामुळे मी शासनाच्या नियमित सेवेत स्थिर राहू शकली. आजच्या तरुणींना माझा संदेश आहे आलेली संधी कितीही अल्पकाळाची असो, ती नक्कीच स्वीकारा. महिला असल्या तरी कोणत्याही क्षेत्रात जाण्यास घाबरू नका. आपली जागा सोडून बाहेरच्या जगाशी संपर्क साधा, कामात झोकून द्या, प्रामाणिकपणे आणि आवडीने कार्य करा. आपल्या कामावर प्रेम करा आणि समाजात आपली ओळख निर्माण करा. महिला सक्षमीकरण म्हणजे स्वतः चा निर्णय स्वतः घेणे, हक्क आणि अधिकार मिळवणे आणि समाजात व्यक्ती म्हणून स्वतःला मान्य करणे. भारतीय संविधानाने महिलांना पुरुषांप्रमाणे मूलभूत हक्क दिले आहेत, आणि त्यांचा पूर्ण वापर करणे हे सक्षमीकरण आहे. ग्रामीण आणि शहरी महिलांच्या समस्या समान आहेत, पण शहरात संसाधने उपलब्ध असल्यामुळे संधी लवकर मिळतात. ग्रामीण भागातील महिलांना रोजगार, समान कामाचा मोबदला, शिक्षण, आरोग्य आणि सरकारी योजनांची माहिती मिळवण्यात अडचणी येतात. आर्थिक स्वावलंबनासाठी स्वयंसहाय गट, बचत गट, मार्केटिंग, योजना समन्वय आणि माहितीची उपलब्धता हे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. फार्मर प्रोड्यूसर कंपनी, मार्केट लीकेजेस, विक्री मॉल आणि डिजिटल ट्रेनिंग मॉड्यूल्स सुरू आहेत. डिजिटल युगात महिलांना सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण, यशस्वी उद्योजकांची माहिती, उद्योग आणि शासनाच्या योजना यांची माहिती दिली जाते. महिला दिन हा दिवस साजरा करण्यापेक्षा, दैनंदिन जीवनात स्त्रीला सन्मान, स्वावलंबन आणि समान अधिकार मिळण्याची आठवण करून देतो. समाजाने महिलांना आर्थिक सुरक्षा, शिक्षण आणि कार्यक्षमतेसाठी मदत केली पाहिजे, ज्यामुळे त्यांना सत्ता, संपत्ती आणि निर्णयक्षमतेसाठी संधी मिळते. माझा संदेश आहे .



मागोवा

वर्षा खोब्रागडे (पाटील)
जिल्हा समन्वय अधिकारी




# स्वातंत्र्योत्तर काळातील राष्ट्र उभारणीत स्त्री-शक्तीचा जागर

नागेश सरतकर
अकोला, मो.9096310354

स्त्रीचे समाजात नेमके कोणते स्थान आहे? एक व्यक्ती म्हणून, एक घटक म्हणून तिचा समाजात दर्जा काय आहे? या प्रश्नांचा विचार केला, तर आपल्या हे लक्षात येईल की सामाजिक व आर्थिक स्थितींतराशी आणि प्रस्थापित मूल्यव्यवस्थेच्या परिवर्तनाशी तो निगडित आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर पुढील कालखंडात भारतीय महिलांनी राष्ट्र उभारणीत मोलाचे योगदान दिले आहे. शिक्षण, समाजकारण, राजकारण, विज्ञान आणि भारतीय अर्थव्यवस्था इत्यादी क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा सदर शोधनिबंध आढावा घेतो. केवळ चूल आणि मूल या चौकटीतून बाहेर पडून महिलांनी अंतराळापर्यंत कशी झेप घेतली आणि भारतीय संविधानाने दिलेल्या समान संधीचा वापर करून राष्ट्राचा चेहरामोहरा कसा बदलला याचे सर्व भारतीय साक्षीदार आहेत. स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक, सांस्कृतिक बदल, महिलांना नेतृत्वाच्या संधी, शिक्षण, आरोग्य, क्रीडा, विज्ञान-तंत्रज्ञान, कुटुंब कल्याण, शाश्वत विकास इत्यादी क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील महिला नेतृत्वाची कामगिरी उल्लेखनीय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व स्त्री-पुरुषांना एकाच पातळीवर आणण्यासाठी आवश्यक कलमांची निर्मिती करून भारतीय संविधानाद्वारे स्त्रियांना शिक्षणाचा व सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार मिळवून दिला आहे. दुर्गाबाई देशमुख समिती: देशातील स्त्री शिक्षणाचा सखोल अभ्यास करून स्त्री शिक्षणाविषयी निश्चित धोरण ठरवण्यासाठी राज्यांनी विकासात्मक कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी अशी शिफारस दुर्गाबाई देशमुख समितीने केली. १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण: आज स्त्री शिक्षणाची असलेली सकारात्मक वाटचाल व महिलांचा सर्व क्षेत्रात सहभाग ही १९८६ च्या धोरणाची फलश्रुती आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला तेव्हा भारतीय समाज हा नुकताच इंग्रजी राजवटीतून बाहेर पडला होता. तत्कालीन समाजसुधारक, विचारवंत राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, महात्मा ज्योतिराव फुले, गोपाळ गणेश आगरकर यांनी स्त्रियांचे समाजातील स्थान उंचावण्याचे फार मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले. त्यामुळे स्त्री शिक्षणाच्या वाटचालीस प्रारंभ झाला. तेव्हा महिलांसमोर केवळ स्वातंत्र्य टिकवण्याचेच नाही, तर एक नवा आधुनिक भारत घडविण्याचे आव्हान होते. भारतीय संविधानाने कलम १४ व १५ अन्वये महिलांना समानतेचा हक्क प्रदान केला. सरोजिनी नायडू, विजयालक्ष्मी पंडित यांसारख्या महिलांनी सुरुवातीच्या काळात धोरण निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावली. राष्ट्र उभारणी म्हणजे केवळ आर्थिक प्रगती नसून सामाजिक न्याय आणि मानवी हक्काची प्रस्थापना होय हे महिलांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले. स्वातंत्र्योत्तर काळात महिलांनी पुरुषप्रधान पारंपारिक संस्कृतीला फाटा दिला. स्वतःचे घर, कुटुंब सांभाळून शिक्षण सुधारणा, महिला व बालकल्याण, राजकारण, समाजकारण, न्यायव्यवस्था, क्रीडा व सांस्कृतिक चळवळी क्षेत्रात सशक्त व मोलाचे योगदान दिले आहे. या योगदानाचा सखोल समीक्षा प्रस्तुत शोधनिबंधात केली आहे. १९५० रोजी भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीद्वारे भारतातील सर्व स्त्री-पुरुषांना समान अधिकार देण्याचे कार्य स्वातंत्र्योत्तर काळात झाले. इतर कोणत्याही व्यक्तीप्रमाणे स्त्री देखील एक स्वतंत्र व्यक्ती आहे. त्यामुळे तिला आपली मते व्यक्त करण्याचा अधिकार भारतीय संविधानाने बहाल केला. स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री शिक्षणाच्या विकासासाठी, प्रचार-प्रसारासाठी करण्यात आलेले सर्व प्रयत्न व त्या प्रयत्नांना आलेले यश याचे मूळ भारतीय संविधानात सापडते. प्रस्तुत विषयावर अनेक अभ्यासकांनी लेखन केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात महिलांनी देशाच्या विकासात आपल्या कर्तृत्वाने हातभार लावून महत्त्वाची भूमिका बजावली आहे. राष्ट्रउभारणीत स्त्रियांचे योगदान दीर्घकाळ स्मरणात राहणारे आहे. राजकीय नेतृत्वः- भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून मा. इंदिरा गांधी यांनी भारताचे नेतृत्व केले. त्यांनी देशासाठी अनेक धाडसी निर्णय घेतले. सुचेता कृपलानी ह्या पहिल्या महिला मुख्यमंत्री होत्या. अलीकडच्या काळात राष्ट्रपती पदावर विराजमान झालेल्या प्रतिभाताई पाटील व द्रौपदी मुर्मू यांनी भारताच्या लोकशाहीला बळकटी दिली. स्थानिक स्वराज्य संस्थेतील ७३व्या व ७४व्या घटनादुरुस्तीने लाखोंच्या संख्येने महिला सत्तेत आल्या. सामाजिक सुधारणाः- डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी, दुर्गाबाई देशमुख आणि अलीकडच्या काळात मेधा पाटकर (नर्मदा बचाओ आंदोलन) तसेच सिंधुताई सपकाळ यांनी उपेक्षितांच्या कल्याणासाठी काम केले. आर्थिक क्षेत्र:- महिलांनी देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.




## ओळख पक्ष्यांची : जंगल घुबड



जंगल घुबड भारतात आणि श्रीलंकेच्या कोरड्या भागात आढळतात. प्रजाती सहसा पहाटे आणि संध्याकाळच्या वेळी त्यांच्या कॉलद्वारे शोधली जातात. या लहान घुबडाचे डोके गोलाकार आहे आणि ते सर्वत्र बारीक आहे. चेहऱ्यावर कोणतीही स्पष्ट डिस्क नसते आणि पंख तपकिरी असतात आणि शेपटी पांढऱ्या रंगात अरुंद असते.

(छायाचित्र : चंद्रकांत पाटील)

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 330



| | |
|---|---|
| टापटीप | **पाच अक्षरी** |
| थरकाप | अंतरपाट |
| देहत्याग | अप्रामाणिक |
| परिहार | कळफलक |
| पसरणे | खरीप पिके |
| बंजारन | जमालगोटा |
| भागवत | टळटळीत |
| मुद्गल | महाभारत |
| वरताण | रकमवार |
| वाताहत | रसरशीत |
| विशेषज्ञ | वाकबगार |
| संगणक | शतपावली |
| सनातन | हकनाहक |
| सरकार | **सहा अक्षरी** |
| सारवणे | अहमहमिका |
| सारीपाट | जगत पालक |
| स्वार्थत्याग | नवलविशेष |

(उत्तर पुढील अंकी)

**संकेत शब्द :–**

**दोन अक्षरी**

अग, अर्थ, कटी, कंपा, कफ, कर्ण, कंस, चेव, तिख, पत, पर्ण, पर्व, नाक, पाटा, पाप, प्रजा, भार, मग, मस, मात, माशी, रट, रत, रूप, लत, वश, वळी, वार, वारू, वाली, वेश, व्रात्य, शनि, सत्य, सर्व, सह, सह, स्वारी

**तीन अक्षरी**

आचारी, कंगाल, कणिक, काटक, गरज, गरूड, चालक, चाहूल, तपन, ताडन, तारण, पालक, प्रकार, प्रवाह, प्राचार्य, भावकी, मगर, मसावि, रनवे, वारस, समास, सरस, सर्वज्ञ, सवारी, हमाल

**चार अक्षरी**


अतिसार, अंथरूण, अनामिका, अनिवार्य, कमतर, काकरव, कार्यवाह, गालबोट, जरतर

मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 711



**आडवे संकेत :–**
2) शेत, मळा, वहिवाट
6) प्रतिपक्ष, आरोपी
9) ज्याला कुणीही जिंकू शकत नाही असा
11) सावधगिरी, जागरूकता
12) सकाळी अंगणात शिंपडलेले शेणमिश्रीत पाणी
13) घट्ट धरून ठेवण्याचे एक हत्यार
15) चोळणे, रगडणे
16) रोजची सवय, अभ्यास
18) विशेष लक्षणयुक्त, असाधारण
19) कापड, वस्त्र किंवा औषधीतील घटकद्रव्य
21) श्रीगणेशाला आवडणारे एक पक्वान्न
22) सूत कातण्याचे हस्तयंत्र
23) साठ मिनिटांचा काळ
24) गुण दोष विवेचन
27) नटणारा, मुरडणारा
29) दाराच्या चौकटीचा तळभाग
31) सौभाग्यवीचे संक्षिप्त रूप
32) हलगर्जीपणा
34) पायातील चप्पल
36) नाश पावलेला भाग
37) शत्रु
38) माया, वात्सल्य, ममत्व
40) एकाग्र दृष्टी
41) चतकोर, मोठी ब्रेड
43) श्रीकृष्णाची पत्नी
44) घास, अन्नाचा गोळा
46) वैराग्य, मन मागे फिरणे
49) पैसे खर्च करण्यास मागे पुढे करणारा, कृपण
50) गीत, कविता
51) चिरकाल टिकणारी बेशुद्धी
52) खाटले (हिंदी)
54) राजाची आवडती मुख्य राणी
55) भाग, खंड
56) देवाच्या जपाची गूढ शक्ति असलेले अक्षरे
57) मुस्लिमांची प्रार्थना
58) एखादे कार्य सहजपणे करण्याचा हातात असलेला गुण
59) टिकाव, निभाव
61) लाकूड
62) तळतळाटाचे भाषण
64) सरस्वती देवीचे आवडते वाद्य
65) वार, दिवस 67) सर्वजण, सगळे
68) दोन पक्षात विशिष्ट अटींवर झालेला ठराव
73) जोडा, पादत्राण
75) सहकारी तत्वावर आधारीत संयुक्त भांडवलावर काढलेले सावकारी दुकान
77) मान देण्यास योग्य असलेले प्रतिष्ठित लोक
79) समारंभाचा शेवट 81) दरवाजा
82) वेळप्रसंगानुसार वागणे
83) शासक, राज्यकर्ते

**उभे संकेत :–**
1) सत्यवचनी राजा हरिश्चंद्राची पत्नी
2) वाद्य वाजविणे
3) छाती
4) उपवासाला चालणारे एक कंद
5) नरक
6) जनन, उत्पत्ति
7) तेढ, अढी
8) दिव्याची ज्योत
9) अट, हट्ट
10) सूर्य, ताप देणारा
14) श्रम, परिश्रम
17) बळकट, कणखर
18) दही करण्यासाठी दुधात टाकलेला विशिष्ट पदार्थ
19) दिवसाचा राजा सूर्य
20) संग्रह, जमा करणे
23) बळ
25) सरदार वल्लभभाई पटेल यांना जनतेने दिलेली पदवी
26) नागाने धारण केलेला बहुमूल्य मणी
28) गोलाकार फिरत घोंघावत येणारे जोराचे वारे
29) योग्यता नसतांना अनाहूतपणे न मागता सल्ला देणारा
30) हत्या, वध
33) मृत्यु देवता
35) आवाज देणे
39) फार पाणी घातलेले ताक
41) पातक
42) गळा भरून येईल इतके, गळ्यापर्यंत
45) जंगल 46) शंकर पत्नी
47) बाण, नदीचा काठ
48) खोल दरी 50) भयंकर
51) कोनाचे अंश मोजणारे उपकरण
53) एखाद्याचे येणे आणि त्याचवेळी काही बऱ्यावाईट गोष्टी घडणे यामध्ये जोडण्यात येणारा कार्यकारण संबंध
54) वृत्तपत्र संस्थेतील एक महत्वाचे पद
57) मादकता, धुंदी, कैफ
60) रान रेडा
62) ज्याला मरण नाही असा
63) उंटाच्या पाठीवरचा उंचवटा
64) शूर, योद्धा
66) अभ्यास
67) एकाच जातीचे
69) उघडपणे, बेधडक, दिवसाढवळ्या
70) निवडणूकीत मतदेणारा
71) एखाद्या बद्दल मनात असणारा वैर भाव
72) ओझी उचलणारा
74) शासन करणारे, सरकार
76) ऊसाचे कांडे
78) आवड, द्रव
80) इतर, परका (उत्तर पुढील अंकी)

मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त? केंद्र सरकारकडून 'लिगसी अँड थ्रस्ट' जिल्ह्यात वर्गीकरण

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गडचिरोली, दि. ९:** गेल्या चार दशकांपासून नक्षलवादाच्या दहशतीत वावरणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यावरील 'सर्वात जास्त प्रभावित जिल्हा' हा शिक्का आता पुसला गेला आहे. केंद्र सरकारने या जिल्ह्याचे वर्गीकरण आता 'लिगसी अँड थ्रस्ट' जिल्ह्यात केल्यामुळे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांमध्ये कंत्राटदारांना मिळणारी अतिरिक्त २० टक्के दराची सवलत आता रद्द होण्याची चिन्हे आहेत. या निर्णयामुळे सरकारी तिजोरीवर पडणारा अनावश्यक बोजा कमी होणार असून, विकासकामांच्या खर्चात पारदर्शकता येणार आहे.






महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने २० फेब्रुवारी २०२६ रोजी निर्गमित केलेल्या पत्रानुसार, केंद्रीय गृह मंत्रालयाने २६ डिसेंबर २०२५ रोजी गडचिरोली जिल्ह्याच्या श्रेणीत बदल केला. जिल्ह्यात नक्षलवादाचा प्रभाव लक्षणीयरीत्या कमी झाला असल्याचे केंद्राने नमूद केले आहे. या पार्श्वभूमीवर, ३१ डिसेंबर २००९ च्या जुन्या शासन निर्णयानुसार नक्षलग्रस्त भागातील कामांसाठी दिली जाणारी २० टक्के अतिरिक्त निधीची तरतूद आता अनावश्यक असल्याचे प्रशासनाचे मत आहे.

गडचिरोलीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भात शासनाला अहवाल सादर केला होता. त्यात जिल्ह्यातील सद्यस्थिती आणि सार्वजनिक हित लक्षात घेता, निविदा रकमेत अतिरिक्त २० टक्के शुल्क आकारणे आता योग्य वाटत नाही. या अतिरिक्त खर्चामुळे प्रकल्पांच्या किमतीत विनाकारण वाढ होत आहे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले होते. नक्षलवादाची सवलत रद्द होणार असली तरी, गडचिरोली हा 'आदिवासीबहुल जिल्हा' असल्याने त्या संदर्भातील सवलतींना कोणताही धक्का लावण्यात आलेला नाही. आदिवासी जिल्ह्यांसाठी असलेली १० टक्के शुल्काची तरतूद तशीच कायम ठेवण्याची शिफारस करण्यात आली आहे. अवर सचिव अजित काटकर यांनी या प्रकरणाचा सविस्तर अहवाल आणि नियामक कार्यवाही तातडीने पूर्ण करून शासनास सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे गडचिरोली जिल्ह्यात राबवल्या जाणाऱ्या कोट्यवधींच्या विकासकामांच्या निविदा प्रक्रियेत आता मोठे बदल होणार आहेत.

गडचिरोलीतील नक्षलवाद कमी होण्यामागे प्रामुख्याने सुरक्षा दलांचे वाढते वर्चस्व आणि विकासकामांचा वेग ही दोन महत्त्वाची कारणे आहेत. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्र पोलिसांच्या 'सी-६०' या विशेष पथकाने नक्षलवाद्यांच्या बालेकिल्ल्यात शिरून केलेल्या थेट कारवायांनी नक्षलवाद्यांचे मोठे नुकसान केले. अनेक वरिष्ठ कमांडर मारले गेल्याने आणि काहींनी आत्मसमर्पण केल्यामुळे नक्षलवादी संघटनांचे जाळे विस्कळीत झाले. त्याच जोडीला, एकेकाळी दुर्गम समजल्या जाणाऱ्या भागात रस्ते, पूल आणि मोबाईल टॉवर्सचे जाळे निर्माण झाले. यामुळे सुरक्षा दलांना नक्षलग्रस्त भागात तातडीने पोहोचणे शक्य झाले आणि नक्षलवाद्यांचा नैसर्गिक आश्रय संपला.

# नक्षी शेतशिवारात वाघाचा हल्ला; बैलाचा पाडला फडशा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**भिवापूर, दि. ९:** नक्षी-वडध रोडलगत असलेल्या शेतात बांधलेल्या बैलावर दबा धरून बसलेल्या वाघाने हल्ला करून त्याला ठार केल्याची घटना रविवारी (ता.८) रात्री घडली. सोमवारी (ता.९) सकाळी फिरायला गेलेल्या नागरिकांना बैल मृतावस्थेत आढळून आला.

नक्षी येथील नारायण धांडे यांची सर्व्हे क्रमांक ३०० ही शेती आनंदराव दसरू ढोरे (रा. वडध) यांनी ठेका पद्धतीने केली आहे. ही शेती नक्षी-वडध रस्त्यालगत असल्याने ढोरे हे आपल्या बैलजोडीला नेहमी शेतात बांधत होते. रविवारी नेहमीप्रमाणे त्यांनी बैल शेतात बांधून ठेवले होते. दरम्यान, शेताजवळ दबा धरून बसलेल्या वाघाने रात्रीच्या सुमारास बैलावर हल्ला चढवला. बैलाला सुमारे २०० मीटर अंतरावर ओढत नेत कापसाच्या शेतात त्याचा फडशा पाडत वाघाने भक्ष्य केले.

सोमवारी सकाळी अनिल लोखंडे (रा. नक्षी) हे फिरायला गेले असता शेतात बांधलेला बैल दिसला नाही. शोध घेतला असता काही अंतरावर बैल मांस खाल्लेल्या अवस्थेत आढळून आला. त्यांनी तत्काळ ही माहिती आनंदराव ढोरे यांना दिली. त्यानंतर ढोरे यांनी वनविभागाला कळविले.माहिती मिळताच भिवापूरचे क्षेत्र सहाय्यक व्ही. एस. काळे, उमरेडचे क्षेत्र सहाय्यक डी. एस. वावरे, मोखाळा बिटचे वनरक्षक दलित सूर्यवंशी, सोमनाळा बिटचे वनरक्षक जे. आर. कदम तसेच वनमजूर यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी दोन ट्रॅप कॅमेरे लावण्यात आले आहेत.या घटनेत आनंदराव ढोरे यांचे सुमारे ८० हजार रुपयांचे नुकसान झाले असून परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. वारंवार होणाऱ्या वाघाच्या हल्ल्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये दहशत निर्माण झाली असून शेतात मजुरीसाठी मजूर मिळणेही कठीण झाले आहे.

## महत्त्वाचे

### नागपूर जिल्हा 'स्फोटांची राजधानी' होणार का? -अनिल देशमुख

**नागपूर :** जिल्ह्यात गेल्या अडीच वर्षांत स्फोटके निर्मिती करणाऱ्या कंपन्यांमध्ये झालेल्या दुर्घटनांमुळे ४७ निष्पाप कामगारांना आपला जीव गमवावा लागला. ही अत्यंत गंभीर आणि चिंतेची बाब असतानाही संबंधित यंत्रणा याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करताना दिसत आहे. नागपूर जिल्ह्याची ओळख टायगर कॅपिटल म्हणून आहे, परंतु दुर्दैवाने आता जिल्ह्याची ओळख स्फोटांची राजधानी म्हणून होणार का? असा सवाल माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी व्यक्त केला आहे.राऊळगाव (ता. काटोल) येथील एनर्जी लिमिटेड कंपनीत झालेल्या भीषण स्फोटाला अनेक दिवस उलटूनही, या प्रकरणात जबाबदार असलेल्या सरकारी यंत्रणेवर अद्याप कोणतीही कारवाई न झाल्याबद्दल अनिल देशमुख यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ''प्रशासन व शासन नेमके कोणाला वाचवण्याचा प्रयत्न करत आहे?'' असा थेट सवाल त्यांनी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांना एका पत्राद्वारे विचारला आहे. २ मार्च २०२६ रोजी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या बैठकीत आणि या विभागांच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचा स्पष्ट निर्णय झाला होता. मात्र, अद्याप या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आलेली नाही. अनिल देशमुख यांनी ८ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून जिल्ह्यातील सर्व स्फोटक कारखान्यांच्या सेफ्टी ऑडिट ची मागणी केली होती. त्यावरुन ने १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दिलेल्या माहितीनुसार, कंपनीचे शेवटचे सेफ्टी ऑडिट २७ जानेवारी २०२४ रोजी झाले होते.

### नागपूरच्या ६ महिला बाइकर्सचा 'क्विन्स ऑन द व्हील'मध्ये सहभाग

**नागपूर :** आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने मध्य प्रदेश पर्यटन आणि यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'क्विन्स ऑन द व्हील' या केवळ महिलांसाठी आयोजित मोटारसायकल मोहिमेच्या तिसऱ्या आवृत्तीचा शुभारंभ भोपाळ येथे मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्या हस्ते ध्वज दाखवून करण्यात आला. या मोहिमेत देशातील विविध भागांमधून २५ महिला रायडर्स सहभागी झाल्या असून त्यात नागपूरच्या सहा रायडर्सचा समावेश आहे. यात डॉ. प्रियांका श्रीवास, रुक्मिणी पुनवटकर, पल्लवी देशमुख, रुचिका मेघे, मैथिली सिंह व एकता खंते या महिला रायडर्स मध्य भारताचा बाईकवरून शोध घेण्यासाठी निघाल्या आहेत.

या ध्वजवंदन समारंभाला उच्च शिक्षण मंत्री इंदर सिंह परमार, मध्य प्रदेश पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक इलैया राजा तसेच चे अतिरिक्त व्यवस्थापकीय संचालक बेडेकर उपस्थित होते.

# जलशुद्धीकरण केंद्रात आढळले मृत कीटक आणि घाण; दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**भंडारा, दि. ९:** सध्या प्रशासन भंडारा आणि पवनीवासीयांच्या आरोग्यासोबत खेळ करत असल्याची अत्यंत गंभीर आणि धक्कादायक बाब समोर आली आहे. गेल्या १५ दिवसांपासून भंडारा शहरात सुरू असलेला दूषित पाणीपुरवठा थेट नागरिकांच्या आरोग्याशी खेळणारा आहे.



पाहणी दरम्यान जलशुद्धीकरण केंद्राच्या टाक्यांमध्ये मृत शिक्षकांचे अवशेष, माती आणि लोखंडाचे कण आढळून आले, त्यानंतर नगरपरिषद प्रशासनाच्या देखभालीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले असून प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा गंभीर प्रकार समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे.

भंडारा आणि पवनी शहरात मागील पंधरा दिवसांपासून नागरिकांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या संदर्भात नागरिकांनी तक्रारी केल्या मात्र त्यांच्या तक्रारींना केराची टोपली दाखवण्यात आली. त्यानंतर खासदार प्रशांत पडोळे यांनी भंडारा आणि पवनी येथील जलशुद्धीकरण केंद्राला भेट दिली असता त्यांना अत्यंत धक्कादायक प्रकार त्या ठिकाणी दिसला.

पाणी शुद्ध करण्याची जबाबदारी असलेल्या केंद्रातच घाण असणे हे व्यवस्थापनाचे पूर्णतः अपयश दर्शवते. नळातून येणाऱ्या पाण्याला दुर्गंधी येत असून पाण्याचा रंगही बदललेला असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत होत्या. या पार्श्वभूमीवर खासदार प्रशांत पडोळे यांनी दसरा मैदान येथील जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी करत परिस्थितीचा आढावा घेतला. पाहणीदरम्यान जलशुद्धीकरण केंद्रातील पाणी साठवण टाक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घाण, माती, लोखंडाचे कण तसेच मृत कीटक आढळून आल्याने प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा गंभीर प्रकार समोर आला आहे. टाक्यांची स्वच्छता दीर्घकाळापासून करण्यात आली नसल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# प्रत्येक महिलांनी मानसिक आरोग्य जपावे -डॉ.शरयू जिभकाटे

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कुही, दि. ९:** कामाक्षी भगिनी ग्रुप कुही यांच्या तर्फे जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम श्री ऋखडाश्रम देवस्थान येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ता सौ.प्रेमिलाताई जिभकाटे तर प्रमुख पाहुणे म्हणून देवस्थानाचे अध्यक्ष रुपचंदजी ठवकर सर उपस्थित होते.मार्गदर्शक वक्ते म्हणून डॉ.शरयू जिभकाटे यांनी महिलांनी मानसिक स्वास्थ कसे जोपासावे याविषयी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले.तर प्रा.वैशाली देशमुख यांनी महिलांनी समाजामध्ये नवीन विचारांची पेरणी करून महिलांना सन्मानाने जगण्याची दिशा द्यावी असे मौलिक विचार व्यक्त केले.याप्रसंगी रामभाऊ क्षीरसागर,मिलिंद लुटे यांनी महिला दिनानिमित्य प्रकाश टाकला .या प्रसंगी नृत्य स्पर्धा,उखाणेस्पर्धा,वक्तृत्व



स्पर्धा ,गीतगायन,पाककला स्पर्धे चे आयोजन केल्या गेले. विजेते व सहभागी स्पर्धकांना बक्षिस देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयपूरकर मॅडम यांनी केले. तर प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करत सूत्रसंचालनाची धुरा सौ.सारिका गावंडे(डहाके)यांनी सांभाळली. आभार सौ.ललिता थोटे यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन , .डॉ.संध्या शेंडवरे, वनिता शेटे, डॉ. वानिता कोल्हे व कामाक्षी ग्रुपचे सर्व सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले. अर्चना चकोले, सुनिता राऊत,धनश्री जिभाकाटे, लिना नागमोते,प्रिया भोस्कर, आराधना शहा, प्रीती तिजारे,नलिनी देशमुख, उर्वशी पटेल, पुष्पा पडोळे, मंगला खंडे, चेतना प्रसाद, सुष्मा शुक्ला, वैशाली डहाके, पौर्णिमा बाळबुधे,संध्या वैध्य,इंदिरा येळणे, ज्योती देशमुख, डॉ. मोनिका तळेकर, जेठे मॅडमजोत्स्ना वंजारी,पुष्पा पाटील, अरुणा धनंजोडे,हर्षा शेंडवरे, शशिकला शेंडे साहिल देशमुख दीपिका येळणे यांनी कार्यक्रमामध्ये उपस्थिती दर्शवली.

# वर्धा शहरातील वृक्ष तोडल्यास १ लाखाचा दंड

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वर्धा, दि. ९:** पर्यावरण निकोप राखण्यात वृक्षवल्ली मोलाचे योगदान देतात. म्हणून झाडे लावा, झाडे जगवा, असे संदेश दिल्या जातात. आबालवृद्ध याबाबत सतर्क झाले असतांना झाडे तोडण्याचा विचार पण कोणी करीत नाही. पण तरीही विविध कारण सांगत तोडल्या जाणारे झाड १५ दिवसापूर्वी मोठ्या प्रयासाने वाचविण्यात यश आल्याची घटना ताजीच. पण आता प्रकार मुळीच होवू नये म्हणून एक इशाराच देण्यात आला.

वर्धा पालिका व वृक्ष प्राधिकरण समिती यांची या विषयावर खास बैठक झाली. त्यात असा निर्णय एकमताने घेण्यात आला. शहरात बेकायदेशीर वृक्ष तोड होत आहे. त्यावर ठोस उपाय करावा, अशी मागणी नगरसेवकांनी केली. तेव्हा अशी वृक्षांची बेकायदेशीर तोड



झाल्यास एक लाख रुपयाचा दंड व फौजदारी गुन्हा दाखल करावा, असा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत नीलेश खोंड यांनी मुद्दा मांडला. काही भागात झाडांची कत्तल करण्यात आली. तेव्हा हे कृत्य करणाऱ्यास काय जाब विचारणार, असा प्रश्न त्यांनी केला होता. तेव्हा निर्णय तर झालाच आणि त्वरित अंमल पण करण्यात आला. संबंधित कत्तल करण्यात दोषी अनिल खिचरे यांच्या विरोधात महाराष्ट्र झाडे तोडणे अधिनियम अंतर्गत तसेच फौजदारी कारवाई करण्यात आली. या बैठकीत निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष तसेच वृक्ष प्राधिकरणचे मुरलीधर बेलखोडे यांनी एक मुद्दा मांडला.

# फेर सर्वेक्षणानंतर एकल महिलांच्या संख्येत तब्बल ५१ हजारांनी वाढ ; ६० हजारांहून अधिक विधवा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**भंडारा, दि. ९:** भंडारा जिल्ह्यात प्रशासनाने केलेल्या फेर सर्वेक्षणानंतर एकल महिलांच्या संख्येत तब्बल ५१ हजारांनी वाढ होऊन ती ६५ हजारांच्या पार गेली आहे. यापूर्वीच्या सर्वेक्षणात केवळ १४ हजार २१० एकल महिलांची नोंद झाली होती. मात्र, साऊ एकल महिला पुनर्वसन समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुळकर्णी यांनी यावर आक्षेप घेत फेर सर्वेक्षणाची मागणी लावून धरली. लोकसत्ताने यासंबंधी वृत्त प्रकाशित करताच जिल्हाधिकारी सावन कुमार यांनी या वृत्ताची गंभीर दखल घेत फेर सर्वेक्षणाचे आदेश दिले. नव्याने झालेल्या या सर्वेक्षणात भंडारा जिल्ह्यात ६५ हजार ४३० एकल महिलांची नोंद करण्यात आली आहे. भंडारा जिल्ह्यात ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत झालेल्या सर्वेक्षणाअंती केवळ १४ हजार २१० एकल महिलांची नोंद करण्यात आली होती. सर्वेक्षणानंतर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर



प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. मात्र ती आकडेवारी समाधानकारक नसल्याने सर्वेक्षणावर ताशेरे ओढत हेरंब कुळकर्णी यांनी फेर सर्वेक्षणाची मागणी केली होती. लोकसत्ताने या संदर्भात ''सर्वेक्षण की कुळाचार'' या शीर्षक खाली वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी याची गांभीर्याने दखल घेतली आणि जिल्हा परिषद प्रशासनाला तातडीने फेर सर्वेक्षणाचे निर्देश दिले. जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरून 'एकल महिला पुनर्वसन समिती'च्या पाठपुराव्यानंतर आता हे व्यापक सर्वेक्षण झाले आहे. या सर्वेक्षणात एकाकी पडलेल्या महिलांची आकडेवारी पुढे आली असून भंडारा जिल्ह्यात ६५ हजार ४३० एकल महिला एकाकी जीवन जगत असल्याचे वास्तव आहे. यापैकी विधवा महिलांची संख्या लक्षणीय असून ती ६० हजार ४५९ इतकी आहे. तर ५० हजार ५५४ एकल महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळत आहे. राज्यातील एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (ता.६) राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना केली हे विशेष. दरम्यान, भंडारा जिल्हाधिकाऱ्यांनी ९ जानेवारी २०२६ रोजी फेर सर्वेक्षणाचे आदेश दिल्यानंतर शासनाच्या मिशन वात्सल्य अंतर्गत जिल्हा परिषदेने १० जानेवारी ते १ मार्च दरम्यान सर्व तालुक्यातील ग्रामीण तसेच भंडारा नागरी व ग्रामीण भागात विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता अशा एकल महिलांचे फेर सर्वेक्षण करण्यात आले. ज्यामध्ये जिल्ह्यात सर्वाधिक ६० हजार ४५९ विधवा, १ हजार ७०५ परित्यक्ता, १ हजार ७६७ घटस्फोटीत तर १ हजार ४९९ कुमारी एकल महिलांच्या संघर्षाचे चित्र पुढे आले आहे.

# अनाथ चिमुकलीवर नातेवाईकाचाच पाशवी अत्याचार

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गडचिरोली, दि. ९:** आठ वर्षांच्या निरागस अनाथ चिमुरडीवर तिच्याच नात्यातील एका नराधमाने अत्याचार केल्याची संतापजनक घटना कोरची तालुक्यात उघडकीस आली आहे. होळीच्या उत्सवात रंगांच्या नावाखाली माणुसकीला काळिमा फासणारा हा प्रकार पाच दिवसांनंतर समोर आला असून, या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला आहे.

पीडित मुलगी अनाथ असून तिचे मामा-मामी तिचा सांभाळ करत आहेत. होळीच्या दिवशी गावात सर्वत्र उत्साहाचे वातावरण असताना, आरोपीने या बालिकेला फूस लावून स्वतःच्या घरी नेले. रक्ताच्या नात्यात असलेल्या या २२ वर्षीय तरुणाने तिच्या असहायतेचा फायदा घेत पाशवी अत्याचार केला. हा प्रकार कोणाला सांगितल्यास 'जिवंत सोडणार नाही', अशी धमकी देऊन त्याने चिमुकलीचे तोंड दाबले. आरोपीच्या दहशतीमुळे ती चिमुरडी पाच दिवस गप्प होती. मात्र, काही दिवसांनंतर तिला आंघोळ घालताना मामीला तिच्या शरीरावरील जखमा आणि पोटावर आलेली सूज दिसून आली. संशय आल्याने मामीने तिला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता, त्या चिमुरडीने आपल्यावर ओढवलेला प्रसंग सांगितला. हे ऐकताच नातेवाईकांना धक्काच बसला.


घटनेची तक्रार मिळताच कोरची पोलिसांनी वेगाने चक्रे फिरवून आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. पीडितेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, आरोपीवर पोक्सो कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनाथ मुलीवर झालेल्या या अन्यायामुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, या नराधमाला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# अस्वलाचा झाडावर ठिय्या, नागरिकांची भंबेरी उडाली

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**भंडारा, दि. ९:** भल्या पहाटे सर्व नागरिक साखरझोपेत असताना वस्तीत एक अस्वल शिरले. वस्तीत अस्वल शिरल्याची वार्ता वाऱ्याच्या वेगाने पसरली आणि नागरिकांनी थेट अस्वलच्या दिशेने धाव घेतली. एका झाडावर भले मोठे अस्वल बसलेले पाहून सर्वांची भंबेरी उडाली. ताबडतोब वन विभागाला पाचारण करण्यात आले. ही थरारक घटना पवनी तालुक्यातील अड्याळ येथे घडली. सुदैवाने वनविभागाने वेळेवर 'डॉट' मारून अस्वलाला बेशुद्ध केल्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

भंडारा जिल्ह्याच्या पवनी तालुक्यातील अड्याळ शहरालगतच्या नागरी वस्तीत अस्वलाने शिरकाव केल्याने शनिवारी पहाटे नागरिकांची चांगलीच धावपळ उडाली. प्रशांत करंजेकर यांच्या घरामागील शेतात असलेल्या झाडावर अस्वलाने ठाण मांडले होते. मात्र, वनविभागाच्या चपळाईने आणि 'डॉट' मारून अस्वलाला बेशुद्ध केल्याने मोठा अनर्थ टळला. प्रशांत करंजेकर यांच्या घरामागील शेतातील झाडावर एक अस्वल चढल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले.



वस्तीच्या इतक्या जवळ अस्वल असल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. घटनेची माहिती मिळताच अड्याळचे सरपंच आणि उपसरपंच यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थितीवर लक्ष ठेवले आणि वनविभागाला पाचारण केले.

वनपरिक्षेत्र अड्याळचे कर्मचारी व भंडारा येथील 'जलद बचाव दल' तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अस्वलाला

गावात अस्वलाचे दर्शन वारंवार घडत असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. यामुळे नागरिक सावध झाले असले तरी अस्वलाच्या उपस्थितीमुळे भीती आणि उत्सुकता दोन्ही दिसून येते.गावात अस्वलाचे दर्शन झाल्यास नागरिकांनी सतर्क राहणे गरजेचे आहे. अस्वलाला पाहण्यासाठी गर्दी करू नका, यामुळे ते अधिक आक्रमक होऊ शकतात असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

खाली उतरवण्यासाठी वनविभागाच्या पथकाने अत्यंत सावधगिरीने अस्वलाला 'डॉट' मारून बेशुद्ध केले. अस्वल बेशुद्ध झाल्यानंतर, त्याला सुरक्षितरीत्या खाली उतरवण्यासाठी झाडाच्या फांद्या कापण्यात आल्या. खाली उतरवल्यानंतर अस्वलाला तातडीने पिंजऱ्यात हलवण्यात आले. अस्वलावर प्राथमिक उपचार केल्यानंतर त्याला नैसर्गिक अधिवासात (जंगलात) सुरक्षितरीत्या सोडण्यात आले. या यशस्वी मोहिमेमुळे अड्याळवासीयांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

वस्तीत अस्वल शिरल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले. अस्वलाला पाहण्यासाठी हातचे काम सोडून बाया, लहान मुले आणि माणसांनी एकच गर्दी केली. गावकऱ्यांच्या आरडाओरडीमुळे अस्वल घाबरले. ते घाबरून एका घरामागे असलेल्या शेतातील झाडावर चढले. या शेतात असलेल्या झाडावर चढून अस्वलाने आश्रय घेतला. अस्वलाला बघण्यासाठी गावकऱ्यांनी एकच गर्दी केली.

सध्या या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. भंडारा आणि आसपासच्या ग्रामीण भागात अन्नाच्या शोधात जंगलातून अस्वलांचा मानवी वस्तीत शिरकाव वाढला आहे. मागील काही दिवसात भंडारा जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी अस्वलाचे दर्शन होत आहे. कधी झाडावर, कधी टेकडीवर, कधी भर रस्त्यावर तर कधी थेट घरात अस्वल शीरल्याच्या घटना दिवसागणिक घडत आहेत. मागील आठवड्यात लाखांदूर तालुक्यात चौकात वर्दळीच्या रस्त्यावर दोन अस्वल दिसल्यानंतर नागरिकांनी मोठ्या धाडसाने या अस्वलींना पळवून लावले होते.

## राष्ट्रीय विद्यापीठ बॉक्सींग स्पर्धा

# अकोल्याचा शिवाजी गेडाम देशात द्वितीय व निळकंठ पुजारी देशात तृतीय

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ९:** दिनांक १ ते ०८ मार्च २०२६ दरम्यान कुरुक्षेत्र (उ.प्र.) येथे आयोजित ओल इंडीया इंटर युनिवर्सिटी स्पर्धेमध्ये अकोला क्रीडा प्रबोधिनीचे शिवाजी गेडाम याने ४७-५० कि. वजनगटात दमदार कामगिरी करीत रजत पदक प्राप्त करुन देशात द्वितीय स्थान मिळविले. तसेच निळकंठ पुजारी याने ९०+ कि. वजनगटात उत्तम कामगिरी करीत कांस्य पदक प्राप्स करून देशात तिस-या स्थानी झेप घेतली. तसेच माणिक सिंग हा क्वार्टर फायनल पर्यंत पोहोचला. या तिनही बॉक्सरांनी आगामी खेलो युनिवर्सिटी स्पर्धे करिता आपली जागा निश्चित केली आहे.

तसेच अकोला क्रीडा प्रबोधिनीच्या एकुण ०९ बॉक्सरांनी सदर स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला ५०-५५ कि. वजनगटात वैभव जारवाल, ५५-६० कि. वजनगटात रेहान शाह, ६०-६५ कि, वजनगटात विशाल नुपे, ६५-७० कि. वजनगटात प्रज्वल भोयर, ७०-७५ कि. वजनगटात माणिक सिंग, ७५-८० कि. वजनगटात शंतनु खबाले, ८०-८५ कि. वजनगटात कृष्णा लोखंडे व ८५-९० कि. वजनगटात पियुश




पाटील यांनी सहभाग नोंदविला.

या यशाबद्यल अकोलाचे मा. जिल्हाधिकारी वर्षा मीना (भा.प्र.से.), कीड़ा व शा.शि. मा. आयुक्त डॉ. तनुजा राऊत, प्राध्यापक डॉ. संजय काळे, डॉ. गजानन बढे, जिल्हा क्रीडा अधिकारी व आंतरराष्ट्रीय बॉक्सींग कोच श्री सतीशचंद्र भट, सहायक प्रशिक्षक श्री आदित्य मने तसेच अकोला चे जनप्रतीनिधी कीडाप्रेमी यांनी विजेत्या स्पर्धकांचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.













# अंतिम सामन्याच्या वेळी खेळाडूंचे परिवारासोबत खास क्षण!





भारतीय संघाचे कोच गौतम गंभीर याला मागील काही महिन्यामध्ये अनेक टीकांचा सामना करावा लागला. या फायनलच्या सामन्यामध्ये त्याची पत्नी आणि दोन मुली सामना पाहण्यासाठी आल्या होत्या. विश्वचषकामध्ये संजू सॅमसंगचा प्रवास एका सिनेमापेक्षा कमी नव्हता. त्याला सोशल मिडियावर देखील ट्रोल करण्यात आले होते. पण यावेळी नेहमीच त्याच्या पत्नीने त्याला साथ दिली आहे, विश्वचषकामध्ये देखील त्याची पत्नी फायनलचा सामना पाहण्यासाठी आली होती.भारताचा कर्णधार सुर्यकुमार यादवची पत्नी देविशा शेट्टी बऱ्याचदा स्टेडियमध्ये पाहायला मिळते. यावेळी सुर्यकुमार यादव यांची फक्त पत्नीच नाही तर परिवारामधील अनेक लोक या विश्वचषकाच्या जल्लोषामध्ये सामील झाले होते.टीम इंडियाचा संकट मोटन जसप्रीत बुमराहने आणखी एकदा स्वत:ला सिद्ध केले त्याने या फायनलच्या सामन्यामध्ये ४ विकेट्स घेतले. हा सामना पाहण्यासाठी त्याची आई आणि त्याचा मुलगा देखील स्टेडियममध्ये उपस्थित होता.भारतीय संघाचा उपकर्णधार अक्षर पटेल फायनलच्या सामन्यामध्ये आणखी एकदा त्याच्या गोलंदांजीने कहर केला. या विश्वचषकाच्या विजयाच्या उत्सवामध्ये त्याचा मुलगा आणि पत्नी सामील झाली होती. भारताचा फलंदाज इशान किशनने या स्पर्धेमध्ये कमालीची कामगिरी केली. यावेळी त्याचे अदिती हुंडियासोबत जोडले जात होते. आता अदिती हुंडिया आणि इशान किशनचा एक रोमॅंटिक फोटो सोशल मिडियावर व्हायरल होत आहे.भारताचा स्टार ऑलराउंडर हार्दिक पांड्या त्याची गर्लफ्रेंड माहिका शर्मासोबत बऱ्याचदा पाहायला मिळाला आहे. त्याने या स्पर्धेमध्ये कमालीची कामगिरी केली आहे.

# ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये रंगणार २०२८ चा विश्वचषक

## १२ संघांनी आपले स्थान केले पक्के

**नवी दिल्ली: दि.९ वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक २०२६ चा थरार आता संपुष्टात आला आहे. महिनाभर चाललेल्या या महाकुंभाचा समारोप भारतीय संघाच्या ऐतिहासिक विजयाने झाला. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने जबरदस्त कामगिरी करत पुन्हा एकदा विश्वविजेतेपदावर आपले नाव कोरले. भारताच्या या विजयानंतर आता जगभरातील क्रिकेट चाहत्यांना २०२८ मध्ये होणाऱ्या पुढच्या टी-२० विश्वचषकाचे वेध लागले आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद () दर दोन वर्षांनी टी-२० विश्वचषकाचे आयोजन करते. २०२४ आणि २०२६ च्या यशस्वी आयोजनानंतर, आता पुढचा टी-२० विश्वचषक २०२८ मध्ये खेळवला जाणार आहे. विशेष म्हणजे, या आगामी विश्वचषकाचे यजमानपद ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या दोन देशांकडे संयुक्तपणे देण्यात आले आहे. २०२६ मध्ये एकदिवसीय () विश्वचषकाचे आयोजन होणार असल्याने, त्यानंतरच्या वर्षी क्रिकेटचा हा सर्वात लहान फॉरमॅट पुन्हा एकदा चाहत्यांच्या भेटीला येईल. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमधील हवामान आणि क्रिकेट हंगाम लक्षात घेता, २०२८ चा टी-२० विश्वचषक ऑक्टोबर ते नोव्हेंबर या कालावधीत आयोजित केला जाण्याची दाट शक्यता आहे. अद्याप अधिकृत वेळापत्रक जाहीर झाले नसले तरी, स्पर्धा ऑक्टोबरच्या मध्यापासून सुरू होऊन नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत चालेल, असा अंदाज वर्तवला जात आहे. या स्पर्धेतही २०२६ प्रमाणेच एकूण २० संघ सहभागी होताना दिसतील. पुढच्या विश्वचषकासाठी १२ संघांनी आताच आपले स्थान निश्चित केले आहे. यामध्ये यजमान देश म्हणून ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडचा समावेश आहे. याशिवाय, २०२६ च्या विश्वचषकात 'सुपर ८' फेरी गाठणाऱ्या संघांनाही थेट प्रवेश मिळाला आहे.

### थेट पात्र ठरलेले १२ संघ:

**यजमान:** ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड

**सुपर ८ कामगिरीनुसार:** भारत, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान, वेस्ट इंडिज, श्रीलंका आणि झिम्बाब्वे

रॅंकिंगच्या आधारे: अफगाणिस्तान, बांगलादेश आणि आयर्लंड

उर्वरित ८ जागांसाठी रंगणार पात्रता फेरी

२० पैकी १२ संघ निश्चित झाले असले तरी उर्वरित ८ जागांसाठी 'प्रादेशिक पात्रता' फेऱ्या घेतल्या जातील. या पात्रता फेऱ्यांमधून जे संघ विजयी होतील, त्यांना २०२८ च्या विश्वचषकाचे तिकीट मिळेल. या पात्रता फेऱ्यांची प्रक्रिया २०२६ च्या मध्यापासून सुरू होणार असून, त्यावर सर्व नवोदित क्रिकेट राष्ट्रांचे लक्ष असेल.



# टीम इंडियाचे चॅम्पियन होताच ३ वर्ल्ड रेकॉर्ड

**नवी दिल्ली: दि.९ वृत्तसंस्था**

क्रिकेट चाहत्यांना ज्या क्षणाची ७ फेब्रुवारीपासून प्रतिक्षा होती तो क्षण अखेर आला आहे. टीम इंडियाने रविवारी ८ मार्चला आयसीसी टी २० वर्ल्ड कप २०२६ चॅम्पियन होण्याचा बहुमान मिळवला आहे. टीम इंडियाने न्यूझीलंडवर मात करत सूर्यकुमार यादव याच्या नेतृत्वामध्ये ही कामगिरी केली आहे.

टीम इंडियाच्या या विजयात प्लेइंग ईलेव्हनमधील ११ खेळाडूंनी योगदान दिलं. मात्र संजू सॅमसन आणि जसप्रीत बुमराह हे टीम इंडियाच्या महाअंतिम सामन्यातील विजयाचे हिरो ठरले. संजूने केलेल्या स्फोटक ८९ धावांच्या खेळीच्या जोरावर भारताने न्यूझीलंडसमोर २५५ धावा केल्या. त्यानंतर जसप्रीत बुमराह याने न्यूझीलंडला सर्वाधिक ४ झटके देत १९ ओव्हरमध्ये १५९ रन्सवर रोखलं. भारताने अशाप्रकारे हा सामना ९६ धावांनी जिंकला. सूर्यकुमार यादव याच्या नेतृत्वात टीम इंडियाने असे ३ वर्ल्ड रेकॉर्ड करुन दाखवले जे आतापर्यंत कोणत्याही संघाला करणं जमलं नाही.टीम इंडियाची टी २० वर्ल्ड कप जिंकण्याची ही इतिहासातील तिसरी वेळ ठरली.

## फूड डिलिव्हरी मार्केटला मिळाला 'बूस्ट'

**नवी दिल्ली:** भारतातील आघाडीच्या तीन ऑनलाइन अन्न वितरण कंपन्या स्विगी, मॅजिकपिन आणि झोमॅटो यांनी ऑक्टोबर-डिसेंबरमध्ये पुन्हा एकदा वाढीला वेग आला आहे. उद्योग अधिकाऱ्यांनी सांगितले की, सणासुदीची मागणी, परवडणाऱ्या ऑफर्स आणि वाढत्या वापरकर्त्यांच्या आधारामुळे ऑर्डरमध्ये वाढ झाली आहे. मार्केटिंग, उत्पादन नवोन्मेष आणि मूल्य-चालित ऑफरिंगमध्ये सतत गुंतवणूक केल्याने, येत्या तिमाहीत या क्षेत्राची वाढीची गती कायम राहण्याची अपेक्षा आहे. मॅजिकपिनचे संस्थापक आणि सीईओ अंशु शर्मा यांनी सांगितले की, ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर हे महिने आमच्यासाठी अतिशय चांगले राहिले आहेत.सर्व बाजारपेठांमध्ये मजबूत वाढ आणि सुधारित कामगिरीसह. दिल्ली-एनसीआरसारख्या प्रौढ बाजारपेठा स्थिर राहिल्या तरी, कंपनीने बेंगळुरू, हैदराबाद आणि मुंबईसह इतर शहरांमध्ये एकूण ऑर्डर मूल्यात ४० टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवली आहे. स्विगीने सांगितले की, ही वाढ वेग, निवड आणि परवडणाऱ्या किमतीच्या नवीन ऑफर स्वीकारल्यामुळे झाली आहे. कंपनीचा सरासरी मासिक व्यवहार वापरकर्ता आधार वर्षानुवर्षे २२ टक्क्यांनी वाढून २४.३ दशलक्ष झाला आहे, तर या कालावधीत एकूण ऑर्डर २३० दशलक्ष वरून २९४ दशलक्ष झाल्यात.झोमॅटोच्या अन्न वितरण व्यवसायातही पुनरावलोकनाधीन तिमाहीत मजबूत वाढीचा ट्रेंड नोंदवला गेला.

# परदेशी गुंतवणूकदारांनी काढले २१ हजार कोटी

## पश्चिम आशिया बाजार संकटात

**नवी दिल्ली: दि.९ वृत्तसंस्था**




पश्चिम आशियातील संकटादरम्यान गेल्या चार व्यापार सत्रांमध्ये परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय समभागांमधून २१,००० कोटी काढून घेतले आहेत. फेब्रुवारीमध्ये परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी भारतीय समभागांमध्ये २२,६१५ कोटी गुंतवल्यानंतर ही नवीनतम विक्री झाली आहे. फेब्रुवारीमधील गुंतवणूक गेल्या १७ महिन्यांतील सर्वाधिक मासिक खरेदी होती. डिपॉझिटरी डेटानुसार, त्यांनी जानेवारीमध्ये ३५,९६२ कोटी, डिसेंबरमध्ये २२,६११ कोटी आणि नोव्हेंबरमध्ये ३,७६५ कोटी काढून घेतले. ज्यामुळे भारतीय शेअर बाजारात अस्थिरता पाहायला मिळत आहे. नवीनतम पैसे काढण्याची प्रक्रिया २-६ मार्च दरम्यान झाली, जेव्हा एफपीएलएसने बाजारात अंदाजे २१,००० कोटी किमतीचे शेअर्स विकले. ३ मार्च रोजी होळीसाठी बाजार बंद होता, हे लक्षात घेण्यासारखे असले तरी त्यानंतर विदेशी गुंतवणूकदार पैसे काढून घेत आहेत. बाजार तज्ज्ञांनी पश्चिम आशियातील वाढत्या भू-राजकीय तणावामुळे ही रक्कम काढून घेतली असल्याचे सांगितले. एंजल वनचे वरिष्ठ मूलभूत विश्लेषक वकार जावेद खान म्हणाले की, होर्मुझच्या सामुद्रधुनीत व्यत्यय येण्याच्या भीतीमुळे ब्रेंट क्रूडच्या किमती प्रति बॅरल ९० डॉलरच्या पुढे गेल्या, त्यामुळे जागतिक




जोखीम टाळण्यास सुरुवात झाली.
शिवाय, रुपया प्रति डॉलर ९२ च्या खाली आला, तर यूएस ट्रेझरी उत्पन्न वाढले. जिओजित इन्व्हेस्टमेंट्सचे मुख्य गुंतवणूक रणनीतिकार व्हीके विजयकुमार म्हणाले की, आखाती संघर्षांवरील अनिश्चितता, अलिकडच्या बाजारातील सुधारणा आणि कच्च्या तेलाच्या किमतीतील तीव्र वाढीमुळे एफपीआयच्या विक्रीत वाढ झाली.भारतीय शेअर बाजारातील मुख्य आठ कंपन्यांचे बाजार भांडवल कोटींनी घसरले आहे. गेल्या आठवड्यात शेअर बाजारातील घसरणीमुळे देशातील टॉप १० कंपन्यांपैकी आठ कंपन्यांचे एकत्रित बाजार मूल्य २,८१,५८१.५३ कोटींनी घसरले. या युद्धामुळे एसबीआयला सर्वाधिक नुकसान झाले. गेल्या आठवड्यात, बीएसई सेन्सेक्स २,३६८.२९ अंकांनी किंवा २.९१ टक्क्यांनी घसरला. रिलायन्स इंडस्ट्रीज आणि इन्फोसिस या टॉप १० यादीतील एकमेव कंपन्या होत्या ज्यांचे मूल्यांकन वाढल्याचे दिसले. स्टेट बँक ऑफ इंडियाचे बाजार मूल्य ५३,९५२.९६ कोटींनी घसरले होते.

# क्रेडिट मार्केटमध्ये महिलांची एंट्री; महिलांचा आर्थिक आत्मविश्वासाने वाढला कर्जात सहभाग

**नवी दिल्ली: दि.९ वृत्तसंस्था**



भारताच्या क्रेडिट मार्केटमध्ये महिलांचा सहभाग झपाट्याने वाढत आहे. अलिकडच्या वर्षांत, कर्ज घेणाऱ्यांमध्ये महिला सर्वात वेगाने वाढणाऱ्या गटांपैकी एक बनल्या आहेत. क्रेडिट ब्युरो सीआरआयएफ हाय मार्कच्या अहवालानुसार, गेल्या पाच वर्षांत महिलांनी पुरुषांपेक्षा कर्ज घेण्याची गती अधिक आहे. अहवालानुसार, डिसेंबर २०२० ते डिसेंबर २०२५ दरम्यान, महिला कर्जदारांची संख्या सरासरी वार्षिक १४.२% दराने वाढून अंदाजे ८९ दशलक्ष झाली. दरम्यान, याच कालावधीत पुरुष कर्जदारांची संख्या सरासरी ८.२% दराने वाढली. हे स्पष्टपणे दर्शवते की भारताच्या औपचारिक कर्ज प्रणालीमध्ये महिलांचा सहभाग सातत्याने मजबूत होत आहे.महिलांच्या कर्ज पोर्टफोलिओमध्येही जलद वाढ झाली आहे. डिसेंबर २०२५ मध्ये, महिलांच्या एकूण थकित कर्ज पोर्टफोलिओमध्ये वार्षिक २३.४% वाढ झाली, जी पुरुषांसाठी १६.७% होती. शिवाय, महिलांच्या सक्रिय कर्ज खात्यांमध्येही १४.८% वार्षिक वाढ नोंदवली गेली, जी पुरुषांपेक्षा दुप्पट आहे. कर्ज परतफेड करण्यात महिला अग्रेसर असल्याचे दिसते. अहवालात असे दिसून आले आहे की, महिला कर्ज परतफेड करण्यात देखील चांगली कामगिरी करत आहेत. ३१ ते १८० दिवसांपर्यंतच्या थकबाकी मोजणारा जोखीम असलेला पोर्टफोलिओ महिलांसाठी २.८% होता, जो पुरुषांसाठी ३.३% होता.

# भारताची तेलाची चिंता मिटली; लवकरच रशियाचे बॅरल पोहोचणार

**नवी दिल्ली: दि.९ वृत्तसंस्था**

अमेरिकेने भारताला रशियाकडून एक महिना खनिज तेल खरेदी करण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे सध्या जहाजावर असलेले खनिज तेल भारतीय तेल शुद्धीकरण करणाऱ्या कंपन्याकडून खरेदी केले जात आहे. मात्र अमेरिकेने रशियातील बऱ्याच कंपन्यावर आणि जहाजावर निर्बंध घातले आहेत. अशा परिस्थितीत या कंपन्याकडून किंवा या जहाजावरून तेल खरेदी कायदेशीर आहे की नाही याबाबत संभ्रम कायम असल्याचे तेल शुद्धीकरण क्षेत्रातील कंपन्यांच्या सूत्रांनी नमूद केले.रशियाच्या जहाजावर जे तेल सध्या समुद्रात उपलब्ध आहे. ते तेल




भारताने खरेदी करण्यास हरकत नाही असे अमेरिकेने म्हटले आहे. त्यामुळे भारताच्या ऊर्जा सुरक्षिततेला मदत होईल. जागतिक बाजारात वाढलेल्या तेलाच्या किमती कमी होण्यास मदत होईल. भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्यांनी ज्या कंपन्यावर अमेरिकेचे निर्बंध नाहीत त्या कंपन्याकडून आतापर्यंत वीस दशलक्ष पिंपतेल खरेदी केले आहे.बंदी घातलेल्या कंपन्याकडून भारताला तेल खरेदी करता येईल का याबाबत अमेरिकेने स्पष्ट निर्देश दिलेले नाहीत. त्यामुळे भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्यात अशा कंपन्याकडून तेल खरेदी टाळत आहेत. काही सूत्रानी सांगितले की अमेरिकेने परवानगी देण्याअगोदरच भारताने रशियाकडून तेल खरेदी सुरू केली होती. २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यानंतर भारताने रशियाकडून सर्वात जास्त तेल खरेदी केले आहे. मात्र अमेरिकेने रशियाकडून तेल खरेदी करू नये असा आग्रह केल्यानंतर जानेवारीपासून भारतातील तेल शुद्धीकरण करणाऱ्या कंपन्यांनी तेल खरेदी कमी केली होती. आता ती पुन्हा वाढविली आहे.

## थोडक्यात

### नरभक्षक वाघ अखेर जेरबंद

**नागपूर :** पारशिवनी परिसरातील नरभक्षक वाघाला अखेर जेरबंद करण्यात आले आहे.सदर वाघाने पारशिवनी तालुक्यात चांगलाच धुमाकूळ घातला होता अनेकांवर हल्ला सुद्धा चढविला होता त्यामुळे गावकऱ्यांनी त्याला पकडण्याची मागणी लावून धरली होती तसेच, याबाबीवर रामटेकचे खासदार श्यामकुमार बर्वे, माजी मंत्री राजेंद्र मुळक यांनी सातत्याने पाठपुरावा सुरू केल्यामुळे वन विभागाने तातडीने कारवाई करत पारशिवनी परिसरातील नरभक्षक वाघाला अखेर जेरबंद केले. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी मोठा दिलासा मिळाला आहे.

### महिलादिनी वृक्षारोपण

**हिंगणा :** समर्थ नारी सामाजिक विकास संस्था, विश्वकर्मानगर वागदरा ईसासनीच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून ब्रह्माकुमारी संगीता दीदी, संस्थेच्या अध्यक्ष राणी भालेकर, उपाध्यक्ष अश्विनी भिलकर, सचिव प्रमिला वरठी उपस्थित होत्यायावेळी वृक्षारोपण,संगीतमय खुर्ची, उखाणे आणि इतर विविध खेळांचे आयोजन केले महिलांच्या प्रगतीसाठी अशा व्यासपीठाची गरज असल्याचे मत कोषाध्यक्ष कांचन कावळे, अश्विनी मांदाडे यांनी व्यक्त केले कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी महिलांना व स्पर्धांमधील विजेत्यांना संस्थेतर्फे आकर्षक भेटवस्तू बक्षिसे देऊन गौरविण्यात आले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीपक कावळे, हिमांशू वरठी, दीपक मस्के, विजय बोरकर यांनी विशेष सहकार्य केले.

### शोधपथकाची कारवाई

**नागपूर:** महानगरपालिकाच्या उपद्रव शोध पथकाने शहरात अस्वच्छता पसरवणाऱ्याविरुद्ध आपली कारवाई अधिक तीव्र केली आहे. ८ आणि ९ मार्च या दोन दिवसांत पथकाने विविध प्रकरणांत एकूण ३५,६०० रुपयांचा दंड वसूल केला आहे. ७९ मायक्रॉनपेक्षा कमी प्लास्टिक पिशव्यांचा वापर, सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणे आणि थुंकणे यावर पथकाचे विशेष लक्ष आहे. वाहतुकीचा रस्ता मंडप किंवा कमानी टाकून वैयक्तिक कामासाठी बंद करणाऱ्या ८ प्रकरणांत सर्वाधिक ९,५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. मलब्यामुळे होणारी वाहतुकीची कोंडी आणि अस्वच्छता रोखण्यासाठी ५ हजार रुपयांची मोठी दंड वसुली एका प्रकरणात करण्यात आली. नागपूर महानगरपालिकेने नागरिकांना शहर स्वच्छ ठेवण्याचे आणि नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

# महावितरणचे १.९३ कोटींचे 'चेक बाऊन्स'

## प्रशासनाकडून ग्राहकांविरुद्ध थेट फौजदारी कारवाईचा इशारा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ९ : नागपूर परिमंडलात फेब्रुवारी महिन्यात तब्बल १ कोटी ९३ लाख ३८ हजार ४७७ रुपयांचे १ हजार २९७ धनादेश तांत्रिक किंवा आर्थिक कारणांमुळे अनादरीत (बाऊन्स) झाल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. या प्रकारामुळे वीज बिलांची वसुली रखडून थकबाकीचा डोंगर वाढत असल्याने महावितरण प्रशासनाने आता अशा ग्राहकांविरुद्ध थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे.**

परिणामी संबंधितांना आता केवळ प्रशासकीय दंडच नव्हे, तर कायद्याचा कडक बडगा ग्राहकांना सोसावा लागणार आहे. महावितरणने 'चेक बाऊन्स' गंभीर प्रकरणांची दखल घेत 'निगोशिएबल इन्स्टुमेंट्स अक्ट १८८१' च्या कलम १३८ अन्वये कायदेशीर कारवाईची मालिका सुरू केली आहे. या कायद्यातील तरतुदीनुसार कोणत्याही बँक खात्यातून जारी केलेला धनादेश अपुऱ्या निधीअभावी किंवा अन्य तांत्रिक कारणांमुळे न वटल्यास, महावितरणकडून संबंधित ग्राहकाला ३० दिवसांच्या आत रितसर नोटीस बजावण्यात येईल. या नोटीसची मुदत संपल्यानंतरही १५ दिवसांच्या आत संबंधिताने भरणा केला नाही, तर ३० दिवसांच्या आत त्या ग्राहकाविरोधात थेट फौजदारी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. या कायद्यानुसार दोषी ठरल्यास ग्राहकास दोन वर्षांपर्यंतचा कारावास किंवा धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट दंडाची अथवा दोन्ही शिक्षा होण्याची कायदेशीर तरतूद आहे.

### ... तर सुविधा निलंबित

**ज्या ग्राहकांचे धनादेश बाऊन्स होतील, त्यांची पुढील सहा महिन्यांसाठी धनादेशाद्वारे वीजबिल भरण्याची सुविधा पूर्णपणे निलंबित केली जाणार आहे. याशिवाय प्रत्येक वीज बिलासाठी विलंब शुल्क आणि जीएसटीसह ८८५ रुपयांचा दंड थेट पुढील बिलात 'इतर आकार' या सदराखाली समाविष्ट केला जाणार आहे. विशेष बाब म्हणजे, एकाच धनादेशाद्वारे अनेक बिलांची रक्कम भरली गेली असेल, तर प्रत्येक बिलासाठी स्वतंत्र दंडाची आकारणी केली जाणार आहे, ज्याचा मोठा आर्थिक भार ग्राहकांना सोसावा लागू शकतो.**

## 'व्हीआयए'तर्फे महिला दिन आज

**नागपूर, दि. ९ :** विदर्भ इंडस्ट्रिज असोसिएशनच्या वतीने १० मार्चला 'जागतिक महिला दिन' आयोजित केला आहे यानिमित्ताने उत्कृष्ट महिला उद्योजिकांचा गौरव करण्यात येणार आहे. विदर्भ इंडस्ट्रिज असोसिएशनच्या लेडी एंटरप्रेन्युअर्स विंग तर्फे जागतिक महिला दिनानिमित्त विशेष सोहळा १० मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स येथील व्हीआयए ऑडिटोरियममध्ये संपन्न होईल. कार्यक्रमाला उपमहापौर लीला हाथीबेड, केंद्रीय वस्तू आणि सेवाकर (सीजीएसटी) नागपूरच्या सहाय्यक आयुक्त, गोधनी रेल्वेच्या नगराध्यक्ष रोशना कोलते विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहतील.यावेळी उद्योग आणि समाजात मोलाचे योगदान देणाऱ्या यशस्वी महिला व्यावसायिकांचा विविध श्रेणींमध्ये या पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. याशिवाय वक्तृत्व स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले आहे. विंगच्या अध्यक्ष योगिता देशमुख यांनी सर्व सदस्य, उद्योजिका आणि इच्छुक महिलांना या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## घरफोड्या टोळीचा पदार्फाश, दोघे अटकेत



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ९ :** हिंगणा ठाण्याच्या हद्दीतील घरातून ६ लाख रुपयांचा ऐवज लंपास करणाऱ्या घरफोड्यांच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले आहे सीसीटीव्ही फुटेजच्या तांत्रिक विश्लेषणावरून दोन आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून ४.२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**घटना अशी...**

मागील २८ फेब्रुवारी रोजी हिंगणा ठाण्या अंतर्गत एकांत ठिकाणी असलेल्या घरात घरफोडीची घटना घडली होती. चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून सुमारे ६ लाख रुपये किमतीचे दागिने आणि रोकड लंपास केली होती. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. सदर प्रकरणाचा तपास करण्यासाठी हिंगणा ठाण्याचे शोधपथक आणि परिमंडळातील इतर ठाण्यातील पथकांनी एकत्रित मोहीम राबवली. तपासादरम्यान परिसरातील अनेक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात आले. सुरुवातीला मिळालेल्या फुटेजमध्ये संशयित आरोपींचे चेहरे अस्पष्ट होते. मात्र, तांत्रिक कौशल्याचा वापर करून पोलिसांनी ते फुटेज स्पष्ट केले, ज्यातून आरोपींची ओळख पटवणे सोपे झाले. तांत्रिक विश्लेषण आणि खबऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून दोन आरोपींना बेड्या ठोकल्या. त्यांच्याकडून चोरीला गेलेल्या ऐवजांपैकी ४.२ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

# क्रिकेट सामन्यावर सट्टा, दोघांना अटक

## नागपूर गुन्हे शाखा युनिट ३ चा अड्ड्यावर छापा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ९ :** टी-२० वर्ल्ड कप २०२६ अंतर्गत भारत विरुद्ध न्यूझीलंड या क्रिकेट सामन्यावर सट्टा (लागवाडी-खायवाडी) लावणाऱ्या अड्ड्यावर नागपूर गुन्हे शाखा युनिट ३ ने धाड टाकली. मानकापूर ठाण्याच्या कारवाईत पोलिसांनी १.३८ लाख रुपयांच्या मुद्देमालासह दोन आरोपींना रंगेहात पकडले असून, त्यांच्या इतर साथीदारांचा शोध सुरू आहे.

गुन्हे शाखा युनिट ३ च्या पथकाला मानकापूरमधील गीता नगर, ठाकरे ले-आउट येथील एका घराच्या मजल्यावर क्रिकेट सामन्यावर ऑनलाइन सट्टा सुरू असल्याची माहिती मिळाली होती या आधारावर ८ मार्चच्या रात्री ९.२० ते ९ मार्चच्या मध्यरात्री १२.२० दरम्यान पोलिसांनी सापळा रचून धाड टाकली. कारवाईत चैतन्यकुमार गंगाराम ठाकरे (वय ५५ खापरी मोहल्ला, इतवारी) आणि पुरुषोत्तम दशरथ सोनकुसरे (वय ५३ अनमोल नगर, वाठोडा) हे दोघेही मोबाईल फोनद्वारे ग्राहकांकडून सट्ट्याची खायवाडी करताना मिळून आले. त्यांना तत्काळ ताब्यात घेण्यात आले अधिक तपासात आरोपींचे अन्य साथीदार संजू रामटेकेकर, हेमराज नामदेव कोहाड (दोघेही रा. नंदनवन) आणि अविनाश खडके (रा. लालगंज) यांच्या मदतीने हा प्रकार सुरू असल्याचे समोर आले आहे. कारवाईत तपास पथकाने १० विविध कंपन्यांचे मोबाईल फोन, १ टेलिव्हिजन तसेच इतर इलेक्ट्रॉनिक साहित्य असा एकूण अंदाजे १,३८,२२० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

**तपास पथक**

ही कारवाई पोलिस आयुक्त रविंद्र कुमार सिंगल, सह-पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अपर पोलिस आयुक्त (गुन्हे) वसंत परदेशी, पोलिस उपायुक्त (डिटेक्शन) राहुल माकणीकर आणि सहाय्यक पोलिस आयुक्त (गुन्हे शाखा) अभिजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोलिस निरीक्षक महेश सागडे, पोलिस उपनिरीक्षक अमित देशमुख, संतोषसिंग ठाकूर, पोहवा अजय पाटील, अनुप तायवाडे, पोअं विवेक भोयर, रोहित काळे, मनीष रामटेके, प्रमोद देशभ्रतार यांचा समावेश होता.

## वाहनांचा जाहीर लिलाव

**नागपूर, दि. ९ :** प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर शहर यांनी मुंबई मोटार वाहन कर कायद्यांतर्गत थकीत कराच्या वसुलीसाठी जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव १३ मार्च रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ पर्यंत प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर शहर येथे होणार असल्याचे कराधान प्राधिकारी तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी (नागपूर शहर) यांनी कळविले आहे. शहर परिवहन कार्यालयामार्फत जप्त / अटकावून ठेवलेल्या वाहनांची विक्री ई लिलावाद्वारे करण्यात येत आहे. लिलावामध्ये विक्री करावयाच्या वाहनांची यादी, लिलावाचा दिनांक, ठिकाण तसेच अटी व शर्ती इत्यादी माहिती महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# अट्टल वाहन चोरट्याला अटक, १८ दुचाकी जप्त

## एमआयडीसी पोलिसांची मोठी कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर, दि. ९ :** एमआयडीसी पोलिसांनी एका सराईत गुन्हेगाराला अटक करून त्याच्या ताब्यातून तब्बल १८ चोरीच्या दुचाकी हस्तगत केल्या आहेत. या कारवाईमुळे शहरातील विविध ठाण्यातील १८ गुन्ह्यांची उकल झाली आहे.

एमआयडीसी ठाण्याच्या हद्दीत वाढत्या वाहन चोरीच्या तक्रारी लक्षात घेत गुन्हे शोध पथकाने संशयितांवर पाळत ठेवली होती. गोपनीय माहितीच्या आधारे एका आरोपीला ताब्यात घेऊन त्याची सखोल चौकशी केली असता त्याने शहराच्या विविध भागांतून दुचाकी चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीच्या निशाणदेहीवरून एकूण १८ मोटारसायकल जप्त केल्या आहेत. प्राथमिक तपासानुसार ८ गुन्हे एमआयडीसी ठाण्याच्या हद्दीतील असून, १० गुन्हे शहरातील इतर विविध ठाण्याच्या हद्दीतील आहेत.सध्या पोलिस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, आरोपीकडून आणखी काही चोरीची वाहने किंवा त्याच्या इतर साथीदारांची माहिती मिळण्याची शक्यता आहे.

# जिद्द आणि चिकाटीतून 'यूपीएससी' क्रॅक



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ९ :** सलग चारवेळा आलेल्या अपयशाने खचून न जाता ज्ञानेश्वर नगरातील चेतन रमेश ठाकरे याने पाचव्या प्रयत्नात 'यूपीएससी २०२५' परीक्षेत दैदीप्यमान यश मिळविले आहे. त्याने इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिस (आयआरएस) मधील अधिकारीपद पटकावून आपले स्वप्न साकार केले.

चेतनने मागील चुकांचे विश्लेषण करत अभ्यासाच्या पद्धतीत बदल केला. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत त्याने यू-ट्यूब आणि चॅटजीपीटीच्या मदतीने कठीण विषय सुलभ केले. दररोज ६ ते ८ तास अभ्यास करतानाच त्याने मागील १० वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचे सखोल निरीक्षण केले. सुमारे २०० महत्त्वाच्या प्रश्नांची पुनरावृत्ती होत असल्याचे लक्षात आल्यावर त्याने त्यावर विशेष लक्ष केंद्रित केले. पाच वर्षांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे चेतनने हे यश खेचून आणले असून, त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# विद्यापीठात 'युवास्पंदन'चा जल्लोष

## क्रिकेट स्पर्धेने युवास्पंदन महोत्सवास सुरुवात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर, दि. ९ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागाचा क्रीडा व सांस्कृतिक 'युवास्पंदन' महोत्सवास सोमवार, दि.९ मार्च २०२६ रोजी क्रीडा स्पर्धेने सुरुवात झाली. युवास्पंदन महोत्सव अंतर्गत विविध क्रीडा तसेच सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन ९ ते १८ मार्च २०२६ दरम्यान करण्यात येणार आहे.

माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे प्रभारी संचालक डॉ. संभाजी भोसले यांच्या शुभहस्ते फित कापून या महोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जनसंपर्क अधिकारी प्रेमदास वाडकर, युवास्पंदन सांस्कृतिक महोत्सवाच्या अध्यक्ष सृष्टी बोरकर, सचिव संकेत रायपुरे, आशय यावले यांची यावेळी उपस्थिती होती. डॉ. संभाजी भोसले यांनी मार्गदर्शन करताना खेळ भावनेतून विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. खेळ भावनेतून कोणत्याही स्पर्धेत उतरल्यास आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असल्याचे त्यांनी सांगितले. युवास्पंदन महोत्सवात विद्यार्थी व विद्यार्थिनींचे क्रिकेट सामने, विद्यार्थ्यांचे हॉलीबॉल सामने, विद्यार्थी- विद्यार्थिनींचे टग ऑफ वार सामने, बुद्धिबळ, रांगोळी, मेहंदी, खाद्य महोत्सव, ट्रेजर हंट, वादविवाद, गायन स्पर्धा, समूह गान, फॅशन शो, एकल नृत्य, मिस्टर अँड मिस कॅम्पस आदी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

# डॉ. विपीन यांनी स्वीकारला मनपा आयुक्तपदाचा पदभार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर, दि. ९ :** भारतीय प्रशासकीय सेवेतील २०१४ च्या बॅचचे अधिकारी डॉ. विपीन यांनी सोमवारी (ता. ०९) नागपूर महानगरपालिकेच्या ५२ व्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला. डॉ. अभिजीत चौधरी यांची पुणे येथे बदली झाल्यानंतर डॉ. विपीन यांची या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. पदभार स्वीकारताना अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत आणि श्रीमती वैष्णवी बी. यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

प्रशासनात येण्यापूर्वी एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केलेल्या डॉ. विपीन यांनी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत महत्त्वाच्या पदांवर काम केले असून, सध्या त्यांच्याकडे नागपूर जिल्हाधिकारी पदाचाही अतिरिक्त कार्यभार आहे. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी मुख्यालयातील विविध विभागांना भेटी दिल्या. तसेच दोन्ही अतिरिक्त आयुक्त, मुख्य अभियंता, उपायुक्त व सहायक आयुक्तांसह सर्व विभाग प्रमुखांशी विकासकामांबाबत सकारात्मक चर्चा केली.

**उच्च शिक्षण सुधारणा... तज्ज्ञांनी वर्तविली आमूलाग्र बदलांची नांदी**

# 'विकसित भारत एज्युकेशन विधेयक २०२५' वर मंथन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर, दि. ९ :** भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) नागपूर येथे 'विकसित भारत एज्युकेशन फाउंडेशन विधेयक २०२५'या विषयावर एक महत्त्वपूर्ण चर्चासत्र (सिम्पोजियम) पार पडले. प्रस्तावित विधेयकातील विविध पैलूंवर चर्चा करणे आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील सुधारणांबाबत शिक्षणतज्ज्ञांकडून सूचना गोळा करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून 'लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी'चे कुलगुरू डॉ. अतुल वैद्य,आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. संजय कविश्वरÞ ॲड. अशोक पावडे आदी मान्यवर उपस्थित होते

आपल्या संबोधनात कुलगुरू डॉ. अतुल वैद्य यांनी शिक्षण पद्धतीवर भाष्य केले. उच्च शिक्षणात शिक्षकांचे मूल्यमापन केवळ त्यांनी प्रसिद्ध केलेल्या शोधनिबंधांच्या संख्येवर आधारित नसावे. त्याऐवजी त्यांनी किती सक्षम विद्यार्थी घडवले आणि किती जणांना मार्गदर्शन केले, यावर भर द्यावा संशोधन करणे आणि संशोधनासाठी विद्यार्थी तयार करणे या दोन वेगळ्या जबाबदाऱ्या असल्याचेही त्यांनी नमूद केले. आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी 'विकसित भारत' या संकल्पनेचे महत्त्व अधोरेखित केले. भारत सन २०४७ च्या आधीच एक विकसित राष्ट्र म्हणून उदयास येण्याची क्षमता राखून आहे भारतीय तरुण आज जागतिक कंपन्यांचे नेतृत्व करत आहेत. भविष्यात जगाला भारताकडून मोठ्या अपेक्षा आहेत त्यामुळे आपली उच्च शिक्षण प्रणाली भविष्यातील गरजांशी सुसंगत असणे आवश्यक असल्याचे डॉ. भीमराया मेत्री यांनी स्पष्ट केले

चर्चासत्रात नियमन, प्रत्यायन, मानकीकरण तीन महत्त्वाच्या तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले. ॲड. अशोक पावडे यांनी बीजभाषण केले. माजी अधिष्ठाता डॉ. संजय कविश्वर यांनीही मार्गदर्शन केले.

**दिल्लीला पाठवणार शिफारसी**

सिम्पोजियममध्ये तज्ज्ञांनी मांडलेल्या सर्व सूचना आणि संकल्पनांचे पद्धतशीर संकलन केले जाणार आहे. हा अहवाल धोरणात्मक शिफारसी म्हणून नवी दिल्लीतील संबंधित प्राधिकरणांकडे सोपवण्यात येणार आहे, जेणेकरून उच्च शिक्षण सुधारणांना अधिक बळकटी मिळेल.

# 'मॉलिक्युलर बायोलॉजीतील साधने व तंत्रे' विषयावर कार्यशाळा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर, दि. ९ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात 'मॉलिक्युलर बायोलॉजीतील साधने व तंत्रे' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा पार पडली. संशोधन क्षेत्रात महत्त्वाच्या ठरणाऱ्या 'मॉलिक्युलर बायोलॉजी'तील विविध साधने व तंत्रांची सखोल माहिती देणे, असा कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

कार्यशाळेत 'हाय-मीडिया लॅबोरेटरिज' येथील अनुभवी प्रात्यक्षिककार डॉ. सुनील कोकणे व डॉ. संजीव कुमार सिंह यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी महत्त्वाच्या तंत्रांबद्दल सविस्तर माहिती देत प्रत्यक्ष प्रात्यक्षिके सादर केली. तसेच, प्राणीशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. उर्मिला जीवनतारे आणि डॉ. आशिककुमार नागवंशी यांनी सिकलसेल ॲनिमिया चाचणीचे प्रात्यक्षिक सादर केल. धारिता जोशी आणि पल्लवी मोहुरले यांनी अपोप्टोसिस चाचणीचे प्रात्यक्षिक सादर केले. कार्यशाळेची सुरुवात प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. श्रीमती व्ही. टी. धुर्वे यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. रुसा समन्वयक डॉ. रुपेश बडेरे यांनी उद्घाटनपर मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी विविध वैज्ञानिक क्षेत्रांमध्ये मॉलिक्युलर बायोलॉजी तंत्रांचे वाढते महत्त्व अधोरेखित केले आणि विद्यार्थ्यांना व संशोधकांना नवनवीन तंत्रज्ञानाबाबत सतत जिज्ञासू राहण्याचे आवाहन केले. कार्यशाळेदरम्यान सहभागी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोग व प्रात्यक्षिकांद्वारे मौल्यवान व्यावहारिक अनुभव मिळाला. डॉ. कोकणे यांनी प्रत्येक तंत्राच्या सैद्धांतिक बाबींचे स्पष्टीकरण दिल्यानंतर त्याचे टप्प्याटप्प्याने प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवले. कार्यशाळेचा एक भाग म्हणून सहभागी विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील रुसा केंद्राला भेट देण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिककुमार नागवंशी यांनी केले.

अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, मंगळवार, दि. १० मार्च २०२६ www.ajinkyabharat.com

## मनोरुग्णाच्या तावडीतून दीड वर्षांच्या चिमुकलीची सुटका

**अकोला :** ऑपरेशन शोध अंतर्गत रामदासपेठ पोलिसांनी तत्परता दाखवत दीड वर्षांच्या चिमुकलीची मनोरुग्णाच्या तावडीतून अवघ्या काही तासांत सुटका करून तिला सुखरूप आईच्या ताब्यात दिल्याची दिलासादायक घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. मध्यप्रदेशातील बुरापुर जिल्ह्यातील शाहपुर येथील रहिवासी फुलसिंग सोलंकी (३०) हा मनोरुग्ण असून तो अकोला येथील रामदासपेठ परिसरातील केळकर हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होता. दरम्यान, सोमवार ९ मार्च रोजी त्याने हॉस्पिटलमधून दीड वर्षांच्या एका चिमुकलीला कोणालाही न सांगता सोबत घेऊन निघून गेल्याची बाब समोर आली. चिमुकली अचानक गायब झाल्याचे लक्षात येताच तिची आई व नातेवाईकांनी तात्काळ रामदासपेठ पोलीस ठाण्यात धाव घेत माहिती दिली. पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे यांनी तातडीने दखल घेत स्वतःच्या नेतृत्वाखाली शोध मोहीम सुरू केली. एक पथक तात्काळ परिसरात रवाना करण्यात आले, तर दुसरे पथक तांत्रिक आणि गुप्त माहितीच्या आधारे संशयिताचा माग काढून मुलीचा शोध घेतला.

महत्त्वाचे

## घरासमोर येऊन महिलेला मारहाण

**अकोला :** शहरातील खदान पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरासमोर येऊन एका महिलेला अश्लील शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी चार जणांविरुद्ध खदान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मनिषा शीतल पांडे (३२) व्यवसाय खाजगी शिक्षिका, रा. कैलास टेकडी, अकोला) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला. २ मार्च २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५.३० वाजण्याच्या सुमारास तक्रारदार मनिषा पांडे या त्यांच्या घरात असताना आरोपी ब्रिजेश शुक्ला हा त्यांच्या घरासमोर आला. त्याने त्यांना अश्लील शिवीगाळ करत अपमानास्पद शब्द वापरले तसेच ''तुला घरात घुसून मारीन'' अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. यानंतर मनिषा पांडे या घराबाहेर आल्या असता ब्रिजेश शुक्ला याने त्यांना चापटा व बुक्यांनी मारहाण केली. यावेळी निशा ब्रिजेश शुक्ला हिने त्यांच्या केसांना धरून पाठीवर चापटा व बुक्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे. तसेच सरीता सुरेंद्र शुक्ला व शिवदेवी तिलकराज शुक्ला यांनीही तक्रारदार महिलेला मारहाण करून अश्लील शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. घटनेनंतर मनिषा पांडे या त्यांच्या वडील व भावासह खदान पोलीस ठाण्यात दाखल झाल्या. पोलिसांनी त्यांना तत्काळ शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी पाठवून उपचार करून घेतले.

# नालेसफाई, श्वानांच्या मुद्द्यावरून सत्ताधारी-विरोधक आक्रमक

## प्रशासनाचा १७ हजार श्वानांच्या लसीकरणाचा दावा फेटाळला; मृत जनावरांच्या विल्हेवाटीवरूनही संताप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ : महानगरपालिकेच्या सोमवारी पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत शहरात गंभीर बनलेला नालेसफाईचा प्रश्न, मोकाट जनावरांचा सुळसुळाट आणि वार्षिक भाडेपट्ट्यावरील गाळेधारकांच्या वाढीव टॅक्सच्या मुद्द्यावरून सभा गाजली. विशेषतः नालेसफाई आणि मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नावर प्रशासनाने केलेल्या तोकड्या उपाययोजनांवर सत्ताधारी भाजपसह विरोधी पक्षांच्या नगरसेवकांनी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. या सभेला पदसिद्ध अध्यक्ष महापौर शारदा खेडकर, उपमहापौर अमोल गोगे, सहा. आयुक्त सुमेध अलोने, नगरसचिव अमोल डोईफोडे, गटनेता, सर्व नगरसेवक यांच्यासह महापालिका विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. शहरातील नालेसफाईचा मुद्दा सभेत गाजला.**

प्रशासनाकडून केल्या जाणाऱ्या नालेसफाईवर भाजपचे नगरसेवक विजय अग्रवाल, विनोद मापारी, मंजुषा शेळके, काँग्रेसचे फजलू पैलवान आणि शिवसेनेच्या उषा विरक यांनी गंभीर आक्षेप नोंदवले. नालेसफाई केवळ कागदावरच असल्याची भावना नगरसेवकांनी व्यक्त करत प्रशासनाच्या कामकाजावर बोट ठेवले. शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या २८ हजार असताना, प्रशासनाने १७ हजार ५५२ कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण केल्याचा दावा केला. मात्र, हा दावा खोटा असल्याचा आरोप विरोधकांनी केला. कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च होत असतानाही नागरिक त्रस्त आहेत. चावा घेणाऱ्या कुत्र्यांना बंदिस्त करण्यासाठी




झोननिहाय शेल्टर उभारण्याची मागणी हरीश आलिमचंदानी, आशिष पवित्रकार आणि पराग गवई यांनी केली.

वारंवार चावा घेणाऱ्या कुत्र्यांना पकडून शेल्टर हाऊसमध्ये ठेवण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असतानाही प्रशासन टाळाटाळ करत असल्याचा मुद्दा नगरसेवक ॲड. काकड यांनी मांडला. भाजप नगरसेवक धनंजय धबाले यांनी मृत जनावरांची विल्हेवाट लावली जात नसल्याचा गंभीर आरोप केला. डम्पिंग ग्राउंडजवळ यासाठी १० एकर जागा उपलब्ध असतानाही अंमलबजावणी का होत नाही, असा प्रश्न विजय अग्रवाल यांनी उपस्थित केला. प्रशासन जर काम करत नसेल, तर आम्हाला प्रशासनावर कारवाई करावी लागेल, असा सज्जड इशाराही अग्रवाल यांनी यावेळी दिला.

यासोबतच नगरसेविका योगिता पावसाळे यांनीही प्रभागातील वाढत्या मोकाट कुत्र्यांच्या समस्येकडे लक्ष वेधले, तर पराग गवई यांनी चारही झोनमध्ये रेबीज इंजेक्शनची व्यवस्था करण्याची मागणी केली.मोक्याच्या जागेवर तसेच शहरातील ओपन स्पेसवर अतिक्रमण करण्यात आले आहे. सदर जागा मुक्त करा असा मुद्दा भाजपचे गटनेता पवन महल्ले यांनी उपस्थित केला. ह्या जागा करार संपूनही अतिक्रमण धारकांच्या ताब्यात असून यामुळे महापालिकेचा महसूल बुडत आहे हा मुद्दाही महल्ले यांनी मांडला.

### वार्षिक भाडेवाढ : ४२ विरुद्ध २१ ने ठराव मंजूर

महापालिकेची विशेष सर्वसाधारण सभा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पार पडली. या सभेच्या विषय सूचीवरील सर्वात महत्त्वाचा मुद्दा असलेल्या मनपाच्या गाळे आणि प्लॉटच्या रेडी रेकनर आधारित भाडेवाढीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली. प्रशासनाने वार्षिक भाड्यावर असलेल्या दुकानांच्या आणि प्लॉटच्या वाणिज्य वापरासाठी १० टक्के रेडीरेकनर दराने सुधारणा करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. मात्र, सत्ताधारी पक्षाने हा दर १० टक्क्यांऐवजी ७ टक्के करण्याची भूमिका लावून धरली. याउलट, विरोधकांनी रेडीरेकनर दराच्या ३ टक्के वार्षिक भाडेवाढ करण्यात यावी, अशी आग्रही मागणी लावली. यावरून दोन्ही गटात सभागृहात मोठे वाद रंगले. चर्चेअंती तोडगा न निघाल्याने महापौर शारदा खेडकर यांनी या विषयावर मतदान घेण्याचा निर्णय घेतला. या मतदानामध्ये सत्ताधाऱ्यांच्या ७ टक्के दरवाढीच्या ठरावाच्या बाजूने ४२ मते पडली, तर ३ टक्के दराच्या समर्थनार्थ विरोधात केवळ २१ मते पडली. अशा प्रकारे सत्ताधाऱ्यांनी बहुमताच्या जोरावर ७ टक्के रेडी रेकनरदराचा ठराव मंजूर करून घेतला.

### गाळेधारकांच्या टॅक्स वाढीवरून पेच

वार्षिक भाडेपट्ट्यावर दिलेल्या गाळेधारकांना रेडी रेकनर दराच्या दहा टक्के टॅक्स वाढविण्याच्या प्रशासनाच्या निर्णयाला सत्ताधारी भाजपने हा टॅक्स सात टक्के करण्याचा मुद्दा मांडला. दुसरीकडे विरोधी पक्षनेता डॉ. जीशान हुसेन टॅक्स अधिक होत असल्याचा मुद्दा उपस्थित करून ही भाडेवाढ कमी करून गाळेधारकांना रेडीरेकनर दराच्या तीन टक्के वाढ करण्याची मागणी लावून धरली. यावर एकमत होत नसल्याने सर्वपक्षीय गट नेत्यांची बैठक घेण्याचा मुद्दा वंचित चे नगरसेवक पराग गवई यांनी मांडला.

### नियुक्तीचा विषय तांत्रिक मुद्द्यामुळे स्थगित

अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीवर महापालिकेच्या सदस्यांपैकी एकास महापालिकेचा सदस्य म्हणून नियुक्त करण्यासाठी चर्चा झाली असता, यासाठी डीडीआर यांचे पत्र घेण्याचा तांत्रिक मुद्दा वंचितचे पराग गवई यांनी मांडल्यानंतर हा विषय स्थगित करण्यात आला.

### अवैध लेआउटचा मुद्दा गाजला

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत शहराच्या नैसर्गिक जलस्त्रोतां-वर झालेल्या अतिक्रमणावरून सत्ताधारी भाजपचे गटनेते पवन महल्ले यांनी प्रशासनाला धारेवर धरले. मोर्णा नदीच्या पात्रात तसेच शहरातील विविध नाल्यांमध्ये चक्क लेआउट टाकून विकासकांनी बांधकामे केली असल्याचा गंभीर आरोप त्यांनी सभागृहात केला. यावेळी बोलताना महल्ले म्हणाले की, नदीप-त्रात हे लेआउट नेमके कोणाचे आहेत आणि या विकासकांना नेमका कोणाचा वरदहस्त लाभला आहे, याची पूर्ण कल्पना शहरातील नागरिकांना आहे. विकासकांनी नियमांची पायमल्ली करत नदी-नाल्यांचे प्रवाह अडवून बांधकामे केल्यामुळे शहराच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला असून, यामागील बड्या शक्तींचा पर्दाफाश करण्याची मागणी या चर्चेतून समोर आली आहे.

### आठ स्वीकृत नगरसेवकांची निवड

अकोला महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजात महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. सोमवारी पार पडलेल्या महापालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेत ८ स्वीकृत नगरसेवकांच्या नावांची घोषणा करण्यात आली. राजकीय समीकरणे आणि विविध पक्षांच्या वाट्याला आलेल्या जागांनुसार ही निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, यामुळे आता महापालिकेच्या सभागृहात नव्या सदस्यांचा समावेश झाला आहे. या विशेष सभेचे अध्यक्षपद महापौर शारदा खेडकर यांनी भूषविले. सभेच्या सुरुवातीला स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीचा विषय मांडण्यात आला आणि त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. निवडीनंतर महापौर शारदा खेडकर यांच्या हस्ते सर्व नवनियुक्त स्वीकृत नगरसेवकांचे पुष्पगुच्छ देऊन विशेष स्वागत करण्यात आले. निवड झालेल्या नगरसेवकांमध्ये वंचित बहुजन आघाडीचे सुनील इन्नाणी, शिवसेना (ठाकरे गट) शंकर लंगोटे तसेच शहर सुधार आघाडीकडून सुनील मेश्राम, अँड. देवाशिष काकड, चंदा शर्मा आणि गिरीश गोखले यांचा समावेश आहे. काँग्रेस पक्षाकडून आकाश कवडे आणि इलियास खान अलीयार खान यांची निवड करण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण विशेष सर्वसाधारण सभेला महापौर शारदा खेडकर यांच्यासह उपमहापौर अमोल गोगे, सहाय्यक आयुक्त सुमेध अलोने आणि नगर सचिव अमोल डोईफोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# फटाक्यांच्या वादातून तरुणावर दगडफेक; दोन्ही गटातील १८ जणांविरुद्ध गुन्हा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ :** जुन्या शहरातील हीना बेकरी परिसरात फटाके फोडण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणावर दगडफेक करून मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. या प्रकरणी परस्परविरोधी तक्रारीवरून दोन्ही गटातील १८ जणांविरुद्ध जुने शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यापैकी चौघांना सोमवारी अटक करण्यात आली आहे.




पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, महाकालीनगर परिसरातील पवन संतोष अग्रवाल (१९) या तरुणाने दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पवन अग्रवाल हा लेडीज पर्स विक्रीचा व्यवसाय करतो. तक्रारीनुसार, ८ मार्च रोजी सायंकाळी पवन अग्रवाल बाहेरगावाहून घरी आला होता. रात्री सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास हीना बेकरी परिसरातून भांडणाचा आवाज येत असल्याने तो बाहेर गेला. त्यावेळी गल्लीत राहणारा सारंग उर्फ 'चींग्या' केशवराव गीते आणि हीना बेकरी चालक 'बब्बू भाई' यांच्यात वाद सुरू असल्याचे त्याने पाहिले.

मोहल्ल्यातील काही लोकांनी बेकरीसमोर फटाके फोडल्याच्या कारणावरून हा वाद सुरू झाला होता. वाद वाढत असताना परिसरातील काही लोक घटनास्थळी जमा झाले. त्यावेळी बब्बू बेकरीवाला, त्याचा मुलगा सद्दाम, बब्बूचा साला मुन्ना, शकीलचा भाऊ सलीम तसेच अंड्या, रजा आणि त्याचा भाऊ ऐपु यांनी एकत्र येत सारंग उर्फ 'चींग्या' गीते याला शिवीगाळ करत दगडफेक केली.

या हल्ल्यात चींग्याच्या हात, पाय आणि डोक्याला दुखापत झाली. दरम्यान, चींग्याची आई घटनास्थळी धावत येऊन त्याला हल्लेखोरांच्या तावडीतून सोडवून घरी घेऊन गेली. त्यानंतर सर्व आरोपी घटनास्थळावरून पळून गेले.

या घटनेप्रकरणी परस्परविरोधी तक्रारींवरून दोन्ही गटातील एकूण १८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत त्यापैकी चौघांना अटक केली असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, प्रभारी शहर पोलीस उपअधीक्षक गजानन पडघन, स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख शंकरराव शेळके, जुने शहरचे ठाणेदार नितीन लेव्हरकर तसेच खदानचे पोलीस निरीक्षक मनोज केदारे यांच्यासह मोठा पोलीस ताफा घटनास्थळी दाखल झाला. पोलिसांनी तातडीने परिस्थिती नियंत्रणात आणली.

या वेळी काही वाहनांची तोडफोड झाल्याचेही समोर आले असून दोन्ही गटांकडून तुफान दगडफेक झाल्याने रस्त्यावर दगडांचा खच पडल्याचे दिसून आले. दरम्यान, टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारताने विजय मिळवल्यानंतर झालेल्या जल्लोषात फटाके फोडण्यावरून हा वाद निर्माण झाल्याचे बोलले जात असले तरी, या घटनेमागे जुना वाद असल्याचीही चर्चा परिसरात आहे. घटनेनंतर सोमवारी दिवसभर हीना बेकरी परिसरात तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. शहरात सध्या शांतता असून नागरिकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे. या प्रकरणी जुने शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १८९(२), १९१(२) आणि ११८(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# जि.प. निधी प्रकरण: आज नागपूर खंडपीठात सुनावणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ :** अनुसूचित जाती उपयोजना व अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे, या योजनेअंतर्गत कामांचा ३६ कोटींचा निधी अन्य ठिकाणी वळता केल्याप्रकरणी जि.प.तील यापूर्वीची सत्ताधारी वंचित बहुजन आघाडीने न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवर मंगळवारी सुनावणी होणार असून,जिल्हा प्रशासनाकडून शपथपत्रही सादर करण्यात आले आहे.

अनुसूचित जात उपयोजना (एससीपी) व अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे, या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ यावर्षाच्या कामांबाबत जि.प. सदस्यांचा कार्यकाळ संपण्यापूर्वी नियोजन करण्यात आले होते. सहाय्यक आयुक्तांकडे निधीसाठी मागणी करून प्रस्ताव सादर करण्यात आला होता; परंतु ३१ जानेवारी रोजी झालेल्या नियोजन समितीच्या सभेत ही कामे रद्द करण्यात आले. मात्र नंतर चौकशी करून पडताळणीचे आदेश देण्यात आले; परंतु त्यापूर्वीच हा संपूर्ण ३६ कोटींचा निधी अन्य कामांसाठी वळता करण्यात आला आहे. त्यावरून तत्कालीन समाज कल्याण सभापती आम्रपाली अविनाश खंडारे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली. या प्रकरणी सुनावणी १० मार्च रोजी होणार असून सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

येथे होणार होता खर्च : अनुसूचित जाती उपयोजना व अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे, या योजनेअंतर्गत कामांचा वळता केलेल्या ३६ कोटींच्या निधीच्या खर्चाला स्थगिती देण्यात आली. हा ग्रामीण भागातील दलितवस्तींमध्ये होणाऱ्या कामांऐवजी शहरातील भागातील कामांवर खर्चासाठी वळता करण्यात आला. हा पालिकेला ११ कोटी लाख तर अन्य नगर परिषद क्षेत्रात ६ कोटींची कामे प्रस्तावित करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेअंतर्गत नवीन विहिर, दुरुस्ती, सूक्ष्म सिंचन, सौर ऊर्जेसाठी १० कोटी रुपये वळते करण्यात आले. समाज कल्याणअंतर्गत वसतीगृहांसाठी १ कोटी आणि यापूर्वीच्या दायित्यासाठी सुमारे ८ कोटींची तरतूद करण्यात आली होती.

सन २०२४-२५ या आर्थिकमध्ये जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाला हा निधी मंजूर करण्यात आला होता. निधी लगतच्या मंजूर दोन वर्षांची मुदत देण्यात आली होती. र मुदत ३१ मार्च २०२६ रोजी संपत आहे. प्रकरण अद्याप उच्च न्यायालयात सुरू असल्याने न्यायालयाचा निकाल लागून निधी खर्च होईल अथवा नाही, या बाबी स्पष्ट नाहीत.

# सभागृहात प्रसारमाध्यमांना प्रवेश नाकारल्याने सत्ताधारी अडचणीत

## वंचित बहुजन आघाडीचा तीव्र आक्षेप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ :** अकोला महानगरपालिकेच्या सोमवारी पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत वृत्तांकन करण्यासाठी आलेल्या प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना सभागृहात प्रवेश नाकारण्यात आला. या प्रकारावर तीव्र संताप व्यक्त करत वंचित बहुजन आघाडीचे गटनेता निलेश देव आणि नगरसेवक पराग गवई यांनी सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले.

महानगरपालिकेच्या सभागृहात होणारे निर्णय हे थेट शहरवासियांच्या हिताशी संबंधित असतात. अशा महत्त्वाच्या निर्णयांची माहिती पारदर्शकपणे जनतेपर्यंत पोहोचणे आवश्यक असते, ज्यासाठी प्रसारमाध्यमांना नेहमीच विशेष बैठक व्यवस्था केली जाते. मात्र, सोमवारी ही परंपरा मोडीत काढत पत्रकारांना रोखले गेले.

या घटनेचा निषेध करत निलेश देव आणि पराग गवई यांनी ''सत्ताधाऱ्यांना प्रसारमाध्यमांची इतकी भीती का वाटते?'' असा थेट सवाल उपस्थित केला. ही लोकशाहीची गळचेपी असल्याचे सांगत त्यांनी हा प्रकार अत्यंत अशोभनीय आणि निषेधार्ह असल्याचे म्हटले. सत्ताधारी पक्षाने घेतलेली ही भूमिका आता वादाच्या भोवऱ्यात सापडली असून, महापालिकेच्या कारभारातील पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांचा हक्क असलेल्या माहितीच्या अधिकारावर आणि पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर हा हल्ला असल्याचा आरोप वंचितच्या नगरसेवकांनी केला आहे.


आयोजन | 'अजिंक्य मी' तर्फे महिलांसाठी उपक्रम

# आरोग्य तपासणी शिबिराला दुसऱ्या दिवशीही उत्स्फूर्त प्रतिसाद

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत अजिंक्य मी या व्यासपीठातर्फे आयोजित करण्यात आलेल्या भव्य आरोग्य वैद्यकीय तपासणी शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दि. ८ मार्चपासून सुरू झालेल्या या शिबिराचा दुसरा दिवसही मोठ्या उत्साहात पार पडला.





महिलांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याच्या उद्देशाने हे शिबिर दि. ८ ते १२ मार्च या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये महिलांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या विविध तपासण्या करण्यात येत आहेत. त्यामध्ये सीबीसी, टीएसएच, पॅप स्मिअर (गर्भाशयाचा कॅन्सर तपासणी), रँडम ब्लड शुगर लेव्हल यांसारख्या महत्त्वपूर्ण तपासण्यांचा समावेश आहे. या सर्व तपासण्या उच्चशिक्षित तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली केल्या जात आहेत.


सदर तपासण्या आयकॉन हॉस्पिटल येथे आयोजित करण्यात आल्या असून, या शिबिरासाठी अवघे तीन दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त महिलांनी या आरोग्यदायी उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, या सर्व तपासण्या केवळ ५० रुपये नाममात्र शुल्कात करून घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. कामाच्या धावपळीत महिलांकडून त्यांच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते; मात्र महिलांचे आरोग्य सुदृढ राहिले तर संपूर्ण कुटुंब सक्षम राहू शकते, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. हे शिबिर अजिंक्य मीच्या सदस्यांसाठी आयोजित करण्यात आले असून, इच्छुक महिलांसाठी ऑन-द-स्पॉट तपासणीची सुविधा उपलब्ध आहे. तसेच अजिंक्य मीचे सभासद होण्यासाठी रजिस्ट्रेशनची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अकोला रेल्वे परिसरात चोरीच्या घटनांची मालिका; प्रवाशांच्या सुरक्षेवर पुन्हा प्रश्नचिन्ह

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ :** रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. गेल्या दोन दिवसांत अकोला रेल्वे पोलिस स्टेशन हद्दीत चालत्या गाड्यांमध्ये तसेच रेल्वे स्थानक परिसरात चोरीच्या तीन वेगवेगळ्या घटना घडल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनांमध्ये लाखो रुपयांच्या मौल्यवान वस्तूंवर चोरट्यांनी हात साफ केला असून अद्याप आरोपींचा ठावठिकाणा लागलेला नाही.



मिळालेल्या माहितीनुसार, काही प्रवासी रेल्वेतून प्रवास करत असताना त्यांच्या बॅगा, मोबाईल, रोकड तसेच सोन्याचे दागिने अशा मौल्यवान वस्तू चोरट्यांनी लंपास केल्या. काही प्रकरणांमध्ये चोरट्यांनी प्रवाशांचे लक्ष विचलित करून चोरी केली, तर काही ठिकाणी गर्दीचा फायदा घेत बॅगा पळविल्याची माहिती समोर आली आहे.

विशेष म्हणजे या घटना चालत्या रेल्वेगाड्यांमध्ये तसेच रेल्वे स्थानक परिसरात घडल्याने सुरक्षा यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रेल्वे प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात असताना अशा घटना वारंवार घडत असल्याने रेल्वे पोलिसांच्या गस्त व सुरक्षा व्यवस्थेच्या कार्यक्षमतेबाबत नाराजी व्यक्त होत आहे.

या घटनांमुळे अनेक प्रवासी असुरक्षिततेची भावना व्यक्त करत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून रेल्वे पोलिसांनी सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, संबंधित तक्रारींवरून रेल्वे पोलिसांनी गुन्हे नोंदवून तपास सुरू केला आहे. रेल्वे स्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत असून संशयितांचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

अकोला रेल्वे स्थानकावर गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी अधिक कडक उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे. रेल्वे प्रशासन व रेल्वे पोलिसांनी संयुक्तपणे गस्त वाढवून चोरट्यांवर कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

## महत्त्वाचे

# सावधान... सूर्य आग ओकतोय!

**वाशिम जिल्ह्याचा पारा ३९.२ अंशांवर; उष्णतेच्या लाटेचा इशारा**



**मंगरूळपीर, दि. ८ :** मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच सूर्याने आग ओकण्यास सुरुवात केली असून, वाशिम जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भ तापायला लागला आहे. विदर्भातील अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यांचे तापमान ४० अंशांच्या पार गेले असून, वाशिम जिल्ह्यातही ३९.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. हवामान खात्याने पुढील काही दिवसांत तापमानात अधिक वाढ होण्याचा अंदाज वर्तवत उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे.

अकोल्यात राज्यातील सर्वाधिक ४०.८ अंश तापमानाची नोंद झाली आहे, तर अमरावतीत ४०.६ अंश सेल्सिअसवर पारा पोहोचला आहे. कमाल तापमान सरासरीपेक्षा ४.५ अंशांनी वाढल्यास उष्णतेची लाट मानली जाते. सध्याची परिस्थिती पाहता नागरिकांनी दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे टाळावे आणि आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. उन्हाळ्याच्या सुरुवातीला सुर्य आग ओत असून पुढे काय परिणाम होतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वाढत्या उन्हामुळे वाशिम जिल्ह्यातील जनजीवन प्रभावीत झाले असून, मार्चच्या पहिल्याच आठवड्यात जाणवणारा हा चटका उन्हाळ्याच्या तीव्रतेची जाणीव करून देत आहे.

# बोर्डी-रामापूर शिवारात गहू काढणीला वेग; मजूर टंचाईमुळे हार्वेस्टरला पसंती

## आधुनिक तंत्रज्ञानामुळे वेळ, श्रम अन् पैशांची बचत; २६०० रुपयांपर्यंत मिळतोय भाव

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. ९ :** तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेला बोर्डी, शिवपूर व रामापूर हा भाग बागायती पट्टा म्हणून ओळखला जातो. या परिसरात सिंचनाच्या सोयी उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांनी नोव्हेंबर महिन्यात गव्हाची मोठ्या प्रमाणात पेरणी केली होती. सध्या हा गहू काढणीला आला असून, मजूर मिळणे कठीण झाल्याने शेतकरी आता आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत हार्वेस्टर मशीनद्वारे काढणीला पसंती देत आहेत.




पूर्वी गहू काढणीसाठी सर्वस्वी मजुरांवर अवलंबून राहावे लागत होते. मात्र, सध्या ५०० रुपये रोजंदारी देऊनही मजूर मिळेनासे झाले आहेत. त्यातच उन्हाची तीव्रता वाढल्याने शेतात काम करणे मजुरांसाठी कठीण जात आहे. अशा परिस्थितीत हार्वेस्टर यंत्र शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. या यंत्रामुळे सोंगणी आणि मळणी एकाच वेळी होत असल्याने शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचत आहे. सध्या या परिसरात गव्हाचे एकरी १६ ते १८ पोते उत्पादन होत असून, बाजारात २५०० ते २६०० रुपये प्रति क्विंटल असा समाधानकारक भाव मिळत आहे.

### काही तासांतच मळणी पूर्ण

मजुरांची कमतरता आणि वाढते ऊन यामुळे शेतकरी चिंतेत होते. मात्र, हार्वेस्टरच्या वापरामुळे अनेक दिवसांचे काम आता अवघ्या काही तासांत पूर्ण होत आहे. मजुरांकडून गहू काढणी करून घ्यायची असल्यास एकरी ५ ते ६ हजार रुपये खर्च येतो. याउलट, हार्वेस्टरद्वारे अवघ्या २ हजार रुपयांत मळणी पूर्ण होते. यामुळे प्रति एकर ३ ते ४ हजार रुपयांची मोठी बचत होत असल्याने शेतकऱ्यांचा कल या यंत्राकडे वाढला आहे.

सध्या शेतात गहू काढणीची लगबग सुरू आहे, पण मजूर मिळेनासे झाले आहेत. मजुरांच्या तुलनेत हार्वेस्टरने मळणी करणे खूप परवडणारे आहे. ५ ते ६ हजार रुपयांचे काम केवळ २ हजारात होते. शिवाय वेळेचीही बचत होत असल्याने आम्ही यंत्राचा वापर करत आहोत.

**- अरुण शामराव चामलाटे,**
शेतकरी, रामापूर.

# मावळे जातीसाठी नव्हे, तर धर्माच्या अस्मितेसाठी लढले – प्रेरणा भोसले




अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अडगाव बु., दि. ९ :** छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातीच्या मावळ्यांना हिंदू धर्माच्या रक्षणासाठी एकत्र करून स्वराज्य निर्माण केले. छत्रपतींचा वारसा पुढे नेण्यासाठी जातीपातीच्या भिंती पाडून संघटित होणे ही काळाची गरज आहे,असे परखड मत शिवचरित्रकार कु. प्रेरणा भोसले यांनी व्यक्त केले. येथील राम मंदिर चौकात आयोजित विराट हिंदू संमेलनात त्या मुख्य वक्ता म्हणून बोलत होत्या. प्रमुख अतिथी म्हणून महेंद्र कवीश्वर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भव्य शोभायात्रा व कलश यात्रेने झाली. माऊली ग्रुप भजनी मंडळाच्या टाळ-मृदंगाच्या निनादात निघालेल्या या यात्रेने गाव भक्तीमय झाले होते. संमेलनस्थळी प्रेरणाताई भोसले यांचे स्वागत दिपा सिसोदिया व कु. तन्वी मांडवगडे यांनी केले, तर महेंद्रजी कवीश्वर यांचे स्वागत वीर सावरकर शाखेचे स्वयंसेवक पवन ढोकणे यांनी केले. नरेन्द्र मानकर यांनी वैयक्तिक गीत सादर केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांसह सर्व हिंदू संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी व ग्रामस्थांनी संमेलन यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. हिवरखेड पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार नाना देशमुख यांनी केले, तर आभार नरेन्द्र मानकर यांनी मानले.

# जनतेने प्रश्न विचारले तरच गावाचा विकास; अन्यथा आश्वासनांचाच खेळ!

## ग्रामसभेतील नीरव शांतता प्रगतीच्या आड; हक्कासाठी जागरूक होण्याची वेळ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**उमरा, दि. ९ :** ग्रामीण भागाच्या विकासाचा कणा असलेली लोकशाही व्यवस्था केवळ लोकप्रतिनिधींच्या भरवशावर चालत नाही, तर त्यात जनतेचा सहभाग तितकाच महत्त्वाचा असतो. मात्र, सध्या अनेक गावांतील चित्र पाहता, लोकप्रतिनिधींच्या अकार्यक्षमतेसोबतच जनतेची मौन संमतीही विकासाच्या मार्गातील मोठा अडथळा ठरत आहे. जोपर्यंत नागरिक प्रशासनाला आणि स्थानिक नेत्यांना जाब विचारत नाहीत, तोपर्यंत गावाचा विकास हा केवळ कागदावरील आश्वासनांचा खेळच राहणार, अशी स्थिती निर्माण झाली आहे.

सध्या ग्रामीण भागात रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत सुविधांचा बोजवारा उडालेला दिसतो. अनेक ठिकाणी ग्रामसभांचे आयोजन केवळ सोपस्कार म्हणून केले जाते. नियमानुसार ग्रामसभेत गावातील ज्वलंत प्रश्नांवर चर्चा होणे अपेक्षित असताना, अनेक नागरिक या सभांकडे पाठ फिरवतात. जे उपस्थित राहतात, तेही स्थानिक राजकारण किंवा वैयक्तिक संबंधांमुळे गप्प राहणे पसंत करतात.

नागरिकांची हीच उदासीनता विकासाला खिळ घालणारी ठरत आहे. शासनाकडून विविध योजनांसाठी निधी उपलब्ध होतो, परंतु तो निधी नेमका कुठे आणि कसा खर्च झाला, याचा जाब विचारणारे कोणी नसल्याने अनेक कामे निकृष्ट दर्जाची होतात किंवा अर्धवट राहतात.

शाळेतील सुविधा असोत वा अंगणवाडीतील पोषण आहार, प्रत्येक बाबीवर लक्ष ठेवणे ही ग्रामस्थांची नैतिक जबाबदारी आहे. जेव्हा जनता प्रश्न विचारते, तेव्हाच प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना उत्तरदायित्वाची जाणीव होते. ज्या गावांमध्ये नागरिक आपल्या हक्कांप्रती जागरूक आहेत, तिथे विकासाची गंगा वेगाने वाहताना दिसते. याउलट, जिथे लोक उदासीन आहेत, तिथे समस्यांची जळमटे वर्षानुवर्षे तशीच राहतात. केवळ निवडणुकीपुरते सक्रिय राहण्यापेक्षा, वर्षभर होणाऱ्या विकासकामांवर नजर ठेवणे गरजेचे आहे. निधी असूनही कामे का रखडली? रस्ते खराब का झाले? पाण्याचे नियोजन का कोलमडले? असे प्रश्न विचारण्याची हिंमत प्रत्येक ग्रामस्थाने दाखवणे ही काळाची गरज आहे.

### एकजुटीनेच शक्य आहे बदल

गावचा सर्वांगीण विकास हा केवळ कागदी घोडे नाचवून होत नाही. त्यासाठी लोकसहभाग अनिवार्य आहे. जोपर्यंत सामान्य नागरिक ग्रामसभेत प्रश्न मांडत नाही, तोपर्यंत सत्तेचे विकेंद्रीकरण यशस्वी होणार नाही. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि जागरूक जनता या तिघांचा ताळमेळ बसला, तरच गावाचा चेहरामोहरा बदलणे शक्य आहे, असे मत सुज्ञ नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# हिरपूरमध्ये विशाल हिंदू संमेलनाचा जयघोष

## हजारो हिंदू बांधवांच्या उपस्थितीत अभूतपूर्व सोहळा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**मुर्तिजापूर, दि. ९ :** मुर्तीजापूर तालुक्यातील हिरपूर येथील श्री जयाजी महाराज मंदिर परिसरात सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित विशाल हिंदू संमेलन २०२६ अत्यंत उत्साहात संपन्न झाले. ग्रामीण भागाच्या इतिहासात पहिल्यांदाच सर्व जाती-पंथ आणि भेद बाजूला सारून हिंदू समाज इतक्या मोठ्या संख्येने संघटित झाल्याचे पाहायला मिळाले.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी अंबोडा येथील महंत सुरेश्वरानंद गिरी (दासगिरी महाराज) यांचे पावन आशिर्वचन लाभले. त्यांनी हिंदू संस्कृतीची जोपासना आणि धर्माप्रती निष्ठेवर मार्गदर्शन केले. विश्व हिंदू परिषदेचे विदर्भ प्रांत सेवक रामजी गणेश लोखंडे यांनी हिंदूंच्या सक्षमीकरणावर जोर दिला, तर अमरावती विद्यापीठाच्या सिनेट सदस्या पल्लवी कुलकर्णी यांनी समाजातील महिलांच्या सहभागाचे महत्त्व विषद केले.

हिरपूरसह सांजापूर, जीतापूर, ब्रह्मी, टीपटाळा, शिरताळा, टाकवाडा व गुंजवाडा येथील हजारो भाविक या संमेलनात सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर वानखडे यांनी केले. सुबोध बापट यांनी वंदे मातरम्चे गायन केले, तर मंगेश अंबाडेकर यांनी भारत मातेची आरती केली. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी उल्हास गुल्हाने, विक्की पांडे, उमेश बुधेकर, सागर अवलक, अंकुश तरोने, अभि डवंगे, सूरज गुप्ता, गंप्पू गुप्ता, प्रवीण धामणे, रोशन हेमने, अंकुश राऊत आणि शुभम गावंडे यांच्यासह स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. हिरपूरमध्ये उमटलेला हा हिंदूंच्या एकीचा हुंकार सध्या संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे.

# निंबा फाटा येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**जानोरी मेळ, दि. ९ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान, नया अंदुरा (निंबा फाटा) येथे ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मेजर दिलीप सरदार व सर्व सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला माता रमाई, माता जिजाऊ आणि माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन पत्रकार देवराव परघरमोर, गणेश वानखडे आणि सरदार यांनी केले. त्यानंतर उपस्थितांनी प्रतिमांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष मेजर दिलीप सरदार यांनी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकला. युवा प्रवक्ते गुड्डू तायडे (अंदुरा) यांनी महिलांच्या अधिकारांवर मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या अधिकारांमुळेच आज महिला राष्ट्रपती, मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी आणि पायलट यांसारख्या उच्च पदांवर कार्यरत आहेत, असे त्यांनी नमूद केले. महिलांनी या अधिकारांचा लाभ घेऊन प्रगती करावी, असे आवाहनही त्यांनी केले.या कार्यक्रमाला साहेबराव सरदार यांनी अध्यक्षस्थान भूषविले. यावेळी शशी दामोदर, गणेश वानखडे, देवमन वानखडे, विनोद घ्यारे, रवी तायडे, सारंगधर घ्यारे, देवराव परघरमोर, पुरुषोत्तम घ्यारे, जीवन परघरमोर, जानोजी दामोदर, प्रशांत पातोंड व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन मेजर दिलीप सरदार यांनी केले, तर आभार प्रदर्शन गुड्डू तायडे यांनी केले.

# सस्ती येथील विकासकामांचे भूमिपूजन

## मंदिरांसह शेतकरी भवनासाठी कोट्यवधींचा निधी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**सुकळी, दि. ९ :** पातूर पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या सस्ती ग्रामपंचायत क्षेत्रात विविध विकासकामांचे भूमिपूजन रविवारी, ८ मार्च रोजी करण्यात आले. शिवसेना उपनेते तथा आमदार नितीन देशमुख यांच्या हस्ते ही कामे मार्गी लावण्यात आली असून, यामध्ये राम मंदिर, हनुमान मंदिर आणि वंदनीय बाळासाहेब ठाकरे शेतकरी भवनाचा समावेश आहे. या विकासकामांसाठी कोट्यवधींचा निधी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

गावातील धार्मिक स्थळांच्या विकासासाठी ग्रामस्थांकडून मागणी होत होती. त्यानुसार, हनुमान मंदिराच्या बांधकामासाठी ५० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच राम मंदिराच्या कामासाठी आवश्यकतेनुसार अमर्यादित निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा आमदार देशमुख यांनी केली. यावेळी दोन्ही मंदिरांच्या कामाचे विधीवत भूमिपूजन करण्यात आले.

शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी गावात वंदनीय बाळासाहेब ठाकरे शेतकरी भवन उभारले जात आहे. यासाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या भवनाचा उपयोग भविष्यात धान्य साठवणूक, शेतकरी मेळावे आणि तांत्रिक मार्गदर्शनासाठी करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची साठवणुकीची अडचण दूर होण्यास यामुळे मदत होणार असल्याचे सांगण्यात आले.

विकासकामांच्या या भूमिपूजन सोहळ्याला सस्ती परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी गावातील प्रमुख मार्गांवरून मिरवणूक काढण्यात आली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली कामे आता प्रत्यक्ष सुरू होत असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.



### मंजूर कामांचा तपशील


| कामाचे स्वरूप | मंजूर निधी | अपेक्षित फायदा |
|---|---|---|
| हनुमान मंदिर | ५० लक्ष रुपये | मंदिराचा जीर्णोद्धार व सुशोभीकरण |
| राम मंदिर | आवश्यकतेनुसार (अमर्यादित) | भव्य मंदिर उभारणी । |
| शेतकरी भवन | २ कोटी रुपये | धान्य साठवणूक व शेतकरी सभांसाठी हक्काची जागा । |

## चाहूल उन्हाळ्याची | कुंभार व्यवसायाला मिळाली नवसंजीवनी

# मंगरूळपीरच्या बाजारपेठेत मातीचे माठ अन् डेरे दाखल

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरूळपीर, दि. ९ :** मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच सूर्याने आग ओकण्यास सुरुवात केल्याने अंगाची लाहीलाही होत आहे. वाढत्या उन्हामुळे थंड पाण्यासाठी नागरिकांची पावले आता मातीच्या माठांकडे वळू लागली आहेत. गरीबांचा फ्रिज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पारंपरिक माठ आणि डेऱ्यांना ग्रामीण भागासह शहरी भागातही मोठी मागणी वाढली असून, बाजारपेठेत सध्या मातीची ही नैसर्गिक साधने भाव खाऊन जात आहेत.



गेल्या काही वर्षांत घरोघरी इलेक्ट्रॉनिक फ्रिज पोहोचले असले, तरी वाढती वीजबिलं, वारंवार होणारी लोडशेडिंग आणि आरोग्याप्रती असलेली जागरूकता यामुळे अनेक कुटुंबांनी पुन्हा माठाचा पर्याय स्वीकारला आहे. मातीच्या भांड्यातील पाणी नैसर्गिकरीत्या थंड होत असल्याने ते आरोग्यासाठी अत्यंत हितकारक मानले जाते. फ्रीजमधील अतिथंड पाण्यामुळे घसा दुखी किंवा इतर आजार बळावण्याची शक्यता असते, मात्र माठातील पाणी नैसर्गिकरीत्या थंड आणि चविष्ट असल्याने नागरिक या पारंपरिक पर्यायाला पसंती देत आहेत.

मंगरूळपीर येथील स्थानिक कुंभार व्यावसायिकांनी सांगितले की, यावर्षी मार्चच्या पहिल्या आठवड्यापासूनच माठ व डेऱ्यांची विचारणा सुरू झाली आहे. सामान्यतः एप्रिल-मे महिन्यात होणारी विक्री यावर्षी लवकर सुरू झाल्याने कुंभार व्यवसायाला नवसंजीवनी मिळाली आहे. सध्या बाजारात आकर्षक आकाराचे माठ ३०० ते ८०० रुपयांपर्यंत, तर छोटे डेरे १५० ते ४०० रुपयांपर्यंत विकले जात आहेत. विशेषतः शेतावर काम करणारे मजूर आणि मध्यमवर्गीय कुटुंबांमध्ये माठाला मोठी मागणी आहे.

पर्यावरणतज्ज्ञांच्या मते, मातीचे माठ हे केवळ पाणी थंड ठेवण्याचे साधन नसून ते ऊर्जा बचतीस हातभार लावणारे माध्यम आहे. विजेचा वापर न करता नैसर्गिक बाष्पीभवनाद्वारे पाणी थंड ठेवण्याची ही पद्धत कार्बन उत्सर्जनात घट करण्यास मदत करते. प्लास्टिकच्या बाटल्यांच्या वाढत्या वापराला फाटा देऊन नागरिक आता मातीच्या रांजणाकडे वळत असल्याचे समाधानकारक चित्र ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे. एकूणच, वाढत्या तापमानामुळे मातीच्या माठांनी पुन्हा एकदा घराघरांत आपले हक्काचे स्थान मिळवले आहे.

# कार्ला येथे वन्यप्राण्याच्या हल्ल्यात गोऱ्हा ठार; परिसरात बिबट्याची दहशत

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**आलेगाव, दि. ९ :** आलेगाव परिसरातील कार्ला येथे गावालगत असलेल्या शेतात वन्यप्राण्याने (बिबट्या असल्याचा प्राथमिक अंदाज) गोठ्यात बांधलेल्या एका मोठ्या गोऱ्ह्यावर हल्ला करून त्याला जागीच ठार केले. ही घटना सोमवारी पहाटे ५ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. या घटनेमुळे शेतकरी रामचंद्र तुळशीराम तायडे यांचे हजारो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असून, परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रामचंद्र तायडे यांची कार्ला गावाजवळ ३ एकर शेती असून, तेथे सध्या गव्हाचे पीक उभे आहे. शेतातील वाड्यानजीक त्यांनी सात ते आठ जनावरे बांधली होती. सोमवारी पहाटेच्या सुमारास बिबट्या सदृश प्राण्याने या पशुधनावर झडप घातल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे. पहाटे चारापाणी करण्यासाठी तायडे शेतात गेले असता, त्यांना गोऱ्हा मृतावस्थेत आढळला. शिकार केल्यानंतर त्याला गव्हाच्या पिकातून ओढत नेल्याच्या खुणा दिसून आल्याने ग्रामस्थांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे. या घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते उमेश तायडे



यांच्यासह ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. माहिती मिळताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन प्राथमिक पंचनामा पूर्ण केला आहे. सततच्या अस्मानी-सुलतानी संकटांनी खचलेल्या शेतकऱ्यावर या घटनेमुळे मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. वनविभागाने पीडित शेतकऱ्याला तातडीने योग्य ती नुकसान भरपाई द्यावी आणि वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करून ग्रामस्थांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली जात आहे. वन्यप्राण्याच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मोठा गोऱ्हा ठार झाल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. वनविभागाने या घटनेचा अधिकृत पंचनामा करून पीडित शेतकऱ्याला तातडीने शासकीय मदत मिळवून द्यावी आणि या भागात वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पिंजरा लावण्यासह आवश्यक उपाययोजना कराव्यात, जेणेकरून भविष्यातील जीवितहानी टाळता येईल.

## महत्त्वाचे

### वादात मध्यस्थी करणे पडले महागात; महिलेला धमकी

**मंगरूळपीर :** दोन व्यक्तींच्या वादात मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या एका महिलेला अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा प्रकार चिखली येथे घडला. याप्रकरणी ताई तेलगोटे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी वसंता चतुर, अजय गावंडे आणि दीपक गावंडे या तिघांविरुद्ध ६ मार्च रोजी गुन्हा दाखल केला आहे.

### पाणी कपातीचा फटका: अडोळ प्रकल्पातील सिंचन बंद

**मालेगाव :** वाढत्या उन्हामुळे अडोळ प्रकल्पातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याने प्रशासनाने सिंचनासाठीचा पाणी उपसा तात्पुरता थांबवला आहे. शिरपूर, रिसोड, रिठदसह मोठ्या गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटावा, यासाठी हा निर्णय घेण्यात आला असला तरी, याचा मोठा फटका रब्बी पिकांना बसणार आहे. सध्या काढणीवर आलेल्या गहू आणि कांदा पिकाला पाण्याची नितांत गरज असताना सिंचन बंद झाल्याने बोराळा, ढोरखेडा, ताकतोडा, वाघी, खंडाळा आणि शेलगाव येथील शेतकरी संकटात सापडले आहेत.

### विहिरीत पडलेल्या सायाळाला जीवदान

**मंगरूळपीर :** मानोरा रोड परिसरातील खोडके यांच्या विहिरीत पडलेल्या एका ३ फूट लांबीच्या सायाळ (पोर्क्युपाइन) या वन्यजीवाला जीवदान देण्यात आले. शनिवारी दुपारी ही घटना निदर्शनास येताच वाइल्ड लाइफ कन्झर्वेशन टीम आणि निसर्ग स्पर्श फाउंडेशनच्या सुबोध साठे, गणेश जामनिक व शंकर राठोड यांनी तातडीने बचाव कार्य राबवले. कोणतीही इजा न होता सायाळाला सुरक्षित बाहेर काढून वनपरिक्षेत्रातील नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले.

### बिअरच्या बाटलीने गळ्यावर वार

**मंगरूळपीर :** क्रिकेट सामना पाहून परतणाऱ्या युवकावर बिअरच्या फुटलेल्या बाटलीने जीवघेणा हल्ला केल्याची घटना ५ मार्चच्या रात्री पंचशील नगर परिसरात घडली. चंद्रशेखर बुरे यांच्या तक्रारीनुसार, ते चहा पिण्यासाठी थांबले असताना आरोपी विराज हिवरकर याने विनाकारण शिवीगाळ करत त्यांच्या गळ्यावर फुटलेल्या बाटलीने वार केले. तसेच मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी मंगरूळपीर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# महिला ठाणेदारांच्या काळातही लेकीचा शोध लागेना!

## आमदार सई डहाके यांनी पोलीस प्रशासनाचे टोचले कान

। संजय अलदर ।

**मानोरा, दि. ९ : ज्या तालुक्याचा पोलीस दलाचा कणा एक महिला अधिकारी सांभाळत आहेत, त्याच तालुक्यातून ३१ मुली बेपत्ता होणे, ही बाब केवळ चिंताजनक नाही तर पोलीस प्रशासनासाठी मान खाली घालणारी आहे.'' अशा जळजळीत शब्दांत आमदार सई डहाके यांनी विठोली येथील नारी शक्ती सन्मान या ८ मार्च रोजी पार पडलेल्या सोहळ्यात पोलिस प्रशासनाचे वाभाडे काढले. कारंजा आणि मानोरा तालुक्यातून तब्बल ३१ मुली बेपत्ता असून, त्यापैकी केवळ ४ मुलींचा शोध लागला आहे. उर्वरित २७ मुली कुठे आहेत? हा प्रश्न आता पालकांच्या काळजात धडकी भरवणारा ठरत आहे.**




मानोरा पोलीस ठाण्याची धुरा सध्या महिला ठाणेदार नयना पोहेकर यांच्या खांद्यावर आहे. एका महिला अधिकाऱ्याकडे तालुक्याचे नेतृत्व असताना, बेपत्ता मुलींच्या तक्रारींकडे अधिक संवेदनशीलतेने आणि तत्परतेने पाहिले जाईल, अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरिकांना होती. मात्र, ३१ मुलींचा हा आकडा समोर आल्यानंतर, ''महिला ठाणेदारांच्या काळातच जर लेकीबाळी सुरक्षित नसतील, तर दाद मागायची कोणाकडे?'' असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. ८ मार्चच्या महिला दिन सोहळ्यात कौतुकाचे शब्द ऐकण्याऐवजी, पोलीस प्रशासनाला या जळजळीत वास्तवाचा सामना करावा लागला.



❑ महिला पोलीस अधिकारी असतानाही जर मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येत असेल, तर ही प्रशासकीय उदासीनतेची पराकाष्ठा आहे. नयना पोहेकर यांनी आपली खाकीची ताकद बेपत्ता मुलींच्या शोधासाठी वापरावी, हीच खरी महिला दिनाची भेट ठरेल.

**- आमदार सईताई डहाके**
कारंजा मानोरा मतदार संघ

### केवळ नारी शक्तीचे गोडवे नको, सुरक्षा द्या!

विठोली येथील पी. एम. श्री जिल्हा परिषद शाळेच्या कार्यक्रमात बोलताना आमदार डहाके यांनी पोलीस निरीक्षक नयना पोहेकर यांच्या उपस्थितीतच प्रशासनावर तोफ डागली. त्या म्हणाल्या की, व्यासपीठावर बसून महिला सक्षमीकरणाच्या गप्पा मारणे सोपे आहे, पण प्रत्यक्षात जेव्हा ३१ मुली गायब होतात, तेव्हा त्या कुटुंबांवर काय आभाळ कोसळते, याची जाणीव प्रशासनाला आहे का? केवळ ४ मुलींचा शोध लागणे, हे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. या कार्यक्रमाला तहसीलदार राजेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक नयना पोहेकर, गटविकास अधिकारी विलास जाधव, गटशिक्षणाधिकारी अनिल पवार यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात शाळेच्या वतीने घेण्यात आलेल्या रांगोळी, वक्तृत्व आणि एकांकिका स्पर्धेतील विजेत्यांना गौरवण्यात आले. मात्र, संपूर्ण सोहळ्यावर बेपत्ता मुलींच्या गंभीर प्रश्नाचे सावट कायम होते.

बेपत्ता मुलींच्या या प्रकरणाने तालुक्यातील सामाजिक सुरक्षेचे धिंडवडे काढले आहेत. पोलीस प्रशासनाने आता कागदी घोडे नाचवणे बंद करून, या प्रकरणाचा मुळापासून तपास करण्याची गरज आहे. महिला ठाणेदारांनी या विषयात स्वतः जातीने लक्ष घालून, विशेष पथके तैनात करावीत आणि गायब झालेल्या प्रत्येक मुलीचा शोध घ्यावा, अशी मागणी आमदार डहाके यांनी केली. पालकांनीही आपल्या पाल्यांच्या बाबतीत अधिक सतर्क राहून, समाजकंटकांपासून सावध राहण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी आहार आणि पूरक उपचार पद्धतीवर चर्चासत्र

### उपचार पद्धतीवर चर्चासत्र जनसेवा फाउंडेशन आणि ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेचा उपक्रम; तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ९ :** वाढत्या वयात आरोग्याची काळजी घेताना आहार आणि मानसिक स्वास्थ्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हेच ओळखून जनसेवा फाउंडेशन, पुणे आणि ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (८ मार्च) एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. शिवाजीनगर येथील राजकुमार बोनकिले यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या या कार्यक्रमात आहारशास्त्र, ॲक्युप्रेशर आणि म्युझिक थेरपी या विषयांवर तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले.




कार्यक्रमाचे उद्घाटन वाशिम नगर परिषदेचे माजी स्थायी समिती सभापती अनिल ताजणे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी महादेव आप्पा काष्टे होते. पहिल्या सत्रात आहार आणि पोषण या विषयावर डॉ. पूजा निलेश राठी आणि डॉ. सदानंद धामणकर यांनी संवाद साधला. ज्येष्ठांनी पचनशक्तीनुसार आहार कसा घ्यावा आणि घरगुती पदार्थांतून पोषण कसे मिळवावे, याचे उपयुक्त दाखले त्यांनी दिले. दुसऱ्या सत्रात डॉ. सत्यनारायण बाहेती (अध्यक्ष, अकोला जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन) आणि डॉ. नेहा माळेकर यांनी ॲक्युप्रेशर, ॲक्युपंक्चर आणि म्युझिक थेरपी या आधुनिक उपचार पद्धतींची माहिती दिली. संगीताचा मनावर होणारा सकारात्मक परिणाम आणि व्याधीमुक्तीसाठी निसर्गोपचाराचे महत्त्व यावेळी विशद करण्यात आले. यावेळी जनसेवा फाउंडेशनचे कार्यक्रम अधिकारी जयवंत मंत्री आणि गोविंद सिंग पाटील यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेत ज्येष्ठांना मार्गदर्शन केले. चर्चासत्राला डॉ. नागोराव थोरात, रामेश्वर वाघ, नथुजी बुंदे, तुकारामआप्पा बुकसेटवार, गजानन बोलवार, शेळके, मगर, मार्गे, राठोड, सुरोशे आणि इंगोले यांसह अनेक ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि संचालन राजकुमार बोनकिले यांनी केले, तर आभारप्रदर्शन रामकृष्ण आप्पा धंतुरे यांनी केले.

# जागतिक महिला दिनानिमित्त एनसीसी कॅडेट्सकडून पोस्टर स्पर्धा

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ९ :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून स्थानिक श्री बाकलीवाल विद्यालयाच्या एनसीसी कॅडेट्सकडून पोस्टर स्पर्धा ८ मार्च रोजी पार पडली . या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी भारतीय महिलांच्या शौर्याचा, कर्तृत्वाचा आणि सन्मानाचा जागर आपल्या कलाकृतींतून प्रभावीपणे साकारला.



या स्पर्धेत सहभागी झालेल्या ५६ विद्यार्थ्यांनी आपल्या पोस्टर्समधून भारतीय महिलांचा गौरवशाली इतिहास तसेच वर्तमानातील प्रगतीशील वाटचाल चित्ररूपात मांडली. माँ जिजाऊ, झाशीची राणी लक्ष्मीबाई, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांसारख्या थोर व्यक्तिमत्त्वांसह माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील तसेच विद्यमान राष्ट्रपती यांच्या कार्याला विद्यार्थ्यांनी आपल्या चित्रांमधून सलाम केला. इतिहासाबरोबरच आधुनिक काळातील डॉक्टर, इंजिनिअर, क्रिकेटपटू, वैज्ञानिक तसेच भूदल, नौदल आणि हवाई दलात देशसेवा करणाऱ्या महिलांची प्रेरणादायी कामगिरीही विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे रेखाटली. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला असून प्रथम क्रमांक सेजल सरनाईक, द्वितीय क्रमांक अनुजा काकडे आणि तृतीय क्रमांक गौरी कानकटाव यांनी पटकावला. विजेत्या विद्यार्थिनींना लवकरच विशेष बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे मुख्याध्यापक बबनराव बिल्लारी, उपमुख्याध्यापक दंभीवाल, एनसीसी अधिकारी अमोल काळे तसेच सर्व शिक्षकवृंदांनी विशेष कौतुक केले.

# जलताराचे खड्डे भरले, पण शेतकऱ्यांचे खिसे रिकामेच

## आशेचा खड्डा अन निराशेचा धडा: जिल्हाधिकारी लक्ष देतील काय?

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ९ :** जमिनीची तहान भागवण्यासाठी आणि भूगर्भातील जलसाठा वाढवण्यासाठी तत्कालीन जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी जिल्ह्यात जलतारा ही महत्त्वकांक्षी मोहीम राबवली. प्रशासनाच्या एका आवाहनावर विश्वास ठेवून मानोरा तालुक्यातील साखर डोह आणि परिसरातील शेतकऱ्यांनी स्वतःच्या रक्ताचे पाणी करून शेतात जलताराचे खड्डे खोदले. मात्र, आज आठ महिने उलटूनही हक्काच्या घामाचा पैसा खात्यात जमा न झाल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले आहे. शासनाच्या या उदासिनतेमुळे ''कष्ट आमचे आणि मस्टर कुणाचे?'' असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.

विहिरीची पाणी पातळी वाढेल, बोरवेलला पाणी येईल आणि उन्हाळ्यातही आपली पिके डोलतील, या आशेने शेतकऱ्यांनी ४ बाय ४ आकाराचे खड्डे खोदले. त्यात दगड-गोटे भरले. एका खड्ड्यासाठी ४ हजार ५०० रुपये मिळतील, या आशेवर शेतकऱ्यांनी पदरमोड करून, प्रसंगी उसनवारी करून ही कामे पूर्ण केली. चार एकरात चार खड्डे घेणाऱ्या शेतकऱ्याला १८ हजार रुपयांचे स्वप्न दाखवण्यात आले होते. सुरुवातीच्या दीड महिन्यात काही नशीबवान शेतकऱ्यांच्या पदरात मस्टरचे पैसे पडले, पण त्यानंतर मात्र प्रशासकीय यंत्रणेला जणू ग्रहण लागले आहे. साखर डोह परिसरातील शेकडो शेतकरी आज केवळ बँकेच्या फेऱ्या मारत आहेत.

❑ शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे, पण आज त्यालाच स्वतःच्या हक्काच्या पैशासाठी प्रशासनासमोर हात पसरण्याची वेळ आली आहे. ही लोकशाहीसाठी लाजिरवाणी बाब आहे. जर आठ दिवसांत आमचे पैसे मिळाले नाहीत, तर तहसील कार्यालयासमोर ठिय्या मांडण्याशिवाय आमच्याकडे पर्याय उरणार नाही.

**- एक त्रस्त शेतकरी, साखर डोह**

शेतकरी आधीच निसर्गाच्या लहरीपणाने होरपळलेला आहे. कधी अतिवृष्टी तर कधी कोरडा दुष्काळ त्याचा पिच्छा सोडत नाही. अशातच जलतारा सारख्या योजनांमधून मदतीचा हात मिळण्याऐवजी केवळ आश्वासनांचीच गाजरे दाखवली जात आहेत. ''आम्ही प्रशासनावर विश्वास ठेवला, अधिकाऱ्यांनी गावागावात येऊन बैठका घेतल्या, पण आता मस्टरच्या वेळी हेच अधिकारी तोंड लपवत आहेत,'' अशी संतप्त प्रतिक्रिया साखर डोह येथील शेतकऱ्यांनी दिली आहे. मस्टरसाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक मान्यता आणि देयके कृषी विभाग व तहसील कार्यालयात का रखडली आहेत, याचे उत्तर देण्यास कोणीही तयार नाही. खिशात पैसा नसल्यामुळे आगामी मशागतीची कामे कशी करावीत, हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा आहे. मानोरा तालुका कृषी अधिकारी आणि तहसीलदार यांनी या प्रकरणी वैयक्तिक लक्ष घालून संबंधित कर्मचाऱ्यांना डेडलाईन द्यावी आणि मस्टरच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ रक्कम जमा करावी, अशी आर्त मागणी केली जात आहे.

# उमरी बुद्रुक येथे छत्रपती शिवाजी महाराज राजस्व शिबिर उत्साहात संपन्न




**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ९ :** शासकीय योजनांचा लाभ थेट जनतेच्या दारापर्यंत पोहोचवण्यासाठी महसूल विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान अंतर्गत उमरी बुद्रुक येथे भव्य समाधान शिबिराचे उद्घाटन ७ मार्च रोजी मोठ्या थाटात संपन्न झाले. या शिबिराच्या माध्यमातून महसूल, कृषी आणि आरोग्य विभागाशी संबंधित नागरिकांच्या तक्रारींचे जागेवरच निराकरण करण्यात येऊन त्यांना दिलासा देण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी आकाश वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार राजेंद्र पाटील, माजी आमदार अनंतकुमार पाटील, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबूसिंग नाईक, तालुका कृषी अधिकारी रोशन भागवत, वैद्यकीय अधिकारी डॉ. ललित हेडा, नायब तहसीलदार मधुकर अस्टुरे, माजी पंचायत समिती सदस्य विजय पाटील, अशोक चव्हाण, मुख्याध्यापक प्रसेन भगत, योगा शिक्षिका अर्चना राऊत, प्रेस क्लबचे अध्यक्ष उपेंद्र पाटील, सचिव माणिक डेरे आणि सह कोषाध्यक्ष संजय अलदर यांची उपस्थिती होती. याप्रसंगी वसंतराव नाईक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित हृदयस्पर्शी प्रबोधनात्मक नाटिका सादर केली. तसेच संत वामन महाराज इंग्रजी शाळेच्या विद्यार्थ्यांनी योगा नृत्याद्वारे उपस्थितांची मने जिंकली. या सांस्कृतिक सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक वारसा आणि आरोग्याचे महत्त्व विशद केले. तहसीलदार राजेंद्र पाटील यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात या अभियानाचा मुख्य उद्देश स्पष्ट केला. ''शासकीय कार्यालयात चकरा मारण्याऐवजी अधिकाऱ्यांनी गावागावात येऊन लोकांच्या समस्या सोडवणे हेच या अभियानाचे यश आहे,'' असे त्यांनी नमूद केले. त्यानंतर बाबूसिंग नाईक, अनंतकुमार पाटील आणि उपेंद्र पाटील यांनी आपल्या मनोगतातून या उपक्रमाचे कौतुक केले. अध्यक्षीय भाषणात उपविभागीय अधिकारी आकाश वर्मा यांनी ग्वाही दिली की, ''महसूल विभागाने आयोजित केलेल्या या समाधान शिबिराचा उद्देश केवळ कागदोपत्री नसून, प्रत्यक्ष जागेवरच नागरिकांच्या समस्या सोडवून त्यांचे शंभर टक्के समाधान करणे हा आहे. या शिबिरात ई-पीक पाहणी, फेरफार अदालत, किसान सन्मान निधी आणि नवीन रेशन कार्ड वितरण प्रक्रिया यावर तज्ज्ञांनी सविस्तर माहिती दिली. आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य जनजागृती करण्यात आली. अनेक पात्र लाभार्थ्यांना यावेळी लाभाचे आदेश आणि प्रमाणपत्रांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. महसूल, कृषी, आरोग्य आणि पंचायत समितीच्या वतीने लावण्यात आलेल्या विविध स्टॉलवर नागरिकांनी आपल्या अडचणी मांडल्या, ज्यांचे तातडीने निराकरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माणिक डेरे यांनी केले, तर उपस्थित सर्वांचे आभार महसूल अधिकारी संदीप आडे यांनी मानले.

## मास्टर ब्लास्टर कामगिरी | आळंदी ते मुंबई व्हाया काशी-वृंदावन

# तेंडुलकर कुटुंबाच्या शुभविवाहात उमटला इंझोरीच्या संस्कारांचा ठसा

। नरेश आसावा ।

**इंझोरी, दि. ९ :** आपल्या मातीतील कर्तृत्व जेव्हा आकाशाला गवसणी घालते, तेव्हा अख्ख्या गावचा ऊर अभिमानाने भरून येतो. वाशिम जिल्ह्यातील इंझोरी गावच्या शिरपेचात असाच एक सुवर्णतुरा रोवला गेला आहे. गावचे सुपुत्र आणि प्रकांड पंडित उदय महाराज जोशी यांनी जागतिक कीर्तीचे महान क्रिकेटपटू, भारतरत्न सचिन तेंडुलकर यांचे चिरंजीव अर्जुन तेंडुलकर यांचा शुभविवाह सोहळा आपल्या मंत्रघोषाने संपन्न केला. एका सामान्य ग्रामीण पार्श्वभूमीतून येत, क्रिकेटच्या देवदूताच्या घरात आपल्या विद्वत्तेचा ठसा उमटवणाऱ्या उदय महाराजांचे कौतुक आता सर्वत्र होत आहे.

उदय महाराज जोशी यांचा हा प्रवास निव्वळ योगायोग नसून, तो कठोर तपश्चर्या आणि जिद्दीचा परिपाक आहे.



इंझोरी येथील आदर्श, मनमिळावू आणि गरिबांची जाण असणारे दानशूर व्यक्तिमत्व प्रकाश महाराज जोशी यांचे ते चिरंजीव. कोणत्याही मोठ्या मार्गदर्शनाशिवाय किंवा वारशाशिवाय, उदय महाराजांनी आळंदी, काशी आणि वृंदावन सारख्या पवित्र ज्ञानपीठांमध्ये वेदाध्ययन पूर्ण केले. स्वप्नगरी मुंबईत पाय ठेवल्यानंतर, सुरुवातीला संघर्षाचे डोंगर पार करत त्यांनी हळूहळू आपली पकड मजबूत केली. आज मुंबईतील बड्या सेलिब्रिटींच्या आणि नामवंत व्यक्तींच्या घरचे धार्मिक विधी उदय महाराजांच्या मार्गदर्शनाखाली पार पडतात, हे संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे.

### गावासाठी सुवर्णक्षण

एका छोट्याशा इंझोरी गावातून गेलेला तरुण आज देशातील सर्वात प्रतिष्ठित तेंडुलकर कुटुंबाचा पुरोहित होतो, ही बाब सामान्य नाही. अर्जुन तेंडुलकर यांच्या विवाह सोहळ्यात त्यांनी ज्या तन्मयतेने आणि शास्त्रोक्त पद्धतीने पौरोहित्य केले, त्याचे कौतुक तेंडुलकर कुटुंबानेही केले. आपल्या कर्तृत्वाने गावचे नाव उज्ज्वल करणाऱ्या उदय महाराज जोशी यांच्यावर सध्या अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील अनेक तरुणांना नवी प्रेरणा मिळाली आहे.

संस्कारांची शिदोरी आणि माता-पित्यांचे कष्ट

उदय महाराजांच्या या उत्तुंग यशामागे त्यांचे वडील प्रकाश महाराज आणि त्यांच्या मातोश्रींचे अपार कष्ट अन् आशीर्वाद आहेत. अतिशय प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपल्या मुलाला घडवले आणि उच्च संस्कार दिले. म्हणूनच जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे ''आपुलीया हिता जो असे जागता। धन्य माता पिता तयांचीया।
कुळी कन्यापुत्र होती जे सात्विक। तयांचा हरीक वाटे देवा।।''

असा सात्विक आणि विद्वान पुत्र जन्माला आल्याचा आनंद आज केवळ त्यांच्या कुटुंबालाच नाही, तर संपूर्ण गावाला होत आहे. भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्यासारख्या महान व्यक्तिमत्वाच्या घरी गावची संस्कृती आणि वेदमंत्रांचा गजर पोहोचवण्याचे काम उदय महाराजांनी केले आहे.

अजिंक्य भारत

आपलं अकोला/वाशिम

अकोला, मंगळवार, दि. १० मार्च २०२६ www.ajinkyabharat.com



# इंझोरीत आरोग्य प्रशासनाची धाव; गोवर-कांजण्यांच्या संशयितांवर उपचार

## आरोग्य पथकाकडून गृहभेटी अन् सर्वेक्षण; संसर्ग रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



अजिंक्य भारत इम्पॅक्ट

**इंझोरी, दि. ९ :** मानोरा तालुक्यातील इंझोरी परिसरात गोवर आणि कांजण्या सदृश आजाराने डोके वर काढल्याचे वृत्त दैनिक अजिंक्य भारत मध्ये ९ मार्च रोजी प्रसिद्ध होताच, आरोग्य प्रशासन खडबडून जागे झाले आहे. या वृत्ताची गंभीर दखल घेत जिल्हा आरोग्य विभागाने सोमवारी दुपारी ४ वाजता तातडीने विशेष आरोग्य पथक इंझोरी गावात पाठवले. प्रशासनाच्या या जलद कार्यवाहीमुळे संशयित रुग्णांना वेळेवर उपचार मिळाले असून, संपूर्ण गावात आरोग्य तपासणीची मोहीम राबवण्यात आली आहे.

इंझोरी आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून लहान मुलांमध्ये ताप आणि अंगावर पुरळ येण्याचे प्रमाण वाढले होते. याकडे स्थानिक पातळीवर दुर्लक्ष होत असताना दैनिक अजिंक्य भारतने या संकटाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. वृत्त प्रसिद्ध होताच प्राथमिक आरोग्य केंद्र, कुपटा अंतर्गत येणाऱ्या इंझोरी उपकेंद्रात हालचाली गतीमान झाल्या. जिल्हा आरोग्य अधिकारी आणि तालुका आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञांचे पथक गावात दाखल झाले.

या पथकाने केवळ दवाखान्यात न थांबता, प्रत्यक्ष बाधित कुटुंबांच्या भेटी घेतल्या. गोवर आणि कांजण्यांची लक्षणे असणाऱ्या प्रत्येक संशयित रुग्णाची वैद्यकीय तपासणी करून त्यांना जागेवरच औषधोपचार उपलब्ध करून देण्यात आले. या मोहिमेत मानोरा तालुक्याचे समन्वयक डॉ. धीरज राठोड , कीटकशास्त्रज्ञ , कु. स्मितल गिरी, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. नितल जाधव, आरोग्य निरीक्षक उमेश सुर्वे, आरोग्य सेवक गणेश धोटकर आणि आरोग्य सेविका शारदा वेळूकर यांचा समावेश होता. या पथकाला स्थानिक आशा स्वयंसेविका सुनीता राठोड आणि पुष्पा वानखडे यांनी मोलाचे सहकार्य केले. केवळ उपचार करून न थांबता, आरोग्य पथकाने ग्रामस्थांशी संवाद साधला. संसर्गजन्य आजार पसरू नये म्हणून घ्यावयाची काळजी, वैयक्तिक स्वच्छता आणि मुलांचे लसीकरण पूर्ण करण्याबाबत पालकांचे समुपदेशन केले. ''सध्या सर्व संशयित रुग्णांची प्रकृती स्थिर असून घाबरण्याचे कोणतेही कारण नाही. मात्र, लक्षणे दिसल्यास घरगुती उपचारांऐवजी त्वरित आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा,'' अशा सूचना डॉ. धीरज राठोड यांनी दिल्या.

**प्रशासनाने दाखवलेल्या या तत्परतेबद्दल इंझोरी ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. दैनिक अजिंक्य भारतने जनसामान्यांच्या आरोग्याचा प्रश्न लावून धरल्यामुळेच दुर्गम भागातील या समस्येला वाचा फुटली आणि प्रशासकीय यंत्रणा गावात पोहोचली, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. सद्यस्थितीत आरोग्य विभाग या परिसरावर बारीक लक्ष ठेवून असून, पुढील काही दिवस सर्वेक्षणाचे काम सुरू राहणार आहे.**

# अडगाव बु. येथे हरभऱ्याच्या गंजीला आग; हाता तोंडाशी आलेला घास हिरावला



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**दीड लाखांहून अधिक रकमेचे नुकसान**

**अडगाव बु., दि. ९ :** येथील अल्पभूधारक शेतकरी शशिकांत वैजीनाथ तंबारे यांच्या तीन एकर शेतातील हरभऱ्याच्या गंजीला आग लागून सोन्यासारख्या पिकाची राख झाल्याची धक्कादायक घटना ८ मार्चच्या रात्री घडली. या आगीत अंदाजे ३० पोते हरभरा जळून खाक झाला असून, शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

शेतकरी तंबारे यांनी यंदा मोठ्या आशेने तीन एकरात हरभऱ्याची लागवड केली होती. दिवस-रात्र कष्ट करून पीक काढणीला आल्यानंतर मळणीसाठी शेतात गंजी रचून ठेवली होती. मात्र, मळणी होऊन हाती पैसा येण्यापूर्वीच अज्ञात कारणाने ही आग लागली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून शेतकरी वर्ग भयभीत झाला आहे.

या प्रकरणी शशिकांत तंबारे यांनी हिवरखेड पोलीस स्टेशनला तक्रार दिली आहे. तीन एकरमधील अंदाजे ३० पोते हरभरा जळून १ लाख ७५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू केला आहे.

## महत्त्वाचे

### महिला दिनानिमित्त महिलांसाठी रोजगार मेळावा

**अकोला :** जिल्हा रोजगार मार्गदर्शन केंद्रातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी पं. दीनदयाळ उपाध्याय विशेष रोजगार मेळावा दि. १० मार्च रोजी सकाळी ११ वा. डॉ. आनंदीबाई जोशी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत होईल. त्यात पाच नामांकित कंपन्यांतर्फे १५४ पदांची भरती होणार आहे. दहावी, बारावी, एएनएम, जीएनएम उमेदवारांना संधी आहे. इच्छुकांनी मेळाव्यास कागदपत्रांसह उपस्थित राहावे. rojgar.mahaswayam.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : (०७२४) २४३३८४९ किंवा ९४२१४२५०६६.

### सामाजिक न्याय विभागातर्फे पुरस्कारासाठी अर्ज मागविले

**अकोला :** सामाजिक क्षेत्रात चांगले कार्य करणा-यांना सामाजिक न्याय विभागातर्फे विविध पुरस्कार दिले जातात. त्यासाठी इच्छूकांनी दि. १५ मार्चपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन सहायक आयुक्त एम. जी. वाठ यांनी केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार, शाहू फुले आंबेडकर पुरस्कार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार या ७ पुरस्कारांसाठी, तसेच २०२४-२५ व २५-२६ या कालावधीसाठी अर्ज मागविले आहेत. इच्छूकांनी अर्ज चार प्रतीत पोलीसांच्या चारित्र्य पडताळणी दाखल्यासह सहायक आयुक्त, समाजकल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, अकोला येथे पाठवावा.

### राजस्थानी दिनानिमित्त अकोल्यात १९ मार्चला राष्ट्रीय कवी संमेलन

**अकोला :** राजस्थानी सेवा संघाच्या वतीने गुढीपाडवा व राजस्थानी दिनानिमित्त गुरुवार, १९ मार्च रोजी सायंकाळी ६:३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृह येथे भव्य राष्ट्रीय हिंदी कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे.या संमेलनात मुंबईचे आशकरण अटल, कानपूरचे चंदन राय, भोपाळचे मदन मोहन समर आणि नागपूरचे मनीष वाजपेयी हे नामवंत कवी सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजस्थानी सेवा संघाचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, महामंत्री संजय खंडेलवाल यांच्यासह दीपक शर्मा, दीपक गोयनका, विजय तोष्णीवाल, विजय तिवारी, विनोद गोलेचा, दिलीप खत्री व विविध समाज बांधवांनी जय्यत तयारी केली आहे.

# यशाची सुरुवात कम्फर्ट झोनच्या पलीकडे- अदिती पोहरे

अजिंक्य भारत । प्रतिनिधी





**अकोट, दि. ९ :** येथील श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ''यशाची खरी सुरुवात ही कम्फर्ट झोनच्या पलीकडे असते, आपली क्षमता ओळखून मोठी स्वप्ने पहा, असे प्रेरणादायी विचार प्रमुख व्याख्यात्या अदिती देशमुख पोहरे यांनी मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनील पांडे होते. अदिती पोहरे यांनी मॅजिक आऊट ऑफ युअर कम्फर्ट झोन या विषयावर बोलताना यशासाठी धाडस आणि आत्मविश्वासाचे महत्त्व पटवून दिले. दुसऱ्या व्याख्यात्या कु. ऋतंबरा शिरीष धोत्रे यांनी स्ट्रेस अँड टाइम मॅनेजमेंटवर मार्गदर्शन करताना कामांना प्राधान्य देणे आणि आंतरमनातील शांतता राखण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी प्रास्ताविक डॉ. नूतनवर्षा देशमुख यांनी केले, तर डॉ. माणिक ढोरे यांनी स्वागतपर भाषण केले. कार्यशाळेला उपप्राचार्य डॉ. संजय कोल्हे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा. अश्विनी फोकमारे यांनी, तर आभार प्रदर्शन प्रा. भरत नागरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. संतोष पाटोळे, प्रा. उमर भाटी, प्रा. चंद्रशेखर लाडोळे, कु. वैष्णवी राऊत, प्रज्वल गिरनाळे, कर्मा सोलकर, सुनील खवले, संजय पुंडकर, किशोर लाधे आणि विकास पुंडकरे यांनी परिश्रम घेतले.

# अकोटमध्ये बैलजोडीसह ३.६५ लाखांचा मुद्देमाल जप्त

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अकोट, दि. ९ :** अकोट ग्रामीण पोलिसांनी ऑपरेशन प्रहार मोहिमेअंतर्गत गोवंशीय प्राण्यांची तस्करी करणाऱ्यावर मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत एक मालवाहू वाहन आणि दोन बैल असा एकूण ३,६५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

दिनांक ७ मार्च २०२६ रोजी अकोट ग्रामीण पोलीस कर्मचारी पेट्रोलिंग करत असताना त्यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, काही तस्कर अंजनगाव-अकोट मार्गे कत्तलीसाठी गोवंश घेऊन येणार आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी अकोट-अंजनगाव रोडवरील वाई फाट्यासमोर, पठार नाल्याजवळ नाकाबंदी केली.

नाकाबंदी दरम्यान अंजनगावकडून येणारे महिंद्रा सुप्रो कंपनीचे मालवाहू वाहन (क्रमांक एम एच २७ बी एक्स ८२५४) थांबवण्यात आले. वाहनाची झडती घेतली असता, त्यात ६५,००० रुपये किमतीचे दोन बैल अत्यंत निर्दयतेने कोंबलेले आढळले.

या प्रकरणी वाहन चालक शेख मुजाहीद शेख मजीद (वय २१, रा. आयडीया टॉवरजवळ, भालदारपुरा, अंजनगाव सुर्जी) याला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी ३,००,००० रुपयांचे वाहन आणि ६५,००० रुपयांचे गोवंश, असा एकूण ३.६५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीविरुद्ध अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, सहाय्यक पोलीस अधीक्षक निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे, पोहेकॉ उमेशचंद्र सोळंके, पोकॉ राजेश माळेकर आणि सुनील पाटील यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# मुंडगाव येथे सावित्रीच्या लेकीकडून जागतिक महिला दिन साजरा

## अकोट तालुक्यातील संत नगरीत महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; सत्कार सोहळा संपन्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मुंडगाव, दि. ९ :** अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथे सावित्रीच्या लेकी ग्रुपच्या वतीने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्थानिक संत बायजाबाई मंदिर परिसरात आयोजित या कार्यक्रमात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी गावातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामाजिक ऐक्याचे दर्शन घडविले. कार्यक्रमात सावित्रीच्या लेकी ग्रुपच्या संस्थापक अध्यक्षा पल्लवीताई हेमंत गणगणे (अकोट) यांनी स्त्री जीवनावर आधारित प्रभावी व्याख्यान दिले. महिलांनी स्वतःचे अस्तित्व निर्माण करून सक्षम व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. ग्रुपच्या संस्थापक सचिव राजश्रीताई बाळे यांनीही महिलांना मार्गदर्शन करताना त्यांच्या हक्क आणि कर्तव्यांची जाणीव करून दिली.

या सोहळ्यात कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये पल्लवीताई गणगणे, राजश्रीताई बाळे तसेच मुंडगाव येथील ज्योत्स्ना हेमंत कोकाटे (कृष्णा केबल्स अँड कंडक्टर्स) यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन मुंडगाव येथील सावित्रीच्या लेकी ग्रुपच्या अध्यक्षा दिपालीताई धनंजय वांगे, सचिव योगिताताई कमलकिशोर पिंपळे, उपाध्यक्ष भावना राहुल भिरडे व सर्व सदस्यांनी केले. याप्रसंगी परिसरातील असंख्य महिलांची उपस्थिती होती.

# मजुरांच्या हाताला काम की यंत्रांचा सुळसुळाट?

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बाळापूर, दि. ९ :** ग्रामीण भागातील बेरोजगारांच्या हाताला काम मिळावे आणि ग्रामीण पायाभूत सुविधांचा विकास व्हावा, या उदात्त हेतूने सुरू करण्यात आलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) मूळ उद्देशाला बाळापूर तालुक्यात हरताळ फासला जात असल्याचे चित्र आहे. योजनेची अंमलबजावणी आणि जमिनीवरील वास्तविकता यात मोठी तफावत निदर्शनास येत असून, मजुरांच्या जागी यंत्रांचा वापर करून केवळ कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण केली जात असल्याचा खळबळजनक आरोप होत आहे.

भारत सरकारचा हा महत्त्वापूर्ण उपक्रम ग्रामीण भागातील अल्पभूधारक आणि शेतमजुरांसाठी जीवनवाहिनी मानला जातो. मात्र, बाळापूर परिसरात सुरू असलेल्या कामांमध्ये पारदर्शकतेचा अभाव दिसून येत आहे. नियमानुसार रोहयोची कामे मजुरांच्या माध्यमातून होणे अनिवार्य असताना, प्रत्यक्षात मात्र अनेक ठिकाणी रात्रीच्या सुमारास गुपचूप मशिन्सच्या साहाय्याने कामे उरकली जात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. बांधाची कामे, जलसंधारण आणि रस्ते विकासाची कामे चंद्राच्या साक्षीने घाईगडबडीत उरकून केवळ बिलांसाठी मजुरांचा देखावा उभा केला जात असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. योजनेच्या निकषानुसार मजुरांची हजेरी, कामाची गुणवत्ता आणि प्रत्यक्ष सहभाग आवश्यक असतो. परंतु, संबंधित कंत्राटदार आणि यंत्रणेतील काही घटकांच्या कृपाशीर्वादाने ही सर्व प्रक्रिया कागदावरच मर्यादित राहत असल्याचे बोलले जाते. मजुरांच्या हक्काचा रोजगार हिरावून यंत्रांना प्राधान्य दिले जात असल्याने शासनाच्या निधीचा अपव्यय होत असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.

**या सर्व प्रकारामुळे ''रोजगार हमी योजनेतील पारदर्शकता कुठे हरवली?'' असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मजुरांच्या नावे बोगस मस्टर भरून शासनाच्या तिजोरीवर दरोडा टाकणाऱ्यांची झोळी भरली जात असून, गरीबांना मात्र वाऱ्यावर सोडले जात आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी.**

## गंभीर प्रश्न — कौलखेड चौकात अस्वच्छतेचा विळखा

# कचऱ्याचे ढीग; सार्वजनिक शौचालय नसल्याने नागरिक त्रस्त

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. ९ :** कौलखेड चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या मागे मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग साचत असून परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. महानगरपालिकेची घंटागाडी नियमित कचरा उचलत असली तरी काही स्थानिक दुकानदार तसेच भाजी-फळ विक्रेते पुन्हा त्याच ठिकाणी कचरा टाकत असल्याने या जागेचे अनधिकृत कचराकुंडीत रूपांतर झाले आहे. त्यामुळे चौकातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला असून नागरिकांत नाराजी व्यक्त होत आहे.

कौलखेड चौक हा अकोला शहरातील गजबजलेल्या चौकांपैकी एक असून या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा होत असते. मात्र चौक परिसरात कचरा टाकला जात असल्याने दुर्गंधी पसरत असून प्लास्टिक, भाजीपाला व इतर कचऱ्याचे ढीग साचलेले दिसून येतात. त्यामुळे नागरिकांना अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे.

याशिवाय चौक परिसरात भाजी व फळ विक्रेत्यांचे ठेले तसेच लहान दुकाने लावण्यात आल्याने अतिक्रमणाची समस्या वाढली आहे. आधीच रस्ता अरुंद असताना या अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून वाहनचालक व पादचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, चौक परिसरात सार्वजनिक शौचालयाची सुविधा नसल्याने रस्त्यालगत व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांना तसेच नागरिकांना मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे या ठिकाणी सार्वजनिक शौचालय उभारण्याची मागणीही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, चौकातील कचरा नियमितपणे उचलून परिसर स्वच्छ ठेवावा, अतिक्रमणावर कारवाई करावी तसेच सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

- चौकात दररोज कचरा साचतो आणि काही जण पुन्हा त्याच ठिकाणी कचरा टाकतात. त्यामुळे परिसर अस्वच्छ होतो. महानगरपालिकेने येथे कायमस्वरूपी उपाययोजना करावी.

  \- **आकाश तायडे,** स्थानिक नागरिक

- चौक परिसरात रोज मोठी वर्दळ असते, पण सार्वजनिक शौचालय नसल्याने आम्हा गाडी लावणाऱ्या विक्रेत्यांची अडचण होते.

  \- **नानाभाऊ वाघ,** पाणीपुरी विक्रेता, कौलखेड

# सावकलाल समाजाच्यावतीने महिला दिन उत्साहात साजरा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. ९ :** जागतिक महिला दिनानिमित्त सावकलाल समाज संघटनेच्या वतीने येथील आदर्श कॉलनीतील इच्छापूर्ती गणेश मंदिर परिसरात महिला दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रांत ठसा उमटवणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित वक्त्यांनी महिला सक्षमीकरणावर भर देत, समाजातील महिलांनी शिक्षण, व्यवसाय आणि सामाजिक क्षेत्रात हिरीरीने पुढे येऊन आपली प्रगती साधावी, असे आवाहन केले. आज महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपली क्षमता सिद्ध केली असून, समाजाच्या सर्वांगीण विकासात त्यांचे योगदान मोलाचे असल्याचेही यावेळी मान्यवरांनी नमूद केले.या सोहळ्याचे खास आकर्षण म्हणजे महिलांसाठी आयोजित विविध सांस्कृतिक उपक्रम आणि स्पर्धा. यामध्ये समाज बांधवांच्या महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सावकलाल समाज महिला संघटनेच्या अलका लोहकपुरे, सोनल लोहिकपुरे, प्रियंका बासोडे, स्नेहल लोहकपुरे, छाया कट्यारमल, अश्विनी पातूर्डे, प्रियंका लोहकपुरे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानून सांगता करण्यात आली.

## महत्त्वाचे

### पळशी सुपो संस्थानच्या अध्यक्षांना लोटपाट

**खामगाव :** सुपो महाराज संस्थानवर येवून भाविकभक्तांना तसेच संस्थानच्या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केल्याची घटना ८ मार्च रोजी सकाळी १० वाजता घडली. नितीन गोपाल कोकाटे रा. पळशी सुपो हा संस्थानवर येवून भाविकभक्तांना व संस्थानच्या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करीत होता. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी संस्थेचे अध्यक्ष अरुण वसंतराव देवकर यांना जावून सांगितले असता त्याांनी नितीन कोकाटे याला समजावून सांगण्यासाठी गेले असता नितीन कोकाटे याने त्यांना सुध्दा शिवीगाळ करुन लोटपाट केली तसेच लोखंडी पाईप डोक्यात मारण्याचा प्रयत केला असता तो अडवल्याने तो पाईप देवकर यांच्या हाताला लागला. संस्थानच्या कर्मचाऱ्यांनी भांडण सोडविले असता तेव्हा नितीन कोकाटे याने अरुण देवकर यांना म्हटले की एखाद्या दिवशी तुला जिवाने मारुन टाकू अशी पळशी सुपो संस्थानच्या धमकी दिली. अरुण देवकर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन जळगाव जामोद पोलिसांनी आरोपी नितीन कोकाटे विरुध्द कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (३) बीएनएस नुसार गुन्हा दाखल केला.

### महिलेचा विनयभंग; गुन्हा दखल

**खामगाव :** विहिरीवर पाणी भरण्यासाठी गेलेल्या २५ वर्षीय महिलेचा विनयभंग केल्याची घटना ८ मार्च रोजी तालुक्यातील गवंढाळा येथे घडली. २५ वर्षीय महिला सकाळी १०.३० वाजता गावातीलच एका विहिरीवर पाणी भरण्यास गेली होती. त्या ठिकाणी अनिकेत श्रीकृष्ण इंगळे उर्फ सोन्या याने सदर महिलेकडे पाहून हावभाव केले. सदर महिलेने झालेल्या प्रकाराची तक्रार हिवरखेड पोस्टेला दिली. पोलिसांनी आरोपी अनिकेत इगळे उर्फ सोन्या विरुध्द कलम ७९ नुसार गुन्हा दाखल केला. तपास हिवरखेड पोस्टेचे पोहेकाँ प्रविण जाधव करीत आहे.

### जेवण देण्याच्या कारणावरुन लोखंडी काठीने मारहाण

**खामगाव :** उर्वरीत लोकांना जेवण देण्याच्या कारणावरुन खामगाव-शेगाव रोडवर असलेल्या बहीरम हंडी हॉटेलवर वाद होवून लोखंडी पाईप व काठीने मारहाण केल्याची घटना ८ मार्च रोजी रात्री ९.३० वाजता घडली. या प्रकरणी शेगाव ग्रामीण पोलिसांनी ४ जणांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. निशांत भास्कर वक्ते रा. अंबिका नगर घाटपुरी नाका खामगाव याने शेगाव ग्रामीण पोस्टेला दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की मी व माझे मित्र असे जेवण करण्यासाठी बहीरम हंडी हॉटेलवर गेलो होतो. त्याठिकाणी पाच जणांची जेवणाची ऑर्डर दिली होती. आलोक बिलेवार याने दोन लोकांची जेवणाची थाळी आणून दिली. निशांत वक्ते याने म्हटले की उर्वरीत लोकांना जेवण द्या असे म्हटले असता यावरुन वाद झाला. निशांत वक्ते सोबतच्या असलेल्या लोकांनी व्हिडीओ चित्रीकरण करण्यास सुरुवात केली. आरोपी आलोक बिलेवार, कारागीर, गल्ल्यावरील व्यक्ती, काळी टी शर्ट घातलेला (नाव माहीत नाही) अशा चार जणांनी निशांत वक्ते व इतरांना लोखंडी पाईपाने व काठीने मारहाण केली तसेच शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १९०० - २१७६ |
| गहू | १७०० - २२५० |
| तुर | ६८०० - ८२५० |
| हरभरा | ४४५० - ५२५० |
| सोयाबीन | ४००० - ५२५० |
| उडीद | ५००० - ५००० |
| मुग | ३५०० - ४३०० |
| मका | १४०० - १४०० |

# न्याय तळागाळापर्यंत पोहोचविणे आपले कर्तव्य - न्यायमूर्ती किलोर

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**

## ११३ कोटी रुपयांचे लाभ वितरण



**बुलडाणा दि. ९ :** भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकांला जन्मापासून ते मृत्यूपर्यंत अनेक मूलभूत अधिकार दिले आहेत. मात्र, माहितीच्या अभावामुळे दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत हे अधिकार आणि विधी सेवा पोहोचत नाहीत. शासन आपल्या दारी प्रमाणेच न्याय आपल्या गावी पोहोचवणे हे प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याचे आणि सजग नागरिकाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा पालक न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी केले.

चिखली तालुक्यातील अमडापूर येथील श्री क्षेत्र बल्लाळाई संस्थान परिसरात आयोजित 'विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांच्या महामेळाव्या'च्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली, उच्च न्यायालय मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समिती व तालुका वकील संघ चिखली व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाचे न्यायधीस तथा पालक न्यायमुर्ती एम.एम. नेरलीकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.एन. रोकडे, तसेच जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, पोलीस अधिक्षक निलेश तांबे, तसेच अमडापूरचे सरपंच वैशाली गवई, श्री क्षेत्र बल्लाळाई संस्थान अमडापूर अध्यक्ष वल्लभराव देशमुख आदी उपस्थित होते. न्यायमूर्ती अनिल किल्लोर पुढे म्हणाले की, ग्रामीण लोकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती तसेच लाभ देण्यासाठी या महामेळाव्याचे आयोजन आहे. आपल्या राज्यघटनेने प्रत्येकाला अधिकार बहाल केले आहेत. आजवर जे न्यायाच्या कक्षेत आले नाहीत त्यांना अशा उपक्रमातून आपल्या समस्या सोडविण्याची संधी मिळते. शासकीय यंत्रणांनी आपल्या विभागामार्फत असलेल्या विविध योजना प्रभावीपणे गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचाव्यात, असे त्यांनी सांगितले. या मेळाव्याचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.एन. रोकडे तसेच जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांचे कौतुक केले. न्यायधीस तथा पालक न्यायमुर्ती एम.एम. नेरलीकर म्हणाले की, बुलढाणा जिल्हा असो किंवा महाराष्ट्रातील इतर दुर्गम भाग, तिथे विधी सेवा पोहोचवणे हे मोठे आव्हान असते. मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे अनेकदा अडचणी येतात, परंतु अशा वेळी त्या-त्या भागात कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. प्रशासकीय यंत्रणेने केवळ नोकरी म्हणून नव्हे, तर कर्तव्य भावनेतून शेवटच्या घटकापर्यंत त्यांचे अधिकार पोहोचवण्याचे काम करावे. घटनेला अभिप्रेत असलेला न्याय जोपर्यंत तळागाळातील माणसाला मिळत नाही, तोपर्यंत लोकशाही खऱ्या अर्थाने यशस्वी होणार नाही. मोबाईलच्या युगात आज शासनाच्या योजनांची माहिती सहज उपलब्ध आहे, त्याच धर्तीवर विधी सेवांची माहितीही प्रत्येकाच्या हातापर्यंत पोहोचली पाहिजे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील म्हणाले की, एकेकाळी शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा ही ओळख असलेल्या बुलढाणा जिल्ह्याने आता विकासाच्या बाबतीत संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार, बुलढाणा जिल्ह्याचा विकासदर तब्बल २२.६ टक्केवर पोहोचला असून, सर्व जिल्ह्यांना मागे टाकत विकासाच्या शर्यतीत जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर आला आहे. जिल्ह्याची जुनी ओळख पुसून काढण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्रित प्रयत सुरू केले आहेत. राज्य शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून तळागाळातील नागरिकांपर्यंत शासकीय योजना पोहोचवल्या जात आहेत. विशेषतः आर्थिक परिस्थितीमुळे किंवा माहितीच्या अभावामुळे जे घटक विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर होते, त्यांना या शिबिरांच्या माध्यमातून संधी उपलब्ध करून दिली जात आहे, असे त्याांनी यावेळी सांगितले

# पदावरील महिला म्हणजे कर्तृत्वाची खात्री - आ. श्वेता महाले




**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**

**चिखल दि.९:** जागतिक महिला दिनानिमित्त चिखली नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षा सौ. वैशाली कपिल खेडेकर यांच्या वतीने पोलीस विभागातील महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास चिखली विधानसभेच्या आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सोहळ्यात आयोजकांच्या वतीने चिखली पोलीस स्टेशनमधील सर्व महिला कर्मचाऱ्यांना फेटे बांधून त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. महिला दिनाचे औचित्य साधून चिखली पोलीस स्टेशनचे ठाणेदार भूषण गावंडे यांनी आजच्या दिवसाचा संपूर्ण प्रभार पोलीस उपनिरीक्षक श्रीमती अश्विनी गाडे यांच्याकडे सोपवला. या निर्णयाचे उपस्थितांनी मनापासून स्वागत केले. यावेळी बोलताना आमदार सौ. श्वेता महाले पाटील म्हणाल्या, ''पोलीस विभागातील महिलांनी धैर्य, कर्तव्यनिष्ठा आणि समर्पणाच्या जोरावर समाजात नारीशक्तीचे सामर्थ्य सिद्ध केले आहे. देशाच्या राष्ट्रपतीपदापासून ते पोलीस स्टेशनपर्यंत महिला आपले कर्तृत्व पुरुषांच्या बरोबरीने सिद्ध करत आहेत,पदावर महिला असणे ही आता कार्यकुशलतेचि खात्री मानली जाते,हीच आजच्या दिवसाची खरी प्रेरणा आहे.'' या कार्यक्रमाचे एक वेगळेपण म्हणजे आयोजक उपनगराध्यक्षा वैशाली खेडेकर या एका महिलेने महिलांचा सन्मान करण्यासाठी पुढाकार घेणे, हे या कार्यक्रमाला अधिक अर्थपूर्ण बनवते असे गौरवउदगार काढून उपनगराध्यक्षा सौ.वैशाली खेडेकर यांच्या या उपक्रमाचेही आमदारांनी मनापासून कौतुक केले.

# महाशिबिरात एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**

**बुलडाणा दि. ९ :** चिखली तालुक्यातील अमडापूर येथे आयोजित विधीसेवा महाशिबिर व शासकीय योजनांच्या महामेळाव्यात बुलढाणा जिल्ह्यातील एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. हा शुभारंभ उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूरचे प्रशासकीय न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी उच्च न्यायालय मुंबईचे न्यायमूर्ती एम. एम. नेरलीकर, जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बुलढाणाचे अध्यक्ष आर. एन. रोकडे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी खरात, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, शीतल साखळीकर तसेच विविध विभागांचे खातेप्रमुख अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी एचपीव्ही लसीकरणाचे महत्व, गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून होणारे संरक्षण तसेच मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने या मोहिमेचे महत्व याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. महाशिबिराच्या निमित्ताने विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात आले. सिकल सेल तपासणी अंतर्गत १०० लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली, तर महिला दिनानिमित्त ३०० महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

# जिल्हास्तरीय 'अस्मिता लीग' क्रीडा स्पर्धा उत्साहात

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**



**बुलडाणा दि.९ :** आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून युवक कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, यांच्या मार्गदर्शनाखाली मेरा युवा भारत व जिल्हा क्रीडा कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ वाजता तालुका क्रीडा संकुल, चिखली (ता. चिखली, जि. बुलढाणा) येथे जिल्हास्तरीय ''अस्मिता लीग'' क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेत १३ ते १८ वर्षांवरील मुली तसेच महिला यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धांमध्ये १०० मीटर, २०० मीटर व ४०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारांसह विविध मनोरंजनात्मक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. महिलांचे मनोबल वाढवण्यासाठी चिखली मतदारसंघाच्या आमदार श्वेताताई महाले कार्यक्रमास उपस्थित होत्याा. तसेच नगराध्यक्ष पंडित दादा देशमुख, उपनगराध्यक्षा सौ. वैशालीताई खेडेकर, सहायक क्रीडा विकास अधिकारी अनुराधाताई सोळंकी, शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त मान्यवर तसेच लेखाधिकारी रमेश अहिरकर, आकाश चाफेकर आदी उपस्थित होते. यावेळी खेलो इंडिया प्रशिक्षक अक्षय गोलांडे, आकाश साळोक, तसेच अनेक महिला व क्रीडाप्रेमी उपस्थित होते. जिल्ह्यातील मोठ्या संख्येने मुली व महिलांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर व जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी सहभागी सर्व महिला व मुलींचे आभार मानत महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# कबुत्तर पकडण्याच्या कारणावरुन वाद

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**

**सोनाळा दि.९ :** कबुत्तर पकडण्याच्या कारणावरुन वाद होवून एकास दगडाने मारहाण केल्याची घटना ८ मार्च रोजी सकाळी १० वाजता घडली. शेख मुशरान शेख अनवर रा. सोनाळा याने पोस्टेला तक्रार दिली की शेख शाहरुख शेख हसन, शेख रिहान शेख आजम, शेख हसन शेख मुतझा, शेख साकीब शेख हसन, शेख हुसेन शेख मुतझा यांनी संगनमत करुन मला व माझा भाऊ शेख अनिस शेख अनवर यास कबुत्तर पकडण्याचे कारणावरुन दगडाने डोक्यावर, तोंडावर तसेच छातीवर मारहाण केली व लाथाबुक्यांनी सुध्दा मारहाण केली. सोनाळा पोलिसांनी आरोपी शेख शाहरुख शेख हसन, शेख रिहान शेख आजम, शेख हसन शेख मुतझा, शेख साकीब शेख हसन, शेख हुसेन शेख मुतझा यांच्या विरुध्द कलम ११८ (१), १८९ (२), १८९ (४), १९१ (३), १९०, ११५ (२) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल केला.

तसेच शेख हसन शेख मुतझा याने सुध्दा तक्रार दिली की आरोपी शेख अनिस शेख अनवर, शेख गोलू शेख अनवर, शेख जफर शेख अजीज, शेख अफसर शेख अजीज, शेख मोझीर शेख अनवर यांनी संगनमत करुन मुलगा शेख शाहरुख शेख हसन व नातू शेख रेहान शेख आजम यांना खबुत्तर मारण्याचे कारणावरुन दगडाने मारहाण केली. पोलिसांनी वरील पाचही जणांविरुध्द कलम ११८ (१), १८९ (२), १८९ (४), १९१ (३), १९०, ३५१ (२), ३५१ (३) अन्वये गुन्हा दाखल केला.

# सरपंच, प्रशासक व सदस्य झाले प्रशासकीय समितीचा भाग

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**

**सोनाळा दि.९ :** सरपंचांना प्रशासक आणि इतर सदस्यांना प्रशासकीय समितीमध्ये घेण्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. सदर परिपत्रक २८/०२/२०२६ पर्यंत कार्यकाळ संपणाऱ्या राज्यभरातील संपूर्ण ग्रामपंचायती साठी लागू राहणार आहे. याचिका दाखल करताना यामध्ये प्रमुख तीन मागण्या करण्यात आल्या होत्या. त्यावर मुंबई उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठाने ऐतिहासिक निर्णय दिला आहे.

मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे राज्य शासनाने जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ कार्यकाळ संपणाऱ्या ग्रामपंचायती संदर्भात प्रशासक नियुक्तीला आव्हान देणारी याचिका अरविंद दळवी व इतर बुलढाणा यांच्यावतीने दाखल करण्यात आली होती. दिनांक ९/०२/२०२६ रोजी प्रथम सुनावणी दरम्यान सदर परिपत्रक असल्याचे प्रथम दर्शनी न्यायालयाने मत नोंदवत, परिपत्रकाच्या अनुषंगाने कुठलीही कार्यवाही न करण्याचे निर्देश दिले होते. संपूर्ण निर्देश हे राज्यभरातील साडे चौदा हजार ग्रामपंचायतीना लागू असल्यामुळे संपूर्ण राज्यातील सरपंचांचे लक्ष या याचिकेच्या सुनावणी कडे लागले होते. दुसऱ्या सुनावणी दरम्यान राज्य शासनाच्या वतीने हजर वकिलांनी विद्यमान सरपंच यांना प्रशासक म्हणून आणण्याची बाब विचाराधीन असल्याचे स्पष्ट केले आणि पुढील तारीख प्रकरणात घेण्यात आली. २४ फेब्रुवारी २६ रोजी सुनावणी दरम्यान राज्य शासनाच्या वतीने हजर वकीलांनी सुधारित परिपत्रक दाखल करून सरपंचांना प्रशासक आणि इतर सदस्यांना प्रशासकीय समितीमध्ये घेण्याचे सांगितले. सदर परिपत्रक २८/०२/२०२६ पर्यंत कार्यकाळ संपणाऱ्या राज्यभरातील संपूर्ण ग्रामपंचायती साठी लागू राहणार आहे . याचिका दाखल करताना यामध्ये प्रमुख तीन मागण्या होत्या. २३ जानेवारी २०२६ शासन परिपत्रक रद्द करण्यात यावे .विद्यमान सरपंच यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात यावी. सदर निवडणुका ह्या विशिष्ट कालावधीत घेण्यात याव्यात. सदर गोष्टींची सुधारित परिपत्रकाच्या अनुषंगाने पूर्तता झाली असून, मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे दाखल याचिका क्रमांक. १२५०/२०२६ च्या निकालाने सरपंच हेच प्रशासक होणार याबाबत शिक्कामोर्तब झाला आहे.

# महिलांच्या सन्मानासाठी संविधानाचा जागर करू- शीतल पाटील

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**





**बुलडाणा दि.९ :** समानता, स्वातंत्र्य व सन्मान केवळ संविधानातील शब्द नसून स्त्रीच्या जगण्याची मूलभूत तत्वे आहेत. संविधानाने महिलांना अधिकार दिले, पण त्याचा प्रत्यक्ष अनुभव तेव्हाच येईल जेव्हा समाज म्हणून आपण ते मान्य करू, पाळू आणि संरक्षण करू! अन्यायाविरोधात आवाज उठवणे, स्त्री च्या निर्णय स्वातंत्र्याचा सन्मान करणे व समानतेसाठी संघटित होणे हेच संविधानाच्या मूल्याचे प्रत्यक्ष पालन आहे. असे मत शिलाताई पाटील यांनी प्रगती सार्वजनिक वाचनालय व सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन,सीटू च्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित ''उपेक्षित महिलांच्या जीवन संघर्षाचा सन्मान'' या कार्यक्रमात अध्यक्षिय भाषण करताना त्यांनी व्यक्त केले. हक्काचे व अधिकाराचे संरक्षण केवळ कायद्यामुळे होत नाही ते समाजाच्या सामाजिक आणि नैतिक जाणिवेमुळेच सुनिश्चित होते संघर्ष शिवाय आज पर्यंत स्त्रीला काहीच मिळालेले नाही. हा आजवरचा इतिहास आहे असे मत या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित असलेल्या जिल्हा कारागृह अधीक्षक मेधाताई बाहेकर यांनी व्यक्त केले. यावेळी मंचावर नवनिर्वाचित नगरसेविका दिव्यांगना ताई ठाकरे प्रा.डॉ.कि. वा.वाघ, सिटूचे राज्य सहसचिव पंजाबराव गायकवाड, सुनिताताई जाधव यांनी सुद्धा यावेळी आपले समयोचित मनोगत व्यक्त केले शासनाच्या वेगवेगळ्या योजनेत महत्वाची भूमिका बजावत असलेल्या अंगणवाडी सेविका मदतनीस, आशा व गटप्रवर्तक, अर्धवेळ स्त्री परिचारिका, शालेय पोषण आहार कामगार अल्प आणि प्रामाणिकपणे काम करिता असलल्या तरी त्या उपेक्षित आहेत. ह्या उपेक्षित असलेल्या २१ कर्तृत्वान महिलांच्या जिवन संघर्षाचा सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाची सूरूवात शारदा लिंगायत यांच्या स्वागत गीतांनी झाली. तसेच शाहीर डि.आर.इंगळे यांनी महिलांचा सन्मान जागविणारे प्रेरणादायी गीत सादर केले तसेच सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर केणे यांनी शुभेच्छा दिल्या, साहित्यिक सुरेश साबळे, प्रा.प्रतापराव सपकाळ, डॉ.इंदूमती लहाने, रमेश इंगळे, युवराज कापरे, सर्जेराव चव्हाण, रविकिरण टाकळकर, गजानन अंभोरे, सरला इंगळे, अनिता कापरे, यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

**मेळावा** — वरवंड येथील संवाद मेळाव्यातून काँग्रेस प्रवेशाची घोषणा

# वारसा अन मूल्ये जोपासणे महत्वाचे; संधी मिळाल्यास सोने करु - संदीप शेळके

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**




**बुलडाणा दि. ९ :** आजोबा दिवंगत उत्तमराव पाटील यांनी १९४२ च्या लढ्यात महात्मा गांधी यांच्यासोबत देशाला स्वात्रंत्र्य मिळावे यासाठी इंग्रजांविरुद्ध संघर्ष केला. तुरुंगावास सुद्धा भोगला. क्रांतिसिंह नानासाहेब पाटील यांच्या प्रति सरकारमध्येही ते अग्रस्थानी होते. काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष पद त्यांनी १५ वर्षे भुषवले होते. शिव, शाहू, फुले, आंबेडकरी विचारांचा वारसा त्यांनी जपला. तोच वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी आपण काँग्रेस पक्षात प्रवेश घेणार आहोत. काँग्रेसमध्ये संधी मिळाल्यास संधीचे सोने करु, असा विश्वास राजर्षी शाहू परिवाराचे अध्यक्ष तथा वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी व्यक्त केला.


### प्रवाहाविरुद्ध लढण्याचा आपला स्वभाव

प्रवाहासोबत सगळेच जात असतात; परंतु प्रवाहाविरुद्ध लढण्याचा आपला स्वभाव आहे. आपण सर्वांनी माझ्या सुख- दुःखात मोलाची साथ दिली. यापुढेही आपण माझ्यासोबत असाल, अशी अपेक्षा व्यक्त करीत काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याचे संदीप शेळके यांनी जाहीर केले. तळागाळातील सर्व घटकांना सोबत घेऊन न्याय देण्यासाठी आपण प्रयत करू. जिल्ह्याच्या विकासासाठी आपल्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करत राहू, असे त्यांनी सांगितले.

शिवसेना उबाठा पक्षाचा पाच मार्च रोजी राजीनामा दिल्यानंतर संदीप शेळके यांनी ७ मार्च रोजी वरवंड येथे जिवाभावाच्या सहकाऱ्यांसोबत संवाद साधला. तसेच आपली पुढील राजकीय भूमिका स्पष्ट केली. यावेळी बोलतांना ते म्हणाले, जिल्ह्यातील अनेकजण माझ्याविषयी मत व्यक्त करताना, सहकार क्षेत्रात असून पैशाच्या जोरावर राजकारण करत असल्याचा आरोप करतात. केवळ विरोधाचे राजकारण करण्याचा त्यांचा हेतू आहे. राजर्षी शाहू परिवाराच्या माध्यमातून गेली २४ वर्षे आपण समाजकारण, सहकार, राजकारणात सक्रिय आहोत. राजर्षी शाहू परिवार आणि वन बुलढाणा मिशनच्यावतीने आयोजित रक्तदानाचा महायज्ञ अंतर्गत योगदानाची दखल इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने घेतली आहे. हजारो युवकांना व्यवसाय प्रशिक्षण देऊन प्रत्याक्ष रोजगार उपलब्ध केला आहे. बचतगटांच्या महिलांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम करीत असून त्याचे आत्मिक समाधान आहे. राजकारणात काम करतांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रोश मोर्चा, मेळावे, युवक, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यासह विविध घटकांसाठी आंदोलने केल्याचे त्यांनी सांगितले.

# बनमेरू महाविद्यालयात आयोजित लोणार विज्ञान महोत्सव थाटात

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**



**लोणार दि.९:** येथील कै. कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय स्तरावरील ९वा लोणार विज्ञान महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यंदा महाविद्यालयाचे रौप्यमहोत्सवी वर्ष असल्यामुळे या महोत्सवाला विशेष महत्व प्राप्त झाले. कै. कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय व कै. कमलाबाई क. बनमेरू महिला महाविद्यालय, लोणार यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. महोत्सवाची सुरुवात ढोल-ताशांच्या गजरात विज्ञान ज्योत रॅली व ग्रंथ दिंडीने झाली. यावेळी शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव प्रकाशभाऊ मापारी, छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ पनवेलचे कुलगुरू डॉ. केसरीलाल वर्मा, अखिल भारतीय शैक्षिक महासंघाचे राष्ट्रीय सचिव प्रा. डॉ. प्रदीप खेडकर, प्राचार्य डॉ. प्रकाश बनमेरू, डॉ. संतोष बनमेरू, प्रा. बळीराम मापारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उद्घाटन समारंभात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्राचार्य डॉ. प्रकाश बनमेरू यांनी प्रास्ताविकातून लोणार सरोवराच्या जतन व संवर्धनासाठी हा विज्ञान महोत्सव महत्वाचा असल्याचे सांगितले. कुलगुरू डॉ. केसरीलाल वर्मा यांनी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त केले. केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे महोत्सवाला शुभेच्छा दिल्या. या महोत्सवात वैज्ञानिक मॉडेल प्रदर्शन, पोस्टर सादरीकरण, विज्ञान प्रश्नमंजुषा, स्पॉट पेंटिंग, पुष्परचना व रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी लोणार सरोवराच्या जैवविविधतेवर आधारित उत्कृष्ट सादरीकरण केले. बक्षीस वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संतोष बनमेरू होते. यावेळी नंदूभाऊ मापारी, नगराध्यक्षा मीराताई मापारी, प्राचार्य डॉ. ओमराज गजभिये आदी मान्यवर उपस्थित होते. विविध स्पर्धांतील विजेत्यांना रोख पारितोषिक, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

अजिंक्य भारत

# आपलं खामगांव

खामगाव, मंगळवार, दि.१० मार्च २०२६ www.ajinkyabharat.com



**महत्त्वाचे**

## पोलीस कर्मचाऱ्याची आत्महत्या

**मेहकर :** तालुक्यातील हिवरा आश्रम येथील रहिवासी असलेले ५६ वर्षीय पोलीस हवालदार यांनी बाबुळखेड शेत शिवारात विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याचे आठ मार्च सकाळी दहा वाजता उघडकीस आल्याने एकच खळबळ माजली. बुलढाणा हेडकॉटर कार्यरत असलेले हिवरा आश्रम येथील राहणारे पंजाबराव भीमराव शेळके वय ५६ वर्ष हे बाबुल खेड शिवारात असलेल्या लाड यांच्या विहिरीमध्ये उडी घेऊन त्यांनी आत्महत्या केली त्यांच्या पश्चात दोन मुली एक मुलगा व पती असा परिवार असून त्यांनी आत्महत्या का केली याचा शोध पोलीस विभाग घेत आहे त्यांच्या आत्महत्या मागे काय कारण असेल हा संशोधनाचा विषय असून सध्या पोलीस विभागामध्ये त्यांच्या आत्महत्येविषयी हळहळ व्यक्त केल्या जात आहे व त्यांनी आत्महत्याा का केली यावर चर्चा सुरू आहे विशेष म्हणजे जे पोलीस इतरांच्या आत्महत्येचा पंचनामा करतात त्याच पोलिसांना आपल्या सहकार्याचा पंचनामा करावा लागला हे खेद जनक असल्याचे बोलले जात आहे.

## १५ मार्चपूर्वी थकित कर्जाचा भरणा करा

**खामगाव :** न. प. हद्दीतील मालमत्ता धारकांनी थकीत कराचा भरणा १५ मार्च २६ पुर्वी न.प. कार्यालयात किंवा आपल्याकडे येणाऱ्या वसुली लिपीकाकडे करावा. अन्यथा १६ मार्च २६ नंतर ज्या मालम त्ता धारकांकडे कर थकीत असेल अश्या नागरिकांची यादी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येईल. तसेच वारंट काढुन मालम त्ता जात करण्यात येईल व सदर मालमत्ता न. प. च्या नावे करण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. तर पाणीपट्टी थकबाकीदार यांची नळ जोडणी खंडीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल. असे प्रसिद्धीपत्रक मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके यांनी काढले आहे. कराचा भरणा करण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

## शहरात पुन्हा अतिक्रमण हटाव मोहीम राबविणार - अहीर

**खामगाव :** न.प. अतिक्रमण निर्मुलन पथकाकडून येत्या काही दिवसात पुन्हा अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येणार आहे. यामध्ये मोहन चौक ते टावर नाका, विकम सी चौक ते अजय हॉटेल बाळापूर नाका व टिळक चौक, टावर चौक ते शेगाव पुतळा, भुसावळ चौक ते जगदंबा चौकापर्यंतची अतिक्रमणे हटविण्यात येणार आहे. अतिक्रमण धारकांनी त्वरीत आपले अतिक्रमण काढून सहकार्य करावे अन्यथा न.प.कडून अतिक्रमण हटाव कारवाई करण्यात येईल, असे अतिक्रमण निर्मुलन पथकाचे अधिकारी मोहन भहीर यांनी बोलतांना सांगितले.

## घरफोडी प्रकरणी महिलेस अटक; दोन लाखाचा मुद्देमाल जप्त

**खामगाव :** स्थानिक केला नगर भागातील देशमुख मंगल कार्यालयाच्या मागील रहिवासी साकेत संजय दशोत्तर (३१) यांच्या घराचे कुलूप तोडुन अज्ञात चोरट्याने २६ फेब्रुवारी २६ रोजी दुपारी ४.३० ते ५.३० वाजेदरम्यान सोन्याचे दागिने व रोख असा एकुण १ लाख ८७हजाराचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी शहर पोस्टेला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासादरम्यान पोलिसांनी सिसिटीव्ही फुटेज व गोपनिय माहितीच्या आधारे आरोपी सिमा परवीन नसीम शेख (वय ४५ वर्ष, रा.साजिया नगर हैदरपुरा अमरावती) या महिलेस अटक करून तिच्या कडुन २ लाख ५६ हजार ३२० रूपयांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले. तसेच आरोपीने शेगाव शहर पोस्टे हद्दीत सुध्दा गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले. ही कारवाई पोलिस अधिक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधिक्षक श्रेणीक लोढा, एसडीपीओ प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनात शहर पोस्टे ठाणेदार राम कृष्ण पवार यांच्या आदेशाने पोहेकों, सागर भगत, पोकॉ. अंकुश गुरुदेव, पोकॉ. राहुल धारकर, मपोकॉ. दिव्या काळे यांनी केली.

# खामगाव - जालना रेल्वेमार्गासाठी केंद्राकडे पाठपुरावा करावा

### रेल्वे लोकआंदोलन समितीची आ. श्वेता महाले यांच्याकडे मागणी

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**चिखली दि.९:** बुलढाणा जिल्ह्याच्या विकासाचा राजमार्ग ठरण्याची क्षमता असलेल्या खामगाव - जालना रेल्वेमार्गाचा विषय आता केंद्र सरकारच्या अखत्यारीत पोहोचला असून केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी तीन महिन्यापूर्वी झालेल्या भेटीमुळे या विषयाला अधिक गती मिळाल्याचे चित्र निर्माण झाले होते. मात्र मागील महिन्यात केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पात सदर रेल्वे मार्गाबाबत कोणतेही घोषणा न झाल्याने पुन्हा एकदा खामगाव - जालना रेल्वेमार्गाबाबत निराशा हाती आली. या पार्श्वभूमीवर रेल्वे लोकआंदोलन समितीच्या सदस्यांनी जिल्ह्याचे खासदार तथा केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांना त्यांच्या स्वीय सहाय्यकांच्या मार्फत वारंवार विचारणा केली, परंतु अद्याप प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे रेल्वे लोकआंदोलन समितीचे सदस्य डॉ. किशोर वळसे व रेणुकादास मुळे यांनी ८ मार्च रोजी मा. आ. श्वेताताई महाले यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान समितीच्या वतीने आ. महाले यांना एक निवेदन सादर करण्यात आले असून त्यामध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खाम गाव - जालना रेल्वेमार्गासाठी केंद्र सरकारकडे प्रयत व पाठपुरावा करावा अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुलढाणा जिल्ह्याचे मागासपण दूर करण्याच्या उद्देशाने खामगाव - जालना रेल्वेमार्गाची महत्वाची भूमिका लक्षात घेऊन सदर रेल्वेमार्गाकरता केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा अशी मागणी व्यक्त करण्यात आली आहे. दोन वर्षांपूर्वी रेल्वेलोक आंदोलन समिती च्या ४२ दिवसांच्या आंदोलन नंतर मा. आ. श्वेताताई यांच्या पाठपुराव्याने राज्य सरकारने या रेल्वेमार्गाला ५० टक्के निधी मंजूर करत असल्याचे पत्र केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडे सुपूर्द केले होते. याबाबतचा ठराव देखील राज्य मंत्रिमंडळात मंजूर करण्यात आला होता. परंतु, तरीदेखील केंद्र सरकारकडून या प्रस्तावाला अद्याप अंतिम मंजुरी मिळाली नसल्याने ही प्रक्रिया नेमकी कोठे थांबली आहे? कोणत्या बाबीची पूर्तता करणे आवश्यक आहे? याचा मागोवा घेतल्यास आवश्यक त्या गोष्टींची उपायोजना करून लवकरात लवकर मंजुरी मिळू शकेल असा विश्वास समितीच्या सदस्यांनी यावेळी बोलून दाखवला. तसेच सध्या सुरू असलेल्या राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात लक्षवेधी सूचना किंवा तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून खाम गाव - जालना रेल्वेमार्गाच्या विषयात सद्यस्थिती काय आहे याबाबतची अधिकृत माहिती देखील आ. श्वेताताई महाले यांना मिळवता येईल. तसे झाल्यास याबाबत पुढील कार्यवाहीची दिशा देखील स्पष्ट होईल असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वरील सर्व विषयासंदर्भात एकदा प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना खामगाव - जालना रेल्वेमार्गासाठी केंद्र सरकारकडे अधिक जोरकसपणे पाठपुरावा करण्याची विनंती करणे आवश्यक आहे, त्यासाठी आ. श्वेताताई महाले यांनी पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा रेल्वे लोकआंदोलन समितीने व्यक्त केली.

# रोहीनखेड येथे शिवजन्मोत्सव सोहळा थाटात

### मराठा पाटील युवक समितीच्या १०० व्या शाखेचे जल्लोषात उद्घाटन

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी




**मोताळा दि. ९ :** स्वराज्यासाठी सर्वस्व समर्पित करण्याचा विचारच स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवणारा आहे. निस्वार्थ त्याग आणि समर्पणाच्या विचारावर कार्या करणाऱ्या मावळ्यांची फौज स्वराज्याचे खरे बलस्थान होते.शक्ती सोबत राष्ट्रमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवरायांचे शिस्तबद्ध नियोजन होते. म्हणूनच जगाला हेवा वाटावा असे स्वराज्य निर्माण झाले तोच स्वराज्याचा वसा पूर्णत्वास नेण्यासाठी मराठा पाटील युवक समिती यापुढे करणार आहे. असे मत मराठा पाटील युवक समितीचे संस्थापक अध्यक्ष गजानन दादा ढगे पाटील यांनी व्यक्त केले.

छत्रपती शिवरायांच्या तिथी प्रमाणे जयंती निमित्त शिवजन्मोत्सव सोहळा आणि शंभराव्या शाखा उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने गजाननदादा ढगे पाटील यांनी आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यामध्ये ७ मार्चला सायंकाळी उपरोक्त मत छत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक ग्राम रोईनखेड येथे व्यक्त केले. यावेळी शिवव्याख्याते प्रबोधनकार ॲड. सतीशचंद्र रोठे पाटील आणि प्रा.योगेश म्हैसागर यांनीही शिवचरित्रावर अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले. शिवजन्मोत्सव सोहळ्याच्या पिठावर जिल्हाध्यक्ष मोहन घुईकर,जिल्हा संपर्क प्रमुख छोटू पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष सतिश लांजूळकर, रुग्ण सेवा समिती अध्यक्ष रमेश अवचार,जिल्हा उपाध्यक्ष श्याम अढाव, निवृत्ती दिवाणे, आदींची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम ग्राम रोहीनखेड मधून जय भवानी जय शिवराय च्या निनादांमध्ये ग्राम प्रदक्षिणा करीत ग्राम शाखेचे उद्घाटन करण्यात आले. त्याानंतर अवलिया संत गजानन बाबांच्या मंदिरासमोरील प्रांगणामध्ये शिवजन्मोत्सव सोहळ्याला छत्रपती शिवरायांचा पोवाडा आणि महापुरुषांना सामूहिक माल्यार्पन करून प्रारंभ करण्यात आला. छत्रपती शिवरायांचा जीवनपट आणि वर्तमान परिस्थितीतील मराठा समाजाची उत्क्रांती या विषयाच्या अनुषंगाने उपस्थित शिवपिठावरील मान्यवरांनी समाज प्रगतीच्या अनुषंगाने काही महत्वपूर्ण ठराव सर्वानुमते पारित केले. तर समाजामध्ये सर्वोत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींचा यावेळी शालपुष्प देऊन सत्कारही करण्यात आला. शिवजन्मोत्सव सोहळा आणि शंभराव्या शाखा उद्घाटन भव्य सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी मराठा पाटील युवक समितीचे सर्वश्री पदाधिकारी खामगाव तालुका अध्यक्ष अविनाश कुटे,नितीन खोंड, खामगाव शहर अध्यक्ष प्रतिक मिरगे, अवि ढगे,गौरव खुमकर,जिल्हा सचिव अमोल टिकार,चेतन रायपूरे, ऋषी पऱ्हाड,राहुल कुटे,मोहन भांबेरे, यांच्यासह आदींनी सहभाग घेत अथक परिश्रम घेतले.

## उपनयन संस्कार सोहळ्याची नियोजनपूर्वक बैठक

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**खामगाव दि.९:** महाराष्ट्र ब्राह्मण सभेतर्फे आयोजित विदर्भस्तरीय भव्य (सामूहिक व्रतबंध सोहळा) उपनयन संस्कार या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य भ. परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष.कॅप्टन आशिष दामले हे (कॅबिनेट मंत्री दर्जा ) उपस्थितीत होते. आशिषजी दामले साहेब यांनी ब्राह्मण समाजासाठी भ.श्री. परशुराम आर्थिक विकास महामंडळ यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. यावेळी समाजातील विविध प्रश्नांवर चर्चा करतांना महाराष्ट्र ब्राह्मण सभेचे अध्यक्ष तथा बहुभाषिक ब्राह्मण महासंघाचे व अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे शेखर जोशी, महाराष्ट्र ब्राह्मण सभा उपाध्यक्ष तथा अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ प्रदेश सरचिटणीस आशिष सराफ व अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ जिल्हा कार्यकारिणी सदस्य व सल्लागार रवि जोशी याप्रसंगी आशिष दामले यांनी महाराष्ट्र ब्राह्मण सभेकडून उपनयन संस्कार सोहळ्याच्या उत्कृष्ट व नियोजनपूर्वक आयोजनाबद्दल समाधान व्यक्त करून कार्यक्रमाची प्रशंसा केली.

## जि.प.शाळा बोरगांव काकडे येथे महिला दिवस साजरा

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**मंगरूळ नवघरे दि.९:** येथील जि प मराठी उच्च प्राथमिक शाळा बोरगांव काकडे या ठिकानी ८ मार्च जागतिक महिला दिवस धूमधड़ाकयात साजरा करण्यात आला. सुरुवातीला मा जिजाऊ व क्रांति ज्योति सावित्रीबाई फुले ह्यांच्या प्रतिमे चे पूजन व दीपप्रज्वलन करुण कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी शाळा समितीचे अध्यक्ष मा गोपाल जी काकडे होते तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुने म्हणून मा राजूभाऊ लहाने होते . कार्यक्रमात समाजातिल काहीआदर्श महिलांचे यथोचित सत्कार करण्यात आले त्या डॉ. वैशाली पऱ्याड (फिजियोथेरेपी)व वैशाली अमोल चव्हाण (अटेंडन्स, सिव्हिल हॉस्पिटल) ह्या महिला भगीनी चा यथोचित सत्कार घेण्यात आला त्यांचे मनोगत घेण्यात आले. त्यावेळी विद्यार्थिनींनी वेगवेगळ्या थोर महान स्त्रीयांची आकर्षक वेशभूषा प्रधान केली होती .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप पिडीयार सराणी केले तर आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक भीमराव वानखेडे भाऊसाहेब याणी केले .कार्यक्रम यशस्वी करण्या साठी शाळेतील शिक्षक रविंद्र अंभोरे सर,शाम सुरशे सर व किसन परिहार सर ह्यांनी कष्ट घेतले त्यानंतर मुलांना खाऊ वाटून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## इंडियन डेंटल असो. च्या वतीने जागतिक डेंटिस्ट डे व महिला दिन साजरा

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**खामगाव दि.९:** खामगाव इंडियन डेंटल असोशिएशन शाखा खामगावच्या वतीने ६ मार्च २६ रोजी जागतिक दंत दिवस साजरा करण्यात आला. यावेळी खामगाव, शेगाव व नांदुरा येथील शाळांमध्ये सुमारे २३०० विद्यार्थ्यांचे मोफत दंत तपासणी करण्यात आली. तसेच दंत व मुखरोगाबद्दल माहिती देण्यात आली. तर ब्रम्हकुमारीज सेंटर येथे पायरिया विषयावर व्याख्यान देण्यात आले. महिला दिनी महिलांसाठी सिटी स्पोर्टस टर्फ येथे विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्राजक्ता चरखे ह्या होत्या. तर असो. चे अध्यक्ष डॉ. मयुर वानखडे, सचिव डॉ.प्रतिक वराडे, कोषाध्यक्ष डॉ. सानिया वराडे, प्रोजेक्ट संचालक डॉ. रूपाली महाजन व डॉ. प्रतिमा राठी उपस्थित होते. कार्यक्रमात खाम गाव येथील डॉ. गायत्री थानवी, डॉ. शुभम देशमुख, डॉ. सुरभी जैस्वाल, डॉ. रोहिणी पवार, डॉ. प्रियंका सोनी, डॉ. सोनिका मानकर, शेगाव येथील डॉ. अभय गोयनका, डॉ. विष्णु चौधरी, डॉ. नेहा चौधरी, डॉ. सोनल कलावटे, डॉ. साक्षी अग्रवाल, डॉ. आकांशा नागपाल, नांदुरा येथील डॉ. हरीष उमाळे, सह आर्दीनी घेतला.

## सणानिमित्त स्वस्त धान्याचा पुरवठा व्यवस्थित करावा : निवेदन

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**खामगाव दि. ९:** रामनवमी व रमजान ईद या दोन्ही पवित्र सणानिमित्त स्वस्त धान्य दुकानात अन्नाचा तुटवडा असून या काळात स्वस्त धान्याचा पुरवठा व्यवस्थित करावा अशा मागणीचे निवेदन राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना पाठविले आहे. सदर निवेदनात नमूद आहे की,हिंदु व मुस्लीम बांधवांचे पवित्र सण रामनवमी व रमजान ईद मार्च महिन्यात येत आहेत. त्या अनुषंगाने स्वस्त धान्य दुकानात अद्याप पावेतो पुरेसा धान्याचा पुरवठा शिधा पत्रिका धारकांना झालेला नाही. ७ मार्च २०२६ पावेतो मार्च महिन्याचे कोणत्याही प्रकारचे शिधा वाटपाचे वितरण सुरु झालेले नाही. तरी त्वरीत धान्य पुरवठा करण्यात यावा जेणेकरून नागरिकांना त्रास होणार नाही व त्यांचे सण आनंदाने साजरे होतील. सरकारकडून मिळणारी धान्याची मदत ही गोरगरीबांना आपल्या संसारासाठी फार महत्वाची आहे. पूर्वी निवडणूक काळात गोरगरीबांना शिधा वाटप किटचे वाटप करण्यात आले होते. परंतू आता कोणत्याही प्रकारचे किट वाटप होत नाही त्यामुळे ''गरज सरो वैद्य मरो'' या उक्तीचा प्रत्यय शिधापत्रिका धारकांना येत आहे. म्हणून त्वरीत आदेश काढून नागरिकांना तातडीने धान्याचा पुरवठा करावा असे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

## नरवेल गावात अवैध वाळू वाहतुकीमुळे मोठा अपघात टळला

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**नरवेल दि. ९ :** गाव परिसरात सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीमुळे मोठा अपघात टळल्याची घटना आज सकाळी घडली. सुसाट वेगाने धावणाऱ्या वाळूच्या टिपरमुळे नलेश्वर मंदिरासमोर अपघात होऊन गावातील बांधकामाचे नुकसान झाले असून भविष्यात मोठा अपघात होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नरवेल येथे गेल्या अनेक दिवसांपासून अवैध वाळू उपसा सुरू आहे. याबाबत ग्रामस्थांनी वारंवार प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले असतानाही महसूल विभाग आणि पोलिस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. आज सकाळी वाळूने भरलेला एक टिपर सुसाट वेगाने जात असताना नलेश्वर मंदिरासमोर उभ्या असलेल्या ट्रॅक्टरला जोरदार धडक देत बाजूला असलेल्या सामाजिक भांडी ठेवण्यासाठी बांधलेल्या खोलीच्या भिंतीवर आदळला. या धडकेत बांधकामाचे नुकसान झाले तसेच जवळील इलेक्ट्रिक पोल तुटून खाली पडल्याने गावातील वीजपुरवठा काही काळ खंडित झाला. अपघाताची माहिती मिळताच ग्रामस्थांनी एमआयडीसी पोलिस स्टेशनला कळविले. पोलिस घटनास्थळी दाखल झाले; मात्र संबंधित टिपर चालकाविरुद्ध कारवाई न करता परत गेल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पोलिसांनी आर्थिक तडजोड करून कारवाई टाळल्याचीही चर्चा गावात होत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, वारंवार तक्रारी करूनही अवैध वाळू उपशावर कारवाई होत नसल्याने शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. तसेच जड वाहतुकीमुळे गावातील रस्त्यांचीही मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. तरीदेखील स्थानिक तलाठी व संबंधित अधिकारी कारवाई करण्यास धजावत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

**शिबीर** | एकाच छताखाली लाभार्थ्यांना दाखले, प्रमाणपत्रे, विविध लाभांचे आदेश

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी






**मोताळा दि. ९ :** दिनांक ७ मार्च २०२६ रोजी मोताळा येथे ''छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर ''अभियान शिबिर संपन्न या शिबिराचे बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनाने या व छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळ्यास माल्ल्याअर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरिता पाटील तहसीलदार मोताळा ह्या होत्या.

शासनाचे आदेशानुसार तालुका प्रशासनाने बोराखेडी मंडळ स्तरावर आयोजित केलेल्या या शिबिरात तालुक्यातील सर्व शासकीय विभाग प्रमुख व कर्मचारी तसेच सर्व ग्रामहसुल अधिकारी, महसूल सेवक , मंडळ अधिकारी उपस्थित होते. सदर शिबिरात तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. विविध शासकीय विभागांची स्टॉल स्टॉल लावण्यात आले होते. जसे पुरवठा विभाग, संजय गांधी निराधार अनुदान योजना विभाग, निवडणूक विभाग , पंचायत समिती विभाग कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, ॲग्रीस्टॅक, भूमी अभिलेख विभाग, सेतू विभाग, आरोग्य विभाग, आधार सेवा, आणि महत्त्वाचे एक खिडकी योजना विभाग हे या शिबिराचे आकर्षण होते. या सर्व विभागांनी एकाच दिवशी एकाच छताखाली लाभार्थ्यांना विविध दाखले, प्रमाणत्रे, विविध लाभांचे आदेश दिले. कृषी विभाग मोताळा यांनी १० लाभार्थ्यांना कृषी विषयक अवजारे व इतर साहित्याचे माननीय आमदार साहेब यांचे हस्ते वाटप केले. शेतकऱ्यांना भोगवटादार वर्ग २ चे वर्ग एक मध्ये रुपांतरित केल्याचे आदेश पारित करून अद्यावत सातबाराचे वितरण करण्यात आले. शेतकऱ्यांना डिजिटल सातबारा एकूण ५६ सातबारा चे वाटप केले. संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या ३२ लाभार्थ्यांना मंजूरी आदेश प्रदान करण्यात आले. पुरवठा विभाग मोताळा यांनी एकूण ४१ लाभार्थ्यांना शिधा पत्रिका वाटप केल्या. जन्म मृत्यू नोंदणीचे सहा आदेश महसूल विभागामार्फत वाटप करण्यात आले. तसेच सेतू विभाग मोताळा चे वतीने ४१ लाभार्थ्यांना उत्पन्नाचे दाखले, डोमिसाईल चे दाखले वाटप करण्यात आले. व जातीचे दाखले आणि नॉन क्रिमिलियर चे प्रस्ताव तयार करून घेण्यात आले पंचायत समिती मार्फत पंडित दीनदयाल योजनेअंतर्गत दोन आदेश वाटप करण्यात आले. आधार कार्ड विभागाकडून सहा लाभार्थ्यांचे आधार कार्ड अद्यावत करण्यात आले. ॲग्री स्टॅग अंतर्गत लँड एडिशन ची सुविधा पुरविण्यात आली बोराखेडी मंडळातील एकूण २३ गावांचे लाभार्थ्यांनी वेगवेगळ्या सेवांचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला सदर शिबिरात शासनाने मागील काळात घेतलेल्या महत्त्वाकांक्षी निर्णय. अकृषिक रुपांतरणासाठी जिल्हाधिकारी यांची परवानगी आवश्यक नसल्याबाबत शिबिरार्थीना मार्गदर्शन करण्यात आले. तुकडेबंदी सुधारणा कायद्याबद्दल शिबिरार्थीना मार्गदर्शन केले. लक्ष्मी मुक्ती योजनेअंतर्गत आदेश पारित होऊन लाभार्थ्यांना सातबारा वितरित करण्यात आला.

# पत्रकार अशोक जसवाणी यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र नायक पुरस्कार जाहीर

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**खामगाव दि. :** पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केल्याबद्दल खाम गावयेथील जेष्ठ पत्रकार अशोक जसवाणी यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र नायक पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे.

समाज प्रतिबिंब बहुद्देशीय संस्था व बी.एस.एफ बहुद्देशीय संस्था, सत कबीर बहुद्देशीय संस्था आणि उपेक्षित नायक न्यूज यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील सामाजिक, कृषी, क्रीडा, उद्योग, शैक्षणिक, संस्था, प्रशासकीय, कला व अन्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या ७० लोकांना महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत असते. यावर्षी पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केल्याबद्दल या पुरस्कारासाठी पत्रकार अशोक जसवाणी यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन नाशिक येथे करण्यात आले असून चित्रपट सृष्टीतील दिग्गज कलाकारांच्या उपस्थिती मध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. अशोक जसवाणी यांच्या पत्रकारितेतील सत्यानिष्ठा, समाजाभिमुख वृत्तांकन आणि उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन त्यांची निवड पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. खामगावसह बुलडाणा जिल्ह्यात पत्रकारिता क्षेत्रात नावलौकिक असलेले अशोक जसवाणी यांची पत्रकारिता नेहमीच समाजाभिमुख राहली आहे. तब्बल ३५ वर्षापांसून ते पत्रकारिता करत असून गेल्या २२ वर्षापासून संपादक म्हणून स्वताचे सांज दैनिक खबरे शामतक वृत्तपत्र चालवत आहेत. आता पर्यंत त्यांना खामगाव प्रेस क्लब खामगावचा कै. बाळासाहेब बिन्नीवाले पत्रकारिता पुरस्कार, जिल्हा स्तरीय महेश रत्न पुरस्कार, राज्यस्तरीय नवशितीज महाराष्ट्र गौरव पत्रकारिता पुरस्कार, मुंबई अशा पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. ते विदर्भ सिंधी विकास परिषद बुलढाणा जिल्हा उपाध्यक्ष, श्री गुरुनानक बहुउदशीय संस्था अध्यक्ष देखील असून पत्रकारितेसह सामाजिक क्षेत्रात त्यांचा सक्रीय सहभाग राहला आहे. पत्रकारिता करत असताना त्यांनी कुटूंबाला सुध्दा प्राधान्य देत मुलांना उच्चशिक्षीत करून स्वताच्या पायावर उभे करण्याचे काम केले आहे. त्यांची मुलगी डॉ. जया जयेश खुबनानी बीएएमएस एमडी असून मोठा मुलगा नानक अशोक जसवानी हा काम्पुटर इंजिनियर इमफोसिस, पुणे तर छोटा मुलगा अमन बी फार्मसी केला असून तो स्वतः चा न्यु महाराष्ट्र मेडिकल चा संचालक आहे. तसेच पती सौ.वर्षा अशोक जसवानी, डीएड सेवा निवृत्त शिक्षिका आहे. उच्च शिक्षित जसवाणी कुटूंबाची पत्रकारिता, वैद्यकीय, शिक्षण व सामाजिक क्षेत्रात ही सेवा सातत्याने सुरू आहे.

अजिंक्य भारत •
आपलं जालना
जालना, मंगळवार, दि. १० मार्च २०२६ www.ajinkyabharat.com


## महत्त्वाचे

### दिव्यांगाचा निराधार योजनेचा प्रश्न मार्गी

**अंबड :** दीन-दुबळे व निराधार नागरिकांच्या सेवेसाठी कायम अग्रस्थानी असलेले अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांनी तहसील कार्यालयात आलेल्या एका दिव्यांगाची भेट घेऊन त्यांचा निराधार योजनेचा प्रश्न तातडीने मार्गी लावला,दह्याळा (ता. अंबड) येथील दिव्यांग काशीनाथ बाबूराव बर्वे हे निराधार योजनेच्या कामासाठी तहसील कार्यालयात आले होते. दुपारची वेळ, उन्हाचा कडाका आणि तहसील कार्यालयात नागरिकांची मोठी गर्दी असल्याने त्यांना उभे राहणेही कठीण जात होते. आपले काम होईल की नाही, या चिंतेमुळे अस्वस्थ झाले होते. कार्यकर्ते निसार पटेल आणि पोलिस पाटील यांनी काशिनाथ बर्वे यांना तहसीलदार विजय चव्हाण यांच्याकडे नेले,गुरुवारी तहसीलदार कार्यालयात सुनावणी सुरू असताना चव्हाण यांनी बर्वे यांची भेट घेतली व त्यांची विचारपूस केली. त्यानंतर निराधार योजनेचा अर्ज देऊन आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्रे जमा करण्यास सांगितले. अर्ज ऑनलाइन करून घेण्यात आला असून, पुढील महिन्यापासून मानधन सुरू होईल, असेही त्यांनी सांगितले.

### शॉर्टसर्किटने आठ एकर ऊस जळाला

**परतूर :** तालुक्यातील नांद्रा येथील वाघाडी शिवारात तरुण शेतकरी जीवन राधाकिसन बाबर यांच्या ८ एकर शेतातील तोडणीसाठी आलेला लाखो रुपयांचा ऊस वीज वितरण कंपनीने शेतात उभारलेल्या खांबावर शॉर्टसर्किट होऊन जळून कोळसा झाला. शेतातील पाईपलाईन जळाली. मोटार वायर जळाली. शेतमालाची झोपडी जळाली. इतर शेती उपयोगी साहित्यही जळून खाक झाले.या घटनेत बाबर यांनी मेहनतीने उभे केलेल्या उसाचे उत्पन्न डोळ्यांसमोर जळून राख झाले. त्यांनी नुकसान भरपाईसाठी महावितरण उपविभागीय कार्यालय, मंठा येथे अर्ज केला आहे.

### जिल्हा रुग्णालयात उष्माघातासाठी चार राखीव बेड

**जालना :** गेल्या तीन चार दिवसांपासून उन्हाची तिव्रता वाढल्याने जिल्हा सामान्य रुग्णालयात उष्माघातासाठी चार बेड राखीव ठेवण्यात आले आहेत. तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्येही उष्माघाताच्या रुग्णांसाठी बेड राखीव ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.उन्हाचा चटका वाढल्याने नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचे प्रकार घडू शकतात. याकडे दुर्लक्ष केल्यास जिवावरही बेतण्याची शक्यता असते. त्यामुळे उन्हाचा त्रास झाल्यानंतर तत्काळ डॉक्टरांशी संपर्क करणे अपेक्षित आहे. उन्हातून आल्यानंतर चक्कर येणे, अस्वस्थ वाटणे, ताप येणे, डोकेदुखी, थंडी वाजणे आदी लक्षणे उष्माघाताची असू शकतात. त्यामुळे अशी लक्षणे जाणवल्यास तत्काळ डॉक्टरांशी संपर्क साधणे गरजेचे आहे. त्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात चार बेड राखीव ठेवण्यात आले आहेत. यापैकी दोन बेड अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले आहेत तर दोन बेड जनरल वॉर्डमध्ये राखीव ठेवले आहेत. तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयांना उष्माघाताच्या रुग्णांसाठी बेड राखीव ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# जालना-जळगाव रेल्वे मार्गाला गती देण्यासाठी हालचाली

## केंद्रीय मंत्री रक्षा खडसे व माजी मंत्री दानवे यांच्यात सकारात्मक चर्चा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ९ :** मराठवाडा आणि खानदेश या दोन महत्त्वाच्या भागांना थेट जोडणाऱ्या प्रस्तावित जालना-जळगाव रेल्वे मार्गाला गती देण्यासाठी महत्त्वपूर्ण हालचाली सुरू झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे आणि केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्यात छत्रपती संभाजीनगर येथील भेटीत सविस्तर चर्चा झाली.

मराठवाडा आणि खानदेश या दोन्ही भागांच्या दळणवळणाच्या दृष्टीने हा रेल्वे मार्ग अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. या मार्गामुळे दोन्ही प्रदेशांतील व्यापार, उद्योग, शेतीमाल वाहतूक तसेच पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे. विशेषतः अजिंठा परिसरासह अनेक पर्यटन स्थळांपर्यंत पोहोच अधिक सुलभ होणार आहे. या भेटीत माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची सद्यस्थिती, प्रशासकीय प्रक्रिया, तसेच पुढील टप्प्यांतील कामाबाबत सविस्तर माहिती घेत



हा प्रकल्प अधिक जलद गतीने पूर्णत्वास कसा नेता येईल याबाबत सकारात्मक संवाद साधला.

रेल्वे मार्गासाठी आवश्यक असलेली विविध प्रशासकीय बाबी, नियोजन आणि समन्वय यावरही दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. या प्रकल्पाला गती देण्यासाठी केंद्र आणि राज्य पातळीवर आवश्यक असलेल्या पुढील कार्यवाहीबाबत दानवे आणि खडसे यांच्या मध्ये सकारात्मक चर्चा झाली.

# महापालिकेत खांदेपालट केल्याने सुधारणा होईल ?

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ९ :** महापालिकेतील विविध विभागातील कामकाजात सुसूत्रता, सुरळीतपणा, गतिमान व लोकाभिमुख होण्यासाठी काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.महापालिकेच्या उपायुक्त नंदा गायगकवाड यांनी या बदल्यांचे आदेश निर्गमीत केले आहे.

त्यानुसार सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण सार्वजनिक बांधकाम, अग्निशमन आपत्ती व्यवस्थापन, संगणक विभाग, स्वच्छता विभाग, अतिक्रमण विभाग, आस्थापना विभाग १ व २ तसेच नगर सचिव, विवाह नोंदणी विभाग, नाहरकत विभाग, वेतन विभाग, स्मशानभूमी व दफन भूमी देण्यात आली आहे. प्रभारी कार्यालय अधीक्षक विजय फुलंब्रीकर यांच्याकडे कार्यालय अधीक्षक पदासह अनुराधा नागोरी सहायक आयुक्त यांच्याकडील आवक-जावक विभाग, सुविधा केंद्र, माहिती व जनसंपर्क, दिव्यांग विभाग, जन्म-मृत्यु नोंदणी विभाग व विद्युत विभाग, बाहन विभाग या विभागाचे आणि प्रभारी सहायक




आयुक्त म्हणून कामकाज पाहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. रोखपाल राजेश कुरलिये यांच्याकडे जनगणना व रोखपाल पदाच्या जबाबदारीसह अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून कामकाज पहावे, अशी जबाबदारी सोपविण्यात आली आहे. जन्म-मृत्यू नोंदणी विभागाच्या लिपीक रंजना दाणेकर (कुलकर्णी) यांच्याकडे महापौर यांचे स्वीय सहाय्यक म्हणुन कामकाज पहावे असे आदेशीत करण्यात आले असून, लिपीक बंडू फकीरचंद चव्हाण सभाकाज विभागातील कामकाजासह उपमहापौर यांचे स्वीय सहाय्यक म्हणून कामकाज पहावेअसे सांगण्यात आले आहे. नगर रचना विभागाचे लिपीक मोहन जामदार यांची बदली स्वताः कडील कामकाजासह भालेराव यांच्याकडील नगर रचना विभागातील असलेले काम पाहण्याच्या सुचना करण्यात आल्या असून नगर रचना विभागाचे लिपीक संजय भालेराव यांची आस्थापना विभागात अजय पेम्बार्ती लिपीक यांच्या जागी बदली करण्यात आली आहे.

प्रभारी लिपीक प्रिया कवडे (पोलवाल) यांची अस्थापना विभागात सविता मोरे यांच्या जागी बदली करण्यात आली आहे.

जन्म-मृत्यू नोंदणीचे लिपीक महेश मसारे यांची सार्वजनिक बांधकाम विभागात बदली झाली असून, अस्थापना विभागाचे लिपीक अजय पेम्बार्ती यांची जन्म-मृत्यू नोंदणी विभागात बदली झाली आहे. तर अस्थापना विभागातील लिपीक सविता मोरे यांची जन्म-मृत्यू नोंदणी व अभिलेख विभागात बदली करण्यात आली आहे. आणि सदर बाजार एकचे अनुभव कांबळे यांनी कर विभागात बदली करण्यात आली असून, बदली झालेल्या ठिकाणी तत्काळ रुजू होवून अहवाल सादर करण्याचे निर्देश नंदा गायकवाड यांनी दिले आहेत.

# शहराची महापौर होण्यास संविधान कारणीभूत-वंदना मगरे

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ९ :** महिला दिनाच्या निमित्ताने बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात विविध उपक्रम राबविल्या गेले. यानिमित्ताने जालना शहराच्या महापौर बंदनाताई मगरे यांनीही या उपक्रमाला भेट देऊन महिला दिनाच्या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा दिल्या. त्या म्हणाल्या भारतीय राज्यघटनेने सर्वांना समान संधी दिली असून संविधान जगण्याला बळ देते, असे सांगून लोकशाहीमध्ये आपण एकमेकांचा सन्मान करायला हवा. मी आज जालना शहराची महापौर झाले ते भारतीय संविधानामुळेच. शहरात विविध प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्याची सोडवणूक करण्यासाठी आपण सर्वांनीच प्रयत्न करणे गरजेचे आहे असेही त्या म्हणाल्या.

यानिमित्ताने इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी जालनाच्या माजी संचालक प्रा.डॉ. स्मिता लेले यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. उद्योजकीय व्यक्तिमत्व घडविण्यासाठी लागणाऱ्या कौशल्याचा यावेळी त्यांनी उल्लेख केला. कोणतीही निर्मिती करत असताना आत्मविश्वासपूर्वक ती करायला हवी.

अपयश आले असले तरी त्यातून नवे काहीतरी आपणाला करता येऊ शकते. म्हणून आपण विविध आव्हाने स्वीकारली पाहिजेत. त्यांनी उद्योजकीय प्रेरणा याबद्दलही विचार व्यक्त केले. निर्भय आणि मुक्त राहायचे आहे मला, या भावार्थावर आधारित सत्यप्रिया श्रृंगारे हीने गायलेल्या बेखौफ आजाद रहना मुझे या गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली.



डॉ.प्रेरणा रामटेके यांनी डॉ. स्मिता लेले यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या संयोजक महिला समितीच्या प्रा.डॉ. सुनिता भराडे यांनी प्रास्ताविकात महिला दिवसाच्या संदर्भातील ऐतिहासिक संदर्भाचा आढावा घेतला. स्त्रियांना मानसन्मान आणि प्रतिष्ठा मिळविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या विविध संघर्षांचा आढावा यावेळी त्यांनी घेतला. कार्यक्रम उत्तमरीत्या सादर केल्याबद्दल प्राचार्य कविता प्राशर यांनी सर्वांचे कौतुक केले. पल्लवी धनगर हिने झांसीची राणीची भूमिका साकारली. त्याबद्दल तिला प्रथम पारितोषिक दिले गेले. समीक्षा कुडके हीने राजमाता जिजाऊची भूमिका साकारली त्याबद्दल द्वितीय पारितोषिक दिले गेले. श्वेता कोकणे हिने सरोजनी नायडू यांची भूमिका साकारली त्याबद्दल तिला तृतीय पारितोषिक देण्यात आले. मानसी काळे हिने महिला दिवसाच्या निमित्त उत्कृष्ट मनोगत व्यक्त केले त्याबद्दल तिला प्रोत्साहनपर बक्षीस दिले गेले. गिरिजा टाकळकर हिने माता रमाबाई आंबेडकर यांची भूमिका साकारली. त्याचबरोबर शिवकालीन युद्धकलेचे प्रदर्शन केले. त्याबद्दल तिला प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात आले. सानिया शेख, नेहा शिंदे, साक्षी पवार, भूमिका गावंडे, योगिता बरगे, बेदिका जायभाये, वैशाली मील, वनिता दौड, कृतिका ठेंगणे, कमल सोहनी, साधना चव्हाण, ऐश्वर्या खरात यांनी इतिहासातील कर्तबगार महिलांची वेशभूषा साकारली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मोहिनी रायबागकर यांनी केले.

# स्त्रियांनी सुप्त गुणांना वाव द्यावा -नगराध्यक्षा देवयानी कुलकर्णी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अंबड, दि. ९ :** प्रत्येक स्त्रीने स्वतःसाठी वेळ काढून पुढे जायला हवे. आपले शिक्षण पूर्ण झाले असेल, आपण आज आईच्या भूमिकेत असाल. मात्र आज काळ बदलला आहे. आपले अस्तित्व निर्माण करण्यासाठी वेगळेपण दाखवाचे लागेल, सावित्रीच्या लेकींना वयोगटाची मर्यादा नाही, आपला प्रत्येक वेळ विद्यार्थी दशेचा समजावा. आपल्यातील सुप्त गुणांना घाव द्यावा, जगाला गवसनी घालण्यासाठी सज्ज व्हा, अशी आर्त हाक नगराध्यक्षा देवयानी कुलकर्णी यांनी दिली.



अंबड येथील व्हीएलडी इंग्लिश स्कूलमध्ये महिला दिनाचे औचित्य साधून महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका गीतल धरमशी उपस्थित होत्या. कुठल्याही वयात आपण शिकू शकतो. आपल्याला जे साध्य करायचे आहे, ते साध्य करू शकतो. पुढे जाऊ शकतो. आपल्या मनातील भीती काढण्यासाठी स्थापन झालेला वन्स प्राईड ग्रुप हा खरा प्लॅटफॉर्म आहे. निसंकोचपणे आपल्यातील सुप्त गुणांना वाव देऊन पुढे जाण्याची हीच खरी वेळ आहे. या शाळेने वुमन्स प्राईड ग्रुपची स्थापना केली आहे. दर महिन्याला त्याची मीटिंग होणार आहे. या मीटिंगमध्ये स्त्रीशक्तीचा जागर होईल, तुमच्यातल्या कलागुणांना वाव मिळेल, या पद्धतीचे मार्गदर्शन मिळेल, असे मुख्याध्यापिका गीतल धरमशी यांनी सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या आईसाठी पाम पेंटिंगद्वारे संदेश दिला. यावेळी विविध कलागुणांसह उखाणे, संगीत खुर्ची, गाणे, डान्स आदींचे सादरीकरण झाले.

# मुलींसाठी स्वसंरक्षण शिबिरे घेण्यासाठी नेहमीच सहकार्य करू-घनश्याम गोयल

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ९ :** छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य प्रत्यक्ष साकारायचे असेल तर शिवछत्रपतींचा संपूर्ण इतिहास विद्यार्थ्यांना शिकवला जावा, शिवजन्मोत्सव समितीने मुलींसाठी आत्मरक्षण शिबिरे आयोजित करावीत. यासाठी आपले सहकार्य राहील, अशी ग्वाही उद्योजक घनश्यामदास गोयल यांनी दिली.

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त श्री शिवछत्रपती सांस्कृतिक मंडळ, जालना संचलित सर्वपक्षीय शिवजयंती उत्सव समितीच्यावतीने घेण्यात आलेल्या खुल्या जिल्हास्तरीय पत्रलेखन स्पर्धेचे बक्षीस वितरण जे.ई.एस. महाविद्यालयाच्या सभागृहात झाले. यावेळी गोयल बोलत होते. यावेळी जेईएस महाविद्यालयात विजेत्या स्पर्धकांना बक्षीस व सन्मानपत्र



देण्यात आले.यावेळी

अंकुशराव राऊत, अध्यक्ष सुभाषचंद्र देवीदान, कार्याध्यक्ष रवींद्र राऊत, शिवप्रकाश चितळकर, कोषाध्यक्ष स्वागताध्यक्ष रोहित भुरेवाल, सचिव सतीश जाधव, हिरालाल पिपरिये, बालाजी बांडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. जालना शहरात स्वा.से.रामभाऊजी राऊत, कै. बाबूलाल पंडित, के.बलीराम यादव आणि सहकाऱ्यांनी सर्वप्रथम बैलगाडीवर मिरवणूक काढून शिवजयंती साजरी केली होती. आमच्या पिढीने ही परंपरा जोपासत आहे, असे सांगून स्पर्धेच्या माध्यमातून शिवछत्रपतींचे संस्कार रुजविण्याचा समितीचा प्रयत्न आहे. पुढील वर्षी मोठ्या स्वरूपात स्पर्धा घेणार असल्याचे रवींद्र राऊत म्हणाले, स्वागताध्यक्ष रोहित पुरेवाल, परीक्षक डॉ. अशोक काकडे यांनीही मनोगत व्यक्त केले.

# भोकरदन रस्त्यासाठी २५ कोटी रुपये मंजूर; आमदार संतोष दानवे यांची माहिती

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**भोकरदन, दि. ९ :** विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात भोकरदन-जाफराबाद तालुक्यातील चार महत्त्वाच्या रस्त्यांच्या सुधारणेसाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार संतोष दानवे यांनी दिली.

या रस्त्यांसाठी संबंधित गावांतील ग्रामस्थांनी आमदार दानवे यांच्याकडे निधीची मागणी केली होती. त्यानुसार आमदार दानवे यांनी २५ कोटींची मागणी केली होती. मंत्रीद्वयांनी तातडीने दखल घेत अर्थसंकल्पातून निधी मंजूर केला. या निधीत पिंपळगाव रे. ते कोठाकोळी रस्त्याच्या सुधारणेसाठी १० कोटी ५० लाख रुपये मंजूर झाले. अकोलादेव-



बुटखेडा-पोखरी रस्त्यासाठी २ कोटी ५० लाख रुपये मंजूर झाले, टेंभुर्णी ते आंबेगाव रस्त्यासाठी ३ कोटी रुपये मंजूर झाले. जाफ्राबाद ते चिखली रस्त्यासाठी ९ कोटी रुपये मंजूर झाले. निधी मिळाल्याने भोकरदन, जाफ्राबाद तालुक्यांच्या दळणवळणाला गती मिळणार आहे. शेतमाल वाहतुकीला मोठा उपयोग होणार आहे. दोन्ही तालुक्यांच्या अर्थकारणाला चालना मिळणार आहे. निधी तातडीने उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार संतोष दानवे मतदारसंघातील यांनी जनतेच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे आभार मानले. निधी मोठ्या प्रमाणावर मिळाल्याने दुरुस्तीची कामे लवकर होतील, रस्ते चांगले होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**पुढाकार** सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांचे निर्देश

# सफाई कर्मचाऱ्यांच्या योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ९ :** स्वच्छतेमुळे शहराची समृध्दीकडे वाटचाल सुरु झालेली आहे. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या जीवनात अपेक्षित बदल झालेला दिसत नाही. कोरोनासारख्या कठीण काळात जेव्हा सर्वजण घरात होते, तेव्हा पोलीस आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांनीच रस्त्यावर उतरून आपले कर्तव्य बजावले. त्यामुळे स्वच्छता कर्मचाऱ्यांनी केलेल्या सेवेचा सन्मान राखला गेला पाहिजे. तरी सफाई कर्मचाऱ्यांना देय असलेल्या विविध शासकीय योजनांची जिल्ह्यात त्वरित आणि प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिले.

या बैठकीस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., अपर पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी श्री. डागोर यांनी सफाई कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेतला. वारसा हक्क, लाड-पागे समितीच्या शिफारसींची अंमलबजावणी, घरकुल योजना आणि कर्मचाऱ्यांचे आरोग्य व सुरक्षा या विषयांवर त्यांनी सविस्तर चर्चा केली. प्रशासनाने या घटकाकडे संवेदनशीलतेने बघून त्यांच्या अडीअडचणी प्राधान्याने सोडवाव्यात, जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी सफाई कामगारांच्या हितासाठी असलेल्या योजनांचा अहवाल नियमितपणे सादर करावा. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजनेची' जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी. सफाई कामगारांना हक्काचे घर मिळावे यासाठी श्रम साफल्य योजना ही अत्यंत महत्त्वाची आहे. या योजनेअंतर्गत पात्र सफाई कामगारांना घराचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत. तसेच हा वर्ग आजही हक्काच्या घरापासून वंचित आहे. त्यामुळे प्रशासनाने १९८७ च्या अधिनियमांतर्गत पात्र सफाई कामगारांना त्यांच्या घरांच्या जागांचे मालकी हक्क पट्टे त्वरित वाटप करावेत. तसेच वारसा हक्काच्या प्रकरणांचा निपटारा करणे आणि त्यांच्या इतर प्रलंबित मागण्यांना गती देण्याबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांना बजावले. सफाई कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी समाज कल्याण विभागाने त्यांना केवळ स्थानिक शिक्षणच नव्हे, तर परदेशी शिक्षण आणि युपीएससी व एमपीएससीतील राजपत्रित अधिकारी होण्यासाठी प्रशिक्षण उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. यामुळे या वर्गातील पुढची पिढी सामाजिक आणि आर्थिक विषमतेची साखळी तोडून मुख्य प्रवाहात येऊ शकेल. असेही त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्ह्यातील सर्व नगर परिषदा व नगर पंचायती तसेच महापालिकेत कार्यरत स्वच्छता कर्मचाऱ्यांना इतर विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांप्रमाणेच सर्व शासकीय सुट्ट्यांचा लाभ मिळणे शासन निर्णयानुसार बंधनकारक आहे. जर त्यांना कामाच्या निकडीमुळे शासकीय सुट्टीत कामावर बोलावले, तर त्यांना त्याऐवजी बदली सुट्टी देण्यात यावी, तसेच कामाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांना आवश्यक सर्व सुरक्षा साधने पुरविणे बंधनकारक आहे. सेवानिवृत्त सफाई कामगारांना त्यांचे सेवा उपदान आणि रजा रोखीकरणाची रक्कम विनाविलंब मिळाली पाहिजे. तसेच सेवेत असताना त्यांचे वैद्यकीय देयके कालमर्यादेत अदा करावीत, असे महत्त्वपूर्ण निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

या बैठकीस नगर परिषद व पंचायतीचे मुख्याधिकारी, संघटनांचे पदाधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, मंगळवार,१० मार्च २०२६

# अमरावतीत अंमली पदार्थांचे महारॅकेट

■ तीन कोटींचे एमडी ड्रग्ज जप्त ■ गुन्हेशाखेच्या कारवाईने खळबळ ■ पोलिस आयुक्तांची पत्रकार परिषदेत माहिती

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.९ :** गुन्हे शाखेच्या पथकाने भातकुलीहून सुकली-वाराणसी रस्त्यावरून अमरावतीला येत असलेल्या दोन तस्करांना एका व्याहियावरून अटक केली आणि त्यांच्याकडून २ किलो ८० ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त केले. या मालाची किंमत ३ कोटी ११ लाख ८५ हजार रुपये असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणात, पोलिसांनी आज आणखी दोन आरोपींना अटक केली आहे. अशा प्रकारे, या प्रकरणात अटक केलेल्या आरोपींची संख्या चार झाली आहे. पोलिस आणखी ६ आरोपींचा शोध घेत आहेत. या संपूर्ण प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेचे निरीक्षक संदीप चव्हाण यांच्याकडे सोपवण्यात आला आहे, अशी माहिती पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी सोमवार, ९ मार्च रोजी आयुक्त कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

अमरावती शहरात बेकायदेशीर अमली पदार्थांची तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर प्रभावी कारवाई करून अंमली पदार्थांविरुद्ध शून्य सहनशीलता धोरण राबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी पत्रकार परिषदेत दिली. या आदेशानुसार, गुन्हे शाखेचे





निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना रविवार, ८ मार्च रोजी माहिती मिळाली की आझाद नगर येथील रहिवासी अब्दुल फहीम अब्दुल रहीम, आजारी पोलीस उर्फ फहीम एम.बी. शेख अयान आणि शेख रमजान, द्वारका नगर येथील रहिवासी, एमडी विक्रीचा व्यवसाय करतात आणि ड्रग्जच्या व्यापारात सहभागी असलेल्या इतर व्यक्तींसाठी मुंबईहून मेफेड्रोन (एमडी) आणत आहेत. हे दोन्ही तस्कर मुंबईहून मूर्तिजापूरला निघाल्यानंतर संध्याकाळी दुचाकीवरून अमरावतीत पोहोचण्याची अपेक्षा होती. गुप्त माहितीवरून कारवाई करताना, गुन्हे शाखेच्या पथकाने सुकली बनारसी गावापासून लालखाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर सापळा रचला. संध्याकाळी ६ ते ७ वाजेच्या दरम्यान, त्यांनी एमएच २७-बीएन ७८८३ क्रमांकाची एक पांढऱ्या रंगाची ॲक्टिव्हा मोपेड थांबवली आणि गाडीत बसलेल्या दोन्ही तरुणांना ताब्यात घेतले. दोन्ही तरुणांची झडती घेतली असता त्यांच्याकडून २ किलो ८० ग्रॅम एमडी सापडले, ज्याची किंमत ३ कोटी ११ लाख ८५ हजार रुपये आहे. पोलिसांनी एमडी, एक दुचाकी आणि एक मोबाईल फोन जप्त केला, ज्याची एकूण किंमत ३१२,६०,००० रुपये आहे. चौकशी केल्यानंतर, आरोपींनी सांगितले की हा माल मुंबईतील माहिम येथील रहिवासी अरबाज उर्फ अरबू आणि अझीम यांच्याकडून मिळाला होता. अमरावती येथील एमडी ड्रग्जच्या व्यापारात सहभागी असलेल्या आठ व्यक्तींसाठी ते माल आणत होते असेही त्यांनी उघड केले. आरोपींनी दिलेल्या नावांच्या आधारे, पोलिसांनी आज शेख नाझिम, शेख रहीम आणि शेख रहीम उर्फ हुगन, शेख अमद यांना अटक केली, ज्यामुळे या प्रकरणात अटक केलेल्या आरोपींची एकूण संख्या चार झाली आहे. उर्वरित सहा जणांचा शोध सुरू आहे. गुन्हे शाखेचे निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण प्रकरणाचा तपास केला जाईल, असे पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी सांगितले. पत्रकार परिषदेत पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या व्यतिरिक्त, उपायुक्त श्याम घुगे, उपायुक्त गणेश शिंदे, उपायुक्त रमेश घुमल आणि गुन्हे शाखेचे निरीक्षक संदीप चव्हाण उपस्थित होते. पोलिस आयुक्त राकेश ओला म्हणाले की, हा माल शेख नाजीम शेख रहीम, शेख रहीम उर्फ ह्युगन शेख अमाद, शेख नईम उर्फ राजा शेख रहीम, शेख फहीम उर्फ सोनू शेख रहीम, शेख जमीर उर्फ बाबा युगान, शेख समीर शेख अमीर, गिलू अहमद आरिफ अहमद कुरेशी आणि अब्बास कुरेशी, रहिवासी चांदूर बाजार, हे सर्व गवळीपुरा येथे राहतात, त्यांच्यासाठी आणला जात होता. यातील दोघांना अटक करण्यात आली आहे. इतर सहा आरोपींचा शोध सुरू आहे.आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ, सहाय्यक आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे निरीक्षक संदीप चव्हाण, सहाय्यक निरीक्षक मनीष वाकोडे, महेश इंगोले, अमोल कडू, उपनिरीक्षक गजानन सोनुने, हेडकॉन्स्टेबल दीपक सुनील, सतीश खान, उपायुक्त दीपेश खान, फरार शेख यांनी कारवाई केली. सुंदरकर, गजानन राहे, मनोज ठोसर, आस्तिक. देशमुख, जहीर शेख, सचिन बहाळे, मंगेश लोखंडे आदींनी केली.

### मुंबईतून रेल्वेने येतो ड्रग्जचा साठा

एमडी तस्कर नेहमीच गरजू तरुणांना शहरात ड्रग्ज आणण्यासाठी शोधत असतात. ते त्यांना पैशाचे आमिष दाखवून शहरात आणतात. पोलिसांच्या सततच्या कारवाईमुळे, एमडीची नाविन्यपूर्ण पद्धतींनी शहरात तस्करी केली जात आहे. एमडी आणण्यासाठी मुंबईला जाणाऱ्या तरुणांना सात ते आठ दिवस आधीच पाठवले जाते. मुंबईत आल्यानंतर ते एका लॉजमध्ये राहतात. मुंबईतील एमडी डीलर त्यांचे मोबाईल फोन जप्त करतो. मुंबईत पाच ते सहा दिवस राहिल्यानंतर त्यांना एमडी दिला जातो. कन्साइनमेंट मिळाल्यानंतर, तरुण ट्रेनने निघून जातात.

मुंबईहून निघाल्यानंतर, एमडी घेऊन जाणारे तरुण मूर्तिजापूरला उतरतात. तिथे त्यांना दुचाकी असलेला एक तरुण भेटतो. त्यानंतर ते त्याच दुचाकीवरून मूर्तिजापूरहून भातकुलीमार्गे सुकली बनारसी रोडने लाखाखडीला पोहोचतात. गुन्हे शाखेचे निरीक्षक संदीप चव्हाण यांना या प्रकरणाची संपूर्ण माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे, रविवारी त्यांनी आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली आणि लोकांना अटक केली आणि माल जप्त केला, परंतु एक आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाला.

## थोडक्यात

### गळफास लावून युवकाची आत्महत्या

अमरावती : डेबुजी नगर, न्यू आयटीआयजवळ, रहाटगाव येथे टिनपत्र्याच्या शेडमध्ये युवकाने गळफास लावून आत्महत्या केली. सुरज सुनील थोरात (२८) असे मृतकाचे नाव आहे. नांदगाव पेठ पोलिसांनी मर्ग नोंदवला.

### घरातून इलेक्ट्रिक साहित्य लंपास

अमरावती : नवीन घराचे बांधकाम सुरू असून तेथे नुकतेच इलेक्ट्रिक फिटिंग व वायरिंगचे काम करण्यात आले. मात्र अज्ञात चोरट्याने रात्रीतून ते सर्व फिटिंग केलेले साहित्य घराच्या मागील बाजूस असलेल्या गॅलरीतून आत प्रवेश करीत चोरून नेले. त्याची अंदाजे किंमत ४० हजार रुपये आहे. ही घटना शिवपुत्र कॉलनी, व्यंकटेश टाऊनशिप, भातकुली रोड येथे घडली. फिर्यादीच्या तक्रारीवरून खोलापुरी गेट पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### लोखंडी वस्तूने युवकावर हल्ला

अमरावती : मित्राने दारू पिण्यासाठी पैसे मागितले, परंतु युवकाने पैसे नाही असे सांगत त्याला ते देण्यास टाळले. त्याचा राग आल्याने मित्राने लोखंडी धारदार वस्तूने युवकावर प्रहार करीत जखमी केले. ही घटना अंबाविहार येथे घडली. जखमीच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी मित्राविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### इसमास काठीने मारहाण

अमरावती : घराजवळ उभे राहून एक परिचित शिवीगाळ करीत होता. त्यासाठी त्याला शिवीगाळ न करण्यास हटकले सोबतच त्याला धरी जाण्यास सांगीतले. त्यामुळे चिडलेल्या परिचिताने काठीने मारहाण केली.

### वाहनचालकावर पोलिसांची कारवाई

अमरावती : नागरिकांच्या जीविताचे हित लक्षात न घेता स्टंटबाजी करीत निष्काळजीपणे वाहन चालवणे सहा जणांना चांगलेच महागात पडले. भातकुली पोलिसांनी या संदर्भात सहा वाहन चालकांवर गुन्हे दाखल केलेत. यापैकी पाच कारवाई तहसील कार्यालयासमोर, तर एक बस स्टँड परिसरात करण्यात आली. यामुळे निष्काळजीपणे वाहन चालवणाऱ्याचे चांगलेच धाबे दणाणले आहे.

# जंगलात वणवा पेटला; वृक्ष,वन्यजीव संकटात

अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**चिखलदरा,दि.९ :** मेळघाटात उन्हाची तीव्रता वाढताच जंगलात वणवा पेटण्याच्या घटनांना सुरुवात झाली. अकोट वन्यजीव विभागांतर्गत येणाऱ्या धारगड वनपरिक्षेत्रातील जंगल परिसरात भीषण आग लागल्याचे समोर आले. यामध्ये मोठ्या प्रमाणात वनसंपदा जळून खाक झाली आहे. या आगीमुळे मेळघाटातील जैवविविधता धोक्यात आली असून वन्यप्राण्यांच्या जिवालाही मोठा धोका निर्माण झाला आहे.

दरवर्षी उन्हाळ्याच्या दिवसांत मेळघाट व्याघ्र प्रकल्प, प्रादेशिक विभाग आणि अकोट वन्यजीव विभागात वणवा लागण्याचे प्रमाण वाढते. धारणी-अकोट मार्गावरील हायपॉइंटनजीक रात्रीच्या सुमारास लागलेल्या आगीमुळे गवत, झुडपे व लहान वनस्पतींचे प्रचंड नुकसान झाले. विशेष म्हणजे, आगीच्या धुरामुळे वन्यप्राणी सुरक्षेसाठी मानवी वस्त्यांकडे किंवा इतर भागांत स्थलांतर करण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

वणवा रोखण्यासाठी दरवर्षी जाळरेषा कापण्यासह अंगारी योजनेंतर्गत लाखोंचा खर्च केला जातो. यातून फायर लाईन, गस्त वाढवणे आणि जनजागृतीसारखी कामे केली जातात. मेळघाटात वारंवार लागणाऱ्या आगींमुळे या उपाययोजना आणि खर्चावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

धारगडमधील आग विझवण्यासाठी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न केले. दरम्यान, उन्हाळ्याच्या दिवसांत नागरिकांनी किंवा प्रवाशांनी जंगल परिसरात जाताना निष्काळजीपणा टाळावा. पेटती विडी, सिगारेट किंवा कोणत्याही ज्वलनशील वस्तू जंगलात फेकू नयेत, असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.

# मोझरी-जळका रस्त्याच्या नूतनीकरणासाठी उपोषण

कामाचा श्री गणेश केल्याशिवाय माघार नाही; उपोषणकर्त्यांचा निर्धार



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**तिवसा,दि.९ :** तालुक्यातील मोझरी, शिरजगाव मोझरी, धोत्रा, सालोरा, शेंदोळा, जळका मार्गावर गेल्या १२ पेक्षा अधिक वर्षांपासून मरण यातना सहन कराव्या लागत आहे. त्यामुळे आता रस्ता खोदून दुपदरी आणि उंच पुलांची उभारणी करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे, शिरजगाव मोझरी ग्रामपंचायतीचे माजी सदस्य पुरुषोत्तम मेश्राम यांनी माणिकग्राम धोत्रा बाजार चौकात बेमुदत ठिय्या आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. यावेळी उपोषणातून मोझरी ते जळका अखंड रस्त्याचे बांधकाम नूतनीकरण व्हावे,रस्त्याचे बांधकाम दुपदरी व्हावे,रस्त्यांवर स्ट्रीट लाईट लावण्यात यावे,अपघात स्थळ किंवा वळणदार रस्त्यांवर सूचना फलक लावण्यात यावे, रात्रीच्या प्रवासात रस्त्यावर प्रवास करताना रस्ता दिसण्यासाठी रिफ्लेक्टर लावण्यात यावे, शिरजगाव मोझरी गावाच्या वेशीवर असलेला नाला सरळ करून त्यावर उंच पूल बांधण्यात यावा, धोत्रा ते सालोरा गावादरम्यान तलावाला लागून असलेल्या नदीवर उंच पूल बांधण्यात यावा, धोत्रा ते माळेगाव रस्त्याचेही नूतनीकरण करून त्या मार्गावरील पुलांचे उंच बांधकाम करावे अश्या विवि मागण्या यावेळी उपोषणकर्त्यांनी केल्या आहे.यावेळी धोत्रा ग्रामपंचायत सरपंच भूषण गाठे, शेतकरी हक्क संघटनेचे संजय वानखडे, बसपाचे पदाधिकारी विलास चव्हाण, दिपक वाडीभसमे, महादेव अंबुलकर, रवी हगवणे, संदीप हगवणे, प्रकाश चिचखेडे, सुशील तंतरपाळे, जयंत तायवाडे, प्रीतेश ठवरे, रामभाऊ उमप, भाऊराव वैद्य, रमेश गाडे, महादेव भोंबे, कृष्णराव इंगोले, प्रमोद शेंडे, महादेव राऊत, राजकुमार राणे, रामराव भडके, शुभम नेवारे, रूपराव राऊत, महादेव भोयर, गोवर्धन भडके, अंकुश वानखडे, विवेक ठाकरे, सुभाषराव राऊत, चंद्रशेखर वानखेडे, प्रकाश काकडे, प्रदीप भडके, अशोक ठाकरे, मनोहर ओझरकर आदींची उपस्थिती होती.

आज सकाळी ११ वाजतापासून या उपोषणाला सुरवात करण्यात आली तर दुपारी ४ वाजेच्या दरम्यान तिवसा सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप विभागीय अभियंता विनोद बोरसे यांनी उपोषणास्थळी भेट दिली.यावेळी उपोषणकर्त्यांशी चर्चा करून लवकरच या रस्त्याच्या कामाला सुरवात होईल असे स्पष्ट केले.परंतु जोपर्यंत रस्त्याबाबत केलेल्या मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत उपोषण सुरु राहिल अशी भूमिका यावेळी उपोषणकर्त्यांनी घेतली.

परिणाम

राज्य सरकारने घेतला आंदोलनाचा धसका

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे श्रेय बच्चु कडूंचेचं – उपमुख्यमंत्री शिंदे

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.९ :** मेळघाटातील आदिवासींच्या विविध मागण्यांसाठी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी मेळघाटातून २५० किलोमीटरची पदयात्रा काढली. चिखलदरा येथे या पदयात्रेचा समारोप झाला.

दुपारी चार वाजेपर्यंत सरकारने मागण्यांची दखल घेतली नाही, तर 'तांडव आंदोलन' केले जाईल, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला होता. आमच्या हाती त्रिशूल आहे, आम्ही काहीही करू शकतो, असे त्यांचे म्हणणे होते. अखेर उद्योगमंत्री उदय सामंत आणि आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर हे चिखलदरा येथे पोहचले. बच्चू कडू यांच्याशी या दोन्ही मंत्र्यांनी चर्चा केली. मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. विधिमंडळाचे अधिवेशन आटोपल्यानंतर बैठक घेऊन सर्व प्रश्न मार्गी लागतील, असा विश्वास व्यक्त केला. पण, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीवरून आंदोलकांशी संवाद साधला, त्यावेळी उपस्थितांनीही जोरदार



दाद दिली.

यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेची घोषणा केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याचे श्रेय बच्चू कडू यांना दिले.

एकनाथ शिंदे म्हणाले, बच्चू कडू यांनी कर्जमाफीसाठी नागपुरात आंदोलन केले होते. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मी आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तत्काळ एक बैठक घेऊन कर्जमाफीसाठी समिती गठित करण्याचा निर्णय घेतला होता. यंदाच्या अर्थसंकल्पात त्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. त्याचे श्रेय बच्चू कडू यांना जाते. मेळघाटातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी धोरणात्मक मुद्यांवर मुख्यमंत्र्यांसमवेत एका बैठकीचे आयोजन करण्यात येईल. आरोग्य, परिवहन, उद्योग आणि इतर विभागाशी संबंधित मागण्यांविषयी मंत्री स्तरावर चर्चा करून तत्काळ निर्णय घेतले जातील. हे सरकार सर्वसामान्यांचे सरकार आहे. चिखलदरा येथील स्काय वॉकमुळे तेथे रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

एकनाथ शिंदे यांच्याशी दूरध्वनी वरून संवाद साधताना बच्चू कडू यांनी चिखलदरा येथील 'सिडको'शी संबंधित प्रश्नांची आठवण करून दिली. एकनाथ शिंदे यांनी हे प्रश्न तत्काळ सोडवले जातील, असे सांगितले. त्यानंतर बच्चू कडू यांनी एकनाथ शिंदे यांचे आभार मानले. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपये प्रोत्साहन अनुदान दिले जाणार आहे, ते किमान दीड लाख रुपये करावे, अशी मागणी बच्चू कडू यांनी एकनाथ शिंदे यांच्याकडे केली. त्यावर हसतच एकनाथ शिंदे यांनी हो, त्याचाही विचार करू, असे म्हणत बच्चू कडू यांना 'जरा दमाने घ्या', असा सल्ला दिला.

# पत्रकार सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी व्हावी

आ.संजय खोडकेंची विधान परिषदेत सूचना

अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**अमरावती, दि.९ :** महाराष्ट्र राज्यातील प्रसारमाध्यमातील पत्रकार, व्यक्ती व कर्मचाऱ्यांच्या कल्याण व सुरक्षेच्या दृष्टीने शासनाकडून प्रभावी उपाययोजना व अंमलबजावणी होण्यासंदर्भात महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य आ.संजय खोडके यांनी राज्य विधिमंडळातून महाराष्ट्र शासनाचे लक्ष वेधले. राज्यात पत्रकार संरक्षण कायदा लागू झाला, हा कायदा पुरेसा सक्षम आणि चांगला असला तरी त्याची अंमलबजावणी होत नसल्याने तो आता कुचकामी ठरला आहे.त्यामुळे या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी,यासाठी शासनाने ठोस पाऊले उचलण्याची गरज असल्याची लक्षवेधी सुचना आ.संजय खोडके यांनी सभागृहात सादर केली. राज्यविधीमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या कामकाजात सहभागी होत असतांना आ. संजय खोडके यांनी सभागृहाला अवगत केले कि, शासनाने पत्रकारांना आर्थिक साहाय्य करण्यासाठी आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना लागू केली आहे. मात्र या संदर्भात शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागाकडे अनेक प्रस्ताव प्रलंबित आहेत. यासंदर्भात अजूनही अर्जाची पडताळणी झाली नाही तसेच मागील दीड वर्षापासून अधिस्वीकृती समितीची बैठक झाली नसल्याने शेकडो जेष्ठ पत्रकार हे आर्थिक साहाय्य मिळण्यापासून वंचित आहेत. त्यामुळे आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेची प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासनाने संबधित विभागाला सुचना करावी, अशी लक्षवेधी आ.संजय खोडके यांनी लावून धरली. तसेच सदर योजनेसाठी पात्र निकषांमध्ये वयाची अट ६० वर्ष ऐवजी ५८ वर्ष लागू करण्याची सुचना यावेळी सभागृहासमक्ष करण्यात आली.तसेच प्रसार माध्यमात आपली कर्तव्ये पार पाडत असतांना पत्रकारांवर होणाऱ्या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी शासनाने लागू केलेल्या पत्रकार सुरक्षा कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी, यासाठी शासनाने गृह विभागाला वेळोवेळी आवश्यक सूचना व दिशानिर्देश देण्याची आवश्यकता असल्याचे सुद्धा आ. खोडके यांनी मांडले.

## थोडक्यात

### पैशांच्या वादातून वृद्धावर हल्ला

धामणगाव रेल्वे : तुरी सोंगण्याच्या मजुरीचे अर्धे पैसे फिर्यादी ज्ञानेश्वर श्यामरावजी ठाकरे (६०) यांनी गिरीश सुधाकर ठाकरे (३०) याला मागितले. त्याने कशाचे पैसे म्हणत शिवीगाळ केली. घरातून काठी आणत फिर्यादीच्या डोक्यात मारली. त्यामुळे डोके व कानाला दुखापत झाली. ही घटना धानोडी, ता. चांदूर रेल्वे येथे घडली. वृद्धाच्या तक्रारीवरून तळेगाव दशासर पोलिसांनी युवकाविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### खोलापूर येथे एकाला अज्ञाताची मारहाण

खोलापूर : मुलाला शाळेतून घेवून जात असताना फिर्यादी किशोर सुभाषराव पेचकाळे (४०) याला गावातीलच एक युवक जखमी अवस्थेत ओरडत पळताना दिसून आला. त्याला विचारणा केली असता. तोंड बांधलेल्या अज्ञाताने हल्ला केल्याचे सांगितले. फिर्यादीच्या तक्रारीवरून खोलापूर अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### कचरा काढण्यावरून दोन कुटूंबात वाद

धामणगाव रेल्वे : तालुक्यातील निंभोरा नालीत अडकलेला कचरा येथे काढण्यावरून दोन कुटुंबात वाद झाला. त्याचे रुपांतर शिवीगाळ व हाणामारीत झाले. या प्रकरणी परस्परविरोधी तक्रारीवरून एका महिलेसह चौघांवर गुन्हे दाखल झालेत. हेमंत वासुदेवराव बमनोटे (६३) यांच्या तक्रारीवरून संजय नानाजी चवरे (५०) व विकास संजय चवरे (३१), तर विकास चवरे यांच्या तक्रारीवरून हेमंत बमनोटे यांच्यासह एका महिलेवर गुन्हे दाखल झालेत.

### गाळ काढण्यावरून तिघांची मारहाण

मोर्शी : फिर्यादी अरविंद हजारे (४०, रा. पिंपरी, ता. मोर्शी) यांचे सायवाडा शिवारात शेत आहे. ते शेतातील विहिरीमधील गाळ काढत होते. त्या वेळी बाजूच्या शेतातील आलेल्या तिघांनी त्यांना गाळ काढण्यास मनाई करीत मारहाण केली. ते ते बेशुद्ध पडताच मारेकरी पळून पळून गेले. त्यांच्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### शेतातील गंजीला लावली आग

तिवसा : सोंगणी करून लावलेल्या हरभऱ्याच्या गंजीला अज्ञाताने आग लावली. त्यात संपूर्ण गंजीची राखरांगोळी झाली. ही घटना तिवसा येथे घडली. त्यामुळे शेकऱ्याचे अंदाजे ८० हजारांचे नुकसान झाले. या संदर्भात नंदकिशोर निळकंठराव देशमुख (४९, रा. तिवसा) यांच्या तक्रारीवरून तिवसा पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### गोडाऊन फोडून लाखोंचा मुद्देमाल लंपास

दर्यापूर : येथील धनंजय लॉज येथे रोडिनीया एनर्जी प्रा. लि. कंपनीचे गोडाऊन आहे. अज्ञाताने त्याचे कुलूप तोडून अंदाजे अडीच लाखांचा मुद्देमाल चोरून नेला. प्रोजेक्ट मॅनेजर गौरव रुपरावजी सैनी (४७, रा. छपरा, त. लाडवा, जि. कुरूक्षेत्र, हरियाणा) यांच्या तक्रारीवरून दर्यापूर पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखले केला.

### दारू विक्रेत्यावर पोलिसांची कारवाई

अमरावती : अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्या महिलेवर नागपुरी गेट पोलिसांनी कारवाई केली. तिच्या ताब्यातून २४ नग पावट्या जप्त केल्यात. त्याची अंदाजे किंमत १ हजार ९२० रुपये आहे. ही कारवाई रतनगंज परिसरात करण्यात आली.

# ५५१ ग्रामपंचायतींसाठी प्रभागरचना कार्यक्रम जाहीर

## २३ एप्रिल रोजी रचना होणार निश्चित

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.९ :** जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ दरम्यान मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर केला आहे. यासंदर्भातील आदेश ग्राम विकास विभागाने निर्गमित केले आहेत. या कार्यक्रमाअंतर्गत २३ एप्रिल रोजी प्रभाग रचना अंतिम होणार असून मे महिन्यात ग्रामपंचायतींमध्ये निवडणुका लागण्याचे संकेत आहे.

जिल्ह्यात ५५१ ग्रामपंचायतींचा कार्यकाळ १० ते १७ फेब्रुवारी दरम्यान संपुष्टात आला आहे. या ग्रामपंचायतींवर



प्रशासक बसविण्याला न्यायालयाची स्थगिती मिळाली असताना मंगळवारी शासनाकडून ग्रामपंचायतींसाठी प्रभाग रचना करण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### ७ एप्रिलपासून हरकती व सूचना स्वीकारणार

७ एप्रिल २०२६ पर्यंत प्रारूप प्रभाग रचनेला प्रसिद्धी देऊन हरकती स्वीकारल्या जाणार आहे. १३ एप्रिलपर्यंत यावर हरकती स्वीकारल्या जाणार आहे. १६ एप्रिल रोजी उपविभागीय अधिकाऱ्यांकडून यावर सुनावणी होईल. २१ एप्रिलपर्यंत अभिप्रायासह प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केले जाईल. २३ एप्रिल रोजी प्रभाग रचना अंतिम केली जाणार आहे.

याअंतर्गत २० फेब्रुवारी पर्यंत तहसीलस्तरावर नकाशे अंतिम केले जाणार आहे. २७ फेब्रुवारीपर्यंत तलाठी व ग्रामसेवक यांनी संयुक्त पाहणी करून प्रभाग पाडणे व सीमा निश्चित करणे, ५ मार्चपर्यंत तहसीलदारांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत प्रारूप प्रभाग रचनेची तपासणी, ११ मार्चपर्यंत प्रस्ताव उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे, १७ मार्चपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडून तपासणी करून प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविणे, २३ मार्चपर्यंत आयोगाकडून आवश्यक दुरुस्ती व मान्यता देणे व ३० मार्चपर्यंत समितीकडून अंतिम प्रारूपास मान्यता दिली जाणार आहे.

# तडीपार गुन्हेगार ताब्यात



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.९ :** शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी गुन्हे शाखेने गुरुवार, ५ मार्च २०२६ रोजी आक्रमक कारवाई करत एक तडीपार गुन्हेगार ताब्यात घेतला. हा धाडसी इसम मसानगंज गार्डन परिसरातील पोस्टे नागपुरी गेट हद्दीत पकडला गेला असून त्याच्याकडून धारधार लोखंडी चाकू जप्त करण्यात आला.गुन्हे शाखेचे पथक संपूर्ण पोलीस आयुक्तालय हद्दीत नियमित पेट्रोलिंग करत असताना संशयास्पद हालचाल करणाऱ्या २९ वर्षीय जब्बार खा. रऊफ खा (रा. अन्सार नगर वाडी, अमरावती) या तडीपार इसमाचा मागोवा लागला. त्याची झडती घेतल्यावर त्याच्याकडून सुमारे ५०० रुपयांचा धारधार लोखंडी चाकू जप्त झाला. सदर इसमाविरुद्ध नागपुरी गेटपोलीस ठाण्यात कलम १४२ मपोका तसेच ४/२५ आर्म ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस सध्या पुढील तपास करत आहेत. गुन्हे शाखेची तत्पर आणि आक्रमक कारवाई शहरातील नागरिकांसाठी सुरक्षा व शांततेचा संदेश देणारी ठरली आहे.

# समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घेणार

## डॉ.अर्चना रोठे यांचे प्रतिपादन | दख्खन कुणबी समाज मेळावा उत्साहात

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि.९ :** समाजाच्या विकासासाठी शिक्षण, आरोग्य सुविधा, आर्थिक समानता, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक एकोपा अत्यंत महत्त्वाचा आहे.समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घेणार असून सर्व सुविधा देण्याचे काम आमदार प्रतापदादा अडसड यांच्या नेतृत्वात करणार असल्याचे मत नगराध्यक्ष डॉ.अर्चना अडसड- रोठे यांनी व्यक्त केले. दख्खन कुणबी समाज संघटन यांच्या वतीने सर्वोदय कॉलनी हनुमान मंदिर येथे मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी .प्रतिभाताई अरूणभाऊ अडसड, धामणगाव विधानसभा प्रमुख रावसाहेब रोठे, कृष्णा प्रतापदादा अडसड, सेवानिवृत्त प्राचार्य योगेंद्र गांडोळे, गणेश कडगे, व्यावसायिक प्रवीण परिमल यांची




उपस्थिती होती.कुणबी समाजाचे बहुतांश कुटूंब वास्तव्यास आहे. पण समाजातील या कुटूंबाचा एकमेकांशी पाहीजे तसा ओळख परिचय नाही.

समाजातील कुटूंबाचा एकमेकांशी ओळख ,परिचय व्हावा व ऋणानुबंध वाढावा या साठी स्नेहमीलन मेळावा आयोजित करण्यात आला होता .अर्थसंकल्पीय अधिवेशनात व्यस्त असल्याने मुंबई येथून आमदार प्रतापदादा अडसड यांनी या मेळाव्याला शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक वैष्णवी अशोकराव ढाले,तर संचालन विनोद वरकड तसेच आभार प्रदर्शनआर्या विनोद वरकड हिने केले. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिलांचा गौरव करणे म्हणजे रोहिणी फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद

## दर्यापूर येथे आयोजित कार्यक्रमात खासदार बळवंत वानखडे यांचे प्रतिपादन

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**दर्यापूर, दि.९ :** कष्टकरी ज्येष्ठ महिलेचा गौरव करणे ही रोहिणी फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन खासदार बळवंत वानखडे यांनी केले ते सत्कार प्रसंगी बोलत होते प्रत्येक कष्टकरी ज्येष्ठ महिला यांच्या निवासस्थानी जाऊन गौरव करण्यात आला रोहिणी फाउंडेशन दर्यापूर सामाजिक कार्यात अग्रेसर असते त्या आधारे दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धाजागतिक महिला दिनाच्या निमित्ताने रोहिणी फाउंडेशन दर्यापूर तर्फे आयोजित कार्यक्रममध्ये अध्यक्ष म्हणून किशोर ठाकूर तर प्रमुख पाहुणे म्हणून अमरावती लोकसभा मतदार संघाचे खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते तर रोहिणी फाउंडेशन दर्यापूर चे मार्गदर्शक गजानन



देशमुख यांच्या उपस्थितीत कार्यक्रमचे औचित्य साधून दर्यापूर मधील कष्टकरी विधवा महिलांनी आपल्या स्व कर्तृत्व साधून आपल्या जीवनात,समाजात व सामाजिक कार्यात लौकिक मिळवला अशा कर्तबगार महिलांचा सत्कार रोहिणी फाउंडेशन दर्यापूर तर्फे वरील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला त्यामध्ये ज्येष्ठ महिला,कष्टकरी महिला,प्रामुख्याने श्रीमती अलका अशोकसिंह गहरवार, श्रीमती लक्ष्मीबाई गोपाल सिंह बयस, श्रीमती शालू नरेश कंटाळे , श्रीमती देवांगना नरेश धानिस्कर,श्रीमती कांताबाई रामचंद्र तायडे,श्रीमती कृष्णाबाई श्रीराम पवार, श्रीमती वैशाली नंदू सावळे, श्रीमती जूलेखाबाई जिक्करभाई घाणीवाले यांचा सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव निलेश पारडे तर आभार प्रदर्शन उपाध्यक्ष संतोष मिसाळ यांनी केले कार्यक्रमा सूत्रसंचालन गजानन देशमुख यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्याकरता किशोर ठाकूर,संतोष मिसाळ,निलेश पारडे,सौ रितिका देशमुख,स्नेहल धानिस्कर, वैभव देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले सत्कार सोहळा पाहून तीन महिलांच्या डोळ्यात अक्षरशः पाणी आले होते. त्यांच्या सुनबाई समोर हा सत्कार झाला तसेच कष्टकरी सुनबाई समोर त्यांच्या सासूचाही सत्कार करण्यात आला हे विशेष होय.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघ अचलपुर महिला आघाडी जाहीर

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि.९ :** राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव घोलप माजी समाज कल्याणमंत्री यांच्या आदेशानुसार राष्ट्रीय चर्मकार महासंघाची अचलपूर येथे महिला जिल्हाध्यक्षा राधाताई कुरील यांच्या अध्यक्षतेखाली तसेच राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अमरावती जिल्हाध्यक्ष निलेश जामठे, जिल्हा संपर्कप्रमुख पी.बी.वनस्कर, शिक्षक आघाडीचे विदर्भ अध्यक्ष प्रा.गजानन वानरे, जिल्हा उपाध्यक्ष मनोहर कोथळकर, अचलपूर तालुका अध्यक्ष रामा लाहाळके, चिखलदरा तालुका अध्यक्ष सतिश घोरे, सामाजिक कार्यकर्ते दिलीप



तायडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीमध्ये महिला कार्यकारणी नियुक्तीपत्र देऊन जाहीर करण्यात आली.

यामध्ये अचलपूर महीला तालुका अध्यक्षा जयश्री निलेश डामरे, जिल्हा उपाध्यक्षा रश्मी रविंद्र भागवतकर, अचलपूर शहर अध्यक्षा पुष्पा आशिष भागवत, अचलपूर शहर उपाध्यक्षा दिपाली किशोर भागवतकर, अचलपूर शहर सचिव वर्षा गजानन सरोदे, अचलपूर शहर कोषाध्यक्षा वैशाली अमोल डामरे, अचलपूर शहर संघटका अल्का संजय भागवतकर, अचलपूर शहर कार्याध्यक्षा अंजली दिनकर भागवतकर, महिराबपुरा महिला कार्यकारणी मध्ये शाखा अध्यक्षा मोनू चेतन सरोदे, शाखा उपाध्यक्षा मीनाक्षी सुकेश भागवतकर, शाखा सचिव पूजा नरेंद्र गव्हाळे यांना नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली.

# बुद्धांनी महिलांना समान हक्क दिला : नयन मोंढे

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.९ :** जगाला स्त्री-पुरुष समानतेचा संदेश देण्याचे महान कार्य अडीच हजार वर्षांपूर्वीच तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी केले. त्यांनी महिलांना भिक्खू संघात स्थान देऊन स्त्रीला धर्म, समाज आणि विचारांच्या क्षेत्रात समान हक्क दिले. त्यामुळे महिलांना भिक्खू संघात प्रवेश मिळालेला तोच दिवस खऱ्या अर्थाने महिला दिन असल्याचे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे सचिव नयन मोंढे यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित भारतीय बौद्ध महासभेची रविवारची बुद्ध वंदना कार्यक्रमात बोलत होते. अमरावती बडनेरा शाखेच्या वतीने गणपती नगर, येथील विश्वरत्न आंबेडकर

## जागतिक महिला दिनानिमित्त बुद्ध वंदना



वाचनालय येथे रविवारची ३७८ वी बुद्ध वंदना पार पडली. जिल्हा पर्यटन व प्रचार सचिव नयन मोंढे यांनी महिलांचे अधिकार व सद्यस्थिती या विषयावर बौद्ध उपासक उपासिकांना धम्मदेशना दिली. जिल्हाध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मोंढे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे की, समाजाची प्रगती ही त्या समाजातील महिलांनी केलेल्या प्रगतीवरून मोजता येते. या विचारातूनच महिलांच्या शिक्षण, स्वातंत्र्य आणि अधिकारासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या भारतीय संविधानामुळे आज महिलांना समान हक्क मिळाले असून त्या राष्ट्रपती, प्रधानमंत्री यांसारख्या सर्वोच्च पदांवरही विराजमान झाल्या आहेत.

**उत्पन्न** — झेडपीच्या तिजोरीत वाढ, आराखड्यात होणार समावेश

# मुद्रांक शुल्क, जमीन महसूलपोटी २६.४६ कोटी रुपयांची वसूली

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.९ :** आर्थिक वर्षाच्या अखेरीस जिल्हा परिषदेला मुद्रांक शुल्क, जमीन महसूलपोटी २६.४६ कोटींचा धनलाभ झाला आहे. आगामी नियोजनात त्याचा सहभाग करून पंचायत समितीस्तरावर सदरचा निधी वितरीत केल्या जाणार आहे.जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध योजना राबवून विकासकामे केली जातात. मुद्रांक शुल्क हा जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत आहे.

जिल्हा परिषदेला यंदाच्या आर्थिक वर्षात नोव्हेंबर महिन्यात ६ कोटी ६३




लाख ४३ हजार ६२० रुपये व नुकताच १९ कोटी ८३ लाख ५० हजार ३६५ मुद्रांक शुल्कातून शासनाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गत काही वर्षांपासून खोळंबल्या आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर नगरपंचायत, नगरपरिषद, महापालिकेच्या निवडणुका पार पडल्या. राज्यातील १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समितीचा अपवाद सोडला तर अमरावतीसह विदर्भात जिल्हा परिषदेच्या निवडणुका अद्याप झालेल्या नाहीत. अशातच सध्या प्रशासक राजवटीमुळे जिल्हा परिषदेला प्रलंबित असलेला मुद्रांक शुल्काचा पहिल्या टप्पात सुमारे १९ कोटी ८३ लाख ५० हजार ३६५रुपयांचा तर जमीन व महसूलचा सुमारे ६ कोटी ६३ लाख ४३ हजार ६२० अशा एकूण २६ कोटी ४६ लाख ९३ हजार ९७६ रुपयांचा निधी मिळाला आहे. विशेष म्हणजे, मुद्रांक शुल्क निधी प्राप्त झाल्याने विकासकामांना गती मिळणार आहे. यामधून विविध योजनाही राबविण्यात येणार आहेत.

> मुद्रांक शुल्काची काही रक्कम शासनाकडे थकीत आहे. परंतु, शासनाने यंदा आतापर्यंत दोन टप्प्यात मुद्रांक शुल्काचे १९ कोटी ८३ लाख रुपयांवर निधी जिल्हा परिषदेला दिली आहे. त्यामुळे योजना राबविणे जिल्हा परिषदेला सोयीचे ठरणार आहे.
>
> **शिल्पा पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद**

# पृथ्वी वाचवायची असेल तर पर्यावरण संवर्धन काळाची गरज!

## पर्यावरण तज्ज्ञ डॉ. जयंत वडतकर यांचे मनोगत

**अमरावती,दि.९ :** आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात वन्यजीव व पर्यावरण संवर्धन ही केवळ एक सामाजिक जबाबदारी नसून मानवजातीच्या अस्तित्वाशी निगडित गरज बनली आहे.



औद्योगिकीकरण, शहरीकरण, जंगलतोड, प्रदूषण आणि हवामान बदल यामुळे नैसर्गिक संतुलन बिघडत आहे. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण आणि वन्यजीवांचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक झाल्याचे मत राष्ट्रीय पर्यावरण तज्ञ डॉ. जयंत वडतकर यांनी व्यक्त केले. ते सुकळी येथील पिएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत गुरुवारी ( दि. २६) एक्सपर्ट टॉक या कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना बोलत होते. यावेळी विद्यार्थ्यांशी दिलखुलास चर्चा करतांना डॉ. वडतकर म्हणाले, आपल्याभोवतालचे नैसर्गिक घटक हवा, पाणी, जमीन, वनस्पती आणि प्राणी. हे सर्व घटक एकमेकांशी घट्ट जोडलेले आहेत. अन्नसाखळी व अन्नजाळे यांद्वारे प्रत्येक सजीवाचे अस्तित्व इतरांवर अवलंबून असते. जर एखादी प्रजाती नष्ट झाली तर त्याचा परिणाम संपूर्ण पर्यावरणावर होतो. उदाहरणार्थ, वाघासारखा प्रमुख शिकारी प्राणी कमी झाला तर शाकाहारी प्राण्यांची संख्या वाढते आणि वनस्पतींचे नुकसान होते. त्यामुळे जैवविविधतेचे संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. वन्यजीव व पर्यावरण संरक्षण कायद्या संदर्भात सांगतांना ते म्हणाले.

## थोडक्यात



### पुसदच्या पत्रे लेआऊटमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात

**पुसद :** येथील पत्रे लेआऊटमधील छत्रपती उद्यानात ८ मार्च रोजी महिला मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. राजमाता जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन करून महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. या उपक्रमामुळे परिसरातील महिलांना संघटित होऊन आपले सुप्त गुण सादर करण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ मिळून नवी ऊर्जा मिळाली. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी नगरसेविका ऐश्वर्या बोरकर होत्या. प्रास्ताविकात संध्या विरखडे यांनी सावित्रीबाई फुले ते प्रतिभाताई पाटील यांच्या कार्याचा आढावा घेत स्त्रिया आता सर्वच क्षेत्रांत सबला झाल्याचे सांगितले. ऐश्वर्या बोरकर यांनी महिलांना समाजकार्यात सहभागी होण्याचे आवाहन करत प्रभागातील समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी महिलांसाठी विविध कलागुण स्पर्धा पार पडल्या. कार्यक्रमाचे संचालन व आभार संध्या विरखडे यांनी मानले. भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### पांढरकवड्यात श्री गोपाळकृष्ण मंदिर विकासाचा मार्ग मोकळा

**पांढरकवडा :** येथील श्री गोपाळकृष्ण मंदिराच्या विकासाचा मार्ग ५ मार्च रोजी सामोपचाराने मोकळा झाला. मंदिराच्या जागेतील दुकानदारांनी जागा खाली करण्यास संमती दिल्याने अनेक वर्षांचा वाद मिटला आहे. या निर्णयामुळे आता मंदिर परिसरात मंगल कार्यालय, वृद्धाश्रम आणि स्पर्धा परीक्षा अभ्यासिका यांसारख्या समाजोपयोगी प्रकल्पांना गती मिळणार असून परिसरात समाधानाचे वातावरण आहे. विशेष बैठकीत सुरेश अग्रवाल, अतुल मायी आणि राजेश नार्लावार यांनी विकासासाठी दुकाने रिकामी करण्याचे मान्य केल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. अंकित नैताम यांनी मंदिर विकास हा सामाजिक विषय असल्याचे सांगत जुन्या वादावर दिलगिरी व्यक्त केली. बैठकीत नवीन सभागृह, सवलतीच्या दरातील मंगल कार्यालय, वृद्धाश्रम आणि एमपीएससी-यूपीएससी अभ्यासिकेचा महत्त्वपूर्ण निर्णय झाला. यावेळी अध्यक्ष डॉ. उपेंद्र वेदपाठक, संजय चिंतावार, मधुकर गुडावार, अनिल काळे, प्रकाश गावंडे, शिशिर कुलकर्णी, डॉ. नारायण उपलेंचवार, डॉ. संजय तोडासे, राहुल भानेगावकर व कृष्णा देवघरे उपस्थित होते. युवा टायगर फोर्सचे मदन जिड्डेवार, सुनील बोकीलवार, बंडू नक्षणे व सुधीर जुवारे यांनीही या प्रक्रियेत सहभाग घेतला. संवाद आणि समन्वयामुळे पांढरकवड्याच्या या प्राचीन श्रद्धास्थानाच्या वैभवात आता मोलाची भर पडणार असून समाजोपयोगी उपक्रम तातडीने सुरू होणार आहेत.



### 'मानसिक थकवा' या विषयावर विशेष कार्यशाळा संपन्न


यवतमाळ : जिल्हाधिकारी कार्यालयात ४ मार्च रोजी लेखापरीक्षण विभागातील कर्मचाऱ्यांसाठी 'मानसिक थकवा' या विषयावर विशेष कार्यशाळा संपन्न झाली. नोकरी आणि वैयक्तिक आयुष्याचा समतोल बिघडल्यामुळे येणारा ताण कमी करण्यासाठी मानसशास्त्राचे विद्यार्थी अमित कांबळे यांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढून त्यांना ताणमुक्त जीवन जगण्याची नवी दिशा मिळाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय सहनिबंधक सुदाम रोडगे, जिल्हा विशेष लेखापरीक्षक श्रीनिवास पांढरे, पुरुषोत्तम बोबडे, चंद्रशेखर भोयर आणि सुजित जाधव उपस्थित होते. अमित कांबळे यांनी कार्यालयीन कामकाजात येणाऱ्या नकारात्मक विचारांचे व्यवस्थापन आणि डिजिटल युगातील आव्हानांवर सोप्या भाषेत प्रकाश टाकला. मानवी वर्तनातील घटना, विचार, भावना आणि कृती हे चार टप्पे त्यांनी विविध उदाहरणांतून समजावून दिले. अचानक येणाऱ्या कामाच्या दबावाला यशस्वीपणे कसे हाताळावे, याचे कौशल्यही त्यांनी शिकवले. दैनंदिन जीवनात मानसिक समृद्धीसाठी काही उपयुक्त सवयींचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. या संवादी कार्यशाळेत कर्मचाऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास गवळी यांनी केले, तर आभार पराग गौतम यांनी मानले.

# ग्रामीण भागाला फ्लोराईडचा विळखा

## प्रशासकीय दुर्लक्षामुळे जनतेचे आरोग्य धोक्यात, ३७८ जलशुद्धीकरण यंत्रे झाली भंगार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ९ :** जिल्ह्यातील ३७८ गावांमधील नागरिक प्रशासकीय दुर्लक्षामुळे फ्लोराईडयुक्त दूषित पाणी पिण्यास मजबूर झाले आहेत. कोट्यवधी रुपये खर्च करून बसवलेली जलशुद्धीकरण यंत्रे वर्षभरापासून बंद असल्याने केळापूर, झरीजामणी, पुसद आणि आर्णी तालुक्यात आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. देखभालीच्या अभावामुळे ही यंत्रणा आज शोभेची वस्तू ठरली असून, जिल्हा परिषद प्रशासनाच्या या दिरंगाईमुळे लाखो ग्रामस्थांचे आरोग्य टांगणीवर लागले असून जनमानसात तीव्र संताप व्यक्त होत आहे.




यवतमाळ जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न अत्यंत जटील झाला आहे. काही वर्षांपूर्वी जिल्ह्यात दूषित पाण्याचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन सरकारने मोठ्या उत्साहात आणि गाजावाजा करत जलशुद्धीकरण यंत्रे कार्यान्वित केली होती. मात्र, आज याच यंत्रणेच्या दुरवस्थेमुळे दुर्गम आणि आदिवासी बहुल भागांत परिस्थिती भीषण बनली असून सामान्य नागरिक हतबल झाले आहेत. विशेषतः केळापूर, झरीजामणी, पुसद, आर्णी आणि यवतमाळ तालुक्यातील आदिवासी बहुल गावांमध्ये पाण्याचे स्त्रोत पूर्णपणे दूषित झाले आहेत. प्रदूषणामुळे बालके आणि माता धोक्यात असतानाही जिल्हा परिषद प्रशासन आणि पाणी पुरवठा विभाग अजूनही सुस्त असल्याचे विदारक चित्र दिसून येते. जिल्हा परिषदेच्या प्रत्येक बैठकीमध्ये प्रभावित गावांची नवी यादी तयार करून आश्वासनांची खैरात केली जाते, परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र कागदावरच राहते. परिणामी सामान्य जनतेच्या नशिबी पुन्हा तेच दूषित पाणी पिणे आले आहे. ग्रामपंचायतींनी पंचायत समिती स्तरावर वारंवार पत्रव्यवहार करून दुरुस्तीची मागणी केली, तरीही प्रशासनाने त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. हे प्रशासन नागरिकांच्या मृत्यूची वाट पाहत आहे का, असा संतप्त सवाल आता ग्रामीण जनतेकडून विचारला जात आहे. पाणी पुरवठा विभागाच्या फाईल्स आजही प्रशासकीय टेबलांवर धूळ खात पडल्या असून, तांत्रिक कारणांचे निमित्त देऊन लोकप्रतिनिधींची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप होत आहे. प्रशासकीय अनास्थेमुळे ग्रामीण जनतेमध्ये प्रशासनाविरुद्ध कमालीची अस्वस्थता असून, जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने या गावांचा दौरा करण्याची गरज निर्माण झाली आहे. केवळ आकडेवारीचा खेळ न खेळता, तातडीने स्वच्छ पाणी उपलब्ध न केल्यास, संतप्त नागरिक जिल्हाधिकारी कार्यालयावर हंडा मोर्चा काढण्याच्या तयारीमध्ये आहेत. ही विदारक परिस्थिती सुधारण्यासाठी प्रशासनाने एसी केबिनमधून बाहेर पडून सर्वसामान्यांचे दुःख जाणून घेणे आवश्यक आहे. केवळ आश्वासनांनी लोकांची तहान भागणार नाही, तर त्यासाठी तातडीने कृतीची गरज आहे.

### मानवी आरोग्यावर परिणाम

फ्लोराईडयुक्त पाणी पिणे म्हणजे एक प्रकारचे 'स्लो पॉयझन' असून, यामुळे ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्य धोक्यात आले आहे. दूषित पाण्यामुळे लहान मुलांचे दात पिवळे पडणे आणि हाडे ठिसूळ होण्याचे प्रमाण वाढले आहे. गरोदर मातांना या पाण्याचा सर्वाधिक धोका असून, यामुळे पचनसंस्थेचे गंभीर विकार आणि सांधेदुखी जडते. यवतमाळच्या दुर्गम भागातील अनेक पिढ्या आज या आजारांच्या विळख्यात अडकल्या असून, प्रशासकीय बेजबाजदारपणामुळे आरोग्याची आणीबाणी निर्माण होण्याची भीती वर्तवण्यात येते.

### अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

जिल्ह्यातील ३७८ गावांमध्ये बसवण्यात आलेली लाखो रुपयांची जलशुद्धीकरण यंत्रे आज भंगार अवस्थेत आहेत. कंत्राटदारांची मुदत संपल्यानंतर नवीन व्यवस्था न करणे, तांत्रिक बिघाड आणि विद्युत देयकांकडे दुर्लक्ष केल्याने ही यंत्रणा शोभेची वस्तू बनली आहे. जनतेचा पैसा अशा प्रकारे वाया घालवणाऱ्या कंत्राटदारांवर आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई का होत नाही? निविदा प्रक्रिया आणि निधीचे कारण पुढे करून ग्रामपंचायतींच्या पत्रांना केराची टोपली दाखविणाऱ्या प्रशासकीय सुस्तीमुळे जनतेचा रोष शिगेला पोहोचला आहे.

# दिव्यांग व्यक्तींना साहित्याचे वाटप

## खासदार संजय देशमुख यांच्याहस्ते वितरण

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**दिग्रस, दि. ९ :** दिग्रस पंचायत समिती सभागृहात शनिवारी (दि. ७) खासदार संजय देशमुख यांच्या हस्ते १८१ दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना मोफत सहाय्यक उपकरणांचे वाटप करण्यात आले. वाढत्या वयातील व्याधी आणि अपंगत्वावर मात करून गरजू बांधवांना स्वावलंबी बनवण्यासाठी 'राष्ट्रीय वयोश्री योजने'अंतर्गत हे साहित्य देण्यात आले असून, यामुळे लाभार्थ्यांचे जीवन अधिक सुसह्य होणार आहे.

खासदार संजय देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला शिवसेना उबाठाचे तालुकाप्रमुख रवींद्र अरगडे, शहरप्रमुख राहुल देशपांडे, दीपक वानखडे, रामकृष्ण इंगोले आणि सखाराम तुंडलवार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. गरजूंच्या जीवनातील अंधार दूर करणे हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे खासदार देशमुख यांनी सांगितले. यावेळी व्यासपीठावर तेजस गावंडे, रमेश चव्हाण, पुरुषोत्तम कुडवे, निलेश सगणे, रवी काळे, नगरसेवक अब्दुल गफार अब्दुल सत्तार, बिलाल मीरावाले, रमजू पटेल, श्रीराम नरळे, सचिन रत्नपारखी आणि ईश्वर फाउंडेशनचे प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एलिम्को मुंबईचे डॉ. रमेश पावरा यांनी केले, तर गटविकास अधिकारी रमेश खरोडे यांनी मनोगत व्यक्त केले. विस्तार अधिकारी जतकर यांनी आभार मानले. या उपक्रमामुळे दिग्रस तालुक्यातील अनेक गरजू ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग बांधवांनी प्रशासनाप्रती मोठे समाधान व्यक्त केले आहे.

# डॉ. अंजली गवार्ले यांना दिल्लीत राष्ट्रीय आरोग्य सेवा उत्कृष्टता पुरस्कार प्रदान

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ९ :** येथील प्रसिद्ध शल्य चिकित्सक डॉ. अंजली आशिष गवार्ले यांना जागतिक महिला दिनानिमित्त दिल्ली येथे 'राष्ट्रीय आरोग्य सेवा उत्कृष्टता पुरस्कार २०२६' देऊन गौरविण्यात आले. आरोग्य क्षेत्रातील १५ वर्षांचा अनुभव आणि उल्लेखनीय सामाजिक योगदानाची दखल घेऊन 'नॅशनल वूमन पार्लमेंट' कार्यक्रमात हा सन्मान करण्यात आला असून, यामुळे विदर्भाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



डॉ. अंजली गवार्ले या मुळव्याध, फिशर व भगंदर तज्ज्ञ असून इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव नोंदविणाऱ्या त्या विदर्भातील एकमेव महिला शल्य चिकित्सक आहेत. त्यांनी इजिप्तसह विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांत भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. रुग्णसेवेसोबतच त्यांनी शाळा, महाविद्यालये व खेड्यापाड्यात आरोग्य मार्गदर्शन, कॅन्सर जनजागृती आणि व्यसनमुक्तीवर शिबिरे घेतली आहेत. प्रजासत्ताक दिनी महिलांचे रक्तदान शिबिर घेणाऱ्या त्या एकमेव डॉक्टर आहेत. त्यांनी 'अर्शश्रुता' आणि 'आयुर्वेदा मॉडर्न व्ह्यू' या पुस्तकांचे लेखनही केले आहे. यापूर्वी त्यांना दुबई, लंडन, शेगाव आणि सातारा येथील विविध नामांकित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्या लायन्स क्लब, रोटरी क्लब, आधार फाउंडेशन आणि निमा असोसिएशनच्या सक्रिय सदस्या आहेत. दुर्धर आजारातून रुग्ण मुक्त झाल्यावर मिळणारे समाधान हीच आपली ऊर्जा असल्याचे डॉ. अंजली गवार्ले यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले. त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या जेवणात भेसळयुक्त तूप

## नेर येथील प्रकार, भारतीय विद्यार्थी मोर्चाचा एल्गार; समाजकल्याण आयुक्तांकडे तक्रार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नेर (परसोपंत), दि. ९ :** येथील मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वसतिगृहात जेवणात भेसळयुक्त तूप वापरल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस आला आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या अत्यंत गंभीर घटनेची समाजकल्याण आयुक्तांकडे लेखी तक्रार करत भारतीय विद्यार्थी मोर्चाने दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली असून, न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिल्याने खळबळ उडाली आहे.

नेर तालुक्यातील डोल्हारी मार्गे दारव्हा रोडवर असलेल्या मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वसतिगृहात हा संतापजनक प्रकार घडला. विद्यार्थ्यांना जेवणात चक्क भेसळयुक्त तूप दिले जात असल्याची माहिती वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी भारत मुक्ती मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांना दिली. यानंतर पदाधिकाऱ्यांनी थेट वसतिगृहाला भेट देऊन व्यवस्थापनाशी चर्चा केली आणि हा धक्कादायक प्रकार उघडकीस आणला. भेसळयुक्त अन्नामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. या बेजबाबदारपणाला सर्व संबंधित शासकीय अधिकारी जबाबदार असल्याचा आरोप करत, या प्रकरणाची निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी बोलताना भारतीय विद्यार्थी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष जयशील कांबळे यांनी सांगितले की, केवळ नेरच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रातील मागासवर्गीय शासकीय वसतिगृहांमध्ये हा प्रकार राजरोसपणे सुरू आहे, आणि आम्ही हे खपवून घेणार नाही. ॲड. रोशना आडे यांनी प्रशासनाला धारेवर धरत सांगितले की, विद्यार्थ्यांना जेवण देण्यापूर्वी खाद्यपदार्थांचे नमुने घेऊन त्यांचे कठोर परीक्षण करावे. विद्यार्थ्यांच्या या निर्णायक लढाईत भारतीय विद्यार्थी मोर्चा पूर्ण ताकदीनिशी त्यांच्या पाठीशी उभा राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या आंदोलनात भारतीय विद्यार्थी मोर्चासह भारतीय बेरोजगार मोर्चा, भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय पीछडा वर्ग ओबीसी मोर्चा आणि बहुजन मुक्ती पार्टीचे असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी न्यायाची मागणी केली.

# प्रांजली टेंभेकर यांना आचार्य पदवी प्रदान

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ९ :** येथील प्रांजली टेंभेकर यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या २३ व्या दीक्षांत समारंभात शिक्षणशास्त्र विषयात आचार्य (पीएच.डी.) पदवी प्राप्त केली. माध्यमिक विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी व स्मृतीक्षमतेवरील संशोधनासाठी त्यांना हा सन्मान मिळाला. या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे कौतुक होत असून परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



प्रांजली यांनी आपला संशोधन प्रबंध शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा येथील प्रा. डॉ. नूतन बी. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पूर्ण केला. त्या डोंगरकर्डा येथील सेवानिवृत्त शिक्षिका कीर्ती टेंभेकर आणि चंद्रशेखर टेंभेकर यांच्या कन्या आहेत. आपल्या या यशाचे श्रेय त्यांनी पती चंद्रकांत पवार, आई-वडील आणि गुरुजनांना दिले असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# यवतमाळ झेडपीत 'पोक्सो' कायद्यावर कार्यशाळा!

## केंद्रप्रमुखांना मिळाले बाल संरक्षणाचे धडे, महिला दिनी जिल्हा परिषदेचा अभिनव उपक्रम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ९ :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद यवतमाळच्यावतीने बालकांच्या सुरक्षिततेसाठी एक महत्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्या संकल्पनेतून, जिल्ह्यातील सर्व केंद्रप्रमुखांसाठी 'बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२' (पोक्सो) या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा जिल्हा परिषद सभागृहात उत्साहात पार पडली.



जिल्हा बाल संरक्षण कक्ष, महिला व बाल कल्याण विभाग आणि शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बदलत्या सामाजिक परिस्थितीत आणि तंत्रज्ञानाच्या युगात बालकांची सुरक्षा हा कळीचा मुद्दा बनला असून, या पार्श्वभूमीवर शिक्षण क्षेत्रातील मुख्य दुवा असलेल्या केंद्रप्रमुखांची क्षमता बांधणी करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. कार्यशाळेच्या मुख्य मार्गदर्शिका ॲड. ज्योती खांडपासोळे यांनी उपस्थितांना गुन्ह्यांचे स्वरूप, कडक कायदेशीर तरतुदी आणि शिक्षकांची जबाबदारी यावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी 'बालविवाह प्रतिबंध' करण्याबाबत सामूहिक शपथ घेतली. या कार्यक्रमाला विशाल जाधव (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बा.क.), प्रकाश मिश्रा (शिक्षणाधिकारी), वासुदेवराव डायरे (अध्यक्ष, बाल कल्याण समिती), अनिल गायकवाड, लीना आदे, गजानन जुमळे आणि रवींद्र गजभिये यांसह इतर मान्यवर उपस्थित होते. जिल्हा स्तरावरील या यशस्वी कार्यशाळेनंतर, आता जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये अशाच प्रकारे जनजागृती सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी देवेंद्र राजुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वप्नील शेटे, महेश हळदे, माधुरी पावडे, आकाश बुर्रेवार आणि चाईल्ड हेल्पलाईनच्या टीमने परिश्रम घेतले.

### व्यापक जनजागृतीचा निर्धार!

कार्यशाळेत ॲड. ज्योती खांडपासोळे यांनी बाल लैंगिक शोषणासारख्या घटना रोखण्यासाठी आणि पीडित बालकांना न्याय मिळवून देण्यासाठी शिक्षकांची भूमिका किती महत्वाची आहे, हे अधोरेखित केले. बाल कल्याण समिती, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, पोलिस प्रशासन आणि चाईल्ड हेल्पलाईन यांच्या कार्यपद्धतीची माहिती केंद्रप्रमुखांना देण्यात आली. आता हा जनजागृतीचा लढा केवळ जिल्हा स्तरापुरता मर्यादित न राहता, प्रत्येक तालुका आणि शाळा पातळीपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# रस्त्याच्या निकृष्ट कामाविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

## बहुजन मुक्ती पार्टी आक्रमक; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**दिग्रस, दि. ९ :** जिल्ह्यातील अंतरगाव ते चिखलवर्धा या प्रमुख जिल्हा रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने बहुजन मुक्ती पार्टीने आज जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. रस्ते बांधणीत तांत्रिक मानकांचे उल्लंघन आणि भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप करीत, निकृष्ट साहित्यामुळे अपघातांचा धोका वाढल्याने नागरिकांनी संताप व्यक्त करीत कडक चौकशीची मागणी केली आहे.

अंतरगाव-केळझरा-सावळी-उमरी-कापेश्वर-चिखलवर्धा या रस्त्याच्या कामात निविदेतील अटी व शर्तींचे उल्लंघन होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. मेटल लेयर, खडीकरण आणि डांबरीकरणाच्या कामात हलक्या दर्जाचे साहित्य वापरले जात असून, यामुळे सरकारी निधीचा अपव्यय होत आहे. या प्रकरणी कामाची स्वतंत्र गुणवत्ता तपासणी करून दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदन देताना भारतीय बेरोजगार मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष भुवन मुनेश्वर, लोकसभा अध्यक्ष बिमोद मुधाने, रोषना आडे, राजेंद्र देठे, राजीव डफाडे, देवराव साठे, चंद्रशेखर पाढेन, संतोष भगत, युवराज आडे, विलास भोयर, मधुकर हटकरे, नरेंद्र खरतडे, उत्तम बनसोड, अरुण गोसाई, मिलिंद बडसे, कैलाश भगत, यशवंत कावलकर, उल्हास बहादे, ओमप्रकाश कांबळे, नानाभाऊ पाचभाई, सुनील वेले, प्रकाश वावरे, सागर कंदाके, मनोज बुरघाटे आणि करण फुलमाळी उपस्थित होते. तातडीने कारवाई न झाल्यास काम बंद आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

अजिंक्य भारत
# आपलं यवतमाळ
मंगळवार दि. १० मार्च २०२६ www.ajinkyabharat.com


## महत्वाचे

### अध्यक्षपदी एल.पी. राठोड



**यवतमाळ :** मुख्यमंत्री बळीराजा शेत/पांदण रस्ता योजनेच्या दिग्रस तालुका विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या अध्यक्षपदी लोपचंद पिता राठोड (एल. पी. राठोड) यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील शेतीमालाची वाहतूक सुलभ व्हावी आणि शेतकऱ्यांना दर्जेदार रस्ते उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने शासनाने ही नियुक्ती केली असून, यामुळे रखडलेल्या पांदण रस्त्यांच्या कामांना आता वेग मिळणार आहे. एल. पी. राठोड यांच्या निवडीबद्दल परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे. अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर राठोड यांनी सांगितले की, प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत योजनेचा लाभ पोहोचविण्यासाठी ते प्रामाणिकपणे प्रयत्न करतील. पांदण रस्त्यांची कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी स्थानिक यंत्रणांशी योग्य समन्वय साधला जाईल. या निवडीबद्दल विविध सामाजिक व राजकीय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### तरुणावर रॉडने हल्ला

**यवतमाळ:** वडगाव रोडवरील लक्ष्मी कृपा सोसायटीमध्ये जागेच्या जुन्या वादावरून एका तरुणाला लोखंडी रॉडने मारून जखमी करण्यात आले. फिर्यादी प्रवीण पुंडलीकराव बोकडे (४६) यांच्याशी आरोपी सुरेश माणीराव माटे, प्रज्वल माटे, अरुण माटे आणि अनिकेत माटे यांनी संगनमत करून वाद घातला. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता घडलेल्या या घटनेत आरोपींनी प्रवीण यांच्या डोळ्याच्या वर लोखंडी रॉडने प्रहार केला, ज्यामध्ये ते जखमी झाले. याप्रकरणी अवधूतवाडी पोलिसांनी चौघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५१(२), ११८(१) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### दुचाकी चोरीला

**पांढरकवडा:** केळापूर तालुक्यातील सायखेडा येथून ३२ हजार रुपये किमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने पळवली. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७ वाजता ही घटना घडली. फिर्यादी विकास मनोहर सोयाम (३५) यांनी आपली मोटारसायकल (MH-२९ AQ ९८२४) घरासमोर उभी केली होती, जिथून ती लंपास करण्यात आली. १९ फेब्रुवारी रोजी पांढरकवडा पोलीस ठाण्यात याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

# ‘हाफ तिकीट’साठी ‘स्मार्ट कार्ड’ची सक्ती!

## एसटी महामंडळाचा नवा फतवा; ५०टक्के सवलतीसाठी बसस्थानकावर महिला आणि ज्येष्ठांची गर्दी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.९ :** ‘सवलत दिली एका हाताने आणि त्रास वाढवला दुसऱ्या होताने!’ अशीच काहीशी अवस्था सध्या राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून प्रवास करणाऱ्या महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची झाली आहे. राज्य शासनाने ’महिला सन्मान योजने’अंतर्गत महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत जाहीर केली होती. मात्र, आता ही सवलत मिळविण्यासाठी ’नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड’ किंवा ’स्मार्ट कार्ड’ काढणे सक्तीचे करण्यात आल्याने सर्वसामान्यांचे चांगलेच हाल होत आहेत. यवतमाळसह संपूर्ण जिल्ह्यातील बसस्थानकांवर या कार्डसाठी महिला आणि वयोवृद्ध नागरिकांच्या दररोज लांबच लांब रांगा लागत असून, कडक उन्हात त्यांची मोठी ससेहोलपट सुरू आहे.

राज्य शासनाने २०२३ मध्ये अत्यंत गाजावाजा करत महिलांसाठी एसटी प्रवासात ५० टक्के सवलत लागू केली होती. या घोषणेनंतर एसटीतून प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांच्या संख्येत मोठी वाढ झाली. आतापर्यंत महिला केवळ आपले आधार कार्ड किंवा इतर ओळखपत्र दाखवून या सवलतीचा सहज लाभ घेत होत्या. मात्र, डिजिटल व्यवहारांना चालना देण्याच्या नावाखाली आता एसटी महामंडळाने ’नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड’ प्रणाली लागू केली आहे. या नव्या नियमानुसार, ५० टक्के सवलतीचा लाभ चालू ठेवण्यासाठी महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना आता हे स्मार्ट कार्ड काढणे बंधनकारक करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, हे कार्ड मोफत नसून त्यासाठी सुमारे १९९ रुपये शुल्क आकारले जात आहे. तसेच, या कार्डमध्ये ठराविक किमान रक्कम (बॅलन्स) शिल्लक ठेवण्याचीही सक्ती करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे‘मोफत सवलतीसाठी पैसे का मोजायचे?‘असा संतप्त सवाल प्रवाशांमधून विचारला जात आहे. या नव्या आणि किचकट नियमामुळे यवतमाळ बसस्थानकावर मोठा गोंधळ उडाला आहे. ग्रामीण भागातून अनेक महिला आणि वयोवृद्ध आजी-आजोबा केवळहे कार्ड काढण्यासाठी शहरात येत आहेत. मात्र, अपुरी यंत्रणा आणि संथ गतीने चालणाऱ्या कामामुळे त्यांना कडक उन्हात तासन्तास रांगेत तिष्ठत राहावे लागत आहे. एकीकडे उन्हाळ्याच्या झळा वाढू लागल्या आहेत, तर दुसरीकडे तासन्तास रांगेत उभे राहिल्याने अनेकांना भोवळ येण्याचे प्रकार घडत आहेत. ‘पन्नास टक्क्यांची सवलत नको, पण हा त्रास थांबवा,‘ अशी उद्विग्न प्रतिक्रिया रांगेत उभ्या असलेल्या ग्रामीण महिलांकडून व्यक्त केली जात आहे. केवळ यवतमाळच नाही, तर जिल्ह्यातील बहुतांश बसस्थानकांवर सध्या हीच विदारक परिस्थिती पाहायला मिळत आहे.

### सामाजिक संघटना आक्रमक

**एसटी महामंडळाच्या या भोंगळ आणि त्रासदायक कारभाराविरोधात सामाजिक संघटनांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. शेतकरी चळवळीचे प्रा. पंढरी पाठे, यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटी सोशल मीडियाचे अध्यक्ष कृष्णा पुसनाके, सुरेश कुमरे आणि कॉम्रेड सचिन मनवर यांनी या प्रकाराचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे. ‘महिलांना ५० टक्के सवलतीचे आमिष दाखवून, आता कार्डच्या नावाखाली त्यांच्याकडून १९९ रुपये उकळणे आणि त्यांना तासन्तास उन्हात रांगेत उभे करणे हा अत्यंत संतापजनक प्रकार आहे. शासनाने केवळ डिजिटलच्या नावाखाली गरिबांचा छळ करू नये,‘ असा घणाघाती आरोप या नेत्यांनी केला आहे.**

### कार्ड वितरणाची प्रक्रिया सुलभ करावी

**याप्रश्नी राज्य शासनाने आणि एसटी महामंडळाने तत्काळ सकारात्मक तोडगा काढावा. कार्ड वितरणाची प्रक्रिया अत्यंत सोपी आणि विनाशुल्क करावी, तसेच वयोवृद्ध आणि महिलांची होणारी ससेहोलपट त्वरित थांबवावी. अन्यथा या अन्यायाविरोधात रस्त्यावर उतरून मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल, असा खणखणीत इशाराही देण्यात आला आहे. आता एसटी महामंडळ या सर्व गोंधळावर काय मार्ग काढते आणि प्रवाशांना दिलासा देण्यासाठी काही पर्यायी आणि सोयिस्कर व्यवस्था करते का, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.**

# रेती वाहतुकीचे दोन टिप्पर तलाठ्याने सोडले

## उमरखेड येथील घटना, कारवाईऐवजी ‘स्वहित’ जोपासल्याने महसूल प्रशासनावर प्रश्नचिन्ह

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**उमरखेड, दि. ९ :** येथील माहेश्वरी पुतळ्याजवळ रविवारी (दि. ८) दुपारी रेतीने भरलेले दोन विना नंबरचे टिप्पर एका तलाठ्याने तपासणीसाठी अडविले. मात्र, कोणतीही कायदेशीर कारवाई न करता आर्थिक तडजोड करून हे दोन्ही टिप्पर सोडून दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडाला असून भ्रष्ट कर्मचाऱ्यांमुळे तस्करीला पाठबळ मिळत असल्याची चर्चा सर्वत्र रंगली आहे.

उमरखेड तालुक्यात सध्या रेती तस्करीचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले असून पैनगंगा नदीपात्रातून अवैधरित्या वाळूचे उत्खनन सुरू आहे. रविवारी, (दि.८) दुपारी ४ वाजताच्या सुमारास महागाव रोडकडून दोन विना नंबरचे टिप्पर शहरात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याकडून गायत्री चौकाकडे जात असताना माहेश्वरी पुतळ्याजवळ तहसील कार्यालयांतर्गत कार्यरत असलेल्या एका तलाठ्याने हे दोन्ही टिप्पर थांबवले. यावेळी तलाठ्याने सदर वाहने कवडाशा बाबा रोडवर थांबवून चालकांशी गुप्त चर्चा केली. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, कोणतीही अधिकृत पावती न फाडता किंवा जप्तीची कारवाई न करता केवळ स्वतःचा ’खिसा गरम’ करून तलाठ्याने दोन्ही टिप्पर बिनधास्तपणे सोडून दिले. तालुक्यातील रेती तस्कर महसूल प्रशासनाच्या नाकावर टिच्चून दिवसाढवळ्या रेतीची चोरटी वाहतूक करीत असताना, अशा प्रकारे जबाबदार कर्मचाऱ्यानेच तस्करांना मदत केल्याने संताप व्यक्त होत आहे. विना नंबर प्लेट असलेल्या वाहनांची शहरातून राजरोसपणे वाहतूक होत असल्याने प्रशासनाचा वचक संपला की काय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. ’कुंपणच शेत खात असल्याचा’ हा प्रकार समोर आल्यानंतर आता वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. रेती तस्करीला अभय देणाऱ्या या ’झारीतील शुक्राचार्यांचा’ शोध घेऊन संबंधित तलाठ्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सजग नागरिकांकडून होत आहे. या तस्करीमुळे पर्यावरणाचे नुकसान होत असून शासनाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे अशा भ्रष्ट कर्मचाऱ्यांची झाडाझडती घेण्याची आवश्यकता आहे.

# चोरीच्या संशयावरून तरुणाचा खून

## इचोरी येथील घटना, कोंबड्याच्या चोरीचा संशय, आरोपीस अटक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि. ९ :** तालुक्यातील ईचोरी गावात रविवारी (दि. ८) कोंबडा चोरल्याच्या केवळ संशयावरून एका तरुणाची काठीने बेदम मारहाण करून हत्या करण्यात आली. किशोर राजू कुंभेकर असे मृत युवकाचे नाव असून, या धक्कादायक प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पोलिसांनी याप्रकरणी मुख्य आरोपीला तातडीने अटक केली असून पुढील तपास वेगाने सुरू आहे.

ईचोरी येथील किसन शामा घोटेकर याचा कोंबडा हरविल्याने, तो गावातीलच किशोर राजू कुंभेकर याने चोरल्याचा संशय त्याला होता. याच कारणावरून रविवारी, (दि. ८) किसनने किशोरशी जोरदार वाद घातला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि संतापलेल्या किसनने किशोरवर काठीने हल्ला चढविला. या हल्ल्यात घाव वर्मी बसल्याने किशोर कुंभेकरचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर गावात प्रचंड तणाव निर्माण झाला होता. मृतक किशोरचे वडील राजू बापूराव कुंभेकर यांनी लाडखेड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी किसन शामा घोटेकर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ (१) नुसार खुनाचा गुन्हा नोंदविला. घटनेची माहिती मिळाताच उपविभागीय पोलिस अधिकारी भोरें, ठाणेदार विनायक लंबे आणि पोलीस उपनिरीक्षक जायभाये यांनी तातडीने घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी अत्यंत वेगाने हालचाली करीत आरोपी किसनला गावातूनच ताब्यात घेऊन अटक केली आहे. किशोरचा मृतदेह शवविच्छेदनासाठी यवतमाळच्या शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला असून, या भीषण घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. क्षुल्लक कारणावरून घडलेल्या या हिंसक कृत्याचा सर्वच स्तरातून निषेध होत आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक जायभाये करत असून पोलिस आता प्रत्यक्षदर्शींच्या साक्षी नोंदवीत आहेत.

# उमरखेडच्या वृद्ध भावंडांचे उपोषण सुटले

## नितीन भुतडा यांच्या आश्वासनानंतर घेतला निर्णय

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. ९ :** रेल्वे कंत्राटदाराने फसवणूक केल्यामुळे मुळावा येथील तीन वृद्ध शेतकरी भावंडांनी सोमवारी (दि. ९) उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर पुकारलेले आमरण उपोषण अखेर मागे घेण्यात आले. भाजप नेते नितीन भुतडा यांनी मध्यस्थी करीत कंत्राटदाराकडून शेतातील खड्डे बुजवून देण्याचे ठोस आश्वासन दिल्याने, या वयोवृद्ध शेतकऱ्यांच्या आरोग्याचा विचार करून प्रशासकीय उपस्थितीत उपोषण सोडवण्यात आले.

मुळावा येथील माजी जिल्हा परिषद सभापती शहांजी खडसे, भागोराव खडसे आणि सुदाम खडसे या तीन भावंडांच्या शेतातून रेल्वे कंत्राटदाराने मुरुमाचे उत्खनन केले होते. कराराप्रमाणे मुरुमाचे खड्डे मातीने भरून शेत समतल करून देण्याचे ठरले होते, मात्र कंत्राटदार काम अर्धवट सोडून पळून गेला. यामुळे खडसे बंधूंचे मोठे नुकसान झाले. अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी हे तिन्ही वृद्ध शेतकरी उपोषणाला बसले होते. याची दखल घेत भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी उपोषण मंडपाला भेट दिली. त्यांनी तातडीने संबंधित कंपनीचे प्रतिनिधी व महसूल अधिकाऱ्यांशी चर्चा करून काम पूर्ण करून घेण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर नितीन भुतडा, काँग्रेस नेते तातूजी देशमुख आणि वंचित बहुजन आघाडीचे नेते दामोदर यांच्या हस्ते उपोषणकर्त्यांना सरबत पाजून उपोषण स्थगित करण्यात आले. याप्रसंगी माजी पोलिस पाटील साहेबराव खडसे, गणेशराव खडसे, उपसरपंच देशमुख, पत्रकार विलास चव्हाण, सुभाष बरडे, नायब तहसीलदार राणे, अक्षय बोनगुलवार, अनाथपिंडक खडसे आणि मुळावा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकप्रतिनिधींच्या सकारात्मक मध्यस्थीमुळे वयोवृद्ध शेतकऱ्यांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

# ’इएसझेड’क्षेत्रातील अनधिकृत रिसॉर्ट्सची चौकशी

## टिपेश्वर अभयारण्य; प्रधान मुख्य वनसंरक्षकांचे तातडीने चौकशी करण्याचे आदेश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**पांढरकवडा, दि.९ :** तालुक्यातील टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य परिसरातील इको सेन्सिटिव्ह झोन (इएसझेड) क्षेत्रात सुरू असलेल्या कथित बेकायदेशीर रिसॉर्ट व कृषी पर्यटन प्रकल्पांच्या प्रकरणाने आता राज्यस्तरावर लक्ष वेधले असून या प्रकरणाची राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) कार्यालयाने गंभीर दखल घेतली आहे. नागपूर येथील वन भवनातून संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने चौकशी करून सविस्तर वस्तुस्थिती अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पांढरकवडा येथील सामाजिक कार्यकर्ते अंकित नैताम यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालयाने यवतमाळ येथील मुख्य वनसंरक्षक तसेच मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक यांना प्रकरणाची तपासणी करून केलेल्या कारवाईचा अहवाल शासनास व नागपूर कार्यालयास सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तक्रारीनुसार टिपेश्वर अभयारण्यालगतच्या ’इएसझेड’ क्षेत्रात मागील काही वर्षांत अनेक रिसॉर्ट, हॉटेल व कृषी पर्यटन प्रकल्प उभारण्यात आले असून त्यामध्ये पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विशेषतः केंद्र शासनाच्या १७ जानेवारी २०१६ च्या ’इएसझेड’अधिसूचनेचे उल्लंघन, वन्यजीव संरक्षण कायद्याचे संभाव्य उल्लंघन तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या ३ जून २०२२ च्या आदेशाचे पालन झाले आहे का, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. दरम्यान, जिल्हास्तरीय ’इएसझेड’समितीकडून या प्रकरणात अपेक्षित कारवाई न झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे सर्व संबंधित प्रकल्पांची संयुक्त विशेष तपासणी करून परवानगीशिवाय सुरू असलेल्या प्रकल्पांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. वनविभागाच्या सर्वोच्च कार्यालयाकडून चौकशीचे आदेश निघाल्याने टिपेश्वर अभयारण्य परिसरातील पर्यटन प्रकल्पांबाबत आता प्रशासनावर कारवाईचा दबाव वाढला असून या प्रकरणात पुढे काय घडामोडी होतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# आंबेडकरी विश्व साहित्य संमेलन यंदा व्हिएतनामला!

## जिल्ह्यातील १५ साहित्यिकांचा सहभाग; शासनाच्या अनुदानाविना स्वखर्चाने विचारांचा जागर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी








**उमरखेड, दि.९ :** जागतिक आंबेडकरी साहित्य महामंडळातर्फे आयोजित ’सहावे जागतिक आंबेडकरी साहित्य संमेलन’ यंदा व्हिएतनामची राजधानी हनोई येथे येत्या १५ ते २४ मार्च दरम्यान मोठ्या थाटात पार पडणार आहे. या आंतरराष्ट्रीय संमेलनात यवतमाळ जिल्ह्यातील तब्बल १५ साहित्यिक आणि विचारवंत आवर्जून सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे, कोणत्याही शासकीय अनुदानाविना सर्व साहित्यिक स्व:खर्चाने सातासमुद्रापार आंबेडकरी विचारांचा हा मोठा जागर करणार आहेत.

जागतिक स्तरावर आंबेडकरी विचारांचा आणि मराठी साहित्याचा प्रसार करण्यासाठी यापूर्वी बँकॉक (थायलंड), दुबई, श्रीलंका आणि मलेशिया येथे विश्व साहित्य संमेलने यशस्वीरीत्या पार पडली आहेत. यंदा हे सहावे संमेलन व्हिएतनाममध्ये होत असून, यात महाराष्ट्र आणि दिल्लीसह देशभरातून सुमारे ५०० प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या ऐतिहासिक संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध नाटककार डॉ. सुनील रामटेके यांची निवड झाली आहे. हनोई विद्यापीठाचे भाषाशास्त्र प्रमुख डॉ. ली व्हान चँग यांच्या हस्ते संमेलनाचे शानदार उद्घाटन होईल. स्वागत अध्यक्ष म्हणून जगप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ डॉ. जगन कराडे, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महामंडळाचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे उपस्थित राहणार आहेत. या जागतिक संमेलनात यवतमाळ जिल्ह्याला मोठा बहुमान मिळाला आहे. जागतिक कवी संमेलनाचे अध्यक्षस्थान उमरखेडचे प्रख्यात साहित्यिक व महामंडळाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. अनिल काळबांडे भूषविणार आहेत. या महोत्सवात प्रा. ज्योती खंदारे यांच्या ’वेगळे जग’ या प्रवासवर्णनाचे आणि कवयित्री शीला कदम यांच्या ’हृदयाची स्पंदने’या काव्यसंग्रहाचे प्रकाशन हनोई येथे मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. याशिवाय जिल्ह्यातील मुख्याध्यापक सुरेश कदम, बाळासाहेब सगसमकर, पुसद येथील पी. एन. कॉलेजच्या डॉ. अनिता कांबळे, ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. प्रदीप इंगोले, प्रा. अशोक तिवारी आणि प्रा. आनंद वाघमारे यांच्यासह १५प्रतिनिधी जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या संमेलनात परिसंवाद, कवी संमेलन, ग्रंथ प्रकाशन आणि सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

### स्व:खर्चाने हा वैचारिक जागर यशस्वी

**सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, या आंतरराष्ट्रीय संमेलनासाठी शासनाकडून किंवा इतर कोणाकडूनही एक रुपयाचेही अनुदान घेतले जात नाही. सर्व साहित्यिक पदरमोड करून स्व:खर्चाने हा वैचारिक जागर यशस्वी करतात, अशी माहिती कायदेविषयक सल्लागार ॲड. भूपेश पाटील यांनी दिली आहे. सातासमुद्रापार मराठी साहित्याचा आणि पुरोगामी विचारांचा झेंडा फडकवणाऱ्या या सर्व साहित्यिकांवर सध्या संपूर्ण जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**

# जागतिक महिला दिनी जेफ्री एपस्टीन फाईल प्रकरणाचा यवतमाळात निषेध

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि. ९ :** येथे जागतिक महिला दिनानिमित्त जेफ्री एपस्टीन फाईल प्रकरणातील दोषींवर कारवाई व्हावी, या मागणीसाठी रविवारी (दि. ८) निषेध रॅली काढण्यात आली. रखरखत्या उन्हात काढलेल्या या रॅलीत लहान मुलींवरील अत्याचाराचा निषेध करीत, आरोपींनी राजीनामे द्यावेत ही मागणी लावून धरण्यात आली असून यामुळे समाजात अन्यायाविरुद्ध लढण्याची नवी जाणीव निर्माण झाली आहे.

देशात आणि जगात कोवळ्या मुलींवर होणारे दुष्कर्म आणि बलात्कार या घटनांच्या निषेधार्थ ही रॅली काढण्यात आली होती. जेफ्री एपस्टीन फाईल प्रकरणात भारतातील काही प्रभावशाली व्यक्तींचे चेहरे समोर येऊनही अद्याप त्यांच्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई झाली नसल्याचा संताप यावेळी व्यक्त करण्यात आला. या निषेध रॅलीत अनेक लहान मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवित आपला रोष व्यक्त केला. विशेषतः, जिजाऊंची लेक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काश्यपी वि. दोंदल हिने हातात प्रतिकात्मक तलवार घेऊन या रॅलीचे नेतृत्व केले आणि एका खऱ्या योद्ध्याप्रमाणे अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. दोषींविरुद्ध त्वरित गुन्हे दाखल करून त्यांची पदावरून हकालपट्टी करावी, अशी प्रमुख मागणी यावेळी आंदोलकांनी केली. अन्यायाविरुद्ध लढण्याची ही प्रेरणा भविष्यात स्त्रियांच्या सुरक्षेसाठी महत्वाची ठरेल, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.